IRBK-0100296

म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे

विषय निबंध

दा क्र २९६

IRBK-0100296

IRBK-0100296

14 MAY 1972

व.अ.२९६

निबंध-

929.

वा. नि. ३८८
वि. १८१

वाल्मीकि-रामायण-परीक्षण.

(काव्यविषयक व कथाविषयक)

चिंतामण विनायक वैद्य, एम्. ए. एल् एल्. बी.
यांच्या
रिडल् ऑफ् धि रामायण ' या इंग्रजी ग्रंथाचें भाषांतर.
भाषान्तरकार:—
शिवराम गोविंद भावे.


IRBK-0100296

मुद्रक आणि प्रकाशक:—
शंकर नरहर जोशी, चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव पेठ, पुणें शहर.

१९२०] किंमत १॥ रुपया. [सर्व हक्क स्वाधीन.

२९६
नि. निबंध

ब. मु. सं. ठाणे, ज्ञानसाधना शाखा
दा. क. २९६ ... नों. दि. ...
वि. निबंध ...

प्रस्तावना.

Mahabharata a Criticism या नांवाच्या आपल्या इंग्रजी पुस्तकांत रा.रा. चिंतामणराव वैद्यांनीं प्रस्तावनेच्या आरंभीं म्हटलें आहे—

" महाभारत, रामायण आणि समानविषयक आणखी कांहीं पुस्तकें यांचा चिकित्सक दृष्टीनें अभ्यास केल्यामुळें या दोन काव्याविषयीं मला कित्येक नवीन कल्पना सुचल्या असून त्या लोकांसमोर तीन हप्त्यांनीं मांडण्याचा माझा विचार आहे. प्रस्तुत पुस्तकांत माझे महाभारताविषयींचे ऐतिहासिक दृष्टीचे व वाङ्मय दृष्टीचे विचार मी वाचकांपुढें मांडिले आहेत; हे माझे विचार वाचकांस आवडतात असें दिसून आल्यास याच दृष्टीचे माझे रामायणाविषयींचे विचार पुढें आणण्यास मला उत्तेजन मिळेल; तिसऱ्या पुस्तकांत या दोन जगन्मान्य महाकाव्यांवरून दिसून येणाऱ्या हिंदुस्थानच्या इ. स. पूर्वी ३००० पासून इ. स. पूर्वी ३०० पर्यंतच्या सामाजिक, धार्मिक व बौद्धिक परिस्थितीचें निरीक्षण करण्याचा माझा विचार आहे. "

वरील लिहिण्यास अनुसरून रा.रा. वैद्यांनीं आपले दुसरे दोन हप्ते इंग्रजी वाचकांसमोर ' रिडल् ऑफ दि रामायण ' व 'एपिक् इंडिया' या पुस्तकांच्या रूपानें मांडिले आहेत. प्रस्तुत पुस्तक या तिहींपैकीं मधल्याचें म्हणजे रिडल् ऑफ दि रामायण याचें भाषांतर होय. (राहिलेल्या दोन पुस्तकांपैकीं, पहिलें सबंध व दुसरें बहुतेक, रा. वैद्यांच्याच लेखणींतून उतरलेल्या "महाभारताचा उपसंहार" या पुस्तकावरून मराठी वाचकांस वाचावयास मिळतेंच आहे.)

मूळ पुस्तकांत चिंतामणरावजींनीं रामायणासंबंधींचे आपले ऐतिहासिक दृष्टीचे व वाङ्मय दृष्टीचे विचार दिले असून रामायण या शब्दानें मी वाल्मीकिरामायण समजतों असा त्यांनीं खुलासा केला आहे. रामायणाचा काव्यदृष्ट्या व ऐतिहासिक दृष्ट्या विचार केला असतां, ज्यांचें स्पष्टीकरण मनाला पटेल असें करणें जवळ जवळ अशक्य आहे, व याचमुळें जे कल्पित वाटतात असे अद्भुत प्रसंग व गोष्टी रामायणांत फार आढळत असल्यामुळें त्यांनीं या पुस्तकाला रिडल्स् ऑफ दि रामायण (रामायणाचे गूढ प्रश्न) हें नांव दिलें असून या गूढ प्रश्नांचीं त्यांनीं जीं स्पष्टीकरणें दिलीं आहेत तीं सर्वच बाबतींत खात्री पटविणारीं न वाटलीं तरी मनोरंजक खास वाटतील असा त्यांनीं आपला भरंवसा व्यक्त केला आहे.

प्रस्तुत पुस्तक वर वर्णन केलेल्या पुस्तकाचें भाषांतर होय हें प्रथमतः सांगितलेंच आहे. एक दोन ठिकाणांखेरीज मूळ ग्रंथ मराठींत जसाच्या तसा उतरविण्याचा प्रयत्न केला आहे. रामायणकाव्याला व रामकथेला साधें सरळ रूप दिलें असतांही त्यांतील उदात्तपणा कमी न होतां उलट सरळपणानें तो कसा वाढतो हें निव्वळ मराठी वाचकांच्या ध्यानांत यावें; रामायणासारखें प्राचीन, सन्मान्य, स्वभावमधुर, रसपूर्ण व उदात्त काव्य वाचण्याची प्रवृत्ति (ही प्रवृत्ति नष्ट झाल्यामुळेंच रामकथेसंबंधीं खुद्द रामायणांत नसणाऱ्या कित्येक असंभाव्य गोष्टी आमच्या दंतकथांत उत्पन्न झाल्या आहेत.) नष्ट झाली आहे ती पुन्हा प्रसृत व्हावी आणि आपल्याच मधील एका विद्वानाचे बहुमान्य विचार केवळ इंग्रजींतच न राहतां मराठी वाचकांसही त्यांचा आस्वाद घेतां यावा या तीन हेतूंनीं हें भाषांतर केलें आहे; व हे हेतु थोड्याफार प्रमाणानें साध्य झाल्यास भाषांतरकर्त्याच्या श्रमाचें चीज झालेसें होणार आहे.

सोळाव्या शतकाच्या आरंभीं 'हर्नांडीस् कोर्टेस्' नांवाच्या धाडसी

स्पॅनिश वीरानें थोड्याशा स्पॅनिश लोकांसह अमेरिकेंत जाऊन मेक्सिको देश पादाक्रांत केला. कोर्टेसूच्या या विजयशाली स्वारीच्या इतिहासांत व रामाच्या लंकेवरील विजयशाली स्वारीच्या इतिहासांत बरेंच साम्य असल्यामुळें, रामायणांतील कांहीं गोष्टी कल्पित वाटतात त्या तशा नाहींत हें सिद्ध करण्याकरितां; व रामायण संबंधच कवीच्या कल्पनेचा खेळ आहे, त्यांत तथ्य मुळींच नाहीं, अशा व या प्रकारच्या कांहीं उपपत्त्या कांहीं विद्वानांकडून पुढें मांडण्यांत येतात त्या, रामायणांत वर्णिलेल्या प्रसंगांप्रमाणें अद्भुत प्रसंग नुक्तेच कोर्टेसूच्या स्वारींत घडलेले असल्यामुळें खऱ्या नाहींत, हें सिद्ध करण्याकरितां, आणि दुसऱ्या कित्येक गोष्टींचें स्पष्टीकरण करण्याकरितां मेक्सिकोच्या सदर इतिहासांतील पुष्कळ प्रसंगांचे निर्देश प्रस्तुत पुस्तकाच्या कथाविषयक विवेचनांत अनेक वेळां आले आहेत. इंग्रजी वाचकांना सदर इतिहासाची थोडीबहुत माहिती असतेच; वास्तव मूळ पुस्तकांत सदर इतिहास परिशिष्टरूपानें देण्याची जरूर भासली नाहीं; परंतु हें भाषांतर निवळ मराठी वाचकांकरितां असल्यामुळें व त्यांना ज्यावरून या इतिहासाची माहिती मिळेल असें पुस्तक भाषांतरकर्त्याच्या पाहण्यांत नसल्याकारणानें सदर पुस्तकांत मूळ पुस्तकांत नसलेलें असें एक "स्पॅनिश लोकांनीं मेक्सिको काबीज केल्याचा वृत्तांत" या नांवाचें नवीन परिशिष्ट मुद्दाम तयार करून घातलें आहे. तें वाचकांनीं पुस्तक वाचण्याच्या अगोदर वाचल्यास पुस्तकांतील विवेचन समजण्यास सुलभ होईल.

त्याचप्रमाणें परिशिष्ट 'इ' मधील 'दशरथजातक' नांवाची बौद्ध रामकथा प्रथम वांचावी अशीहि सूचना आहे. कारण उत्तरार्धांत सदर कथेच्या कालनिर्णयावर कांहीं महत्त्वाच्या मुद्द्यांचें विवेचन अवलंबून असल्यामुळें तिचा कालनिर्णय करितांना तदंतर्गत कथाभागावर टीकात्मक विवरण करावें लागलें आहे. तेव्हां तें वाचण्यापूर्वी 'दशरथ-

जातक ' म्हणजे काय याविषयीं नीट समजूत करून घेणें जरूर आहे. त्या योगें तें विवेचन समजण्यास जास्त मदत होईल.

शेवटीं चिंतामणरावजींच्या मदतीचा उल्लेख केल्यावांचून राहवत नाहीं. पुस्तक लिहिण्यास सुरवात केल्यापासून तों तें प्रकाशित होईपर्यंत, मूळ हस्तलिखित प्रत वाचण्याचें श्रम घेऊन, पुस्तकप्रकाशनाच्या बाबतींत प्रत्यक्ष साहाय्य करून व निरनिराळ्या बाबतींत प्रेमळ सल्ला देऊन, त्यांनीं मला अत्यंत ऋणी करून ठेविलें आहे. त्याचप्रमाणें माझ्या दोन अन्य प्रेमळ मित्रांनीं मला अनेक प्रकारें अमोलिक मदत केली त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानून ही अल्प प्रस्तावना पुरी करितों.

भाषांतरकर्ता.

अभिप्राय

१

रा. रा. शिवराम गोविंद भावे यांनीं केलेलें हें 'रिडल आफ् दि रामायण' या माझ्या पुस्तकाचें भाषांतर मीं समग्र वाचून पाहिलें आहे व योग्य ठिकाणीं दुरुस्तीच्या सूचनाही केल्या आहेत. हें भाषांतर चांगलें वठलें आहे व तें मनोरंजक व पाल्हाळरहित आहे. २० व्या शतकांत विवेचक बुद्धि सर्वत्र जागृत झाली असल्यानें निवळ मराठी वाचकांसही रामायणासंबंधींच्या अनेक असंभाव्य गोष्टी ऐतिहासिक दृष्ट्या कशा असाव्या हें जाणण्याची उत्सुकता असणें साहजिक आहे. तेव्हां माझ्या पुस्तकाचें मराठी भाषांतर मराठी वाचकांसमोर येणें योग्य आहे असें मला वाटतें. रामायणकाव्याला आणि रामकथेला सरळ स्वरूप दिलें असतांही त्यांतील उदात्तपणा कमी न होतां उलट सरळपणानें तो कसा वाढतो हें या पुस्तकावरून वाचकांच्या लक्षांत येईल.

कल्याण ता. २१ जुलै १९१८ चिंतामण विनायक वैद्य.

२

रा. रा. शिवराम गोविंद भावे, मु. पेण यांस सा. न. वि. विशेष. तुम्ही पाठविलेला "स्पॅनिश लोकांनीं मेक्सिको काबीज केल्याचा वृत्तांत" हा लेख वाचून तो जेथें नादुरुस्त वाटला तेथें दुरुस्त करून पाठवीत आहें. या दुरुस्त्या फार थोड्या आहेत; व एकंदर तुमची लेखनपद्धति फार नांवाजण्यासारखी आहे. पाल्हाळ न करतां मुद्याच्या गोष्टी मनोरंजक रीतीनें भारदस्त भाषेंत तुम्ही लिहिल्या आहेत. हा लेख पुस्तकांत छापण्यास लायक आहे; तरी लौकर छापावा.

कल्याण ता. २ २।४।१९१९ चिंतामण विनायक वैद्य.

अनुक्रमणिका.

काव्यविषयक

प्रकरण १ लें. ग्रंथकार वाल्मीकि.
,, २ रें. वाल्मीकीचें व हल्लीचें रामायण.
,, ३ रें. हल्लीच्या रामायणाचा रचनाकाल.
,, ४ थें. मूळ काव्याची पुनर्रचना होण्याचें कारण.
,, ५ वें. महाभारताच्या नमुन्यावर झालेली भर.
,, ६ वें. रामायण महाकाव्य कसें आहे ?

कथाविषयक

,, १ लें. रामकथेसंबंधीं वेबरची चुकीची उपपत्ति.
,, २ रें. भारतीय पुराणांचें ऐतिहासिक दृष्ट्या विवरण.
,, ३ रें. अयोध्येचा सूर्यवंश.
,, ४ थें. हिंदुस्तानांतील नानाविध जातीचे मूळ रहिवासी व त्यांची अमानुष कोटींत गणना.
,, ५ वें. राक्षस; त्यांचें उत्पत्तिस्थान व वसतिस्थान.
,, ६ वें. राक्षसांची शरीररचना व नरमांसाशनप्रवृत्ति.
,, ७ वें. त्यांचीं भारतीय आर्यांशीं झालेलीं रामापूर्वीचीं युद्धें.
,, ८ वें. रामाचा जन्म; त्याचें बाळपण, व त्याचा सीतेशीं विवाह.
,, ९ वें. देव देतो आणि दैव नेतें.
,, १० वें. भरताची भ्रातृनिष्ठा.

,, ११ वें. सीताहरण.
,, १२ वें. वानरसख्य.
,, १३ वें. लंकेचा वेढा.
,, १४ वें. दुःखद शेवट.

परिशिष्टें.

(अ.) रामायणाचा विस्तार आणि त्याच्या बंगाल व मुंबई आवृत्त्या.
(आ.) महाभारतांतील रामोपाख्यान व हल्लींचें रामायण यांमधील फरक.
(इ.) रामायणांतील कांहीं अत्युत्कृष्ट वचनें.
(ई.) दशरथजातक.
(उ.) राक्षसांचीं नांवें.
(ऊ.) सीतेचें लग्न बाळपणीं झालें काय?
(ऋ.) राम अगोदर कीं कृष्ण अगोदर.
(ऌ.) स्पॅनिश लोकांनीं मेक्सिको काबीज केल्याचा वृत्तांत.

———

काव्यविषयक

वि. १२१

वाल्मीकि-रामायण-परीक्षण.

शिवराम गोविंद भावे.

वा.नि.३८८ २ ३-१७ वा.नि.३८८

वाल्मीकिरामायण--परीक्षण.

(काव्यविषयक व कथाविषयक)

काव्यविषयक

प्रकरण १ लें.

ग्रंथकार.

रामायण हें रामचंद्राशीं समकालीन असलेल्या वाल्मीकि कवीनें लिहिलेलें ऐतिहासिक काव्य असून त्या दुःखपर्यवसायी कथानकांत स्वतः त्याचा संबंधही आलेला आहे. रामानें टाकून दिलेल्या सीतेचें रक्षण करून तिच्या जुळ्या मुलांना तो वाढवितो; व रामाच्या आयुष्यांतील अंतःकरणास थरारून सोडणाऱ्या प्रसंगावर काव्य रचून त्यांना तें गाण्यास शिकवितो. राम यज्ञ करीत असतां तीं मुलें त्याजकडे जाऊन त्यास तें काव्य गाऊन दाखवितात; (त्या यज्ञाला वाल्मीकीही आलेला होता;) या काव्यगायनामुळें झालेला अत्यंत दुःखप्रद व अंतःकरण विदारण करून टाकणारा असा जो परिणाम तो विश्रुतच आहे. निराशाग्रस्त, लज्जेमुळें व कोपानें कांपणारी, पतीवर निरतिशय प्रेम करणारी सीता सभेमध्यें पुढें येऊन शपथपुरस्सर म्हणते कीं, मी जर पूर्णपणें शुद्ध असेन तर भूमातेनें मला आपल्या उदरांत

आश्रय द्यावा; या तिच्या प्रार्थनेस तात्काल फळ येऊन तिची माता स्वर्गीय सिंहासनावर बसून जमिनीच्या आंतून पृष्ठभागावर येते व आपल्या कन्येला बरोबर घेऊन अदृश्य होते; हें पाहतांच राम निराश होतो, व हातांत दंड घेऊन भूमातेच्या मागोमाग जावयास निघतो; परंतु तेथें जमलेले ऋषि त्यास या अविचारापासून परावृत्त करतात; त्यानंतर कुश—लव आपले पुत्र आहेत असें राम कबूल करितो; व अवशिष्ट राहिलेल्या त्याच्या दुःखमय आयुष्यांत कुश—लव त्याच्या विसाव्याचें स्थान होतात.

रामायण रचण्यासंबंधीची कथा वरीलप्रमाणें असून ती रामायणांतच दिलेली आहे. परंतु रामायणाच्याच रचनेसंबंधीं तितकीच मनोरंजक कथा रामायणांतच दुसऱ्या ठिकाणीं सांपडते. ज्या अरण्यांत वाल्मीकि राहत असे त्यांत तो एकदां फिरत असतां, रतिसुखांत मग्न असलेल्या एका क्रौंच जोडप्यांतील नराला बाणानें मारतांना एका निषादास त्यानें पाहिलें.* पक्षी मरतांना दृष्टीस पडणारा देखावा पाहून व पक्षिणीचा आक्रोश ऐकून ऋषीचें प्रेमळ अंतःकरण कळवळलें व संतप्त मनःस्थितींत त्याच्या तोंडून छंदोबद्ध शापवाणी बाहेर पडली. संस्कृत वाङ्मयांत सुप्रसिद्ध असलेला तो श्लोक—

मा निषाद प्रतिष्ठां त्वमगमः शाश्वतीः समाः ।
यत्क्रौंचमिथुनादेकमवधीः काममोहितम् ॥

याप्रमाणें आहे.

आपल्या तोंडून बाहेर पडलेल्या उद्गारांतील तालबद्धता पाहून ऋषीस एक्याप्रकारें आनंद झाला; व त्याला त्यावेळीं, राक्षसराज

* मैथुन करीत असतांना प्राण्यास किंवा मृगास शिकाऱ्यानें मारूं नये असें धर्मशास्त्र आहे.

रावणानें केलेल्या सीताहरणाची गोष्ट नुकतीच घडलेली असल्यामुळें, तिची साहजिकच आठवण झाली असावी. त्यामुळें त्यानें त्या श्लोकाच्या नमुन्यावर श्लोक करून रामाचें आयुष्य व पराक्रम यांवर काव्य करण्याचा निश्चय केला. आद्यकर्वीचे ते छंदोबद्ध उद्गार ऐकून देवांनीं व ऋषींनीं त्याची स्तुति केली; व त्याच्या आद्यकवित्वपदप्राप्तीचें अभिनंदन करण्यास्तव स्वतः ब्रह्मदेव भूमीवर आला.

आधुनिक कालांत असा एक सिद्धांत काढला गेलेला आहे कीं, छंदोबद्ध रचना करण्याची प्रथम स्फूर्ति होण्यास जर कांहीं मूळ कारण घडलें असेल तर तें 'चित्तविक्षोभ' हेंच होय, वरील हकीगत या सिद्धांताशीं पूर्ण जुळती आहे. "एखाद्या वस्तूचा मनावर अत्यंत साहजिक व स्पष्ट परिणाम होऊन व त्या परिणामाच्या स्पष्टतेमुळें कल्पनाशक्ति व मनोविकार यांस सहज चालना मिळून संवेदनेमुळें उच्चारांत एक प्रकारचें माधुर्य व एक प्रकारची तालबद्धता येऊन झालेला जो परिणाम त्याचा उच्चार तें काव्य होय" अशी हॅझलिटनें काव्याची व्याख्या केली आहे. या एकंदर सिद्धान्तावरून वरील हकीगत खरी असावी असें वाटतें. संस्कृत वाङ्मयांतील काव्यरचनेमध्यें वेदांतील छंदांचा प्रथम उपयोग करणारा ऋषि वाल्मीकीच असावा; कारण वेदांतील छंद साधे व बंधरहित असून ते त्यानंतर ब्राह्मण व आरण्यकें शुद्ध गद्यांत लिहिणाऱ्या ऋषींना व आचार्यांना मनोवेधक वाटत नाहींसे झाले होते; व त्याच वेळीं संक्षिप्त सूत्रें व वचनें लिहिण्याची प्रवृत्ति हळूं हळूं उत्पन्न होत होती. अशा वेळीं वाल्मीकीनें वेदांतील छंदांचें पुनरुज्जीवन करून त्यांत थोडासा नियमबद्धपणा व त्याचबरोबर मोहकपणा आणला; व अशा रीतानें

काव्यरचनेस प्रोत्साहन दिलें. वेदांतील छंद, व संस्कृत वाङ्मयांतील छंद यांची तुलना हा विषय मोठा मनोरम आहे; व या ठिकाणीं त्यांपैकीं कांहीं छंदांची तुलना करून वाल्मीकीनें वेदांतील छंदांत काय सुधारणा केली हें आम्ही दाखवितों. वेदांतील अनुष्टुभ् वृत्तांत ४ चरण असून प्रत्येक चरणांत ८ अक्षरें असतात; या अक्षरांच्या दीर्घत्वाविषयीं किंवा लघुत्वाविषयीं मात्र मुळींच नियम नाहीं; परंतु वाल्मीकीच्या अनुष्टुभांत दोन नियम शिरले व ते " पहिल्या व तिसऱ्या चरणांतील पांचवें अक्षर दीर्घ, व दुसऱ्या आणि चवथ्या चरणांतील सातवें अक्षर लघु " हे होत. याप्रमाणें संस्कृतांत किंचित् नियमबद्ध अशा वृत्तांना आरंभ झाला; पुढें लांब लांब वृत्तांचा प्रसार होऊन प्रत्येक अक्षराच्या दीर्घपणाविषयीं व लघुपणाविषयीं नियम झाले असून आतां त्यांमध्यें फरक होणें अशक्य आहे. वेदांतील सर्वांत जास्त तालबद्ध मत्रांवरूनच हे दीर्घत्व–लघुत्व याविषयींचे नियम ठरविले गेले असले पाहिजेत. विशिष्ट उदाहरणेंच ध्यावयाचीं तर—

सहस्रशीर्षा पुरुषः सहस्राक्षः सहस्रपात् ।
स भूमिं विश्वतो वृत्वाऽत्यतिष्ठद्दशांगुलम् ॥

हा अनुष्टुभ् मंत्र संस्कृत वाङ्मयांतील अनुष्टुभाशीं चांगला जुळेल; व पुढें दिलेला त्रिष्टुभ् मंत्र इंद्रवज्रा किंवा उपेंद्रवज्रा यांच्या चालीवर म्हणण्यास त्यांत फारच थोडा फरक करावा लागेल.

वेदांतील.

उदीर्ष्व नार्यभिजीवलोकम्
गतासुमेतमुपशेष एहि ।
हस्तग्राभस्य दिधिषोस्तवेदम्
पत्युर्जनित्वमभिसंबभूव ॥

संस्कृत वाङ्मयांत.

उदीर्ष्व नारी अभिजीव लोकम्
गतासुमेतं उपशेष एहि ।
हस्ताग्रभस्या दिधिषोस्तवेदम्
पत्युर्जानित्वं अभिसंबभूव ॥

यावरून वाल्मीकीनें वेदांतील अनुष्टुभाला अर्वाचीन अनुष्टुभाचें रूप किती सहज दिलें हें दिसून येईल; वाल्मीकीचें अनुकरण पुष्कळांनीं वेदकालानंतर केलें असून व्यास हा त्यांतील प्रमुख होय. वेदांतील त्रिष्टुभाचें अर्वाचीन इन्द्रवज्रा अगर उपेंद्रवज्रा यांमध्यें रूपांतर होत असतांना त्याचीं स्थित्यंतरें कसकशीं होत गेलीं हें महाभारतावरून अजूनही दिसतें; कारण वैदिक कालांत ज्याप्रमाणें दीर्घलघुत्वासंबंधानें विधिनिषेध नव्हता, त्याचप्रमाणें व्यासाच्या कांहीं श्लोकांत दीर्घलघुत्वाविषयीं विधिनिषेध आढळत नाहीं. वाल्मीकीनें आपलें सर्व काव्य अनुष्टुभ् वृत्तांतच लिहिलें असावें; हल्लीं रामायणांत लांब वृत्तांमधील जे श्लोक सांपडतात ते रामायणाची पुनर्रचना झाली त्या वेळेस घातले गेले असावे, हें पुढें सिद्ध होणारच आहे.

वरील विवेचनावरून असें दिसून येईल कीं, ज्याप्रमाणें ब्रम्हर्षाला वैदिक संस्कृत काव्याचा पिता समजतात, त्याप्रमाणेंच वाल्मीकीला आधुनिक संस्कृत वाङमयाचा जनक म्हणणें हें अगदीं योग्य आहे. संस्कृत वाङ्मयांत या दोघांचाही 'आदिकवि' असा उल्लेख आहे. रघुवंश सर्ग १५ श्लोक ४१ यामध्यें " कवेरादस्य शासनात् " असें वचन असून भागवताच्या आदिम श्लोकांत " तेने ब्रह्महृदा य आदिकवये " असें म्हटलेलें आहे. असो; आदिकवि किंवा अलौकिक कवि या नात्यानें वाल्मीकीची कीर्ति

इतकी पसरलेली आहे कीं, त्याचा कित्येक ठिकाणीं नुसता "कवि" असा सुद्धां उल्लेख आहे. विश्व नांवाच्या कोशांत "कविर्वाल्मीकिशुक्रयोः" असें म्हटलेलें असून रघुवंश सर्ग १५ श्लोक ३२ यांत "कविः कुशलवावेवं चकार किल नामतः।" असें म्हटलें आहे.

कांहीं संस्कृतज्ञ "आदिकवि" या नांवाचें स्पष्टीकरण पहिल्या सर्गबद्ध काव्याचा कर्ता असें करितात. काव्यशास्त्रावरील प्रमाणभूत मानलेल्या ग्रंथांतून सर्गबद्ध काव्याची व्याख्या सांपडते; व तींतील विशेष म्हणजे काव्याचे विशिष्ट विभाग करून त्यांस 'सर्ग' हें नांव देणें हा होय. परंतु वाल्मीकीनें आपल्या मनोवृत्ति क्षुब्ध झालेल्या असतांना प्रचलित संस्कृत वाङ्मयांतील पहिला श्लोक उच्चारला या गोष्टीशीं वरील स्पष्टीकरण विसंगत आहे. त्या गोष्टि वरून असें स्पष्ट दिसतें कीं, वाल्मीकि हा एकाद्या विशिष्ट तऱ्हेच्या काव्याचा कर्ता नसून प्रचलित संस्कृत वाङ्मयांत काव्य त्यानें प्रथम लिहिलें आहे व त्याच्या आधींचे सर्व ऋषि गद्यांत लिहित असत. रघुवंशांतील (सर्ग १४ श्लोक ७०) "निषादविद्धाण्डजदर्शनोत्थः। श्लोकत्वमापद्यत यस्य शोकः।" या श्लोकावरील "चाण्डालं यदा भर्त्सयत्तदाप्रभृति दत्तानि पद्यान्यभवन्। पूर्वं वाक्यान्येवेति श्रूयते" ही मल्लिनाथाची टीका या बाबतींत उल्लेख करण्यास योग्य आहे.

वाल्मीकि हा पहिल्या सर्गबद्ध काव्याचा कर्ता होय ही कल्पना फोल असल्याचें प्रो. वेबर यांनीं केलेल्या विवेचनावरून सुद्धां सिद्ध करितां येईल. भवभूतीच्या कालापर्यंत म्हणजे इ. स. ७०० पर्यंत रामायणाच्या विभागांना सर्ग हें नांव नसून अध्याय हें नांव होतें. भवभूतीनें आपल्या उत्तररामचरितांत

खुद्द रामायणांतून एक वचन घेतलें असून तें कोठून घेतलें याबद्दल त्यानें जेथल्या तेथेंच खुलासा केला आहे. लव म्हणतो;

" बालकांडस्यांतिमे अध्यायेऽयं श्लोकः,
प्रकृत्यैव प्रिया सीता रामस्यासन्महात्मनः ।
प्रियभावः स तु तया स्वगुणैरेव वर्धितः ॥ "

हा श्लोक थोडा बदललेला असा बालकांडांतील शेवटल्या सर्गांत सांपडतो, व त्यावरून वरील अवतरण रामायणांतूनच घेतलें असावें याविषयीं संशय राहत नाहीं. अवतरण घेणारानें तें अध्यायांतून घेतलें आहे असें म्हटलें आहे; सर्गाचें तो नांव काढीत नाहीं; व यावरून रामायण भवभूतीच्या कालीं सर्गबद्ध काव्य नव्हतें हें सिद्ध होतें. रामायण हें एक नमुनेदार सर्गबद्ध काव्य आहे या कल्पनेनें हल्लीं रामायणांत प्रत्येक सर्गाच्या शेवटीं लांब व निराळ्या छंदांत सांपडणारे श्लोक भवभूतीच्यानंतर घुसडले गेले असावे. तर मग जर मूळ वाल्मीकि रामायण हें सर्गबद्ध काव्य नसेल तर वाल्मीकि हाच आद्य कवि होय, याचें कारण प्रचलित संस्कृत काव्यवाङ्मयांतील पहिला श्लोक त्यानें लिहिला असून त्याच्या आधींचे लेखक " ब्राह्मण " प्रमाणें गद्यच लिहित असत. व तो जर याप्रमाणें आद्य कवि ठरतो तर तो अनुष्टुभ् वृत्तांत असणाऱ्या अनेक ग्रंथांच्या कर्त्याच्या व त्याचप्रमाणें व्यासाच्याही पूर्वीचा असला पाहिजे हें उघड होतें.

वाल्मीकि व राम हे खरोखरच समकालीन होते कीं नाहीं, या प्रश्नाचें उत्तर समाधानकारक रीतीनें देतां येत नाहीं. रामायणांतील पहिला सर्ग जर वाल्मीकीइतका जुना असेल तर वाल्मीकीला रामाविषयीं माहिती कर्णपरंपरेनें मिळाली असें म्हटलें

पाहिजे. परंतु उलटपक्षीं वाल्मीकीचा रामायणांतील कथानकांत जो पुढें संबंध येतो तो आद्य रामायणांतही जर असेल तर तो समकालीन कवि असला पाहिजे हें उघड होतें. तो समकालीन होता कीं नाहीं हा वाद जरी सोडून दिला तरी वाल्मीकि हा फार प्राचीन ऋषि आहे; त्याचा उल्लेख **तैत्तिरीय प्रातिशाख्यांत** व **वाजसनेयी संहितेंत** सांपडतो. खुद्द महाभारतांत वाल्मीकि हा एक सन्मान्य ऋषि होता असा उल्लेख सांपडतो; कांहीं ठिकाणीं महाभारतांत तर रामायणांतील श्लोकच्या श्लोक उतरलेले आहेत. रामायणामध्यें कवीनें भौगोलिक ज्ञान इतर प्रांतापेक्षां अयोध्येच्या वायव्येकडील प्रदेशाचें जास्त विस्तृत दाखविलें आहे; व त्यावरून वाल्मीकि हा त्या भागांत राहणारा असावा असें अनुमान निघतें.

प्रकरण २ रें.

वाल्मीकीचें रामायण व हल्लींचें रामायण.

शोधक बुद्धीचा व सर्वमान्य असा जो रामायणावरील टीकाकार कतक ह्यानें जरी हल्लींच्या रामायणास आपली मान्यता दिली असली, तरी वाल्मीकीनें प्रथमतः लिहिलेलें काव्य हें हल्लींचें नव्हे असा संशय कितीहि जुन्यामताचा मनुष्य असला तरी त्याला आल्यावांचून राहणार नाहीं. हल्लींचें रामायण कोणीही अगदीं स्थूल दृष्टीनें जरी वाचलें तरी त्यांतील परस्परविरोधी गोष्टी; संदर्भातील तुटकपणा, जुन्या नव्या कल्पनांचा भरपूर

व अविरत गोंधळ वैगेरे गोष्टी पाहून त्यास आश्चर्य वाटल्याविना राहणार नाहीं. बंगालची आवृत्ति घ्या अगर मुंबईची आवृत्ति घ्या; दोहोंतही हींच स्थिति आढळते; व त्यावरून वाल्मीकीच्या मूळ काव्याची केव्हां तरी पुनरावृत्ति झाली असावी असा तर्क बांधावा लागतो.

परस्परांशीं विरोध असणारीं अशीं रामायणांतून कांहीं उदाहरणें दिलीं असतां, ज्यांनीं तें काव्य सबंध किंवा सूक्ष्म दृष्टीनें वाचलें नसेल त्यांची वरील विधानाबद्दल खात्री होईल. वाल्मीकीनें नारदाला या पृथ्वीतलावर सर्वोत्तम राजा कोण असा प्रश्न विचारल्यावरून नारदानें रामाचा नामनिर्देश करून त्याच्या आयुष्याची सर्व हकीगत थोडक्यांत वाल्मीकीस सांगितली अशी कथा रामायणाच्या पहिल्या सर्गांत आहे; व त्यामुळें हा सर्ग रामायणाचें सारसर्वस्व झालेला आहे. त्यावरून वाल्मीकीला प्रथमतः रामाच्या पराक्रमाविषयीं कांहींच माहिती नसावी असें दिसतें. परंतु उत्तरकांडांत वाल्मीकि स्वतःच सीतेला म्हणतो कीं, तुझा सासरा दशरथ माझ्या माहितींतला असून तो माझा मित्र आहे; जनकही माझ्या चांगला ओळखीचा असून, तुला रामानें कां टाकिलें हेंही मी जाणतों; यावरून असें दिसतें कीं, स्वतःला सर्व कांहीं माहीत असूनही वाल्मीकि नारदाला सर्वश्रेष्ठ राजा कोण असें विचारितो. अर्थातच या दोन परस्परविरोधी वचनांतून कोणतें तरी एक मागाहून घुसडलेलें असलें पाहिजे. दुसऱ्या एका ठिकाणींही हींच स्थिति आढळते. किष्किंधाकांडांत सुग्रीव " मला त्या दुष्ट राक्षसाचें निवासस्थान, त्याचें सामर्थ्य किंवा कुल माहीत नाहीं. " असें प्रथम म्हणतो;

न जाने निलयं तस्य सर्वथा पापरक्षसः ।
सामर्थ्यं विक्रमं वापि दौष्कुलेयस्य वा कुलम् ॥

परंतु तोच पुढें, वानरसमूह सीतेला शोधण्याकरितां निघाले असतां त्यांना सर्व विश्वाचें वर्णन सांगतो, व त्या वर्णनामध्यें लंकेविषयीं माहिती सांगून लंका रामाचा अपराध करणाऱ्या रावणाची होय या गोष्टीचाही निर्देश करितो.

स हि देशस्तु वध्यस्य रावणस्य दुरात्मनः ।
राक्षसाधिपतेर्वीरा सहस्राक्षसमद्युतेः ॥

राक्षसांच्या निवासस्थानाविषयीं सुग्रीवाला माहिती आहे याबद्दल खुद्द कबंधसुद्धां त्याची स्तुति करितो;

स हि स्थानानि कार्त्स्न्येन सर्वाणि कपिकुंजरः ।
नरमांसाशिनां लोके नैपुण्यादधिगच्छति ॥

या दोन विधानांतील विसंगति अगदीं अक्षम्य आहे. टीकाकाराच्या दृष्टीस सुद्धां हा विसंगतपणा आला असून त्यानें त्यांची संगति लावण्याचा प्रयत्न केला आहे. " न जाने " म्हणजे " तज्जाने एवेति शेषः । " असें त्याचें मत आहे. पण हा त्याचा प्रयत्न निष्फळ आहे. कारण तो स्पष्टपणें नकारार्थी असलेल्या वाक्याचा होकारार्थी अर्थ करीत आहे. परंतु इतकें करूनही " न जाने निलयं तस्य " या श्लोकाच्या पुढच्याच श्लोकाचें स्पष्टीकरण करतांना येणारी अडचण अगदीं अभेद्य आहे. कारण त्यांत सुग्रीव म्हणतो,

सत्यं तु प्रतिजानामि त्यज शोकमरिंदम ।
करिष्यामि तथा यत्नं यथा प्राप्स्यसि मैथिलीम् ॥

जर सुग्रीवाला रावणाचें वसतिस्थान खरोखरच माहीत नसेल तर त्याचे वरील उद्गार सुसंगत आहेत. परंतु टीकाकाराच्या

मताप्रमाणें जर त्याला तें माहीत आहे असें म्हटलें तर वरील श्लोकांत 'तु' या शब्दाच्या ऐवजीं 'च' हा शब्द यावयास पाहिजे होता. 'मला राक्षसांचीं निवासस्थानें माहीत आहेत व मी प्रतिज्ञेनें सांगतों कीं तुझी पत्नी तुला परत मिळेल' असें म्हणणें जास्त सयुक्तिक आहे. टीकाकाराच्या वरील मतावर यापेक्षां जास्त विवेचन करण्याची जरूरी नाहीं. खरें बोलावयाचें तर हल्लींच्या रामायणांत सुग्रीवाच्या तोंडीं विश्वविषयीभूत असें जें भौगोलिक वर्णन आढळतें तें मूळ रामायणांतील नसून मागून घातलेलें असावें; व आम्ही हें पुढें सिद्धही करणार आहों. बनावट गोष्टी केव्हांही लपून राहत नाहींत व मूळ रामायणांत मागून घातलेली अनेकविध भर, घडवून आणलेला फेरफार व विस्तार या गोष्टी इतक्या सुस्पष्ट आहेत कीं, वाल्मीकीचा मूळ ग्रंथ अजीबात बदलला असून हें कामही अगदीं अनभिज्ञ व अकुशल माणसाच्या हातून झालें असलें पाहिजे असा सिद्धांत काढल्यावांचून निर्वाह लागत नाहीं.

तरी पण रामायणांत जी विविध व विस्तृत भर टाकण्यांत आलेली आहे त्यांतून मूळ रामायण कोठचें हें शोधून काढणें फार सोपें काम आहे. मूळ रामायण हा हिंदी इतिहासाच्या प्राचीनतम कालांतील ग्रंथ आहे हें उघड आहे. त्या वेळीं, आर्य लोकांच्या धर्मविधींत यज्ञ प्रमुख होता; बुद्ध धर्माचा अद्याप उदय झालेला नव्हता; मूर्तिपूजा अस्तित्वांत नव्हती; ब्राह्मण व क्षत्रिय निःसंदेह मांसान्न भक्षण करीत असत; स्त्रिया वेदाध्ययन करीत व वैदिक आचारधर्म पाळीत; क्षत्रिय ब्राह्मणांशीं विद्येंत चढाओढ करीत व ब्राह्मण क्षत्रियांशीं शस्त्रविद्येंत चढाओढ करीत; असा तो काळ होता. राम सीता; दशरथ कौसल्या; आणि भार-

द्वाज अगस्त्य यांच्या चरित्राचें शोधपूर्वक अध्ययन केल्यास आपणास असें दिसून येईल कीं, त्या वेळची समाजस्थिति आपल्या हल्लींच्या समाजस्थितीपेक्षां अत्यंत निराळी असून बुद्ध धर्माच्या उदयामुळें ज्या भावनांचा व परिस्थितीचा उद्गम झाला त्या परिस्थितीचा व भावनांचा त्या समाजास गंधही लागलेला नव्हता. लक्ष्मणानें पर्णकुटिका बांधल्यावर तिची वास्तु-शान्ति करण्याच्या वेळीं राम स्वतःच होमहवन करण्यास मागें पुढें पाहत नाहीं; व त्या प्रसंगाकरितां मुद्दाम मारून आण-लेल्या हरिणाच्या मांसाची आहुति देतो. ज्या आम्हाला आज कित्येक शतकें शाकाहाराची संवय झाली आहे व जे आम्ही आज कित्येक शतकें यज्ञयागही शाकान्नानेंच करीत आहों त्या आम्हाला लक्ष्मण एक सबंध हरिण भाजतो या गोष्टीचें अति-शय आश्चर्य वाटेल.

अयं सर्वः समस्तांगः श्रितः कृष्णमृगो मया ।
देवता देवसंकाश यजस्व कुशलो ह्यसि ॥

राम ज्या वेळीं जटायूचा शेवटचा प्रेतविधि करितो त्या वेळीं त्या मृत पक्ष्याला तो मृगमांस अर्पण करितो;

रोहिमांसानि चोत्कृत्य पेशीकृत्वा महायशाः ।
शकुनाय ददौ रामो रम्ये हरितशाद्वले ॥

त्याचप्रमाणें मनुष्याच्या आयुष्यांतील निरनिराळ्या प्रसंगीं म्हणावे लागणारे मंत्र म्हणण्यांतही राम निष्णात आहे;

राघवोपि महातेजा नावमारुह्य तांस्ततः ।
ब्रह्मवत्क्षत्रवच्चैव जजाप हितमात्मनः ॥

व त्याचप्रमाणें पुढें

यत्तत्प्रेतस्य मर्त्यस्य कथयन्ति द्विजातयः ।
तत्स्वर्गगमनं क्षिप्रं तस्य रामो जजाप ह ॥

राम प्रतिदिनीं संध्या करीत असे हें कोणत्याही योग्य प्रसंगीं लिहिण्यास कवि चुकलेला नाहीं. रामाचें वैदिक मंत्रपठनांतील पटुत्व व नियम पाळण्यांतील कडकपणा हीं कोणत्याही कर्मठ ब्राह्मणापेक्षां खरोखर कमी नाहींत. कैकेयीनें आपल्या भर्त्यापासून रामाच्या वनवासास जाण्याबद्दल अनुज्ञा मिळविल्यानंतर राम ज्यावेळीं कौसल्येला भेटावयाला गेला त्यावेळीं ती आपल्या पतिसमवेत नव्हे, तर स्वतंत्र होमहवन करीत बसली होती.

सा क्षौमवसना हृष्टा नित्यं व्रतपरायणा ।
अग्निं जुहोति स्म तदा मंत्रवत् कृतमंगला ॥

अत्यंत परिश्रम करून सुद्धां जेव्हां मारुतीला सीता सांपडली नाहीं तेव्हां " या नदीचें पाणी स्वच्छ आहे; तेव्हां संध्या करण्याकरितां येथें सीता येईल. " अशी कल्पना मनांत धरून तो रावणाच्या अशोक वनांतील एका सुंदर जलप्रवाहाच्या बाजूस बसला.

संध्याकालमनाः श्यामा ध्रुवमेष्यति जानकी ।
नदीं चेमां शुभजलां संध्यार्थे वरवर्णिनी ॥

ज्या स्त्रिया आज वेदांचें अध्ययन सुद्धां करण्यास पात्र नाहींत असें समजलें जातें त्याच स्त्रिया पूर्वी संध्या करीत असत हें वाचून आमच्या मनास फारच आश्चर्य वाटतें; व आधुनिक टीकाकाराच्या कानालाही हें कसेसेंच लागून तो म्हणतो " किंच सम्यग्भगवद्ध्यानस्यैव संध्यापदार्थत्वेनास्त्येव तत्र स्त्रिया अधिकारः । गायत्रीमंत्रेण तदर्थस्मरणपूर्वकध्याने तु द्विजस्यै-

वाधिकार इत्यन्यत् । " " संध्या म्हणजे केवळ भगवंताचें ध्यान या अर्थानें पाहिल्यास स्त्रियांना संध्या (विशिष्टप्रकारची नव्हे) करण्यास परवानगी आहे. गायत्री मंत्राचा अर्थ समजून त्याचा जप करून संध्या करणें हा फक्त द्विजाचा हक्क आहे, ही गोष्ट वरील गोष्टीहून अगदीं वेगळी होय. " परंतु हा निव्वळ शब्द-च्छल आहे. हल्लीं स्त्रियांना ज्याप्रकारची भगवदर्चना करण्याचा अधिकार आहे त्या प्रकारास संध्या म्हणतां येणार नाहीं व कोणी म्हणतही नाहींत. (व त्याकरितां नदीवर जाण्याची तर मुळींच अवश्यकता नाहीं.) असो, संध्येच्या या कल्पनेनें चकित होणाऱ्या आम्हाला यज्ञांतील घोड्याला तरवारीचे तीन घाव घालून कौसल्येनें ठार मारिलें हें ऐकून काय वाटेल ?

कौसल्या तं हयं तत्र परिचर्य समंततः ।
कृपाणैर्विशशासैनं त्रिभिः परमया मुदा ॥

कौसल्या खरोखरीच मोठी बलवती व खरी रजपूत स्त्री असली पाहिजे यांत संशय नाहीं.

भरद्वाज व अगस्त्य यांच्या आश्रमांची वर्णनेंही मोठी मजेदार आहेत. जनसंमर्दापासून दूर अशा सृष्टिसौंदर्ययुक्त जागांचे मोठे भोक्ते व आचारविचारांत अत्यंत धार्मिक व विरागी असे ते ऋषि आपला काळ अध्ययन, मनन, ज्ञान, यज्ञयाग इत्यादि कर्मांत घालवीत. आणि इतकें असूनही आपल्या सभोंवार काय चाललें आहे याबद्दल त्यांना कांहीं वार्ता नसे असेंही नाहीं. जमीन स्वतः कसून तीपसून होणाऱ्या उत्पन्नावर आपली उप-जीविका ते करीत. फारच आवश्यकता प्राप्त झाल्यास आपलें स्वतःचें व आपल्या यज्ञांचें आणि वसतिस्थान वगैरेंचें रक्षण

ते हातीं शस्त्र घेऊनही करीत. आपल्या क्षत्रिय बन्धूप्रमाणें ते मांसान्नही भक्षण करीत असत.

पंचपंचनखा भक्ष्या ब्रह्मक्षत्रेण राघव ।

त्यांच्या पूजेअर्चेमध्यें मूर्तिपूजा मुळींच नव्हती; इन्द्र, वरुण, सोम इत्यादि वैदिक देवांसाठीं म्हणून त्यांच्या पर्णकुटिकांमधून "यज्ञ–वेदी" असत* या व दुसऱ्या कित्येक गोष्टीवरून बुद्ध धर्माच्या उदयाच्या पेक्षां फार प्राचीनतम असा समाज आपल्या डोळ्यांपुढें उभा राहतो; त्या समाजामध्यें, वैदिक देवांची यज्ञ करून आराधना करण्याची पद्धत असें. त्या समाजांतील ब्राह्मण व क्षत्रिय यांच्यामध्यें एखादा अनुल्लंघनीय असा खंदक नव्हता. त्यामध्यें स्त्रियांना पुरुषांइतेंकच महत्त्व, स्वातंत्र्य व धार्मिक अधिकार असून या गोष्टींचा त्या चांगला उपयोगही करीत. वाल्मीकीच्या वेळीं अशीच समाजस्थिति असली पाहिजे यांत संशय नाहीं. इसवी सनाच्या आरंभीच्या कवींच्या वेळीं अशी समाजस्थिति असेल किंवा तसे त्यांचे विचार असतील हें संभवत नाहीं. (याच सुमारास रामायणाची पुनर्रचना झाली हें आम्ही पुढें दाखविणार आहों.) परंतु आधींच सन्मान्य होऊन बसलेल्या या काव्यांतील कल्पनांना एकप्रकारचें पावित्र्य

---

* रामाच्या राजवाड्यांत विष्णूकरितां एक आयतन होतें.

"श्रीमत्यायतने विष्णोः शिष्ये नखरात्मजः । " २-६-४

या चरणाचा टीकाकार "निजभवनवर्ति देवालये" असा चुकीचा अर्थ करितो. जर देवपूजालय होतें तर आयतन म्हणण्याचें कारण काय ? अगस्त्याच्या लहानग्या पर्णकुटीप्रमाणें रामाच्या राजवाड्यांत वैदिक देवांकरितां निरानिराळे भाग असून त्यांत "यज्ञवेदी" असाव्या असें दिसतें.

प्राप्त झाल्यामुळें त्या कल्पना पुनर्रचनाकारांनीं तशाच कायम ठेवल्या असल्या पाहिजेत.

प्रकरण ३ रें.

हलींच्या रामायणाचा रचनाकाल.

मागील प्रकरणांतील विवेचनावरून आपणास रामायणाच्या हलींच्या अवाढव्य विस्तारांतून वाल्मीकीचें मूळ काव्य सहज निराळें काढतां येईल. कारण त्यांतील अर्थ व तो व्यक्त करण्याची शैली हीं दोन्हीं अगदीं स्पष्ट आहेत. नवीन कालच्या नवीन कल्पना; लांब छंदांचे श्लोक; व श्लेषयुक्त अलंकार या गोष्टी आपणास रामायणांत जेथें जेथें दिसतील तेथें तेथें त्या मागाहून घातलेल्या आहेत असें निःसंशय समजावें. अगदीं अलीकडे-पर्यंत असली भर रामायणांत थोडथोडी पडत आहे याबद्दल शंका नाहीं; कारण हलींच्या रामायणांतील हा कांहीं सर्ग कतकाच्या वेळीं मुळींच नव्हते व कांहीं प्रक्षिप्त आहेत असें तो स्वतःच सांगतो. तुकतें म्हणजे भवभूतीच्या कालापर्यंत रामायणाचे सर्ग पाडलेले नसून तें अध्यायात्मकच होतें हें आम्ही मागें दाखविलेंच आहे. परंतु लहान लहान भर जरी वेळोवेळीं टाकण्यांत आली असली तरी एका विशिष्ट काळीं रामायणाची पूर्ण पुनर्रचना झाली असली पाहिजे. तेव्हां रामायणास पूर्ण निराळें रूप देणारी ही आवृत्ति—हिजनंतर पडलेली भर थोडी व लहान लहान हप्त्यांनीं पडलेली असल्यामुळें ह्या रूपास **रामायणाची शेवटची आवृत्ति**

असें म्हणावयास हरकत नाहीं–कधीं झाली याचा विचार करणें फायदेशीर होईल.

रामायणास हल्लीचें स्वरूप ज्या कालांत प्राप्त झालें त्या कालाच्या मर्यादा बऱ्याच बरोबर अशा ठरवितां येतात. कालिदासाचा " रघुवंश " व वाल्मीकीचें रामायण हीं दोन्हीं एकदम वाचतांना वाचणारास असें दिसून येईल कीं रघुवंश लिहितांना कालिदासासमोर हल्लींच्या स्वरूपांत असणारें रामायण असलें पाहिजे; कारण हल्लीच्या रामायणांतील गोष्टीबरहुकूम त्यानें आपलें काव्य लिहिलें आहे. कित्येक ठिकाणीं तर रामायणांतीलच शब्द-प्रबंध वापरण्यापर्यंत त्याची मजल गेली आहे. उदाहरणार्थ, " श्लोकत्वमापद्यत यस्य शोकः । अरावणमराम वा । " इत्यादि.

यावरून एव्हढें सिद्ध होतें कीं, रामायण या प्रख्यात कवीच्या आधीचें असलें पाहिजे. परंतु कालिदासाच्या कालासंबंधीं मतभेद आहे. कांहीं लोक त्याला इसवी सनाच्या आरंभीं नेऊन ठेवितात तर कांहीं जास्त शोधक बुद्धीनें विचार करून त्यांस इसवी सनाच्या पांचव्या शतकांत आणून ठेवतात. जरी यापैकीं दुसरी कालमर्यादा खरी मानली तरीसुद्धां दुसरा एक मुद्दा असा आहे कीं, ज्यामुळें रामायण पांचव्या शतकाच्या फार पूर्वी झालें असें सिद्ध करितां येईल. हल्लींच्या रामायणांतील कथेमध्यें अद्भुतपणा जरी वास करीत असला तरी तो लोकांच्या अद्भुतपणाबद्दलच्या इच्छेची पूर्ति करण्यास समर्थ नाहीं. एवढेंच नव्हें तर रामचरित्रांत वेळोवेळीं अद्भुततेची भर पडत गेल्यामुळें मुळांतल्याहून तें अगदीं बदलून गेलें आहे हें आम्हीं पुढें सिद्ध करणारही आहों. हल्लीं दृष्टीस पडणाऱ्या रामायणाच्या आवृत्त्यांची या दृष्टीनें म्हणजे त्या प्रत्येकींतील अद्भु-

तपणाबद्दल विचार केल्यास कालानुक्रमाप्रमाणें यादी तयार करतां येईल. मूळ रामायण व हल्लींचें रामायण यांमध्यें रामायणाच्या ज्या कित्येक आवृत्त्या निघाल्या त्यांचा विचार करितांना या अद्भुततेविषयीं लिहूं. येथें एवढेंच सुचवावयाचें कीं, रामायणाला शेवटचा विस्तार प्राप्त झाल्यानंतरही रामायणाच्या अद्भुततेंत आजपर्यंत भर पडत आलेली आहे.

हल्लींच्या रामायणाच्या नंतरच्या काळांत रामायणकथेच्या ज्या अनेक आवृत्त्या झाल्या आहेत त्यांचे तीन विभाग पाडतां येतील. (१) कालिदासादि कवींच्या आवृत्त्या. (२) पद्म-पुराण व अध्यात्म रामायण यांसारखीं पुराणें. (३) तुलसी-दासाचें रामायण इत्यादि प्राकृत भाषातील रामायणें. हल्लींच्या रामायणांतील कथानकाचा अद्भुततेच्या दृष्टीनें फेरफार कसा होत गेला याचा सूक्ष्म विचार केल्यास, किंवा वाल्मीकीच्या रामायणांत खरोखरी काय आहे व जुन्या मताचे हिंदू लोक वाल्मीकीचें रामायण काळजीपूर्वक वाचल्याशिवाय कोणतीं मतें मान्य करितात याचा विचार केल्यास लोकमतांत शिरलेली अनिबंध अतिशयोक्ति व तसिळें साधारण विश्वास्य अशा कथानकाचे झालेले धिंडवडे नजरेस येऊन कोणीही आश्चर्यानें क्षणभर मूढ झाल्या-विना राहत नाहीं. या सगळ्या अतिशयोक्तींचें संकलन करणें फार कंटाळवाणें होईल. म्हणून त्यांतील कांहीं ज्या फारच स्पष्ट आहेत त्या खालीं देतों. त्यांवरून कालिदासाचें रामायण व हल्लींचें वाल्मीकीचें रामायण यांमध्यें कालाचा किती फरक असला पाहिजे हें सहज दिसून येण्याजोगें आहे.

(१) अहल्या शिलारूप झाली होती आणि रामचंद्रानें आपल्या पादरजस्पर्शाच्या योगानें तिला त्या देहान्तरापासून

सोडविलें अशी कथा हल्लींच्या रामायणांत मुळींच नाहीं ही मोठी आश्चर्यकारक गोष्ट होय. रामायणांतील अहल्येची कथा किती तरी साधी, सरळ, साहजिक व विश्वास्य आहे! संतप्त झालेला गौतम आपल्या स्त्रीला शाप देतो कीं, " या आश्रमामध्यें तूं भस्मावर शयन करून अन्न भक्षण न करतां, नुसता वायु भक्षण करून, कोणाच्याही दृष्टीत न पडतां व पश्चात्तापानें दग्ध होत्साती अशी आपला काल कंठ. "

वातभक्षा निराहारा तप्यन्ती भस्मशायिनी ।
अदृश्या सर्वभूतानामाश्रमेऽस्मिन्वसिष्यसि ॥

ती राखेंत शयन करीत होती याचा अर्थ तिचें दगडांत रूपान्तर झालें होतें असाच अ हे असा युक्तिवाद सांगणें शक्य नाहीं; कारण वातभक्षा (हवेवर जीवन धारण करीत) तप्यन्ती (पश्चात्तापदग्ध) निराहारा (अन्नाशिवाय) इत्यादि शब्द महत्त्वाचे असून स्पष्ट आहेत.* शिवाय राम तिला आपल्या पायानें स्पर्श करितो असेंही रामायणांत नाहीं; उलट पक्षीं अहल्या स्वतः होऊन जेव्हां त्याच्या पुढें येते तेव्हां तो तिच्या पायाशीं लोटांगण घालतो. " तिची तपश्चर्या आटोपल्यानंतर ती त्यांच्या दृष्टिपथांत आली असतां ते राघववंशीय राजपुत्र तिच्या पायांस आनंदानें नमस्कार घालते झालें.

शापस्यान्तमुपागम्य तेषां दर्शनमागता ।
राघवौ तु तदा तस्याः पादौ जग्राहतुर्मुदा ॥

राम आला त्या उत्सवप्रसंगानें तिची पतीनें सांगितलेली

---

* पुराणादिप्रसिद्धः शिलारूपप्राप्तिशापः कल्पांतरीण इति न विरोधः । अत्र शिलारूपत्वे तात्पर्यकथने वातभक्षेत्यत्र विरोधः स्पष्ट एवेति केचित् । ही टीका या बाबींत विचारणीय आहे.

तपश्चर्या संपली असावी व या सन्मान्य अतिथींचा आदरसत्कार करण्याकरितां ती बाहेर आली असावी हेंच जास्त संभवनीय आहे. असें असतांही कालिदास व त्यापुढील सर्व लोक अहल्येला शिलारूप प्राप्त झालें होतें व रामाच्या पवित्र पदधूलीच्या स्पर्शानें त्या स्थितींतून तिची मुक्तता झाली या कथेवर विश्वास ठेवीत आले आहेत.

प्रत्यपद्यत चिराय यत्पुनः ।
चारु गौतमवधूः शिलामयी ॥
स्वं वपुः स किल किल्बिषच्छिदाम् ।
रामपादरजसामनुग्रहः ॥

रघु० सर्ग ११ श्लोक ३४.

(२) रामेश्वर व लंका यांमध्यें तरत्या दगडांचा एक पूल बांधला होता, या गोष्टीसही हल्लींच्या रामायणांत थारा नाहीं. वानरांनीं मोठमोठ्या दगडांनीं समुद्र भरून काढून सेतु तयार केला एवढाच उल्लेख त्यांत सांपडतो. परंतु लोकांत अशी समजूत आहे कीं, ते दगड पाण्यावर तरंगत होते. पदार्थविज्ञानशास्त्रदृष्ट्या ही गोष्ट अशक्य असतां कालिदासाचाही या कल्पनेवर विश्वास असावा असें दिसतें. रघुवंशांत ज्या ठिकाणीं या गोष्टीचा उल्लेख आला आहे त्या ठिकाणीं तो उल्लेख संशयास्पद असला तरी एकंदर शब्द रचनेवरून कालिदासाचा अर्थ लोकमताकडेच झुकतो आहे.

स सेतुं बंधयामास प्लवगैर्लवणांभसि ।

(३) वाल्मीकीनें रामायण रामाच्या पूर्वीच लिहिलें या गोष्टीस रामायणांत काडीइतकाही आधार नसतांना, तें त्यानें अंतः-स्फूर्तीनें अगोदरच लिहिलें, या कल्पनेवर कालिदासाचा विश्वास

असावा असें दिसतें. कालिदासाच्या वेळेपासून पुढें वाल्मीकीच्या रामायणाला लोक इतका मान देऊं लागले कीं, वेदाप्रमाणें तें एक ईश्वरोक्त काव्य आहे अशी समजूत प्रचारांत आली; परंतु आश्चर्याची गोष्ट ही कीं, त्याचें वाचन व अध्ययन फारच क्वचित् होऊं लागलें; कारण तसें नसतें तर खुद्द रामायणांत ज्या कल्पनांना मुळींच आधार नाहीं अशा कल्पनांना लोकमतांत वाव मिळाला नसता. रघुवंशाच्या १५ व्या सर्गांत कालिदास म्हणतो.

अथ प्राचेतसोपज्ञं रामायणमितस्ततः ।
मैथिलेयौ कुशलवौ जगतुर्गुरुचोदितौ ॥

मल्लिनाथ " प्राचतसोपज्ञ "* याचें प्राचतसेन आदौ ज्ञातम् (पाचेतसाला प्रथम माहीत असलेलें) उपज्ञा ज्ञानमाद्यं स्यादित्यमरः । असें स्पष्टीकरण करितो.

पृथ्वीवर सर्वोत्तम राजा कोण असा प्रश्न वाल्मीकीनें नारदाला विचारल्यावरून नारदानें त्याला रामचरित्र सांगितलें अशी कथा तर खुद्द रामायणांतच पहिल्या अध्यायांत दिलेली आहे; व तीवरून वाल्मीकीनें रामायण त्यानंतर लिहिलें असें दिसतें. उत्तरकांडावर किंवा पहिल्या कांडांतील दुसऱ्याच सर्गावर पूर्ण विश्वास ठेविला तर मग वाल्मीकीनें सीतेचे पुत्र त्यांच्या आश्रमांत वाढत असतांना रामायण लिहिलें असलें पाहिजे. ब्रह्मदेवानें दिलेल्या वरांत सुद्धां " रामानें ज्या गोष्टी खासगी–जनतेला माहीत नाहींत अशा–केल्या त्या तुला अंतःस्फूर्तीनें कळतील." एवढेंच कायतें म्हटलेलें आहे. कोणचीहि गोष्ट जरी खरी मानिली तरी वाल्मीकीचें रामायण हें अंतःस्फूर्तीनें–त्यांतील कथाभाग घडण्याच्या

---

* या शब्दाचा दुसरा अर्थ करितां येईल; परंतु तरी सुद्धां रामायण अंतःस्फूर्तीनें लिहिलेला ग्रंथ आहे ही कल्पना कायम राहतेच.

अगोदर–लिहिलें गेलें आहे अशी जी कालिदासाची कल्पना झाली आहेसें दिसतें ती चुकीची आहे हें सिद्ध होतें.

(४) भुजमूर्धोरुबाहुल्यादेकोपि धनदानुजः ।
दृष्टश्च स यथापूर्वं मातृवंश इव स्थितः ॥

या श्लोकावरून रावणाला दोहोंहून अधिक मांड्या होत्या अशी कालिदासाची समजूत असावी असें दिसतें; परंतु आमच्या मतें रामायणांत या गोष्टीचा कोठेंही उल्लेख नाहीं.*

---

* कालिदासानंतर लोकांमध्यें रामायणाविषयींच्या ज्या ज्या चमत्कारिक कल्पना शिरल्या आहेत, त्या सर्व येथें देत बसल्यास एक मोठा ग्रंथच होईल; परंतु त्या पैकीं कांहीं येथें आणखी दिल्या असतां अगदींच वावगें किंवा कंटाळवाणें होणार नाहीं. (१) सीतेच्या स्वयंवराच्या वेळीं मोठा समारंभ झाला; त्या ठिकाणीं सर्व राजेरजवाडे जमले होते; त्यामध्यें रावणही आला होता; त्यानें शिवधनुष्य आपल्या छातीपर्यंत उचललें; परंतु त्या धनुष्याचें वजन त्यास सहन न होऊन तो खालीं पडला व धनुष्य त्याचे छातीवर पडलें; अशी लोकांत कथा आहे. परंतु वाल्मीकिरामायणाच्या हल्लींच्या आवृत्तींत, एवढेंच नव्हे तर कालिदासाच्या ग्रंथांतही या गोष्टीविषयीं उल्लेख सांपडत नाहीं. याच्या उलट खरी वस्तुस्थिति अशी आहे कीं, रामानें ज्या वेळीं धनुष्याला प्रत्यंचा चढविली त्या वेळीं जनकाच्या येथें स्वयंवर समारंभ मुळींच नव्हता. (२) रावणादिकांचा वध करण्यासाठीं रामास वनवासास जावें लागावें या हेतूनें देवांनीं मंथरेला कैकेयीकडे पाठविली असा लोकांत समज आहे. परंतु या हेतूचा रामायणांत मागमूसही नाहीं. (३) आपल्या पतीच्या (इंद्रजिताच्या) मरणाची वार्ता, पतीचा हात एकदम आपल्या समक्ष येऊन पडल्यामुळें समजली असतां इंद्रजिताची पत्नी सुलोचना हिनें केलेला शोक व तिचें सती जाणें वगैरे अंतःकरणभेदी प्रसंगांना पुराणमताभिमानी लोक वाल्मीकि-

(पुढें चालूं)

येथपर्यंत केलेल्या विवेचनावरून असें दिसून येईल कीं, रामायणांतील कथाभागाविषयीं हल्लीं जें लोकमत आहे, अथवा कालिदासाच्या वेळीं जें लोकमत होतें, त्यांतील अद्भुततेबरोबर तुलना करून पाहतां ज्या वाल्मीकीच्या रामायणांत अशा अद्भुततेचा लेश सुद्धां नाहीं तें रामायण कालिदासाच्या फार पूर्वीचें असलें पाहिजे असें दिसतें; कारण रामायणांत ज्या गोष्टी सांगितल्या आहेत त्यांशीं अगदीं विसंगत गोष्टी ज्या रघुवंशाच्या काळीं लोकसमाजांत रूढ झाल्या त्या रूढ होण्यास बराच काळ गेला पाहिजे. अर्थात् रामायणाचा काल व रघुवंशाचा काल यांमध्यें बरेंच अंतर लोटलें असेंल पाहिजे. तेव्हां जरी आपण कालिदासाचा दुसरा काळ खरा मानला तरी रामायण ३००–४०० वर्षें तरी त्याच्या

(मागील पृष्ठावरून पुढें)

रामायणाची जी आवृत्ति प्रमाण मानतात त्या आवृत्तींतसुद्धां मुळींच थारा नाहीं. (४) त्याचप्रमाणें अहि, महि व महीची पत्नी चंद्रावती— या स्त्रीला पुढील अवतारांत मी तुजशीं लग्न करीन असा रामानें वर दिला होता अशी लोकांत समजूत आहे—या तीन्ही व्यक्ति वाल्मीकि रामायणांत नाहींत. (५) लोकमताप्रमाणें कुश आणि लव हे गायक या नम्र स्थितिमध्यें असतांना रामाकडून ओळखले जात नाहींत; तर ते लोकमताप्रमाणें रामाचा अश्वमेधाकरितां सोडलेला अश्व धरितात, चंद्रसेन व खुद्द लक्ष्मण इत्यादि रामाच्या सेनापतींचा पराभव करितात व नंतर ओळखले जातात. (६) सीतेनें दिव्य केल्यावर रामानें तिचा अंगीकार केला असा आपला समज करून घेऊन लोकांनी रामायण मुळांत दुःखपर्यवसायी असतां त्यास आनंदपर्यवसायी रूप दिलें आहे. आणि उत्तर रामचरितांत या कथा–भागांचा भवभूतीनें उपयोग केला आहे; त्यावरून रामायण आनंदपर्यवसायी असल्याबद्दलची कल्पना त्यानेंच प्रथम अस्तित्वांत आणली असावी असा तर्क वाहतो.

आधींचें असलें पाहिजे व यास्तव रामायणाची अगदीं अलीकडची कालमर्यादा ख्रिस्ती सनाच्या दुसऱ्या शतकाच्या अलीकडे येऊं शकत नाहीं.

दुसऱ्या कांहीं बाजूंनीं विचार केल्यास आपणांस हल्लीच्या रामायणाची सर्वांत उच्च कालमर्यादा ठरवितां येईल. रामायणाला हल्लींचें स्वरूप बुद्ध धर्माच्या उदयानंतर प्राप्त झालें यांत तर संशय मुळींच नाहीं. कारण रामायणांत श्रमण, श्रमणी यांचे उल्लेख आले असलेले श्लोक सांपडतात.

तापसा भुंजते चापि श्रमणाश्चैव भुंजते ।

१–१४–१२

त्याचप्रमाणें

या चीरमासाद्य वनस्य मध्ये ।
जाता विसंज्ञा श्रमणीव काचित् ॥ २ ॥

टीकाकार म्हणतो—श्रमणा बौध्यसंन्यासिनः । यद्वा श्रमणपदं संन्यास्युपलक्षणम् । आतां कोणी असें म्हणेल कीं, श्रमण हा शब्द बुद्धधर्माच्या उदयाच्या पूर्वीहि प्रचारांत असावा व याकरितां रामायणांत त्याचा उल्लेख आला आहे, एवढ्यावरूनच तें बुद्धधर्मानंतर झालें असें म्हणतां येत नाहीं. परंतु रामायणांत स्वतः बुद्धाचा उल्लेख असून कांहीं ठिकाणीं त्यांची निंदाही केलेली आहे.

यथा हि चोरः स तथा हि बुद्धः ।
तथागतं नास्तिकमत्र विद्धि ॥
तस्माद्धि यः शक्यतमः प्रजानाम् ।
स नास्तिके नाभिमुखो बुधःस्यात् ॥

आतां बुद्धधर्मावर व बुद्धावर इतकी आग पाखडणारा गृहस्थ एक तर ज्या वेळीं ख्रिस्ती सनाच्या आधीं ६ शतकें बुद्ध आपलीं तत्त्वें

यशस्वीपणानें प्रतिपादित होता त्या वेळीं असूं शकेल किंवा अशोकानें धर्म म्हणून त्या तत्वांची योग्य प्रस्थापना केल्यानंतर अग्निमित्र व पुष्पमित्र या पुराणमताभिमानी राजांच्या वेळीं म्हणजे इसवी सनापूर्वी दीड शतक झाला असेल. या दोन काळांपैकीं दुसरा जास्त विश्वसनीय दिसतो व त्यामुळें हल्लींच्या रामायणाला इ. सनापूर्वी एक शतकापेक्षां पलीकडे नेतां येत नाहीं.

दुसऱ्या एका बाजूनें विचार केल्यास वरील गोष्ट सिद्ध होते. रामायणामध्यें राशींचा उल्लेख आल्यामुळें त्याची कालमर्यादा ख्रिस्ती शकापूर्वी एक शतक यापेक्षां जास्त पलीकडे नेतां येत नाहीं. कारण या कालापर्यंत आर्यलोक आपल्या यज्ञवेळा, चंद्र व त्याच्याशीं संबद्ध असणारीं नक्षत्रें यावरून नियमित करीत. क्रान्तिवृत्ताचे २७ भाग पाडण्यापलीकडे त्यांच्या ज्योतिषाची अथवा खगोलशास्त्राची प्रगति झाली नव्हती. त्यांना लग्न किंवा राशी मुळींच माहीत नव्हत्या. त्यांचा उपयोग इ. स. पूर्वी २०० च्या सुमारास ग्रीक लोकांकडून माहिती झाल्यानें सुरू झाला. कारण अशोकाच्या वेळच्या बुद्धधर्मविषयक ग्रंथांतून सुद्धां नक्षत्रांवरूनच कालगणना केलेली आढळते. रामाच्या शुभ जन्माचें रामायणांत पुढीलप्रमाणें वर्णन आहे.

नक्षत्रे दितिदैवत्ये स्वोच्चसंस्थेषु पंचसु ।
ग्रहेषु कर्कटे लग्ने वाक्पता विंदुना सह ॥

यांत राशि, लग्न, उच्च ग्रह वगैरेंचा उल्लेख आहे.

तिसरा मुद्दा व्याकरणविषयक विवेचनावर अवलंबून आहे. उत्तरकांडामध्यें मारुतीच्या व्याकरणविषयक ज्ञानाची मोठी महती गाइली आहे. शिवाय किष्किंधा–कांडांत सुद्धां राम मारुतीच्या अत्यंत शुद्ध भाषेचें कौतुक करतो. कदाचित् द्राविड लोकांची

व्याकरण व इतर शास्त्रांत जी चमत्कारिक प्रगति आहे त्या प्रगतीचा हा उल्लेख असावा. उत्तरकांडात ३६ व्या सर्गांत मारुतीच्या व्याकरणविषयक ज्ञानाची ज्यांत स्तुति गाइली आहे तो श्लोक असा:—

स सूत्रवृत्त्यर्थपदं महार्थं ससंग्रहं
सिध्यति वै कपींद्रः ॥

टीकाकार म्हणतो—" सूत्रं अष्टाध्यायीलक्षणम् वृत्तिस्तात्कालिकसूत्रवृत्तिः अर्थपदं सूत्रार्थबोधकपदवद्वार्तिकं । महार्थं महाभाष्यं पतंजलिकृतम् ससंग्रहम् व्याडिकृत–संग्रहाख्य–ग्रंथसहितम् । " वरील यादींत बहुतेक सर्व प्रसिद्ध प्राचीन व्याकरणशास्त्रकर्त्यांचा समावेश झालेला आहे. बृहत्कथासारांतील कथा खऱ्या मानल्यास व्याडि हा चंद्रगुप्ताच्या व नंदाच्या वेळचा असून तो वररुचीचा शिक्षक होता असें दिसतें. परंतु ज्याअर्थीं रामायणांत पतंजलीचा उल्लेख आला आहे, त्याअर्थीं रामायण मेनांदर (Menander) च्या नंतरचें असलें पाहिजे; कारण पतंजलीच्या ग्रंथांत मेनांदरानें साकेतास ख्रिस्ती शकाच्या पूर्वी १५० च्या सुमारास घातलेल्या वेढ्याचा उल्लेख आलेला आहे.

याप्रमाणें निरनिराळ्या दृष्टींनीं विचार करितां आम्हीं जें म्हणतों कीं, हल्लींचें रामायण इ. स. पूर्वी २०० च्या आंतील असलें पाहिजे तेंच बरोबर ठरतें. या ठिकाणीं आम्हीं आणखी असेंही नमूद करूं शकतों कीं, रामायणाची पुनर्रचना महाभारताची पुनर्रचना झाल्यानंतर झालेली आहे. " Mahabharata a criticism " या पुस्तकामध्यें सिद्ध केलें आहे कीं, महाभारताची पुनर्रचना अलेक्झांडरच्या विजयी स्वारी नंतर, (ग्रीक लोक मोठे वीर आहेत असें महाभारतांत म्हटलेलें आहे; आदिपर्वातील—

न शशाक वशे कर्तुं यं पाण्डुरपि वीर्यवान् ।
सोऽर्जुनेन वशं नीतो राजाऽसौद्यवनाधिपः ॥

या श्लोकावरून महाभारत-पुनर्रचनाकाराच्या मनांत अलेक्झांडरच्या विजयी स्वारीची आठवण ताजी असावी असें दिसतें. परंतु राशींचा उपक्रम होण्यापूर्वी म्हणजे इ. स. पूर्वी २०० च्या पूर्वी झाली. असो. रामायणांत तर महाभारतांतील एक अध्यायच्या अध्याय उतरून घेतला आहे. तो उतरून घेतला आहे असें म्हणण्याचें कारण हें कीं, तो महाभारताच्या कथाभागाशीं अत्यंत जुळतां असून रामायणांत मात्र तो निष्कारण घातला गेला आहे. अयोध्याकांडांतील सर्ग १०० व महाभारतांतील सभापर्वांतील ५ वा अध्याय हे दोन्हीं एक असून त्यांत राजाचीं कर्तव्यें व चांगल्या राज्यव्यवस्थेचीं साधनें यांची चर्चा आहे. युधिष्ठिराला सभागृहामध्यें स्वस्थ बसलेला पाहून नारदानें जर त्याला " तुझी राज्यव्यवस्था कशी आहे " वगैरे प्रश्न विचारिले तर नारदाचें तें कृत्य सयुक्तिक आहे. परंतु रामायणांत हा विषय जेथें आला आहे तेथें रामाला भरत कृशशरीर असा दिसतो; त्यामुळें त्याला आपल्या पित्याच्या कुशलाची काळजी लागून त्यानें भरताजवळ त्याविषयीं उत्सुकतेनें चौकशी करावयास पाहिजे होती. तसें न करतां त्याऐवजीं राम त्याच्याजवळ राज्यव्यवस्थेसंबंधीं मोठें वक्तृत्व करूं लागून, राज्य करावयास लागून ज्याला अद्याप पुरे ७ दिवसही झाले नाहींत अशा त्या अनभिज्ञ भरताला शेंकडों व इतके चमत्कारिक प्रश्न विचारीत सुटतो कीं वाचकाला ते आश्चर्यचकित करून टाकतात. परंतु या सर्गाच्या प्रक्षिप्तत्वाविषयीं यापेक्षांही सबळ पुरावा आहे. या सर्गाच्या पुढच्याच सर्गाचा आरंभ असा आहे कीं, त्या आरंभावरून त्या सर्गाच्या मागें उपरिनिर्दिष्ट सर्गा-

प्रमाणें एखादा सर्ग असेल अशी कल्पना सुद्धां वाचकाच्या मनांत येत नाहीं. या सर्गाचा आरंभींचा श्लोक

तं तु रामः समाज्ञाय भ्रातरं गुरुवत्सलम् ।
लक्ष्मणेन सह भ्रात्रा प्रष्टुं समुपचक्रमे ॥

" तो आपला गुरुवत्सल असा प्रिय बन्धु आहे हें जाणून राम लक्ष्मणासह त्यास विचारूं लागला " असा आहे. त्यांत " विचारूं लागला " हे शब्द फार महत्त्वाचे आहेत. कारण त्यांवरून त्या पूर्वी कांहीं विचारिलें नव्हतें असा बोध होतो. परंतु मोठ्या आश्चर्याची गोष्ट ही कीं, त्याच्याच मागच्या सर्गांत रामानें भरताला शेंकडों प्रश्न विचारिलेले आहेत; एवढ्यावरून हा सर्ग महाभारतांतून रामायणांत घेतला हें सिद्ध होतें. याशिवाय रामायणांत वासुदेवाचा दोनदां आदरपूर्वक उल्लेख आलेला असून उत्तरकांडांत निमीच्या शापाच्या कथेंत यादव–कुलांतील वासुदेव–जो पुढें अवतार होणार–असा उल्लेख आला आहे. या गोष्टीवरून असें स्पष्ट दिसतें कीं, हल्लींच्या रामायणाची आवृत्ति महाभारताची पुनर्रचना झाल्यानंतर झालेली आहे व तिचा काल इ. स. पूर्वी १०० च्या आसपास असावा. हंटरच्या शब्दांत बोलावयाचें तर " रामायणांतील कांहीं भाग जरी महाभारताच्या पूर्वीचे असले तरी त्याचें हल्लींचें स्वरूप त्यांस महाभारतानंतर प्राप्त झालें असलें पाहिजे. " याच गोष्टींत रामायणाची पुनर्रचना कां झाली या प्रश्नाच्या उत्तराची गुरुकिल्ली आपणास सांपडते.

प्रकरण ४ थें.

मूळ काव्याची पुनर्रचना होण्याचें कारण.

रामाचा आयुष्यक्रम इतका शुद्ध व पवित्र आहे कीं, तो जाणल्यावर त्याजविषयीं कोणालाही दैवी आदर वाटल्यावांचून राहणार नाहीं व हिंदुस्थानांत त्याला देवकोटींत बसवून त्याची लोक पूजा करितात याविषयींहि आश्चर्य वाटणार नाहीं. बुद्धधर्मीयांनीं सुद्धां त्याची कथा आपल्या भाषेंत उतरून घेतली आहे, व दशरथजातकांत त्यास "आपल्यांतील एक अति प्राचीन बुद्ध" असें नांव देऊन या आर्य-राष्ट्रवीराला आपल्या पंथांत ओढण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु रामांत व इतर अलौकिक देवांश वीरांत एक महत्वाचा फरक आहे. मी देव आहें किंवा लोकांनीं मला देव म्हणावें असें दाखविण्याजोगें वर्तन त्यानें कधींही केलें नाहीं. आपल्या आयुष्यांत मी स्वतः देव आहे असें लोकांस स्पष्टपणें सांगणारा श्रीकृष्णच पहिला होय, व लोक त्याला विष्णु म्हणून भजत हें आम्हीं दुसऱ्या ठिकाणीं दाखविणारच आहों. परंतु जेव्हां बुद्धाचे अनुयायी बुद्धाला परमात्मन् म्हणूं लागले व प्राचीन काळीं पुष्कळ बुद्ध होऊन गेले अशी जेव्हां लोकांची समजूत होऊं लागली त्या वेळीं सनातन धर्मी आर्य लोकांना आपण मोठ्या संकटांत सांपडलों आहों असें वाटलें असलें पाहिजे; कारण सामान्य जनतेला नेहमीं आपल्या मानसिक समाधानाकरितां अगर स्वास्थ्याकरितां कृष्ण अगर बुद्ध यांसारख्या मानवी देहांत वावरणाऱ्या दैवी व्यक्तींची जरूर भासत असते; व त्यामुळें साहजिकच

जनता अशा व्यक्तींना देव मानून राहते. या कारणास्तव जुन्या मताच्या आर्य लोकांनीं त्यावेळीं वासुदेव विष्णूचा अवतार होता या तत्त्वाचा अंगीकार करून या अवतार वगैरे गोष्टींत विश्वास ठेवणारा जो पक्ष आधींच उत्पन्न झाला होता त्या पक्षाची सहानुभूति वैदिक धर्माकडे वळविली. याच कारणास्तव महाभारताची पुनर्रचना करणें प्राप्त झालें. कारण सर्व पौराणिक कथा त्यामध्यें भरलेल्या असल्याकारणानें त्या गोष्टींस नवीन रूप देतांना महाभारताची नवीनच रचना करावी लागली; व बौद्ध लोक ज्याप्रमाणें प्रत्येक युगांत एकेक बुद्ध होत असे असा भरंवसा ठेवून त्याप्रमाणें जनतेस उपदेशही करीत, त्याचप्रमाणें वरील कारणास्तव कृष्णाच्या आधींच्या सर्व राष्ट्रवीरांना विष्णूचे अवतार समजण्यांत येऊं लागलें.

याप्रमाणें हिंदी राष्ट्रवीरांना नवें स्वरूप देत असतां महाभारतांतील रामोपाख्यानांत राम विष्णूचा अवतार आहे असें दाखविण्यांत आलें. रामायणाच्या मूळ आवृत्तींतील कर्थेत असा प्रथम फरक झाला. हें रामोपाख्यान हल्लींच्या रामायणाच्या पूर्वीचें आहे व तें तसें असण्याचीं कारणें आम्ही याच पुस्तकांत दुसरीकडे दिलीं आहेत. राम विष्णूचा अवतार होय ही जी कल्पना ती रामायणाची पुनर्रचना होण्यास प्रवर्त्तक झाली. पुनर्रचनाकाराच्या पुढें महाभारताच्या दुसऱ्या आवृत्तीचा नमुना असल्यामुळें रामायणाच्या दुसऱ्या आवृत्तींत त्यानें महाभारताचें पुष्कळ बाबतींत अनुकरण केलें; परंतु पुनर्रचनेसाठीं रामायण ज्याच्या हातीं पडलें तो अगदीं सामान्य प्रतीचा मनुष्य असावा. कारण प्रथम त्याला महाभारताइतका विस्तारही करतां आला नाहीं व दुसरें जीमुळें नवें-जुनें ओळखणें अगदीं अशक्य व्हावें अशी रचनाही करितां आली नाहीं. महाभारतांत प्रामुख्यानें दिसून येणारी जी तत्त्वज्ञानविषयक

मनोरम चर्चा तिचाही समावेश त्याला रामायणांत करितां आला नाहीं. असो; इतर दृष्टीनें जरी रामायणाचा आधुनिक संपादक त्या कामाला अयोग्य असला तरी मूळ काव्यांतील आवेश, कवित्व व साधेपणा यांचा त्याच्या मनावर पूर्ण ठसा उमटलेला असल्या कारणानें रामायणाची हल्लीची आवृत्ति सुद्धां सर्वांच्या मनाचें आकर्षण करिते.

मूळ रामायणांत वैष्णव स्वरूपाचा संपर्क सुद्धां नव्हता याबद्दल दुसऱ्या आवृत्तीच्या संपादकाच्या अयोग्यतेमुळेंच रामायणांत प्रमाणें सांपडतात. ज्यांनीं ज्यांनीं म्हणून हें काव्य शोधक बुद्धीनें वाचलें आहे त्यांच्या लक्षांत ही गोष्ट आलेली आहे. या बाबतींत प्रो. म्यूर (Muir) यांनीं पुष्कळ प्रमाणें, मुद्दे, व उपपत्त्या काढल्या आहेत; परंतु त्यानें दिलेल्या उपपत्त्या विशेष पुरेशा नाहींत. कारण त्या योगानें रामाची वागणूक मनुष्यासारखी होती एवढेंच सिद्ध होतें. पण त्यानें मनुष्याचा अवतार घेतला होता त्या अर्थी त्याला मनुष्याप्रमाणें वागणें भाग होतें असें त्यावर उत्तर देतां येईल. मी स्वतः विष्णु आहें असें दाखवून राम जर त्याप्रमाणें वागता तर रामायण फार थोडक्यांत आटपलें असतें. कारण फक्त इच्छा करण्याचा अवकाश होता कीं, लगेच रावणाचा व लंकेचा पूर्ण नाश होऊन सीता परत मिळाली असती. परंतु एवढें तरी कशाला ? जर राम देवाप्रमाणें वर्तन करीत असता तर तो मुळीं सुवर्णमृगानें फसलाच नसता व मग सीताहरण मुळीं झालेंच नसतें. अवतार घेऊन जनतेला उपदेश करावयाचा असल्यास मनुष्याप्रमाणें वागणें हें फार आवश्यक असें वेदान्ती समजतात. आपल्या सिद्धांताच्या पुष्टीकरणार्थ दिलेल्या प्रो. म्यूर यांच्या श्लोकांची अशा पद्धतीनें वासलात

लावतां येईल; परंतु याच बाबतींत आमच्या मतें रामायणामध्यें अगदीं निर्णायक अशीं वचनें सांपडतात.

(१) अगदीं पहिल्याच सर्गांत रामाच्या पराक्रमाचें वर्णन करितांना नारद म्हणतो—

दशवर्षसहस्राणि दशवर्षशतानि च ।
रामो राज्यमुपासित्वा ब्रह्मलोकं प्रयास्यति ॥

आतां राम जर विष्णूचा अवतार होता तर रामानें या आयुष्याचा शेवट झाल्यावर ब्रह्मलोकास जाण्याऐवजीं विष्णुलोकास जावयास पाहिजे होतें; व एवढ्यानेंच राम अवतार होता या कल्पनेचें खंडन होतें. कारण या जगतामध्यें आयुष्य क्रमीत असतां तो जरी मनुष्याप्रमाणें वागला तरी जगताचा त्याग केल्यानंतर तो विष्णूचा अवतार असल्याकारणानें त्यानें विष्णुलोकांस जावयास पाहिजे होतें. राम विष्णूचा अवतार होता ही गोष्ट नारदाला तरी संमत नसावीसें दिसतें. तो फक्त त्याला एक मोठा मनुष्य या नात्यानें मान देतो; व त्याच्या पुण्यमय आयुष्यानंतर तो ब्रह्मलोकास जाईल असा तो साहजिकच उल्लेख करतो. या श्लोकामुळें टीकाकारासही अडचण उत्पन्न झाली असून तो त्याचें ' ब्रह्मलोकं मायिकं वैकुंठादि लोकम् । अनेन निजनित्यकर्मयोगोपेतस्य ब्रह्मलोकप्राप्तिरिति ध्वनिः । जो जो आपल्या आयुष्यांत मनुष्याला आवश्यक असणारीं सर्व कृत्यें करतो त्याला त्याला मृत्यूनंतर ब्रह्मलोक मिळतो असा या श्लोकांतून ध्वनि निघत आहे ' असें स्पष्टीकरण करतो. उत्तरकांडांत मात्र ब्रह्मदेव रामाला आपल्या पूर्वीच्या म्हणजे विष्णूच्या शरीरांत प्रवेश करावयास सांगतो व त्याच्या सांगण्यावरून रामही आपल्या शरिरांत प्रवेश करितो; व त्याचे अनुयायी जे अयोध्येतील रहिवासी ते शांतनक लोकाप्रत जातात. सुग्रीव सूर्यमंडलास परत जातो.

व वानररूप धारण केलेले इतर देव आपापलीं पूर्वरूपें धारण करितात. एवढ्या प्रकारानंतर सुद्धां नारदाला राम विष्णूचा अवतार होता या गोष्टीची खबर असूं नये हें फार चमत्कारिक दिसतें. त्याच सर्गांत पुढें नारद, राम " विष्णुना सदृशो वीर्ये " (वीर्यांत विष्णुप्रमाणें) होता, असें म्हणतो. व यावरून नारद रामाला विष्णूचा अवतार समजत नव्हता हें सिद्ध होतें. हेंच वाक्य दुसऱ्या कित्येक सर्गांतही आढळतें; व करूंच गेलें तर " ज्या अर्थीं तो मनुष्याप्रमाणें वागत होता त्या अर्थीं त्याला विष्णूसारखा म्हणतां येईल " असा त्याचा अर्थ करितां येईल. परंतु पुढें जर तोच कवि राम विष्णूचा अवतार होता हें स्पष्ट लिहितो तर तोच कवि दुसऱ्या ठिकाणीं अशा उपमा योजील तर त्यामुळें त्याच्याठायीं कवित्वाचा अभाव होता असें म्हणावें लागेल.

(२) अजिंक्य असा राक्षसराज जो रावण त्याचा वध करण्यासाठीं परमेश्वरानें अवतार घ्यावा अशी प्रार्थना करण्याकरितां देव प्रथम ब्रह्मयाकडे व नंतर विष्णूकडे गेले ही कथा अगदीं प्रथम बालकांडाच्या १५ व्या सर्गांत आढळते. रघुवंश व पद्मपुराण यांच्यांतील वर्णनांशीं तुलना केली असतां हा सर्ग विस्ताराच्या व वर्णनाच्या मानानें इतका नीरस आहे; त्याचप्रमाणें रामायणांत इतर ठिकाणीं दिसणाऱ्या विस्तृत व तेजस्वी वर्णनामध्यें व या सर्गांतील वर्णनामध्यें इतका फरक आहे कीं, हा सर्ग कोणीं तरी अकुशल माणसानें रामायणांत घातला असला पाहिजे असें वाटल्यावांचून राहवत नाहीं. दशरथाचा ज्येष्ठ पुत्र या नात्यानें विष्णु जेव्हां पृथ्वीवर अवतार घेतो त्या वेळीं त्यास मदत करण्याकरितां म्हणून इतर सर्व देव वानरपुत्र म्हणून जन्म घेतात व इंद्र वालीचें रूप घेतो, अशी कथा बालकांडाच्या १७ व्या सर्गांत

दिलेली आहे. आतां खरें पाहिलें तर वालीनें रामाला कोठेंही मदत तर केली नाहींच; परंतु उलटा विरोधच केला. विष्णूचा सर्वांत बलाढ्य मित्र व वडील बंधु जो इन्द्र त्यानें रामरावणयुद्धांत रामास कांहींएक मदत न करितां आपलें आयुष्य फुकट घालवावें, या प्रकारावरून असें दिसतें कीं, आधींच नीटपणें वर्णिलेल्या पात्रांशीं अवताराच्या या नवीन कल्पनेची कशीवशी जुळणी केली आहे.

विष्णूच्या १० अवतारांची कथा महाभारतांतील अथवा रामायणांतील नसून ती पुराणकारांच्या कल्पनेंतून निघालेली आहे, हें रामायणावरूनच दाखवितां येईल. मूळ रामायण ज्या काळीं रचिलें गेलें त्या काळीं वराह हा विष्णूचा अवतार मानिला जात नसे.

ततः समभवद् ब्रह्मा स्वयंभूर्देवतैः सह।
स वराहस्ततो भूत्वा प्रोज्जहार वसुंधराम् ॥
असृजच्च जगत्सर्वं सह पुत्रैः कृतात्मभिः।

या श्लोकाचें विवरण करितांना टीकाकाराला मोठी अडचण येऊन पडली आहे. तो म्हणतो " त्रिमूर्तेर्विराजः विष्णुवात्मकोंऽशो वसुंधरां प्रोज्जहार। तस्यैव विराज रजप्रधानः सृष्टिव्यापारवानंशो ब्रह्मा इति व्यवहियमाणः सर्वं जगद् असृजत्।" त्रिमूर्तिआणि ब्रह्मा या शब्दाचे पाडलेले तुकडे ही सर्व टीकाकाराच्या कल्पनेची कारागिरी होय. " ब्रह्मयानें वराहरूप धारण करून पृथ्वी वर उचलली; व नंतर त्यानें आपल्या पुत्रासहवर्तमान सर्व विविध सृष्टि उत्पन्न केली " हा त्या श्लोकाचा साधा अर्थ आहे; व त्यावरून वराहाचें रूप ब्रह्मदेवानें घेतलेलें असून त्यामध्यें विष्णूचा कांहीं संबंध नाहीं हें स्पष्ट दिसून येतें. त्याचवरून मूळ रामायणकर्त्याला १० अवता-

रांची कल्पना माहीत नव्हती हें दिसून येतें. हल्लींचें रामायण ज्या काळीं लिहिलें गेलें त्या काळीं ही कल्पना परिणत होण्याच्या मार्गास लागली होती व पुराणकालीं तिची पूर्ण परिणति झाली. या गोष्टीवरून कित्येक पुराणांचा काल ठरवितां येण्याजोगा आहे.

कारण रामायणांतल्याप्रमाणेंच, राम विष्णूच्या अर्धांशापासून झाला असून भरत एकचतुर्थांशापासून उत्पन्न झाला होता व राहिलेल्या चतुर्थांशापासून लक्ष्मण व शत्रुघ्न उत्पन्न झाले होते, ही कथा कालिदासही रघुवंशांत वर्णन करितो. परंतु राम फक्त विष्णूचा अर्धा अंश होता एवढ्यावर पुराणकारांची तृप्ति होत नाहीं. पद्मपुराणकारांनी असें लिहिलें आहे कीं, राम विष्णूचा संपूर्ण अंश असून भरत पांचजन्यापासून उत्पन्न झाला, लक्ष्मण विष्णूचें शयनस्थान जो महासर्प त्यापासून व शत्रुघ्न सुदर्शन चक्रापासून उत्पन्न झाला.

कैकेय्यां भरतो जज्ञे पांचजन्यांशसंभवः ।
अनंताशेन संभूतो लक्ष्मणः परवीरहा ॥
सुदर्शनांशाच्छत्रुघ्नो संजज्ञेऽमितविक्रमः ॥

पद्मपुराण.

सीता पूर्वजन्मीं लक्ष्मी होती या गोष्टीऐवजीं, सीता पूर्वजन्मीं एका ब्राह्मणाची वेदवती नांवाची कन्या होती असा उल्लेख रामायणांत सांपडतो. त्यावरून रामायणाच्या पुनर्रचनाकालींही वैष्णवसिद्धांत पूर्ण प्रस्थापित झाला नव्हता असें दिसतें. पद्मपुराणानें रामायणांतील सीतेसंबंधीच्या या गोष्टींत सुधारणा केली व आतां लोकांची अशी समजूत झाली आहे कीं, सीता ही लक्ष्मीशिवाय दुसरी कोणीच नव्हती.

अथ लोकेश्वरी लक्ष्मीर्जनकस्य निवेशने ।
सीता मखे समुत्पन्ना बालभावेन सुंदरी ॥

पद्मपुराण.

या व आणखी अशाच गोष्टींत कालिदासानंतर जबर फरक* झाले आहेत; त्यावरून असें वाटतें कीं, पद्मपुराण वैगेरे पुराणें कालिदासानंतर कित्येक वर्षांनीं सुमारें ७००।८०० इ. स. या सुमारास हल्लीच्या स्थितींत आलीं असावीं.

---

* याच बाबतींत आम्ही आणखी एक उदाहरण देतों. लक्ष्मणास इंद्रजिताला मारण्याइतकी शक्ति यावी म्हणून १२ वर्षें रामानें त्याला कांहीं खाऊं दिलें नाहीं अशी लोकांत समजूत आहे. व तो सर्पाचा अवतार असल्यानें त्याला इतक्या दीर्घकालपर्यंत वातभक्षण करून राहतां आलें असेंही लोक समजतात. वाल्मीकीच्या रामायणाच्या अगदीं अलीकडच्या आवृत्तींत सुद्धां या कल्पनेला आधार सांपडत नाहीं. उलट सीतेनें वाढलेलें मांस तो दररोज खात असे असाच त्यांत उल्लेख सांपडतो.

अग्रे प्रदाय भूतेभ्यः सीताऽथ वरवर्णिनी ।
तयोरुपपदे भ्रात्रोर्मधु मांसं च तद्भृशम् ॥
तयोस्तुष्टिमथोत्पाद्य वीरयोः कृतशौचयोः ।
विधिवज्जानकी पश्चाच्चक्रे तत्प्राणधारणम् ॥

अयोध्याकांड.

प्रकरण ५ वें.

महाभारताच्या नमुन्यावर झालेली भर.

मूळ रामायणांत वैष्णव कल्पनांचा गंध देखील नव्हता; परंतु त्यांचा समावेश करण्याकरितांच रामायणाची पुनर्रचना झाली हें आतांपर्यंत सिद्ध केलें. आतां महाभारताच्या नमुन्यावर अथवा इतर कांहीं कारणामुळें रामायणांत ज्या आणखी कांहीं गोष्टींची भर पडली आहे त्यासंबंधीं विचार करूं. रामायणाच्या दुसऱ्या संपादकानें रामायणांत जी भर घातली आहे तीपैकीं, स्वतःच्या काव्यशक्तीला वाव मिळावा याकरितां कांहीं घातलेली आहे हें प्रथमतः लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. या त्याच्या इच्छेमुळें ऋतु, लंकानगरी, रावणाचें ऐश्वर्य इत्यादिकांचीं मूळांतल्यापेक्षां अधिक वर्णनें; राम, तारा, सीता, कौसल्या किंवा मंदोदरी यांचे मूळांतल्यापेक्षां अधिक व निरनिराळ्या प्रकारचे विलाप; व स्त्रीपुरुष पात्रांच्या तोंडीं जास्त घातलेलीं भाषणें यांचा रामायणांत भरणा झाल्यामुळें रामायणाला मुळांतल्या पेक्षां दुप्पट विस्तार प्राप्त झाला आहे. या प्रक्षिप्त गोष्टी व ही भर बहुतेक लांब वृत्तांत आहे; व त्यांत कित्येक ठिकाणीं यमकें साधलीं आहेत; कित्येक ठिकाणीं अनुष्टुभ् छंदांत जें आहे त्याचीच पुनरावृत्ति लांब वृत्ताच्या श्लोकांत झालेली आहे; व कित्येक ठिकाणीं मागच्या पुढच्या संदर्भास विसंगत अशीं विधानें केलेलीं आहेत; त्यामुळें प्रक्षिप्त कोणतें हें सहज कळून येतें. उदाहरणार्थ— अयोध्याकांडांतील २२ व २३ हे अध्याय व त्यांच्या मागच्या २१ व्या अध्यायांतील ५१ ते ६४ हे लांब वृत्तांतले श्लोक घ्या. यांमध्यें मागच्याच्या पुनरावृत्तीशिवाय दुसरें कांहीं नाहीं. हीच

स्थिति त्याच कांडांतील ३४ व्या अध्यायांतील ५५-६१ या श्लोकांची आहे. त्याचप्रमाणें त्याच कांडाच्या ४१ व्या सर्गांत राजास्त्रियांचा शोक लांबविला आहे. परंतु त्यामुळें सर्ग ४० व ४२ यांमधील संदर्भ अगदीं तुटतो. अरण्यकांडांतील ६३ व्या सर्गांत तर रामाचा शोक लांब वृत्तांत वर्णिलेला असून त्यांतील सर्व कल्पना मागें येऊन गेलेल्या आहेत.

अकम्पन रावणाकडे जाऊन राम व खर यांमधील युद्धांत खर मृत्यू पावला ही बातमी रावणास कळवितो. व "रामाची पत्नी सीता हिला पळवून आणून त्यायोगें रामाचा अपमान कर आणि त्याचा उत्साह नष्ट कर" असा उपदेश तो रावणाला करतो. त्यावरून रावण मारीचाकडे जाऊन त्याला स्वतःला मदत करण्यास सांगतो; परंतु त्यानें रावणाचें मन परावृत्त केल्यामुळें तो लंकेस परत येऊन स्वस्थ बसतो अशी कथा अरण्यकांडांतील ३१ व्या सर्गांत आहे. परतु शूर्पणखेनें सीताहरणाची कल्पना ज्या कौशल्यपूर्ण रीतीनें सुचविली तीमधील सर्व सौंदर्य या कथेनें नाहींसें होतें. या कथेमुळें रावणाचा हट्टीपणा कमी दर्जाचा दिसतो. व त्याचप्रमाणें यामुळें शूर्पणखेच्या करामतीची अगोदरच कल्पना होते. या दोन्हीही गोष्टी काव्यदृष्ट्या अत्यंत हीन होत. याप्रमाणें पुढें होणाऱ्या गोष्टींची अवास्तव माहिती करून देणारा हा सर्ग उघड-उघड प्रक्षिप्त आहे.

सुंदर कांडांतील ६ व्या व ७ व्या सर्गांत यमकबद्ध श्लोकांमध्यें पावसाळ्याचीं वर्णनें असून त्यांत नावीन्य व सौंदर्य कांहींच नाहीं. २८ व्या सर्गांत लांब वृत्तांत सीतेचा विलाप आहे. परंतु त्या स्थलीं तो अगदीं निरर्थक वाटतो. या सर्गामुळें मागील कथाभागाशीं विसंगतता आलेली असून कथासंदर्भ तुटला आहे.

आपल्या सभोंवतीं असणाऱ्या राक्षसिणीमुळें भ्यालेली सीता २६ व्या सर्गांत शोक करीत आहे. सर्व राक्षसिणीमध्यें सीतेशीं मित्रभावानें वागणारी त्रिजटा " रावण युद्धांत मेला असून राम विजयी झाला आहे " असें स्वप्न आपण पाहिल्याचें सीतेला २७ व्या सर्गांत सांगते; व त्यामुळें सीतेला समाधान वाटून ती २७ व्या सर्गाच्या शेवटीं म्हणते—

ततः सा व्रीमती बाला भर्तुर्विजयहर्षिता ।
अवोचद्यादि तत्सत्यं भवेयं शरणं हि वः ॥

परंतु त्याच्याच पुढच्या २८ व्या सर्गाचा पहिला श्लोक

सा राक्षसेंद्रस्य वचो निशम्य
तद्रावणस्याप्रियमप्रियार्हा ।
सीता वितत्रास यथा वनांते
सिंहावपन्ना गजराजकन्या ॥

असा आहे.

रावणाच्या भाषणाचा पुन्हां केलेला हा उल्लेख व त्यावरून सीतेचा पुनः शोक करणें हें अगदीं चमत्कारिक आहे; कारण रावण तेथून भाषण करून गेल्यानंतर पुष्कळ गोष्टी घडलेल्या आहेत. राक्षसींनीं सीतेला भीति दाखविली; त्रिजटेनें सीतेला आपलें स्वप्न सांगितलें; व त्यामुळें सीतेला समाधान वाटलें. इतक्या गोष्टी रावण गेल्यानंतर घडलेल्या आहेत. परंतु कवि तर रावणानें आपलें कटु भाषण नुक्तेंच संपविलें असें धरून चालला आहे. त्याच्यापेक्षां जास्त काळजीनें लिहिणारा कवि असता तर त्यानें " निशम्य " या शब्दाच्या ऐवजीं " अनुस्मृत्य " असा शब्द तरी घातला असता; कारण " रावणाच्या भीतिप्रद शब्दांची आठवण होऊन " हें " रावणाचे भीतिप्रद शब्द ऐकून " यापेक्षां कांहीं तरी बरें दिसतें.

यासारखे किती तरी सर्ग केवळ रामायणाचा विस्तार वाढविण्याच्या हेतूनें नवीन घालण्यांत आले आहेत. त्यांच्यामध्यें मुळांतल्यापेक्षां जास्त वर्णनें, विलाप व भाषणें असून त्यांच्यांतील द्विरुक्तीमुळें ते वाचावेसे देखील वाटत नाहींत. त्यांची रामायणांत इतकी रेलचेल आहे कीं, त्यांचीं विशिष्ट उदाहरणें देण्याचें विशेष कारण नाहीं. तेव्हां वरच्याच्या जोडीला युद्धकांडांतील १११ व्या सर्गाचें आणखी उदाहरण दाखवून देऊन हा विषय पुरा करूं. या सर्गामध्यें मंदोदरीचा विलाप आहे. या वर्णनांत मागील वर्णनांची पुनरावृत्ति तर आहेच; परंतु त्यांत विसंगतिही भरपूर आहे. कारण, ११० व्या सर्गांत ८३ व्या श्लोकांत "मला रावणाच्या या शवाची उत्तरक्रिया करण्याची इच्छा आहे" असें विभीषण रामाला सांगतो.

एतस्य यत्प्रेतगतस्य कृत्यं
तत्कर्तुमिच्छामि तव प्रसादात् ॥

रामही

मरणांतानि वैराणि निर्वृत्तं नः प्रयोजनम् ।

असें म्हणून त्याला अनुमति देतो. इतकें झाल्यावर पुन्हां मंदोदरी विलाप करते काय आणि नुकत्याच दर्शविलेल्या आपल्या मनोवृत्तीशीं अत्यंत विसंगत अशी मनोवृति धारण करून बिभीषण त्याच विषयावर पुन्हां भाषण करूं लागतो काय! सर्वच गोंधळ आहे. हा सर्ग स्पष्टपणें प्रक्षिप्त असून यांतच पहिल्याप्रथम मंदोदरीचा उल्लेख आला असून तो रामायणांत शेवटचाच आहे. महाभारतांत ज्याप्रमाणें दुर्योधनाच्या स्त्रीचा उल्लेख मुळींच न करून काव्यसौंदर्य वाढविण्यांत आलें आहे, त्याप्रमाणें वाल्मीकीनें स्वतः आपल्या काव्यांत रावणाची स्त्री मंदोदरी व इंद्रजिताची स्त्री सुलोचना यांचा उल्लेखही केला नसावा असें वाटतें.

रामायणाची पुनर्रचना ज्यानें केली त्यानें आपल्या काव्यशक्तीस वाव देण्याची इच्छा धरून रामायणांत नवीं वर्णनें, नवे विलाप व व नवीं भाषणें घातलीं; त्याप्रमाणें त्याच इच्छेनें त्यापुढील कवींनीं रामायणास नमुनेदार सर्गबंध काव्याचें रूप दिलें. भवभूतीच्या उत्तररामचरितांत रामायणाच्या विभागांचा अध्याय असा उल्लेख आला आहे; त्यावरून रामायणाला सर्गबंध काव्याचें स्वरूप रामायणाच्या पुनर्रचनाकारानंतर पुष्कळ काळानें प्राप्त झालें असलें पाहिजे, हें पूर्वी सिद्ध केलेंच आहे. रामायणास सर्गबंध काव्य बनवावयाचें असल्यामुळें त्याच्या प्रत्येक अध्यायाच्या शेवटीं एक एक लांब वृत्ताचा श्लोक घालावा लागला आहे; व ज्यांना ज्यांना काव्यगुणदोषविवेचनाची शक्ति आहे, त्यांनीं त्यांनीं या श्लोकांना नवीन ठरविलें आहे. त्यांतील कांहीं श्लोक पुनर्रचनाकारानें लिहिले आहेत असें जरी सिद्ध करतां येत असलें तरी त्यांतील बहुतेक सर्व मागाहून घातलेले आहेत असें त्यांच्या अप्रसिद्ध वृत्तांवरूनच दिसून येतें. या श्लोकांतून मागें गेलेल्या कल्पनांची सरसहा पुनरावृत्ति असून कित्येक ठिकाणीं तर पूर्वीच्या कथासंदर्भाशीं अत्यंत विसंगतता आढळते. या गोष्टीचें एकच उदाहरण पुरें होईल. अयोध्याकांडांतील ५२ व्या सर्गाच्या शेवटीं शेवटीं राम म्हणतो—

अद्य दुःखं तु वैदेही वनवासस्य वेत्स्यति ।
प्रणष्टजनसंबाधं क्षेत्रारामविवर्जितम् ।
विषमं च प्रपातं च वनमद्य प्रवेक्ष्यति ॥

आणि एवढें असून नवीन घातलेल्या लांब वृत्ताच्या शेवटच्या श्लोकांत

स लोकपालप्रतिमप्रभाव–
स्तीर्त्वा महात्मा वरदो महानदीम् ।

ततः समृद्धान् शुभसस्यमालिनः
क्षणेन वत्सान् मुदितानुपागमत् ॥

असें म्हटलेलेंआहे.खरा प्रकार असा आहे कीं,रामाच्या वेळीं भरभराटीस आलेला वत्सदेश मुळींच अस्तित्वांत नव्हता. गंगा व यमुना यांमधील सर्व प्रदेश अरण्यमय असून त्यांच्या संगमावर राहत असलेल्या भरद्वाजाशिवाय त्या प्रदेशांत कोणाचीही वसति नव्हती.

(२). रामायणांत आणखी भर घालण्यास काल्पनिक गोष्टींच्या बाबतींत वरच्या इतकीच वाव सांपडली. महाभारताच्या पुनर्रचनेनंतर प्रत्येक महाकाव्य व पुराण यांना काल्पनिक कथांचा अथवा प्रचलित दंतकथांचा संग्रह बनविण्याची महत्वाकांक्षा उद्भूत झाली व तीस अनुसरून हल्लींच्या रामायणांत दंतकथांचा खूप भरणा आहे. त्यांपैकीं कांहीं अगदीं योग्य ठिकाणीं पडलेल्या असून कांहीं मात्र अगदीं अयोग्य ठिकाणीं घातलेल्या आहेत. अशा कथांचा सर्वांत जास्त भरणा उत्तरकांडांत आहे. रामाच्या पराक्रमाविषयींच्या व रावणाच्या दुष्कृत्याविषयींच्या पुढें असलेल्या इतिहासावर संतुष्ट न होऊन अगदीं अलीकडेपर्यंत रामायणांत सर्गावर सर्ग घातले जात आहेत. व अशा कित्येक सर्गावर ते कृत्रिम व प्रक्षिप्त आहेत या कारणानें खुद्द टीकाकारांनींच टीका करण्याचें नाकारिलेलें आहे. वाली व मारुति यासंबंधीच्या गोष्टी व विशेषतः मारुतीच्या व्याकरणनैपुण्याचा उल्लेख, या गोष्टी मागून घातल्या गेल्या असल्या पाहिजेत. पुढें तर लक्ष्मणाच्या तोंडीं कित्येक गोष्टी घातल्या आहेत. लक्ष्मण रामाला यज्ञविषयक गोष्टी सांगतो, व रामही त्याला उलट अनेक नानाविध गोष्टी सांगतो. लक्ष्मणाला गोष्टी सांगण्यास लावण्यांत पुनर्रचनाकारानें आपलें अकुशलत्व स्पष्टपणें जाहीर केलें आहे. गोष्टी बहुधा वृद्ध आणि सन्मान्य मंडळी सांगत असतात.

परंतु उत्तरकांडाच्या ८४ व्या व ८५ व्या सर्गांत वयानें व ज्ञानानें लहान असा लक्ष्मण रामाला दंतकथा सांगत असल्याचा मोठा चमत्कारिक देखावा नजरेस येतो. राम लक्ष्मणाला वृत्रवधाची प्रसिद्ध गोष्ट सांगावयास सांगतो हें तर हास्यास्पदच होय. परंतु स्वतःच्या काळीं प्रचारांत असलेल्या दंतकथा कोणत्याना कोणत्या तरी पात्राच्या तोंडीं योग्यायोग्यतेचा विचार न करतां घालण्याचा हा पुनर्रचनाकाराचा प्रयत्न असावा असें दिसतें.

याच विषयांत आणखी शिरून एकंदर प्रक्षिप्त गोष्टींची गणना करूं गेल्यास तें फार कालावधीचें व तसेंच श्रमाचें काम होईल व तें काम सोपेंही नाहीं. परंतु कांहीं उदाहरणें देऊन सिद्ध करितां येईल कीं, कित्येक गोष्टी प्रथमदर्शनीच प्रक्षिप्त अहेत हें दिसून येतें. शांता व ऋष्यशृंग यांची कथा उघड उघड मागाहून घातलेली आहे. कारण तीमुळें कथासंदर्भ तुटत आहे. दशरथ आपला कुलगुरु जो वसिष्ठ त्याला आपली अश्वमेध करावयाची इच्छा आहे असें सांगतो. वसिष्ठाला राजाचें म्हणणें पसंत पडून तो सरयूच्या पलीकडच्या तीरावर यज्ञभूमि तयार करा व घोडा मोकळा सोडा अशी आज्ञा सेवकांना करतो. दशरथ राज्ञी कौसल्येला दीक्षा घ्यावयास सांगतो; व तीं सर्व आनंदमग्न होतात. इतकें झाल्यावर सुमंत—हा वसिष्ठापेक्षांसुद्धां हुषार असावा!—मध्येंच येऊन सनत्कुमाराविषयींच्या गोष्टी सांगतो. व शेवटीं ऋष्यशृंगाला आणवितात. त्यानंतर राजा ऋषींना व वसिष्ठाला पूर्वीचाच प्रश्न करतो; त्याला पूर्वीचेंच उत्तर मिळतें; व राजा पुन्हां प्रधानांना पूर्वीचेंच हुकूम सोडतो. त्यामुळें—

संभाराः संभ्रियन्तां ते तुरगश्च विमुच्यताम् ।
सरय्वाश्चोत्तरे तीरे यज्ञभूमिर्विधीयताम् ॥

हा श्लोक तीन वेळां आला आहे. याप्रमाणें या गोष्टीनें मागील कथासंदर्भ तुटत असल्यानें ती मागाहून घातलेली असली पाहिजे. विश्वामित्र व वसिष्ठ यांच्यामधील भांडणाच्या गोष्टी याच जातीच्या होत. या गोष्टी सांगतांना शतानंद विश्वामित्राच्या अचाट कृत्यांचें मोठ्या आवेशानें व वक्तृत्वपूर्ण वर्णन करतो तर त्या वेळीं मूळ गोष्टीचें पुढें काय झालें ही वाचकाला उत्कंठा लागलेली असते. या गोष्टी निःसंशय महाभारतांतूत घेतल्या आहेत, व त्या तशा घेतल्या आहेत यावरून जीं अनुमानें निघतात त्यांविषयीं पुढें विचार करूं.

दुसरें व तिसरें कांड हीं मात्र या प्रकारच्या कथांपासून अलिप्त आहेत. कावळ्याचा डोळा गेल्याबद्दलची गोष्ट प्रक्षिप्त असून तिजवर टीकाकारांनी टीकाही केलेली नाहीं. परंतु ती गोष्ट भवभूतीच्या आधीं घातली गेली असली पाहिजे, कारण आपला प्रसिद्ध श्लोक त्यानें या प्रक्षिप्त सर्गातूनच घेतला आहे.

त्वदर्थमिव विन्यस्तः शिलापट्टोऽयमग्रतः ।
यस्यायमभितः पुष्पैः प्रवृष्ट इव केशरः ॥

शिवाय रामायणाच्या एकंदर विशुद्ध रचनेशीं हा सर्ग विसंगत आहे; कारण रामायणांतील सीता व राम यांच्या प्रणयाचीं वर्णनें अत्यंत शुद्ध व निर्दोष आहेत. वातापी व इल्वल यांची गोष्टही प्रक्षिप्तच आहे; कारण तीमुळेंही मागचा पुढचा संबंध तुटत असून तींत कित्येक श्लोकांची पुनरावृत्तिही झालेली आहे.

निगृह्य तरसा मृत्युं लोकानां हितकाम्यया ।
यस्य भ्रात्रा कृतयं दिक् शरण्या पुण्यकर्मणा ॥

हा श्लोक दोनदां आला आहे; आणि

धारयन् ब्राह्मणं रूपमिल्वलः संस्कृतं वदन् ।

या श्लोकांत संस्कृत या शब्दाचा उपयोग आर्यांची भाषा या अर्थी केला आहे. परंतु त्याचा तसा उपयोग प्राचीन ग्रंथांतून केलेला आढळत नाहीं. किष्किंधा कांडांत अशा कांहीं दंतकथा आहेत; परंतु सुंदरकांड व युद्धकांड यांमध्यें फारच थोड्या आहेत. त्यांचा सर्वांत जास्त भरणा उत्तरकांडांत असून त्यांचा प्रक्षिप्तपणा सहज नजरेस येतो.

रामायणांत भर घालण्यास आणखी तिसरें कारण म्हणजे रामायणाला ज्ञानभांडार बनविण्याची पुनर्रचनाकाराची इच्छा होय. या ज्ञानसंग्रहाच्या बाबतींत महाभारताची बरोबरी कोणताही ग्रंथ करूं शकत नाहीं. त्यामध्यें आपल्याला दंडनीति, तत्त्वज्ञान, शास्त्रें व धर्म यासंबंधींची इतकी संपूर्ण माहिती मिळते कीं, त्या त्या विषयावर स्वतंत्रपणें लिहिलेल्या पुस्तकांतून तशी मिळेल कीं नाहीं याविषयीं वानवाच आहे. तात्त्विक व धार्मिक बाबतींत भगवद्गीता, शांतिपर्व व अनुशासनपर्व हीं प्रमाणभूत मानलीं जातात. परंतु या बाबतींत रामायणाच्या द्वितीय संपादकाला मुळींच यश आलेलें नाहीं. याचें कारण एक तर त्या काळीं प्रचलित असलेल्या रामायणाची रचना असल्या प्रकारच्या फरकाला अनुकूल नसेल; किंवा पुनर्रचनाकारच असावा तितका कुशल किंवा विद्वान् नसेल. तथापि महाभारताचें अनुकरण करून, ज्ञानाच्या नानाविध शाखांचें विवरण करण्याकरितां सर्गचे सर्ग मात्र रामायणांत घातलेले आहेत; परंतु कथासंदर्भाशीं ते विसंगत असल्याकारणानें त्यांचा प्रक्षिप्तपणा तेव्हांच नजरेस येतो. ज्या वेळीं रामानें भरताला अयोध्येकडील एकंदर वर्तमानासंबंधानें उत्सुकतेनें प्रश्न करण्यास पाहिजे होते, त्या वेळीं राम भरताला दंडनीतीचे धडे शिकवूं लागतो; असा चमत्कारिक प्रकार अयोध्याकांडाच्या ज्या १००

ज्या सर्गात आहे तो सर्ग महाभारतांतून उतरून घेतलेला असून मागील कथाभागाशींही विसंगत आहे हें मागें सिद्ध केलेंच आहे.

सीतेला शोधण्याकरितां वानरसमूह निघाले असतां, त्यांना सुग्रीवाच्या तोंडून पृथ्वीची भौगोलिक माहिती सांगवून किष्किंधा कांडाच्या ४०–४१ सर्गात या पुनर्रचनाकारानें असाच गोंधळ उडवून दिला आहे. "मला त्या दुष्ट राक्षसाचे (रावणाचे) वसतिस्थान माहीत नाहीं" हें सुग्रीवाचें म्हणणें, आणि लंका-नगरी त्या वधयोग्य राक्षसाचें निवासस्थान आहे" हें त्याचेंच म्हणणें हीं परस्परांशीं किती विसंगत आहेत हें पूर्वीच दाखविलें आहे; परंतु या भूगोलविषयक प्रक्षिप्त सर्गात आणखीही कित्येक अत्यंत असंभाव्य गोष्टी आढळतात. पहिली गोष्ट ही कीं, सुग्रीव जरी सर्व मार्ग किष्किंधेहून दाखवितो आहे, तरी या सर्गातील वर्णनांत वर्णनमध्य दिल्लीच्या आसपास आहे; यामुळें किष्किंधेच्या उत्तरेस असणाऱ्या नद्या व प्रदेश वगैरे तिच्या दक्षिणेस असल्याचें या सर्गावरून भासतें. तेव्हां सहजच तर्क होतो कीं, या सर्गाच्या लेखकाच्या काळीं कुरुक्षेत्र हें आर्यप्रदेशाचें मध्यस्थान असल्याकारणानें तें त्यानें या वर्णनाच्या मध्यस्थानीं कल्पिलें असावें. टीकाकाराला सुद्धां हीं विसंगत गोष्ट दिसून आल्यामुळें तो म्हणतो—

हिमवद्विंध्यमध्यवर्ति आर्यावर्तापेक्षया
प्राच्यादिविभागाः ॥ !!!

याच वर्णनांतील दुसरी एक मोठी विसंगत गोष्ट म्हणजे सुग्रीवानें केलेला पांड्य देशाचा उल्लेख होय.

युक्तं कवाटं पाड्य नां गता द्रक्ष्यथ वानराः ।

जर रामाच्या वेळीं या वर्णनांत उल्लेखिलेले पांड्यादि दक्षिणे-

कडील देश अस्तित्वांत होते, तर सीतेला शोधण्याकरितां व रावणाशीं युद्ध करण्याकरितां रामाला मनुष्याची मदत मिळूं नये हें फार चमत्कारिक दिसतें. रामकालीं आर्यांच्या वसाहती गोदावरीच्या दक्षिणेस मुळींच नव्हत्या* या-विषयीं संशय घेण्यास अगदीं जागा नाहीं; तेव्हां पांड्य देशाचा हा उल्लेख म्हणजे निव्वळ कालविपर्यास होय. ग्रीकांच्या वेळीं पांड्य राष्ट्र चांगलें प्रसिद्ध होतें; व रामायणाचा पुनर्रचनाकार इसवी सनापूर्वी १०० या सुमाराचा असल्यामुळें, त्या वेळीं माहीत असलेल्या देशांचें भूगोलवर्णन जसेंच्या तसें त्यानें उतरलें असलें पाहिजे; तेव्हां पांड्य देशाचा त्यांत साहजिकच उल्लेख आला असावा. अगस्त्य ऋषीचा आश्रम गोदावरीच्या उत्तर तीरावर होता असें अरण्यकांडांत लिहिलेलें आढळतें; परंतु सुग्रीवाच्या या भूगोलवर्णनांत तो आश्रम मलय पर्वताच्या शिखरावर होता असें लिहिलें आहे.

तस्यासीनं नगस्याग्रे मलयस्य महौजसः ।
द्रक्ष्यथादित्यसंकाशमगस्त्यमृषिसत्तमम् ॥

"अगस्त्याचे पुष्कळ आश्रम होते" असें टीकाकार स्पष्टीकरण करतो. पुनर्रचनाकारानें ज्या वेळीं हें वर्णन लिहिलें त्या वेळीं अगस्त्य दक्षिणेकडे राहत होता अशी समजूत असावी व लोकांनीं त्याला या जागीं नेऊन ठेविलें असावें. परंतु लोकमताची अशी हुबेहूब नक्कल करितांना विरोध व विसंगतता उत्पन्न होते याकडे मुळींच लक्ष या पुनर्रचनाकारानें दिलेलें न हीं.

---

* द्राविडाः सिंधुसौवीराः सौराष्ट्रा दक्षिणापथाः । (३७।१०।२) हे राजे रामाच्या राज्याभिषेकाच्या वेळीं हजर होते असें रामायणांत वचन आहे; परंतु वर दिलेल्या कारणावरूनच तें प्रक्षिप्त आहे हें दिसून येईल.

रामायणांत भर पडण्याचें शेवटचें परंतु महत्वाचें कारण म्हणजे अद्भुत गोष्टींची भरती करण्याची इच्छा हें होय. अद्भुततेविषयीं लोकांची इच्छा कालानुक्रमानें वाढत आहे, व त्यामुळें रामायणांत चमत्कार व आश्चर्यें यांचा एकसारखा इतका भरणा होत आहे कीं, रामचरित्राविषयीं लोकांत हल्लीं ज्या कल्पना प्रसृत आहेत त्यांच्याशीं जुन्या लोकांना संमत असलेली ही वाल्मीकिरामायणाची आवृत्ति जर ताडून पाहिली तर ती फार साधी व रुक्ष आहे असें म्हणावें लागेल. या अद्भुततेविषयींच्या लालसेनेंच पुनर्रचनाकाराला नवीन कथा शोधून काढण्याची, किंवा होत्या त्यांचा विस्तार करण्याची इच्छा झाली असली पाहिजे. तसेंच त्याच्या वेळीं लोकांत प्रसृत असणाऱ्या सर्व अद्भुत कथांचा त्यानें रामायणांत समावेश केला असला पाहिजे. हा नवीन झालेला विस्तार त्यांतील पूर्वकथाभागाशीं येणाऱ्या विरोधामुळें किंवा विसंगततेमुळें—हा विरोध किंवा ही विसंगतता लेखकाच्या दृष्टींतून निसटल्यामुळें म्हणा किंवा वाल्मीकीचें रामायण जसेंच्या तसेंच ठेवण्याची त्याची इच्छा होती म्हणून म्हणा राहिली आहे—तावडतोब निराळा दिसतो. उदाहरणार्थ कांचनमृगाची गोष्ट घेऊं या. ही गोष्ट सुंदर पण मूळ रामायणांतील नसावी. बहुधा राम व लक्ष्मण सीतेला जटायूच्या* स्वाधीन करून दोघेही एकदमच शिकारीला गेले असावे, व त्यांच्या प्रमादानें मिळालेल्या या संधीचा फायदा घेऊन रावण आला असावा व जटायूला मारून त्यानें सीतेला नेली असावी. राम

---

* सोऽहं वाससहायस्ते भविष्यामि यदीच्छसि ।
सीतां च तात रक्षिष्ये त्वयि याते सलक्ष्मणे ॥

हें जें जटायूनें रामाला सांगितलें आहे तें या ठिकाणीं विचारणीय आहे.

कांचनमृगाच्या मागें लागून गेलेला होता; व त्याची दुःखाची आरोळी ऐकून त्याच्या पाठीमागें लक्ष्मण गेलेला होता; हें जर खरें मानलें तर रावणाला सीता जी, " महाराज जरा थांबा, माझे पति वनांतील विपुल फळें व मृग, साळू, अस्वल वगैरे पुष्कळ प्राणी मारून त्यांचें मांस घेऊन लौकरच येतील " असें म्हणते ती तसें म्हण ली नसती.

आगमिष्यति मे भर्ता वन्यमादाय पुष्कलम् ।
रुरून् गोधान् वराहांश्च हत्वादायामिषं बहु ॥

पुढें असें घडेल असें वाटल्यावरून ती असें म्हणाली असें म्हणतां येणार नाहीं. कारण तिनें आपली इतर हकीकत जितक्या सरळपणानें व मोकळेपणानें सांगितली तितक्याच सरळपणानें व मोकळेपणानें तिनें राम कांचनमृगाच्या मागें गेला आहे हेंही सांगितलें असतें. शिवाय या गोष्टींत ज्या ठिकाणीं रावण साधु म्हणून पुढें येतो व सीता त्याच्याशीं जणूं काय तिच्या दिरामध्यें व तिच्यामध्यें कांहींच भांडण झालें नाहीं अशा रीतीनें बोलते त्या ठिकाणीं ही गोष्ट थोडीशी विसंगत, असंभाव्य, व रचनाचातुर्य-हीनत्वदर्शक भासते. कारण लक्ष्मणानें " रामावर कोणत्याही प्रकारचें संकट आलें नसून ही सर्व राक्षसांची माया आहे " असें सांगितलें असतां ती त्याला इतके कठोर शब्द बोलली होती कीं सीतेचा स्वभाव लक्षांत घेतां कसल्या तरी भयंकर विकाराच्या तडाख्यांत सांपडल्याशिवाय तिच्या तोंडून असे शब्द निघाले नसते. परंतु आश्चर्याची गोष्ट ही कीं, रावण ज्या वेळीं आला त्या वेळच्या सीतेच्या वर्तनांत तशा कोणत्याही विकाराची छटासुद्धां दिसत नाहीं. आमच्या मतें ही कांचनमृगाची गोष्ट सदोष असून तिचा सूर एकच राखण्यांत आलेला नाहीं. वर दिलेल्या श्लोकावरून राम

लक्ष्मण केवळ रोजच्याप्रमाणेंच शिकारीकरितां व फळेंमुळें गोळा करण्याकरितां सीतेचा हवाला जटायूवर टाकून गेले होते असें मानणेंच जास्त सयुक्तिक होईल.

शरभंग व त्याच्या पर्णकुटिकेसमोर लोंबणारें इंद्राचें स्वर्गीय तेजयुक्त विमान या गोष्टीविषयीं अजीच संशय आहे. शिवाय रामानेंही शरभंग व सुतीक्ष्ण यांनीं विचारिलेल्या प्रश्नाला तेंच तेंच उत्तर दिलें आहे.

अहमेवाहरिष्यामि स्वयं लोकान्महामुने ।
आवासं त्विहमिच्छामि प्रदिष्टमिह कानने ॥

हा श्लोक दुसऱ्या एका दृष्टीनेंही चमत्कारिक आहे; कारण राम पहिल्या अर्धात स्वतः विष्णु किंवा ईश्वर असल्याबद्दलची जाणीव दर्शित करतो; परंतु लगेच दुसऱ्या अर्धात कांहीं माहितीची विचारपूस करून मानवी दैर्बल्य प्रदर्शित करतो. पुढील अध्यायांतील

आपृच्छामः प्रयास्यामो मुनयस्त्वरयंते नः ।
त्वरामहे वयं द्रष्टुं कृतस्नमाश्रममंडलम् ॥

या श्लोकाशींही वरील श्लोक विसंगत आहे. जरा विचार केल्यासही ज्या कथा, अतिशयोक्तीमुळें किंवा निष्काळजीपणानें केलेल्या रचनेमुळें, मागून घातलेल्या आहेत हें ध्यानांत येतें अशा कथा पुष्कळ दाखवितां येतील. भरद्वाजानें आपल्या अलौकिक सामर्थ्याच्या बळावर भरताच्या सैन्याला दिलेल्या मेजवानीचें वर्णन विश्वामित्राच्या सैन्याला वसिष्ठानें दिलेल्या मेजवानीच्या वर्णनाची हुबेहूब नक्कल आणि पुनरावृत्ति आहे; व ही पुनरावृत्ति अगदीं निष्कारण केलेली आहे. गंगानदीच्या जलानें भारत-युद्धांतील मृतवीरांना अर्घ्यप्रदान केल्यबरोबर ते मृत वीर आपल्या वंशजांसमोर उभे राहिले या महाभारतांतील कथेची नक्कल करून 'मृत

ग्रं. क्र. ..... नों. दि .....
[५१]
कि. ..... क्र. .....

दशरथानें रामाला पुन्हां दर्शन दिलें' ही गोष्ट युद्धकांडाच्या २१९ व्या सर्गांत लिहिली आहे ती प्रक्षिप्त आहे हें निःसंशय. तिची रामायणांत कांहीं आवश्यकता दिसत नाहीं; किंवा तिजपासून कांहीं नैतिक किंवा रसपोषक असा पारिणामही होत नाहीं. मारुतीनें द्रोणागिरी आणल्याची कथा तीनदां आलेली असून ती वाचल्यावर तो पर्वत एकदां आणल्यानंतर कायमचा लष्करांत ठेवून दिला असतां म्हणजे पुन्हां पुन्हां आणण्याची निरर्थक खटपट तरी पडली नसती असें वाटल्याविना राहत नाहीं. इंद्रजिताच्या सर्पबंधापासून रामास उठविण्याकरितां गरुड आला ही कथाही प्रक्षिप्तच आहे; कारण त्या सर्गाच्या मागच्याच सर्गांत राम आपल्या सामर्थ्याच्या जोरावर स्वतःच मूर्छेतून उठला असा उल्लेख आहे.

तावुत्थाप्य महातेजा गरुडो वासवोपमौ ।
उभौ च सस्वजे हृष्टो रामश्चैनमुदीक्षत ॥

या श्लोकांत आणि

एतस्मिन्नंतरे रामः प्रत्यबुध्यत वीर्यवान् ।
स्थिरत्वात्सत्त्वयोगाच्च शरैः संदानितोऽपि सन् ॥

या श्लोकांत पूर्ण विरोध दिसतो. सीतेच्या अग्निदिव्याच्या वेळीं ब्रह्मादि सर्व देव हजर होते ही कथाही प्रक्षिप्त आहे. कारण, त्याच्या आधींच सीता पवित्र आहे हें अग्नीनें जाहीर केलें होतें. परंतु आश्चर्याची गोष्ट ही कीं, मी कोण आहे हें राम देवांस विचारितो व लगेच देव त्याची वेदांतिक पद्धतीनें लांबच लांब स्तुति करण्यास प्रवृत्त होतात. रामानें विचारिलेला प्रश्न एकंदर कथाभागाच्या दृष्टीनें प्रासंगिक कसा ठरतो हें एक

कोडेंच आहे. रामायणांतील अद्भुतता वाढविण्यासाठीं ज्या ज्या कथांची त्यांत मागाहून भर पडली आहे, त्या सर्व गोष्टींचें येथें विवेचन करूं गेल्यास तें वाचकांस कंटाळवाणें होईल. अशा गोष्टी सर्व रामायणभर पसरलेल्या असून त्यांपैकीं प्रक्षिप्त कोणत्या हें अगदीं सामान्य वाचकांस सुद्धां ओळखितां येईल. बहुधा वाल्मीकीचें मूळरामायणच अतिशयोक्तीच्या पायावर उभारलेलें असावें. पुढें पुनर्रचनेच्या वेळीं व इतर भर पडत गेली त्या त्या वेळीं मूळ काव्यांतील या विशिष्ट गोष्टीची साहजिकच जास्त वाढ झाली असावी. या अतिशयोक्तीसंबंधींचें आणखी एक उदाहरण देऊन हा भाग पुरा करूं.

मूळ रामायणांत आयुर्मर्यादा फार मोठी मुळींच सांगितलेली नाहीं, एवढेंच नव्हे तर वैदिक वाङ्मयांत सांगितलेल्या "शतायुर्वै पुरुषः" या मर्यादेव हेर मूळ रामायणांतील वयोमर्यादा गेलेली नाहीं. रामाचें लग्न १६–१८ या दरम्यान झालें; व क्षत्रिय राजपुत्रांचीं सकस वाढ आणि सामर्थ्यवान् शरीरयष्टि यांचा विचार करितां त्याच्या लग्नाच्या वेळच्या लहान वयाबद्दल आश्चर्य मानण्याचें कारण नाहीं. २८–३० वर्षांच्या दरम्यान त्याला यौवराज्याभिषेक व्हावयाचा होता; परंतु त्याला त्या वेळीं वनवासास जावें लागलें ही गोष्ट महशूरच आहे. लंका जिंकून १४ वर्षांनंतर तो अयोध्येस परत आला, व त्याला राज्याभिषेक करण्यांत आला; त्या वेळीं त्याचें वय ४२।४३ वर्षांचें असावें; व यांत सर्वसाधारण वयोमानाच्या दृष्टीनें कांहीं अधिक नाहीं; परंतु इतकें असूनही अतिशयोक्तीची कमाल करून त्यानंतर रामानें ११००० वर्षें राज्य केलें असें दाखविण्यांत आलें आहे. दशरथानेंही ६०००० वर्षें राज्य केलें असें रामायणांत लिहिलें आहे. परंतु मनुष्याची वयो-

मर्यादा साधारणतः १०० वर्षें आहे, हें स्वतः दशरथच कबूल करीत आहे.

प्राप्य वर्ष सहस्राणि बहून्यायूंषि जीवतः ।

या श्लोकार्धांतील " बहून्यायूंषि " याचें विवरण टीकाकार " वत्सरशतरूपाण्यनेकपुरुषांयूंषि " असें करतो. एकट्या दशरथानें मात्र ६०००० वर्षें जगावें व त्याच्याच वेळचीं आयुर्मर्यादा १०० च असावी हें खरोखर असंभवनीय आहे. रामायणाच्या पुनर्रचनाकारानें रामायणांत सोडलेलें लांब आयुमर्यादेचें हें पिलूं उत्तर कांडांतील " ब्राह्मणाच्या अकालीं मृत्यू पावलेल्या मुलाच्या गोष्टीनें " अधिकच किळसवाणें दिसतें. हें अकालीं मृत्यू पावलेलें मूल अवघें ५००० वर्षांचें असून, मृत्युसमयीं त्याला यौवनदशाही प्राप्त झाली नव्हती !

अप्राप्तयौवनं बालं पंचवर्षसहस्रकम् ।
अकाले कालमापन्नं मम दुःखाय पुत्रकम् ॥

या ठिकाणीं वर्ष म्हणजे दिवस हा अर्थ घ्यावा असें म्हणून टीकाकार या असंभाव्य गोष्टीचें स्पष्टीकरण करतो खरें; परंतु 'वर्ष' शब्दाचा हा उपयोग अगदीं अपूर्व होय. आणि रामानें ११००० वर्षें व दशरथानें ६०००० वर्षें राज्य केलें असें ज्या ठिकाणीं लिहिलेलें आहे त्या ठिकाणीं वर्ष शब्दाचा वरील अर्थ कां स्वीकारूं नये ? इतकें असूनहि कालिदास या लांब आयुर्मर्यादेच्या कल्पनेचा अंगीकार करून " वर्षाणामयुतं ययौ " असें लिहितो.

वसिष्ठाची आयुर्मर्यादाहि अशीच वाढविली आहे; परंतु त्यामुळें इतर ठिकाणीं नेहमीं घडून येणारा जो परिणाम तो याहि ठिकाणीं घडून आला आहे. रामाच्या लग्नाच्या वेळीं क्षत्रि-

यांच्या चालीस अनुसरून वसिष्ठ जेव्हां त्याची वंशावळ कथन करितो त्या वेळीं तो

द्वे चास्य भार्ये गर्भिण्यौ बभूवतुरिति श्रुतिः ।

" सगराच्या दोन स्त्रिया गर्भवती झाल्या असें ऐकिलें आहे. " असे उद्गार सगराविषयीं काढतो. अयोध्याकांडाच्या १०० व्या सर्गात

कल्माषपादपुत्रोऽभूच्छंखणस्त्विति नः श्रुतम् ।

" कल्माषपादाला शंखण नांवाचा मुलगा होता असें आम्ही ऐकिलें आहे " असें वाक्य सांपडतें. या दोन्ही वचनांवरून असें दिसतें कीं, वसिष्ठ सगराच्या अथवा कल्माषपादाच्या वेळीं जिवंत नव्हता. अयोध्याकांडाच्या दुसऱ्या एका सर्गात तो म्हणतो " स तेऽहं पितुराचार्यस्तव चैव परंतप । " हा वसिष्ठ बहुधा दशरथाचा व त्याच्या पुत्राचाच फक्त आचार्य असावा; परंतु पुनर्रचनाकाराच्या वेळीं लोकांत अशी समजूत होती कीं वसिष्ठ हा युगानुयुगे जिवंत असून इक्ष्वाकूपासून रामापर्यंत इक्ष्वाकु वंशाचा आचार्य तोच होता; व ही समजूत आजपर्यंत अशीच कायम आहे. विश्वामित्र व वसिष्ठ यांच्या विषयींच्या प्रक्षिप्त गोष्टींवरून असें दिसतें कीं, वसिष्ठ त्रिशंकूचा आचार्य असावा व वसिष्ठानेंच सांगितलेल्या वंशावळीवरून त्रिशंकु हा सगराच्या पित्याचा ७ वा पूर्वज होता असें दिसून येतें.

त्रिशंकुरिति विख्यात इक्ष्वाकुकुलवर्धनः ।
वसिष्ठं स समाहूय कथयामास चिंतितम् ॥

शिवाय आपल्यास

इक्ष्वाकूणां हि सर्वेषां पुरोधा परमा गतिः ।

असें वचनहि दुसरीकडे सांपडतें. एकच वसिष्ठ नव्हे, तर वसिष्ठ

या नांवाचें घराणें इक्ष्वाकु वंशाचें पुरोहित होतें; असा वरील प्रश्नाचा उलगडा करितां येईल; परंतु जनसमूह यावर विश्वास टाकणार नाहीं. परंतु त्यावर विश्वास न ठेवल्यास आपल्यासमोर वसिष्ठानें एकदां सगरांविषयीं मी अमुक अमुक ऐकिलें असें म्हणणें व तोच सगरांच्या ८ व्या पूर्वजाचा पुरोहित होता असें दाखविलें जाणें या दोन गोष्टींमधील स्पष्ट विरोध उभा राहतो.

हें प्रकरण संपविण्यापूर्वी उत्तरकांड हें सबंध प्रक्षिप्त आहे कीं त्याचा कांहीं भाग मूळ कर्त्यानें लिहिला असला पाहिजे, या अत्यंत निकट प्रश्नाचा उलेख करून तो सोडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. हा भाग इ. स. पूर्वी १०० या सुमारास झालेल्या पुनर्रचनेइतका प्राचीन आहे हें तर सिद्धच आहे. कारण उत्तरकाडांतील कथा कालिदासानें अगदीं त्याच पद्धतीनें व कधीं कधीं तर त्यांतीलच शब्दप्रबंध घेऊन लिहिल्या आहेत. परंतु प्रश्न हा आहे कीं, उत्तरकांड वाल्मीकीइतकें प्राचीन आहे कीं काय? युद्धकांडाच्या शेवटीं काव्याच्या अंतीं असणारीं आशीर्वचनें आहेत, व या गोष्टीवरून त्या ठिकाणीं रामायणाचा शेवट झाला ही गोष्ट सूचित होतें, एवढें म्हणून या प्रश्नाचा निकाल लागत नाहीं. कारण, उत्तरकांडाच्या नांवावरूनच तें मागून लिहिलेलें असावें ही गोष्ट सिद्ध होत आहे. तें उत्तर किंवा पाठीमागचें कांड आहे. कथासंदर्भावरून असें दिसतें कीं युद्धकांडाच्या शेवटीं संपलेलें काव्य रामाचें पुत्र कुश व लव यांनीं त्यास गाऊन दाखविलें; तेव्हां त्या काव्याचे गायन होण्यास काय कारणें झालीं व त्यानंतर काय हकीगत घडली हें मूळ काव्यांत येणें योग्य नाहीं. परंतु आम्ही पुढें दिलेल्या मुद्यांवरून असें वाटतें कीं, उत्तर कांड हें 'रामायण'

पूर्ण झाल्यानंतर लिहिलें गेलें असलें तरी तें वाल्मीकिनेंच लिहिलें असलें पाहिजे. ते मुद्दे असेः—(१) रावणाचा इतिहास व त्याचें महत्व हीं कोठें तरी द्यावयास पाहिजेच होतीं; नाहींतर काव्याला अपूर्णता येऊन रामाच्या पराक्रमावर लोकांची श्रद्धा बसली नसती. (हा पराक्रम उत्तरकांडातच वर्णिलेला अहे.) (२) काव्यगायनामुळें संतप्त व निराश झालेली सीता भूमातेबरोबर अदृश्य झाली हा प्रसंग एकेवळ काल्पनिक मानला तरी इतका सुंदर आहे कीं, त्या महान् कवीशिवाय दुसऱ्या कोणाही कवीची प्रतिभा इतकी उंच भरारी मारून असल्या प्रसंगाचें आकलन करूं शकली नसती. हा प्रसंग त्या अत्युज्ज्वल दुःखपर्यवसायी महाकाव्याशीं अत्यंत निगडित असावा असेंच वाटतें.

आतां बहुतेक नवीन भर त्यांतच घातली गेली आहे व घातली जात आहे, यांत मात्र मुळींच संशय नाहीं. टीकाकारांनीं सुद्धां त्यांतील कित्येक सर्ग कृत्रिम व प्राक्षिप्त म्हणून सोडून दिले आहेत. रावण सीतेवर बला कार करण्यापासून परावृत्त कां झाला, या संबंधींचा उत्तरकांडांतील गोष्ट पूर्व कथाभागाशीं अत्यंत विसंगत आहे. नलकूबरानें रावणास दिलेल्या शापाचा उत्तरकांडातील वृत्तांत व पुंजिस्थलेवर बलात्कार केल्याबद्दल ब्रह्मदेवानें त्यास दिलेल्या शापाचा युद्धकांडातील १३ व्या सर्गात दिलेला वृत्तांत हे परस्पराशीं अगदीं विसंगत आहेत. रामायणावरील टीकाकारांस सुद्धां हे विरोध आढळून आले आहेत. व त्यामुळें हल्लीं रामायणाचें परीक्षण करतांना परीक्षकाचें मन भांबावून जाऊन दोहोंपैकीं प्रक्षिप्त कोणतें किंवा दोन्हींच प्राक्षिप्त, याचा निकाल करणें त्याला फार जड जातें. उत्तरकांडांतील भविष्यभाग—म्हणजे सीता अदृश्य झाल्यानंतर घडलेल्या हकीकतीचा वृत्तांत—मात्र मागून

दुसऱ्या कोणी तरी घातला आहे, यांत संशय नाहीं. विशेष आश्चर्याची गोष्ट ही कीं, या भागांतील क्रियापदांचीं रूपें मात्र भविष्यकाळाची नाहींत. रामाच्या भविष्यकालीन आयुष्याचा वृत्तांत वाल्मीकीनें आधींच लिहून ठेवला होता अशी कल्पना लोकांमध्यें पसरविण्याची पुनर्रचनाकाराची इच्छा असतांही या भागांतील रूपें भूतकाळचींच कां असावीं ? शिवाय पहिल्या कांडात ब्रह्मदेवाच्या वरामुळें वाल्मीकीला पूर्वी घडलेलें सर्वकांहीं कळून आलें अशी कथा असून, हें वरील भविष्यकथन या कथेशीही विसंगत आहे.

पुरा यत्तत्र निर्वृत्तं पाणावामलकं यथा ।

या श्लोकार्धांत भविष्यकालीन ज्ञानाविषयीं वाल्मीकि एक चकार शब्दसुद्धां काढीत नसून, तो सर्व कांहीं भूतकालीन ज्ञानाविषयीं बोलत आहे; परंतु " यान्निर्वृत्तं जातं उपलक्षणं यच्च भावि " " भूतकालांत भविष्याचा अंतर्भाव " होतो असा खुलासा करून टीकाकारानें उत्तरकांडांतील भविष्यभाग अविसंगत आहे असें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे; व हा भविष्यभाग मूळ महाकाव्याची स्वाभाविक पुरवणी होतो यांतही संशय नाहीं. राम व त्याचे जुळे मुलगे, लक्ष्मण, भरत, मारुति, सुग्रीव इत्यादिकांचें पुढें काय झालें हें जाणण्याची उत्सुकता प्रत्येक वाचकाला असतेच; व त्या दृष्टीनें भविष्यभाग पुरवणी म्हणून आवश्यक आहे; परंतु हल्लींचे स्वरूपांतील भविष्यरामायण संभाव्य आहे असें वाटत नाहीं; तर तें काल्पनिक असावें असें वाटतें. त्यांत मुख्यतः लक्ष्मणानें रामाला, व रामानें लक्ष्मणास सांगितलेल्या गोष्टींचा समावेश केलेला आहे. पुनर्रचनाकाराच्या कालीं प्रसिद्ध असणाऱ्या राज्यांचाही, रामपुत्र, लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न यांनीं स्थापिलेलीं राज्यें असा उल्लेख आहे. विष्णूचा अवतार जो राम त्याच्या

जन्मानें आपल्यापेक्षां ज्यास्त उच्चत्वास पावलेल्या अयोध्येच्या सूर्यवंशाशीं कांहीं तरी संबंध जुळवावा या इच्छेनें पुनर्रचनाकाराच्या काळच्या कित्येक राजकुलांनीं तीं राज्यें स्थापण्यासंबंधींच्या कथा आपल्या कल्पनेनें बनविल्या असाव्या हीच कल्पना जास्त खरी असण्याचा संभव आहे.

सिंहावलोकन:—

वाल्मीकीच्या रामायणांत भर पडून त्याचा विस्तार होण्यास पुढील गोष्टी कारणभूत झाल्या असाव्या असें दिसतें. (१) राम विष्णूचा अवतार होता ही महाभारतावरून घेतलेली कल्पना. (२) रामायण हें नमुनेदार व पहिलें सर्गबंध काव्य होय ही कल्पना. (३) काव्यालंकारलालसा, किंवा ऋतु, रणसंग्राम, नगरें, राजवाडे यांची जास्त वर्णनें; जास्त शोकवर्णनें, स्तुत्या व संवाद वगैरे घालण्याची अनिवार लालसा. (४) रामायणांत दंतकथांचा संग्रह करण्याची लालसा. (५) रामायणाला ज्ञानभांडार बनविण्याची इच्छा. (६) अद्भुतता व अतिशयोक्ती-संबंधीची लालसा. या सर्व कारणामुळें रामायणांत जी आगंतुक भर पडली आहे, ती सर्व काढून टाकल्यास मूळ म्हणून जें काव्य शिल्लक राहील त्यांतील प्रसंग साधे व रचनाही साधी असली तरी तें अत्यंत मनोरंजक होईल; एवढेंच नव्हे, तर पुढील प्रकरणांत आम्ही दाखविणार आहों त्याप्रमाणें तें नैतिक शिक्षणाच्या बाबतींत अत्यंत उत्कृष्ट आणि उदात्त होईल. याप्रमाणें वाल्मीकीच्या रामायणाची मुख्य पुनर्रचना (या पुनर्रचनेनंतरही रामायणांत थोडथोडी भर पडत गेली आहे;परंतु त्या वेळचें स्वरूप बहुतेक पूर्वीचेंच कायम आहे.) केव्हां, कां, व कशी झाली याचें विवेचन झालें. साहजिक-

पर्णेंच या दुसऱ्या आवृत्तींत दोन समाज व संस्कृति; दोन प्रकारच्या मनोवृत्ति व आकांक्षा; आणि दोन प्रकारचीं ज्ञानें व श्रद्धा या गोष्टींची सरमेसळ झाली असून, कित्येक ठिकाणीं त्यांतील विरोधही स्पष्ट दिसतो. असें होण्याचें कारण मूळ रामायण रचिल्यापासून पुनर्रचना होईपर्यंत समाजाला हलवून व बदलून सोडणाऱ्या दोन गोष्टी घडून आल्या होत्या, हें आहे. त्यापैकीं बुद्धधर्माचा उदय ही एक असून, दुसरी ॲलेक्झांडरच्या स्वाऱ्यांमुळें पाश्चात्य आचारविचारांशीं व संस्कृतीशीं आलेला आर्यांचा संबंध ही होय. त्यामुळेंच आपणास एका ठिकाणीं कौसल्या आपल्या हातानें यज्ञाश्व मारीत आहे; व रामलक्ष्मणांनीं मारून आणलेल्या हरिणाचें पक्कान्न करून सीता त्यांना वाढीत आहे असा देखावा दिसतो; तर दुसरीकडे सीतेच्या तोंडीं पशुवधाच्या अनिष्टत्वावर एक व्याख्यान घातल्याचा पहिल्याशीं अत्यंत विरोधी असा देखावा दिसतो. (अयोध्याकांड सर्ग ९ वा पहा.) एका ठिकाणीं संध्या वगैरे वैदिक कर्में स्त्रीपुरुष सारखींच करतांना आढळतात तर कित्येक ठिकाणीं बुद्धधर्माच्या प्रचारानंतर ज्या प्रकारचीं देवालयें अस्तित्वांत आलीं, तसलीं देवालयें अयोध्या प्रांतात व नगरांत असल्याचा उल्लेख आपणांस सांपडतो. अयोध्या नगरींतील भव्य व वैभवशाली प्रासाद, भरताचें सैन्यासह गमन, सार्वजनिक देवालयें व उपवनें वगैरेचीं वर्णनें इतक्या उज्ज्वल तऱ्हेनें लिहिलीं आहेत कीं, वाचकांस " मगध " देशच्या राजांच्या वैभवाची क्षणभर स्मृति झाल्याशिवाय राहत नाहीं. परंतु दुसरीकडे राम, लक्ष्मण व सीता हीं अयोध्या नगरींतून अनवाणीं चालतांना, व स्वसंरक्षण आणि उपजीविका यांसाठीं स्वतःच्या श्रमावर व सामर्थ्यावर अवलंबून राहून १४ वर्षें वनवासांत घालविण्यास तयार व

समर्थ अशीं दिसतात. दशरथ, जनक, राम आणि लक्ष्मण हे आपली कालगणना व दिनचर्या चंद्र व अचल तारे यांच्या संयोगाच्या आधारावर ठरवितांना दिसतात. कारण वेदकालीन लोकांना फक्त अचल तारे व त्यांमधून जाणारा चंद्राचा मार्ग एवढीच माहिती असून त्यांना राशी माहीत नव्हत्या. पण असें असूनही राम, लक्ष्मण इत्यादिकांच्या जन्मवेळा ग्रीक लोकांकडून घेतलेल्या ज्योतिषाप्रमाणें राशींच्या निरनिराळ्या स्थानाच्या आधारानें दाखविलेल्या आढळतात. थोडक्यांत सांगावयाचें तर हल्लीं आपल्याला जें रामायण दिसेंत त्यांत वाल्मीकीनें बुद्धधर्माच्या उदयाच्या आधीं लिहिलेलें मूळ काव्य असून, अॅलेक्झांडरच्या स्वाऱ्यांनंतर इ. स. पूर्वी एक शतक या सुमारास घातल्या गेलेल्या मोठ्या भरीस्वालीं तें बरेंच दडपून गेलें आहे ही गोष्ट नाकबूल करितां यावयाची नाहीं.

आणि आम्हीच केवळ असें म्हणतों असें नाहीं; तर खुद्द रामायणांतच यासंबंधीं पुरावा सांपडतो; एके ठिकाणीं—

शृणोति य इदं काव्यं पुरा वाल्मीकिना कृतम् ।

असा व दुसरे ठिकाणीं

आदिकाव्यमिदं चार्षं पुरा वाल्मीकिना कृतम् ।

असे दोन उल्लेख सांपडतात. वाल्मीकीनें प्रथम लिहिलेल्या काव्याची पुनः कोणी तरी आवृत्ति काढिली असली पाहिजे, अशी कल्पना केल्याशिवाय, या वर घेतलेल्या उद्धारांचा योग्य अर्थ लावतां येणें अशक्य आहे. हल्लींचें सर्वच रामायण वाल्मीकीनें लिहिलें असून तेंच रामाच्या पुत्रांनीं त्याजपुढें गाऊन दाखविलें असें जें कित्येकांचें म्हणणें आहे त्याला वरील श्लोकार्धांतील 'पुरा' या

शब्दानें बाध येतो. कोणी म्हणतील रामजन्माच्या पुष्कळ पूर्वी वाल्मीकीनें रामायण लिहिलें असल्याकारणानें पुरा शब्द साहाजिकच त्यानें घातला; परंतु रामायण हें आधीं लिहिल्याचें हल्लींच्या रामायणावरून मुळींच सिद्ध होत नाहीं. सारांश पुरा या शब्दानें द्वितीयावृत्तीचा प्रकार उघड होत आहे. एवढेंच नव्हे, तर व्यासकाव्याप्रमाणें रामायणालाही रामायणांतच " पुराणेतिहास " हें नांव दिलेलें आढळतें.

पूजयंश्च पठंश्चैनमितिहासं पुरातनम् ॥

आणि

दिव्यमार्षस्तवं चैनमितिहास पुरातनम् ॥

पुराणेतिहास या शब्दांनीं सुद्धां वरील कल्पनेलाच पुष्टि मिळते; कारण ज्या अर्थीं रामायण हें रामापुढें म्हणून दाखवावयाचें होतें त्याअर्थीं वाल्मीकि असल्या शब्दप्रबंधाचा उपयोग करील हें संभवत नाहीं. पुरातन इतिहास हे शब्द, रामायणाला हल्लींचें स्वरूप देण्याचें वेळीं पुनर्रचनाकारानेंच घातलें असले पाहिजेत; परंतु पुनर्रचनेनंतर जो काव्यग्रंथ तयार होईल, तो वाल्मीकीनेंच लिहिला असला पाहिजे अशी लोकांची कल्पना होण्याला आपल्या या वर्तनानें बाध येईल हें मात्र त्याच्या ध्यानांत राहिलेलें दिसत नाहीं.

प्रकरण ६ वें.

रामायण महाकाव्य आहे काय ?

वाल्मीकीच्या मूळ रामायणांत घातली गेलेली भर त्यापासून वेगळी केली तर तें आजपर्यंत जगामध्यें जीं जीं म्हणून काव्यें लिहिलीं गेलीं आहेत, त्या सर्वांपेक्षां जास्त मनोहर व मन उच्च वातावरणांत जास्त नेणारें आहे, यांत मुळींच संशय नाहीं.* उदात्त मनोविकार व कल्पनाशक्ति या बाबतींत रामायण सर्व संस्कृत काव्यामध्यें प्रथमस्थान पटकाविते. महाभारतांत वाचकाला प्रत्यक्ष आयुष्यक्रमांतील धडे मिळतात, तर रामायणांत त्याला या आयुष्यक्रमाचीं ध्येयें सांपडतात. पहिल्यांत दृगोचर असणाऱ्या या सृष्टींतील सुखदुःखांचें वर्णन सांपडतें, तर दुसऱ्यांत काल्पनिक सृष्टींतील सुखदुःखांचें वर्णन सांपडतें. सारांश ज्याला ज्याला म्हणून कल्पनाधिष्टित, चमत्कृतिपूर्ण, मानसोन्नतिकारक, उदात्त व धीरगंभीर काव्य वाचण्याची हौस आहे, त्याला वाल्मीकिरामायण हें जगांतील एक अजब, उत्कृष्ट व नमुनेदार काव्य वाटेल. रामायण संस्कृत वाङ्मयांत आद्य व प्रमुखतम महाकाव्य या नात्यानें ओळखलें जातें हें सर्वविश्रुतच आहे. याचमुळें ज्याप्रमाणें पाश्चात्य वाङ्मयांत महाकाव्याची व्याख्या "होमरच्या" इलियडवरून ठरविलेली आहे त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतही महाकाव्याची व्याख्या रामायणावरून ठरविण्यांत आली आहे. ज्यामध्यें

---

* तें इतकें मनोहर, उदात्त व गंभीर आहे कीं, त्याचीं कित्येक भाषांतून भाषान्तेर झालीं आहेत. फेझीनें त्याचें "परशियन" भाषेंत भाषांतर केलें असून ग्रिफिथनें इंग्रजी भाषेंत केलें आहे.

ऋतु, सूर्यास्त व सूर्योदय; नगरें व वनोपवनें; सैन्यांच्या हालचाली व रणसंग्राम इत्यादिकांचीं वर्णनें आहेत तें महाकाव्य होय, अशी व्याख्या संस्कृत काव्यशास्त्रकारांची आहे* रामायणांत वरील गोष्टींचीं उत्कटतम वर्णनें असून त्यानंतरच्या महाकाव्यलेखकांना रामायण नमुनाच होऊन बसलें आहे.

परंतु संस्कृत काव्यशास्त्रदृष्ट्या रामायणाला जरी महाकाव्य म्हणतां आलें, तरी आधुनिक व पाश्चात्य कसोटीला लावून पाहिल्यास, त्यास जरी हल्लीं महाकाव्य म्हणतात तरी तें तसें नाहीं, असें दिसून येतें. त्याचा विषयही महत्त्वपूर्ण व गुंतागुंतीचा नाहीं. किंवा त्याची भाषाही गंभीर व प्रौढ नाहीं. तें वीररसात्मक वीणाकाव्य आहे असें म्हटल्यास जास्त शोभेल. त्यामध्यें एकाच शूर व्यक्तीच्या महत्कार्याचें वर्णन असून त्याची भाषाही आवेशयुक्त मनोविकारानें ओतप्रोत भरलेली आहे. आर्नोल्ड म्हणतो—"वीणाकाव्य या शब्दप्रबंधाचा अर्थवीणा या शब्दावरूनच स्पष्ट होत आहे. हृदयोद्दीपक गायनांनीं युक्त असे शब्द असा त्याचा मूळ अर्थ असला पाहिजे; कथानकांतील द्रुतगति, तशीच वृत्तांची द्रुतगति हीं वीणाकाव्याला आवश्यक होत. ज्यांचीं मनें शांत व विचारी आहेत अशांच्या हातून वीणाकाव्य तयार होणें अशक्य होय; तें ज्यांचीं मनें विव्रस्त व विकारग्रस्त आहेत,

---

* संध्यासूर्येन्दुरजनीप्रदोषध्वांतवासराः ।
प्रातर्मध्यान्हमृगयाशैलर्तुवनसागराः ।
संभोगविप्रलंभौ च मुनिस्वर्गपुराध्वराः ।
रणप्रयाणोपयमंत्रपुत्रोदयादयः ।
वर्णनीया यथायोगं सांगोपांगा अमी इह ।

साहित्यदर्पण ।

अशांच्याच हृदयांतून बाहेर पडतें." रामायणाच्या आरंभींच अशी कथा आढळते कीं, रामाचीं अद्भुत कृत्यें व सीतेचें पवित्र चारित्र्य यावर काव्य रचून झाल्यावर, वाल्मीकि तें गाण्यास कोणी मिळतें कीं नाहीं हें पाहात असतां, रामाचे टाकून दिलेले पुत्र कुश लव हे त्याच्या दृष्टीस पडले. त्यानें त्यांस रामायण एकप्रकारच्या वाद्यावर गाण्यास शिकविलें. त्या मुलांनीं तें आवेशपूर्ण काव्य रामाच्या यज्ञप्रसंगीं गाऊन दाखविलें व त्यामुळें ऐकणारास फार आनंद झाला. रामायणाचा कल महाकाव्यापेक्षां वीणाकाव्याकडेच जास्त झुकतो याबद्दल आपल्याला वरील गोष्टींत ग्रंथकाराकडूनच पुरावा मिळतो. असें अहे तरी महाकाव्याच्या दृष्टीनें आपण महाकाव्यांतील मूलभूत ज्या चार गोष्टी कथा, पात्रें, विचार व भाषा त्यांच्या दृष्टीनें रामायणाचें परीक्षण करूं.

रामायणातील कथानक वीणकाव्याला फार अनुकूल आहे. रामाच्या आयुष्यक्रमांत पांडवांच्याप्रमाणें विविधता नसेल किंवा प्रसंगही पुष्कळ नसतील; परंतु त्याचा आयुष्यक्रम वीररसप्रधान, कल्पनारम्य व उदात्त आहे. प्राचीन राष्ट्रांतून देवत्व पावलेल्या वीरांशीं तुलना केली असतां राम सर्वांपेक्षां फारच उच्च दिसतो. त्याच्या एका कृत्याखेरीज त्याच्या सर्व आयुष्यांत अशी एकही कृति नाहीं कीं, जीवर बोट ठेवून ती कृति करतांना रामाच्या मनावर ऐहिक नीच हेतूंचा पगडा बसला होता, असें दाखवितां येईल. आज हजारों वर्षेपर्यंत रामचरित्र आपल्या शुद्धतेमुळें व उच्चपणामुळें हिंदु लोकांचें मन वेधीत आलें आहे व पुढेंही अनंत कालपर्यंत तें तसेंच वेधीत राहील अशीं चिन्हें दिसतात. मनामध्यें अत्यंत उच्च भावना उत्पन्न करण्यास रामचरित्र फारच समर्थ आहे आणि वीणाकाव्य-लेखक असल्या म्हणजे भक्ति, निष्ठा, प्रेम, शौर्य, धैर्यादि उच्च भावनां-

विषयींच लिहीत असतात कोणत्याही काल्पनिक अगर ऐतिहासिक गोष्टींत कधींही आढळणार नाहीं, अशा तन्हेचा करुणरस रामायणांत भरलेला आहे; यामुळें रामायणाला फारच मनोहरत्व प्राप्त झालें आहे. रामाच्या सर्व आयुष्यभर उदात्तगंभीर अशी क्लेशपरंपरा आपणास आढळून येते. व तीमुळें याजबद्दल आपणाला कींव येण्याऐवजीं दुःखमिश्रित असें कौतुकच वाटतें. ॲडिसननें म्हटलें आहे, "दुःखमय संविधानकाचे दोन प्रकार आहेत. पहिल्यामध्यें नायक नाना तन्हेच्या अडचणींतून व संकटांतून मार्ग आक्रमितो व शेवटीं मानास व वैभवास पावतो. दुसऱ्या प्रकारांत नायक प्रथमतः एखाद्या उच्च व सन्मान्य स्थितींत असतां दुःखांत व अपमानगर्तेंत सांपडतो. ह्यांत पहिल्यापेक्षां दुसऱ्यानें वाचकांच्या मनावर जास्त परिणाम होतो." संविधानकाचें पृथक्करण एवढ्यावरच थांबवें कीं काय हा प्रश्न आहे. अशा संविधानकामध्यें असाही एक प्रकार असूं शकेल कीं ज्यांत नायकाचा शेवट दुःखांत व अपमानांत होत नाहीं; आणि खरें पाहिल्यास तसा शेवट होणें चांगलेंही नाहीं. या तिसऱ्या प्रकारांत कथेचा शेवट कांहीं तरी निराळा होतो; परंतु त्यामुळें नायकाविषयीं आपलें मन कलुषित होत नाहीं. त्या प्रकारांत नायक शक्य तेवढा प्रयत्न करितो; परंतु तरीसुद्धां शेवट मात्र दुःखांतच होतो. रामाची कथा या तिसऱ्या प्रकारांत पडेल. रावणाचा पराभव करून व त्याचा वध करून त्यानें सीतेला परत आणिली; तिनें अग्निदिव्यही केलें; परंतु तिला अयोध्येस आणल्यावर लोकमत विरुद्ध आहे, हें कळून तिला सोडून देणें त्याला प्राप्त झालें. त्यानंतरसुद्धां ती वाल्मीकिबरोबर यज्ञभूमीवर आली असतां, तेथेंही भूमातेच्या उदरांत गडप झाली. याठिकाणीं कथानकाला दुःखपर्यवसायाकडे अशी कलंडणी देण्यांत कवीनें अत्यंत उच्च चातुर्य

व कौशल्य दाखविलें आहे. महाभारतही असेंच दुःखपर्यवसायी आहे. कारण पांडवाना महायुद्धांत जय मिळाला खरा; परंतु कार्याकार्यविचार न करणाऱ्या अश्वत्थाम्यानें त्यांच्या छावणीवर छापा घालून जेव्हां हाहाःकार उडविला, आणि आपल्या मुलांचा असावधपणें खून झालेला पाहून द्रौपदी जेव्हां मूर्च्छित झाली, तेव्हां युधिष्ठिर एवढेंच म्हणूं शकला कीं, "जेत स्वतःच्या निष्काळजीपणामुळें जिंकले गेले."

दुःखपर्यवसायीपणाबद्दल रामायण व महाभारत यांमध्यें याप्रमाणें साम्य असलें तरी दोहोंतील पात्रें मात्र अगदीं भिन्न आहेत. व्यासाच्या काव्यांतील पात्रें जरी उच्च असलीं तरी तीं आपणास मनुष्यकोटींतील वाटतात; परंतु रामायणांतील पात्रें मात्र पृथ्वीवरचीं आहेत असें वाटत नाहीं; तर तीं या पृथ्वीला स्पर्श करीत नसून तिजपासून कांहीं अंतरावर आपले व्यवहार करीत आहेत असें भासतें. महाभारतांत अशी एक कथा आहे कीं, युधिष्ठिराचा रथ पृथ्वीपासून वर चालत असे; परंतु एकदांच असत्य भाषण केल्यापासून तो जमीनीवर चालूं लागला. अर्थात् युधिष्ठिराच्या निष्कलंक वर्तनाचें वर्णन करण्याची ही एक कवीची पद्धत आहे. या जगांतील दौःशील्यापासून अलिप्त अशा पृथ्वीपासून वर असलेल्या वातावरणांत तो व्यवहार करीत असे अशी कवीनें कल्पना केली आहे. महाभारतांतील एकट्या युधिष्ठिराप्रमाणें रामायणांतील सर्वच पात्रें वातावरणांत आपले व्यवहारव्यापार उरकीत आहेत असें वाटतें. रामायणांत आपल्याला अलौकिक भ्रातृभक्त भाऊ; क्रूरतम सापत्न माता; अलौकिक कर्तव्यजागृत पुत्र; अलौकिक प्रेमी पति; अलौकिक पतिनिष्ठ पत्नी; अलौकिक विश्वासु मित्र व अलौकिक हट्टवादी शत्रू पहावयास मिळतात.

या सर्वांतही राम व सीता यांचीं स्वभावचित्रें इतरांपेक्षां फार उच्च असून आजपर्यंत मानवी कल्पनेला जें जें म्हणून आकलन झालें आहे, त्या सर्वांहून हीं दोन स्वभावचित्रें जास्त उदात्त आहेत. राजा म्हणून, मित्र म्हणून, भाऊ म्हणून, पुत्र म्हणून, कोठच्याही दृष्टीनें पाहिलें असतां, राम उदात्ततेची केवळ मूर्तीच आहे असें वाटतें. त्याची आपल्या प्रजेसंबंधींची काळजी, कळकळ व प्रेमी वृत्ति हीं अबाल-वृद्धांच्या तोंडीं झालेलीं असून रामराज्य हा शब्द हिंदुस्थानांत सुराज्यवाचक असा संप्रदायच होऊन बसला आहे. महाभारतांत सुद्धां रामराज्याविषयीं स्तुतिस्तोत्रें आढळतात. असो; संस्कृत वाङ्मयाच्या या पित्यानें सीताचरित्राच्या ठायीं जें सौंदर्य ओतलें आहे त्याचें मार्मिक, समाधानकारक, व पूर्ण असें वर्णन करण्याचें सामर्थ्य त्याच्या शिवाय दुसऱ्या कोणा भाग्यवानाच्या लेखणींत आहे ? अवर्णनीय अशा पवित्र वातावरणांत संचार करण्याऱ्या व आदर्शभूत अशा या स्त्रीच्या चरित्राचें उद्घाटन व योग्य वर्णन करण्यांत कवीला अनुपम यश आलें आहे. कोणाही हिंदूच्या मनांत सीतेचें नांव येतांच त्याचें हृदय पवित्रतम विचारांनीं थरारून जातें. तात्पर्य हिंदु स्त्रियांना सीता गृहिणीत्वाचा अत्यंत उज्ज्वल आदर्श होऊन बसली आहे.

रामायणांतील पात्रें जितकीं उच्च आहेत, तितकेच उच्च विचार कवीनें त्यांच्या तोंडीं घातले आहेत. अत्युत्कट भावनांचा ज्यांत संचार नाहीं असा एकही विचार रामायणांतील पात्रांच्या मुखांत नाहीं. प्रत्येक पात्राच्या तोंडचे उदात्त उद्गार येथें देणें शक्य नाहीं. आम्ही सीतेचे थोडेसे उद्गार खालीं देतो. " वनांत संकटें व अडचणी फार असतात, तेव्हां त्यांत तूं यऊं नको " असें राम तिचें मन वळवीत असतां ती म्हणते " मी तुमच्या पुढें चालून तुम्हाला सुख व्हावें

म्हणून मार्गातील कांटे व तक्ष्ण गवत दूर करीन " " वनांतील सुवास मधुर असतो म्हणून मी वनांत येईन. " वरील श्लोक रामायणांतून घेतांना भवभूतीनें म्हटलें आहे.

त्वया सह निवत्स्यामि वनेषु मधुगंधिषु ।
इति हा रमते सीता स्नेहस्तस्याः स तादृशः ॥

" सीतेच्या तोंडून असे उद्गार बाहेर पडण्यास तिचें रामावरील अत्युत्कट प्रेमच कारणीभूत होय. " अयोध्येस परत आल्यावर तिला रामानें पुन्हां लक्ष्मणाकरवीं रानांत नेऊन सोडिलें; तेव्हां लक्ष्मणाबरोबर तिनें त्याला जो निरोप पाठविला तो केव्हांही वाचला तरी डोळ्यांत अश्रु आणल्यावांचून सोडीत नाहीं. रघुवंशाच्या १३ व्या सर्गांत कालिदासानें हा सुप्रसिद्ध निरोप ग्रथित करून शेवटीं आपल्या अलौकिक कौशल्यानें त्याला जी एक पुस्ती जोडिली आहे, ती तर फारच बहारीची आहे. " पुढील जन्मीं मला तूंच पति मिळावास; परंतु या जन्माप्रमाणें त्या जन्मांत विरह मात्र होऊं नये, याकरितां मी प्रसूत झाल्यानंतर मोठी तपश्चर्या करीन " हें वाक्य त्यानें सीतेच्या मुखांत जास्त घातलें आहे. वाल्मीकीबरोबर यज्ञस्थळीं येऊन ज्यावेळीं सीता शपथ घेते व इतके दिवस दुःखत्रस्त झालेली ती राज्ञी स्त्रियांच्या सहजस्वभावास अनुसरून प्राणत्याग करावयास सिद्ध होते, त्यावेळचा प्रसंग तर फारच बहारीचा व कल्पनातीत आहे. ती म्हणते " कायावाचामनानें जर मी माझ्या पतीचीच अर्चा केली असेल तर भूमाता मला आपल्या उदरांत घेवो. "

मनसा कर्मणा वाचा यथा रामं समर्चये ।
तथा मे माधवी देवी विवरं दातुमर्हति ॥ *

कालिदास म्हणतो

वाङ्मनःकर्मभिः पत्युर्व्यभिचारो यथा न मे
तथा विश्वंभरे देवि मामंतर्धातुमर्हसि ॥

आज हजारों वर्षेपर्यंत हिंदुगृहिणीच्या स्वभावांत दिसून येणारा समाधानीपणा व प्रेमळपणा हा सीतेची भक्ति, प्रेम, व सतीत्व यांपासूनच उत्पन्न झालेला आहे. करुणरसपरिपोषांत तर वाल्मीकीची बरोबरी कोणाहि करूं शकत नाहीं. करुणरसपूर्ण काव्य वाचून आपल्या भावना करुणरसांत इतक्या दूरवर व उंच जातात कीं, काव्यवाचनापासून होणाऱ्या दुःखामुळें आपण मोहून जातों. दोन परस्परविरुद्ध धर्म असणाऱ्या पदार्थांचा, त्यांतील धर्म पराकाष्ठेप्रत पावले असतांना, संयोग झाल्यास जो परिणाम होतो, तोच परिणाम आपण अत्यंत कुशल कवीच्या करुणरसाशीं तादात्म्य पावलों असतां होऊन आपल्या दुःखाचें आनंदांत रूपान्तर होतें. असे करुणरसानें ओथंबलेले प्रसंग अयोध्याकांडांत पुष्कळ आहेत. रामाला शब्दांत पकडून कैकेयी राम, लक्ष्मण व सीता यांच्या पुढें वल्कलें ठेविते व तीं वल्कलें नेसून त्यांना अरण्यांत जावयास सांगते, तेव्हां असल्या प्रकाराला अपरिचित सीता तें वल्कल खांद्यावरून घेऊन इकडे तिकडे पाहूं लागते; व तिला आतां मूर्च्छा येऊन ती पडणार अशीं चिन्हें दिसूं लागतात. या देखाव्यानें गहिंवरून जाऊन अश्रू ढाळीत ढाळीत "रामा, सीतेला अरण्यांत नेऊं नको; तिला वनांत राहणें शक्य होणार नाहीं." असें तेथील स्त्रिया व कुटुंबांतील इतर मंडळी एकदम ओरडतात. त्यांच्या ओरडण्याकडे लक्ष न देतां राम तिच्या मदतीला जाऊन रेशमी साडीवरूनच तिला तें वल्कल नेसवितो. हा प्रसंग करुणरसाच्या परिपोषाचें उत्कृष्ट उदाहरण म्हणून घेतां येइल.

वाल्मीकीचा स्वभावोक्तिचित्रें रेखाटण्यांत हातखंडा आहे; व ज्याप्रमाणें करुणरसपरिपोषांतही त्याचा कोणी हात धरूं शकत नाहीं, त्याचप्रमाणें सृष्टिसौंदर्यवर्णनांतही इतर संस्कृत कवि

त्यांची बरोबरी करूं शकत नाहींत. आपल्या काव्याच्या निरनिराळ्या भागांत वाल्मीकीनें हिंदुस्थानचे सहा ऋतु मोठ्या ओजस्वितेनें वर्णिले आहेत. आमच्या मतें आधुनिक संस्कृत वाङ्मयांत खऱ्या सृष्टिसौंदर्यवर्णनाचा तुटवडाच आहे. व जीं कांहीं थोडीं आहेत, त्यांत फक्त शब्दालंकारावर उभारलेले श्लेष व उपमाच सांपडतात. इंग्रजी वाङ्मयांतील वर्णनाचा विशेष जो चिवटपणा व सूक्ष्मपणा तो संस्कृत वाङ्मयांत फक्त वाल्मीकीच्या काव्यांतच आढळून येतो. अरण्यकांडांतील हिवाळ्याचें किंवा किष्किंधा कांडांतील पावसाळ्याचें वर्णन वाचणारांस आपण थंडीमुळें कांपत तर नाहींना ? किंवा आपण पावसांत भिजत तर नाहींना ? असा भास झाल्यावांचून राहत नाहीं. त्या वर्णनांत पुष्कळ नानाविध कल्पना आहेत, परंतु आम्हीं त्यांपैकीं एकेकच उद्धृत करितों. कवि म्हणतो " तृषार्त झालेला हत्ती पाणी पिण्याकरितां नदीवर जातो; परंतु बर्फाप्रमाणें थंड असलेल्या जलाचा स्पर्श होतांच आपली सोंड मागें घेतो " स्वभावोक्ति अलंकाराचा योग्य व कौशल्यपूर्ण असा उपयोग फक्त वाल्मीकीच करूं शकतो. दुसऱ्या वर्णनांत कवीनें म्हटलें आहे. " प्रत्येक पर्वतराजाच्या शिखरावर विश्रांति घेणारे ते पाण्याच्या भारानें युक्त असे मेघ पहा " या वर्णनांत एक गूढ उपमा आहे. मेघ हे मजूर आहेत अशी कल्पना करून, भारामुळें त्यांच्या अंगातून घामाच्या धारा चालल्या आहेत व त्यांच्या मार्गांत येणाऱ्या प्रत्येक उच्च ठिकाणीं ते (ओझें ठेवून) विश्रांति घेत आहेत अशी कल्पना कवीनें केली आहे.

उदात्तगंभीर देखाव्यांचीं वर्णनें कल्पिण्याची व तीं उठविण्याची वाल्मीकीची शक्ति अशीच असामान्य आहे. उदात्तगंभीर

देखाव्यांचें वर्णन करणें हा पाश्चात्त्य वाङ्मयांत मिल्टनचा विशेष समजला जातो; व पॅरॅडाइस् लॉस्ट या त्याच्या काव्यांतील "सेटन" खालीं उतरत असतां त्या वेळेचें वर्णन या उदात्तगंभीर वर्णनांच्या सदरांत घालतात. वाल्मीकीच्या सुंदरकांडांत असलीं उदात्त-गंभीर वर्णनें कित्येक सांपडतात. सुंदरकांड हें नुसतें नांवानें नव्हें, तर काव्यदृष्ट्याही "सुंदर" आहे. हिंदी द्वीपकल्प व सीलोन यांच्यामध्यें असलेल्या समुद्रावरून उडी मारून मारुति पलीकडे जातो, या प्रसंगानें त्या कांडाचा आरंभ झाला आहे. या प्रचंड उड्डाणांतून कवीनें उदात्त-गंभीर वर्णन कसें उत्क्रांत केलें आहे; मारुति आपलें शरीर कसें वाढवितो; उडी टाकण्याच्या वेळीं तो काय हावभाव करितो; जमिनीला धक्का देऊन तो उडाल्या-बरोबर झाडें उन्मूलित होऊन त्याच्याबरोबर आकाशांत कशीं उडालीं; मधून मधून ढगामध्यें अदृश्य होऊन व मधून मधून दिसत आहे असा आकाशांतून प्रवास त्यानें कसा केला; त्याची छाया समुद्रावर तीन योजनपर्यंत कशी पडली; व त्या छायेखालीं येणाऱ्या जलचरांना भीति कशी वाटली; वगैरे गोष्टींचें यथायोग्य चित्र डोळ्यांपुढें उभें राहण्यास खुद्द मुळांतलींच वर्णनें वाचलीं पाहिजेत. पुढें रावणाचे रत्नप्रासाद व त्यांचे अंतर्भाग यांच्या वर्णनाचे वेळीं वाल्मीकीची कल्पना उदात्तपणाच्या इतक्या उंच शिखराला जाऊन पोंचली आहे कीं, इतका उंच आजपर्यंत त्याच्याशिवाय दुसरा कोणीही गेलेला नाहीं. रावण नरकापासून स्वर्गापर्यंत सगळ्याचा अधिपति होता. तेव्हां त्याची संपत्ति व वैभव यांचें वर्णन करण्यास या महाकवीची असामान्य कल्पना-शक्तीच फक्त समर्थ होय; परंतु तो जेव्हां रावणाचें अशोक-वन व त्यांतील दुःखी व जवळ जवळ निराश झालेली सीता

यांचें वर्णन करितो, त्या वेळीं तो वरच्यापेक्षांही जास्त प्रतिभा आणि सामर्थ्य दाखवितो. वाक्योपमा किंवा फ्रेंच टीकाकार जिस लंबपुच्छोपमा म्हणतात, ती वापरण्याची होमरला फार आवड होती. होमर कित्येकदां लांब व विस्तृत उपमा देऊन वाचकांचें मनोरंजन करितो. त्याच्या उलट व्यासाला दीर्घ रूपकांची फार आवड आहे. उदा०—"भीष्मद्रोण-तट" इत्यादि श्लोकांत भारतीय युद्धाला एखाद्या खवळलेल्या नदीचें व त्याच्या सर्व भागांचें रूप त्यानें चढावेलें आहे. वाल्मीकिच्या काव्यांतही असा एक विशेष आहे; व तो त्याची उपमांचे ढीगचे ढीग तयार करण्याची अनिवार हौस हा होय. कित्येकदां तर त्या ढिगाखालीं वाचकांचें चित्त चिरडून जाण्याचा वेळ येते. कित्येकदां त्याच्या उपमांतून उपमानाच्या जागीं भाववाचक नामांचा उपयोग केलेला आढळतो. उदाहरणार्थ-कवीनें सीतेला "मलिन न्याय" किंवा "निराशामय आशा" असल्या उपमा दिलेल्या आहेत. सीतेच्या निराधार व भूषणरहित स्थितीचें कवीनें जें वर्णन केलें आहे, तें फारच बहारीचें आहे. ही उपमा देण्याची कला बाणानें आपल्या कादंबरींत उपयोगांत आणली आहे; परंतु त्याच्या उपमा पुष्कळदां ओढून ताणून आणलेल्या व कृत्रिम दिसतात.

शेवटीं आपणास भाषेचा विचार करणें आहे. वाल्मीकीची भाषा सरळ, साधी व सोपी आहे. ती आवेशयुक्त व प्रासानुप्रासयुक्त असल्यानें वीरकाव्याला फार अनुकूल अशी आहे; परंतु ती असावी तितकी गंभीर किंवा मधुर नाहीं; त्याचप्रमाणें महाभारतांतल्या भाषेइतकी ती शुद्ध नाहीं. परंतु तिच्यांत गोवलेले उदात्त विचार आणि विकार तिच्यांतील अशुद्धतेचा विसर पाडतात. हिमालयाच्या उंच शिखरावरील बर्फ एकाद्या उन्हाळ्याच्या

दिवशीं वितळल्यामुळें आलेल्या गंगाजलाच्या ओघांत आपण वाहात जात आहों कीं काय, अशी रामायण वाचतांना आपली स्थिति होते. पुराच्या शुभ्रतम व मधुरतम जलानें मोहित झाल्यामुळें आपल्याला जलौघांत ल लांकडांच्या तुकड्यांचें अथवा नानाविध कचऱ्याचें कांहींच भान रहत नाहीं. वाल्मीकीच्या विचारांचा उदात्तपणा आणि आवेश हीं अगदीं गंगाजलौघाप्रमाणेंच असून ते विचार वाचकांच्या हृदयांत शिरून त्यांचें मन अतिशय उन्नत करितात, व त्यांस पृथ्वीवरील केरकचऱ्याचें स्मरणही होत नाहीं.

कथाविषयक.

वाल्मीकिरामायण–परीक्षण.

कथाविषयक.

पुस्तक दुसरें.

प्रकरण १ लें.

रामकथेसंबंधीं वेबरची चुकीची उपपत्ति.

वाल्मीकीच्या ओजस्वी भाषेंत वर्णिलेल्या रामायणांतील मनोवृत्ति क्षुब्ध करणाऱ्या प्रसंगामुळें, अनेक संस्कृतज्ञ विद्वानांचीं मनें रामायणाकडे वेधलीं गेलीं आहेत. व वेळोवेळीं त्या प्रसंगांच्या खऱ्या स्वरूपाविषयीं निरनिराळ्या उपपत्त्या बसविण्यांत आल्या आहेत. कांहीं थोड्या लोकांना रामायणांत निव्वळ कवीच्या मनोहर सृष्टीशिवाय दुसरें कांहीं आहे असें वाटत नसलें, तरी पुष्कळांना रामायणाला सत्याचा आधार आहे हें पटतें; व ते तसें कबूलही करतात. परंतु हा सत्याचा आधार कोणता याविषयीं अनेकांचीं अनेक मतें आहेत. राम व रावण यांच्यामधील युद्ध म्हणजे दक्षिणेंतील, ब्राह्मणधर्म व बौद्धधर्म यांमधील झगड्याचें

काव्यमय वर्णन होय, अशी इतिहासकार टाल्बाईजव्हीलरयांची कल्पना आहे. एव्हढेंच नव्हे तर याच्याही पुढें जाऊन तो असें म्हणतो कीं, राक्षसांशीं झालेल्या रामाच्या युद्धाचा कदाचित् इ. स. च्या १३ व्या शतकांत विजयानगरच्या हिंदु पातशाहीच्या संस्थापकाच्या नेतृत्वाखालीं रजपूत लोकांनीं दक्षिण हिंदुस्थानांत केलेल्या विजयशाली स्वारीशीं संबंध असावा; परंतु असली कल्पना सर्वस्वीं असमर्पक आहे; कारण, राम-रावणांच्या युद्धाचें जें वर्णन हल्लीं आपणांस वाचावयास मिळतें, तें जसेंच्या तसेंच कालिदासाच्या वेळीं होतें; आणि कालिदासाला तर ५ व्या शतकाच्या अलीकडे आणतां येत नाहीं; त्याचप्रमाणें महाभारतांतील वर्णनांत व हल्लींच्या रामायणांत फार थोडा फरक असून महाभारताची शेवटची आवृत्ति इ. स. २०० च्या अलीकडे आणतां येत नाहीं, हें आम्हीं दाखविलेंच आहे. Talboys Wheeler हा संस्कृतज्ञ नव्हता; व त्यामुळें त्याचा इतिहास इतरदृष्टीनें संशोधनपूर्ण व सुंदर असला तरी त्यांत अशा पुष्कळ कच्चा पायावर उभारलेल्या उपपत्त्या दिसून येतात. दुसरी एक उपपत्ति अशी आहे कीं, "रामायणांत, आर्य लोकांच्या कृषिकर्माची मध्य व दक्षिण हिंदुस्थानांतील जंगलांतून व पर्वतांतून झालेली प्रगति, व कृषिकर्म करून राहणाऱ्या आर्यांवर तेथील बिगरशेतकी, गुरेढोरें बाळगून असणाऱ्या व पारधी टोळ्यांपासून प्राप्त झालेलीं संकटें यांचें वर्णन आहे." परंतु सर्वांत जास्त भयंकर उपपत्ति प्रो. वेबर यांनें लावलेली होय. एका हिंदी कवीनें "आर्यसुधारणेच्या अथवा कृषीच्या प्रसाराच्या चित्रासारखी अमूर्त कल्पना" आपल्या काव्याचा विषय केली असेल, याविषयीं वरील प्रोफेसरांस संशय आहे; व त्यामुळें त्यांचें, दशरथजातक या बौद्ध कथेमध्यें

सीताहरण व राम-रावणयुद्ध यांचें वर्णन नाहीं, या गोष्टीच्या जोरावर असें मत बनलें आहे कीं, वाल्मीकींनें ही कथा होमरच्या इलियडवरून घेतली आहे. तेव्हां या उपपत्तीचा विस्तरशः विचार करणें आपल्यास आवश्यक आहे.

प्रोफेसर वेबरच्या या उपपत्तीचें जस्टिस तेलंग यांनीं एक उत्कृष्ट लहानसें पुस्तक लिहून चांगलें खंडन केलें आहे; परंतु ज. तेलंगाच्या उद्गारांत नेहमीं दिसून येणारा स्पष्टवक्तेपणाचा अभाव या पुस्तकांतही दिसत असल्यामुळें, हें पुस्तक वाचूनही प्रो. वेबरच्या उपपत्तींत थोडें तरी तथ्य असावें असें वाचकांस वाटूं लागतें; परंतु या उपपत्तीचें जस्टिस तेलंग यांच्यापेक्षांही जास्त समाधानकारक रीतीनें खण्डन करितां येईल. प्रो. वेबरच्या मुद्याचा सर्व निष्कर्ष असा आहे कीं, दशरथजातक रामायणाच्या पूर्वीचें आहे; त्यांत नसणाऱ्या सीताहरणासारख्या गोष्टी रामायणांत आहेत, त्याअर्थीं, पंजाब ग्रीक लोकांनीं पादाक्रांत केल्यावर व हिंदूंना होमरच्या इलियडचा माहिती झाल्यानंतर रामायण लिहिलें गेलें असलें पाहिजे.

हल्लींच्या वाल्मीकिरामायणांत मूळचें असें एक काव्य असून त्यांत वेळोवेळीं नवी भर पडत आली आहे, हें आम्हीं पहिल्या पुस्तकांत दाखविलेंच आहे. मूळ काव्य हें, त्यांतील साधी भाषासरणी, त्याचें आर्ष स्वरूप व मागून पडलेल्या भरींशीं येणारी त्याची विसंगतता इत्यादि गोष्टीमुळें या भरींतून सहज वेगळें करतां येतें. जुन्या रामायणाच्या अस्तित्वाबद्दलच्या शक्यतेसंबंधीं प्रो. वेबरही कबुलीजबाब देतो; परंतु आणखी पुष्कळ कल्पना सुचवून तो त्या कबुलीपासून आपली सुटका करूं पाहतो. विषय सोपा होण्याकरितां आम्हीं येथें असें सांगतों कीं, आमच्या मतें

रामायणाच्या आवृत्यांची पुढीलप्रमाणें कालानुक्रमवार यादी देतां येईल.

(१) वाल्मीकींचें मूळ रामायण.

(२) दशरथजातक.

(३) महाभारतांतील रामोपाख्यान.

(४) वाल्मीकिरामायणाची हल्लींची आवृत्ति.

यादीच्या पूर्णतेसाठीं पुढील ग्रंथांचाही वरील यादींत समावेश करितां येईल.

(५) कालिदास व इतर संस्कृत कवींचें रामायण.

(६) पुराणांतील रामायण; मुख्यत्वेंकरून पद्मपुराण व अध्यात्मरामायण यांतील.

(७) तुलसीदास व इतर प्राकृत कवींचें रामायण.

प्रोफेसर वेबरच्या म्हणण्यांत व वरील यादींत पुढीलप्रमाणें तफावत पडते. प्राचीन व मूळ असें रामायण होतें हें तो स्पष्टपणें कबूल करीत नाहीं; व जरी असें त्यानें कबूल केलें, तरी तें दशरथजातकाच्या आधींचे आहे असें तो कबूल करीत नाहीं.

एक विशिष्ट आवृत्ति दुसरीच्या मागून लिहिलेली आहे, हें ठरविण्याची कसोटी म्हटली म्हणजे दुसरीपेक्षां पहिलींत अद्भुत किंवा भाकडकथेचें तत्त्व जास्त आहे कीं नाहीं हें पाहणें होय; व ही कसोटी प्रो. वेबर यांसही मान्य आहे. हीच कसोटी लावून प्रो. वेबरनें असा निष्कर्ष काढला आहे कीं, " महाभारतांतील रामकथा पुष्कळदृष्टींनीं वाल्मीकिरामायणाच्या पूर्वीची आहे. " तेव्हां वाल्मीकीच्या हल्लींच्या रामायणापेक्षां महाभारतांतील रामोपाख्यान प्राचीन आहे हें निःसंशय होय. आतां हें रामोपाख्यान दुसऱ्या एखाद्या ग्रंथाचा सारांश आहे हें अगदीं उघड आहे. प्रो.

वेबर स्वतःच म्हणतो:—"कथेच्या ओघांतील, व वेळोवेळीं भाषेंतही दिसून येणारें ठळक ऐक्य इतकें स्पष्ट आहे कीं, ही कथा वाल्मीकीच्या ग्रंथाचा सारांश असावा असें म्हटल्यावांचून आम्हाला राहवत नाहीं." आपणाला याच्याहीपेक्षां स्पष्ट विधान करतां येईल. जो कोणी महाभारतांतील रामोपाख्यान वाचील त्याला ग्रंथकाराचा तें लिहिण्यांत एखाद्या पूर्वीच्या ग्रंथाचा सारांश देण्याचाच हेतु आहे हें तेव्हांच कळून येईल. तेव्हां जर रामोपाख्यान हल्लींच्या रामायणापेक्षां प्राचीन आहे, व तेंच जर हल्लींच्या रामायणाशीं बहुतांशीं साम्य असलेल्या वाल्मीकीच्या एखाद्या ग्रंथाचा सारांश आहे, तर प्राचीन असें एक वाल्मीकीचें रामायण असून तें हल्लींच्या महाभारताच्या आधींचें असलें पाहिजे असें म्हटल्यावांचून गत्यंतर नाहीं. रामोपाख्यान हें त्या आख्यानापेक्षां पूर्वीच्या अशा काव्याचा सारांश आहे, हें सांगतांना प्रो. वेबर वरील गोष्ट कबूल करतो. परंतु त्याच्या मतें रामायणाच्या अनेक आवृत्त्यांची कालानुक्रमानुसार यादी करण्याच्या अनेक मार्गांपैकीं तो एक मार्ग आहे. पण आमच्या मतें या बाबतींत दुसरा तिसरा मार्ग स्वीकारणें अशक्य आहे. महाभारतांत रामायणाचा—वाल्मीकीच्या—इतका स्पष्ट उल्लेख आला आहे कीं, वरील मताशिवाय दुसरें मत असमर्पक होय. उदाहरणार्थ **'रामायणे विविख्यातः'** किंवा **'अपि चायं पुरा गीतः श्लोको वाल्मीकिना भुवि'** इत्यादि श्लोक पहा. प्रो. वेबरनें सुद्धां हेच श्लोक दिलेले आहेत. परंतु त्याच्या मतांत नेहमीं असणाऱ्या प्रतिकूल ग्रहामुळें तो शेवटीं म्हणतो—"आम्हांला कांहीं या ठिकाणीं कालक्रमानुसार यादी तयार करण्यांत यश आलें नाहीं; कारण रामोपाख्यान महाभारतांत केव्हां घातलें गेलें हें आम्हांस माहीत नाहीं."

परंतु इतर ठिकाणीं प्रो. वेबर यानें ज्या गोष्टी कबूल केल्या आहेत त्यावरूनच आपणास असें म्हणतां येईल कीं, रामायणाच्या या निरनिराळ्या आवृत्त्यांची कालक्रमानुसार यादी करण्यांत आपणास यश आलें आहे. हल्लीं रामायण ज्या स्थितींत आहे त्याच स्थितींत तें कालिदासानें **रघुवंश** लिहिण्याच्या पूर्वी होतें. शिवाय कालिदासाच्या वेळीं रामायणाला वेदांच्या इतकें पूज्यत्व प्राप्त झालें होतें, व स्वतः वाल्मीकि वेदमंत्र लिहिणाऱ्या ऋषींच्या इतका प्राचीन समजला जात होता. तेव्हां आम्हीं पूर्वी दाखविल्याप्रमाणें हल्लींच्या रामायणाच्या रचनेचा काल व कालिदासाचा काल यांत बरेंच अंतर असलें पाहिजे. वास्तविक स्थिति अशी आहे कीं, हल्लींच्या रामायणाच्या रचनेचा काल ख्रिस्ती शकाच्या आरंभाच्या सुमाराचा असून या गोष्टीस, शक व यवन यांच्या संबंधीचे हल्लींच्या रामायणांतील उल्लेख, त्याचप्रमाणें ज्योतिषशास्त्रांतील कांहीं विवक्षित गोष्टींचे उल्लेख लक्षांत घेतां प्रो. वेबर यांनेंही संमति दिली आहे. तेव्हां ज्याअर्थीं महाभारतांतील रामोपाख्यान इसवी सनाच्या आरंभींच्या रामायणापेक्षां जास्त प्राचीन आहे, त्याअर्थीं तें महाभारतांत त्यापूर्वी घातलें गेलें असलें पाहिजे. पुन्हां ज्याअर्थीं तें उपाख्यान वाल्मीकीनें लिहिलेल्या रामायणाचा सारांश आहे, त्याअर्थीं तें जुनें रामायण हल्लीं उपलब्ध असलेल्या महाभारतापेक्षां पुष्कळ प्राचीन असलें पाहिजे. आणि या महाभारताचा काल इ. सनाच्या पूर्वी २ शतकाच्या अलीकडे येऊं शकत नाहीं.

तेव्हां आतां, हल्लींच्या महाभारताच्या पूर्वीचें असें वाल्मीकि रामायण होतें यांत कांहींएक संशय उरला नाहीं; व या सिद्धांतास प्रो. वेबरनें लांबून लांबून कबुली दिलीच आहे. तेव्हां यापुढें मुद्याचा प्रश्न एवढाच राहिला कीं, हें जुनें रामायण **दशरथजातकाच्या**

आधीं लिहिलें गेलें, कीं मागून लिहिलें गेलें; व याच मुद्यासंबंधीं चुकीच्या समजुतीच्या पायावर रामायण हें होमरच्या इलियडवरून घेतलेलें आहे या कल्पनेची इमारत प्रो. वेबर यानें रचिलेली आहे. " दशरथजातकाची कथा मूळची असून तिच्यापासून इतर सर्व आवृत्त्या निघालेल्या आहेत. " असें त्याचें मत आहे. शिवाय जातकाच्या कथेला ऐतिहासिक आधार किती आहे, किंवा या मूळ कथेला " शेतकीवरील अधिपति अशा एखाद्या कल्पित व हद्दपारीनें (बहुधा हिंवाळ्यानें) त्रस्त-प्रतिहत-झालेल्या एखाद्या नायकाचीं अद्भुत साहसाचीं कृत्यें " आधार आहेत या-विषयीं त्याला संशयच आहे. जातां जातां आम्हीं एवढेंच सुचवूं इच्छितों कीं, वरील कल्पनेचें म्हणजे एखाद्या हिंदी काव्यांत शेतकीसारख्या अमूर्त कल्पनेचा समावेश झाला असेल या कल्पनेचें, प्रोफेसर वेबर यानेंच पूर्वी खंडन केलें असून, त्याच कल्पनेचा तो या ठिकाणीं आश्रय करीत आहे.

परंतु रामकथा अगदीं प्रथम दशरथजातकांत लिहिली गेली किंवा वाल्मीकीचें महाभारताच्या आधींचें जें मूळ रामायण तें दशरथजातकाच्या सुद्धां आधींचें होतें या प्रश्नाचा उलगडा फार सहज होण्याजोगा आहे. अंतर्गत पुराव्यावरून आपल्या मनाची अशी खात्री होते कीं, ज्या रामायणावरून हल्लींचें रामायण तयार करण्यांत आलें आहे, त्या मूळ रामायणांत राम हा विष्णूचा अवतार होता असें दाखविण्यांत आलें नव्हतें. मि. म्यूर यानें हें पूर्वीच सिद्ध केलें आहे; व या सिद्धांतास जास्त पुष्टि देण्यासाठीं आम्हीं आपले मुद्देही प्रथमपुस्तकांत पुढें मांडले आहेत. प्रो. वेबर हा आपल्या लेखाच्या शेवटीं निष्कर्ष ४ मध्यें हाच सिद्धांत प्रतिपादितो; परंतु या सिद्धांतापासून आपोआप निघणारीं अनु-

मानें मात्र प्रो. वेबर काढीत नाहीं. जर मूळ रामायणांत वैष्णविक तत्त्व नव्हतें, आणि जर तें तत्त्व " बुद्धधर्माविरुद्ध व ब्राह्मणधर्माच्या हितरक्षणासाठीं " मागाहून घालण्यांत आलें असेल, तर मग ९९ हिश्शानें मूळ रामायण हें बुद्धधर्माच्या प्रारंभाच्या आधीं रचिलेलें असलें पाहिजे. रामोपाख्यानांत सुद्धां हें वैष्णव तत्त्व दृष्टीस पडतें; आणि त्यावरून असें अनुमान करण्यास जागा आहे कीं, वाल्मीकीचें जुनें रामायण रचिलें गेल्याचा काल, आणि महाभारतांतलि रामोपाख्यानाच्या रचनेचा काल यांच्या दरम्यान बुद्धधर्माचा उदय झाला असला पाहिजे. सारांश, वाल्मीकीचें मूळ रामायण दशरथ जातकाच्या पूर्वीचें आहे हें सिद्ध करण्यास हें एक प्रबळ कारण आहे.

कौसल्या व कैकयी या दोन पदांचा पाणिनीच्या दोन सूत्रांमध्यें अर्थ सांगितलेला आहे, आणि त्यावरून रामकथा पाणिनीच्या वेळीं माहीत होती; या सिद्धांताच्या पुष्टीकरणार्थ जस्टिस **तेलंग** यांनीं पुष्कळ सबळ मुद्दे पुढें मांडले आहेत. अंतर्गत पुराव्यावरून निघणाऱ्या ज्या मुद्यांची पहिल्या पुस्तकांत विस्तृत चर्चा केली आहे, त्यावरून रामायणाच्या जुन्या भागांत जी समाजस्थिति दिसून येते, ती बुद्धधर्माच्या पूर्वीची असली पाहिजे हें सिद्ध होतें. वैदिक देवतांची पूजाअर्चा, यज्ञांचें माहात्म्य, ब्राह्मण व क्षत्रिय यांचें मांसाशन, क्षत्रियांची वेद व वैदिक धर्मकृत्यें यांतील पारंगतता, स्त्रियांना हल्लींपेक्षां जास्त असलेलें स्वातंत्र्य व त्यांचें वैदिक धर्मकृत्यांचें आचरण, इत्यादि गोष्टींवरून बुद्धधर्माच्या उदयानंतरच्या कल्पनांचा व भावनांचा संपर्क नसलेली समाजसुधारणा व धर्म त्या वेळीं असावा असें दिसून येतें. या सर्व मुद्यांचा रोख वाल्मीकीचें जुनें रामायण दशरथजातकाच्या पूर्वीचें आहे, असें दाख-

विण्याकडे असून, हेंच दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें तर रामकथा दशरथजातकांतच अगदीं प्रथम वर्णिलेली नाहीं.

दुसऱ्या कित्येक मुद्यांवरून असें दिसून येईल कीं, प्राचीन आर्यांमध्यें प्रचलित असणाऱ्या रामकथेवरूनच दशरथजातकाची गोष्ट लिहिलेली आहे व ती लिहितांना मूळ गोष्टीचा घोटाळा केलेला आहे. प्रथम आपण दशरथजातक व वाल्मीकीचें मूळ रामायण यांना आपली नेहमींची म्हणजे अद्भुततेच्या संबंधींची कसोटी लावून पाहूं. भरताच्या प्रधानांनीं कांहीं अन्याय केल्यास रामपादुका एकमेकांवर आदळत असत असें दशरथजातकांत विधान आढळतें.* ही रामायणांतील मूळ कथेची वेडसर सुधारणा होय. परंतु दशरथजातकांतील अत्यंत चमत्कारिक व मूर्खपणाची गोष्ट म्हटली म्हणजे भरतानें रामाला राज्य देऊं केल्यावर राम बनारसेस परत कां आला नाहीं या संबंधांतील जातकांतील स्पष्टीकरण होय. प्रथम हें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे कीं, रामाची सापत्न माता कैकयी हिनें, माझ्या मुलाला राज्य द्यावें असा वर मागितल्यावर वाल्मीकिरामायणांतल्याप्रमाणें जातकांतला दशरथ कैकयीला वर देत नाहीं. " राजानें वर न देतांच, कैकयीच्या मत्सरामुळें आपल्या मुलांस त्रास होईल, या भीतीनें त्यांस वनांत जावयास सांगून आपल्या अंत्यक्रियेच्या वेळीं (ही गोष्ट विशेष ध्यानांत धरण्यासारखी होय.) परत यावयास सांगितलें " नंतर त्यानें ज्योतिष्यांना आपल्या आयुष्याची मुदत किती आहे हें विचारिलें व त्यांनीं तो १२ वर्षे जगेल असें जाहीर केलें. तेव्हां त्यानें मुलांना पुन्हां " १२ वर्षांनीं या " असें सांगितलें, परंतु ज्योति-

* येथें दशरथजातक परिशिष्टांत दिलें आहे, तें वाचकानीं प्रथम समग्र वाचून पहावें.

वशास्त्राच्या दुर्दैवानें राजा नऊ वर्षांच्या अंतीं मरण पावला आणि भरत व त्याचे मंत्री, राम हा गादीचा खरा मालक असल्यामुळें त्याला परत आणण्याकरितां गेले. बापाची आज्ञा अगदीं अक्षरशः पाळण्याच्या चमत्कारिक कल्पनेखेरीज (आणि शिवाय या कल्पनेप्रमाणें वागतांना तो बापाच्या इच्छेच्या विरुद्धच वागत होता; कारण बापानें त्याला अंत्यविधीच्या वेळीं यावयास सांगितलें होतें; आणि ही त्याची इच्छा नुसती ध्वनित नाहीं; तर स्पष्ट शब्दांत प्रदर्शित केलेली आहे.)—त्याला परत येण्याला कोणती अडचण होती ? हितोपदेशांत एका पंडितमूर्खाची गोष्ट आहे. त्याचें मूर्खपणाचें शेवटचें कृत्य म्हणजे-

सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पंडितः ।

या वचनाप्रमाणें शब्दशः वागून, आपल्या बुडत असलेल्या मित्राचें शिर कापून घेणें हें आहे. जातकांतील पंडित राम हा या पंडितमूर्खाचा सख्खा भाऊच दिसतो. वाल्मीकीच्या रामायणांत ज्या कैकयीकरितां १४ वर्षांच्या आंत परत न येण्याची रामानें प्रतिज्ञा केली होती, तीच कैकयी, तिची प्रेमभावना अत्यंत उद्दीपित झाली असतांही रामाला परत येण्याविषयीं कधींही सांगत नाहीं. उलट ती अगदीं मौनयुक्त राहते; व या मौनाचें कारण कदाचित् ' रामाची वनांत राहण्याची मुदत पुष्कळ लांब आहे; वनांत राक्षस फार आहेत; त्यांच्या कडून रामाच्या जीवास अपाय होऊन भरताची गादीवर सुरक्षितपणें स्थापना होईल ' ही कैकयीची कल्पना असावी. कथेला असें वळण देणाऱ्या वाल्मीकीच्या कलेची व कथेमध्यें मनुष्यस्वभावानुरूप औचित्य ठेवण्याच्या कविशक्तीची स्तुति करावी तेवढी थोडीच ! जिच्याजवळ प्रतिज्ञा केली, ती हजर असतां, व ती प्रतिज्ञेतून मुक्तता करीत नसतां, ठरविलेल्या

कालाच्या आंत परत येणें रामाला अशक्य झालें, ही रामायणांतली कथा जास्त ग्राह्य होय; परंतु जातकांतील कथेंत राजानें अथवा रामानें कोणत्याही तऱ्हेचें वचन राणीला दिलें नव्हतें; वनवासाची मुदत ज्योतिषशास्त्रावरून १२ वर्षें ठरविण्यांत आली असली तरी, खरें पाहिलें असतां ती राजाच्या मृत्यूनंतर संपावयाची होती; यामुळें ती गोष्ट अत्यंत विसदृश वाटते; आणि भरतानें प्रत्यक्ष बोलावल्यानंतरही रामाला परत न जाण्याला एकही बुद्धिग्राह्य असें कारण शोधून काढतां येत नाहीं.

जातकांत घातलेल्या अशा अद्भुत परंतु बुद्धीला मुळींच न पटणाऱ्या गोष्टी कित्येक दाखवितां येतील. सीता व लक्ष्मण यांचें आपल्या बापावरील प्रेम ९ वर्षांच्या वियोगानंतर पूर्वीइतकें दृढ राहणें शक्य नसतांही जातकामध्यें त्यांचें मन इतकें हलकें दाखविलें आहे कीं, बापाच्या मृत्यूची वार्ता ऐकतांच तीं दोघें मूर्च्छित होतील या भीतीनें त्यांना पाण्यांत उभें केलें जातें. त्यांना वार्ता कळवितांच त्यांनीं मूर्च्छित पडावें, हा प्रकार तीनदां झाला व तिन्ही वेळां त्यांना पाण्यानें वाचविलें.—हा एक अत्यंत हास्यास्पद अतिशयोक्तीचा नमुना होय. रामायणांतील कथा यापेक्षां साधी व सरळ आहे. तीमध्यें राम, लक्ष्मण व सीता यांच्या कानावर दशरथ मेल्याची वार्ता, त्यांनीं अयोध्या सोडल्यावर लौकरच आली; आणि असें असूनही ते साधारण मानवांप्रमाणेंच वागले. दुःखभराखालीं ते अगदीं दडपून जातात यांत तर मुळींच संशय नाहीं; परंतु मूर्च्छा वगैरे प्रकारांनीं ते त्यांचें प्रदर्शन करीत नाहींत. अगदीं साहजिक अशा रीतीनें स्वतः रामसुद्धां दुःख करितो. परंतु विचारानें प्रथम आपलें शांतवन करून तो दुसऱ्यांचें शांतवन करितो. रामायणांतील कथेंत याप्रमाणें सृष्टिक्रमाविरुद्ध अथवा

ओढून आणलेलें असें कांहींही नसून तीच कथा त्यामुळें खरी व मूळची अशी वाटते.

शेवटीं सीता ही रामाची बहीण होती हें दशरथजातकांतील परावर्तन कथेंतील संगतीला धरून नाहीं, याविषयीं आपण विचार करूं. बुद्धाच्या पूर्वजांचा जन्म एका बहीणभावंडांचा विवाह होऊन झालेला होता. या बौद्ध दंतकथेशीं सादृश्य जमविण्याकरितां हीं गोष्ट जातकांत घातली असावी. कारण आर्यपत्नीला, पती-बरोबर रानांवनांतून जाण्यास परवानगी होती असें धरून चालतां येईल; रामायणांत तर असें असूनही सीतेची सासू तिला जाण्या-पासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करीत आहे. परंतु भावाबरोबर भगिनीला अरण्यांत जाण्यास कधींही परवानगी खरें पाहिलें असतां मिळूं नये व तिचा नाश व्हावा अशी इच्छा होण्याला कैकयीस कांहीं कारण होतें असेंही जातकावरून दिसत नाहीं. जर ती लहान असल्यामुळें लग्नास योग्य नव्हती तर दोघां बंधूंना ती रानांवनांत एक ओझेंच होय. बरें, जरी लग्नास योग्य इतक्या वयाची ती होती असें मानलें, तरीही तिला १२ वर्षेंपर्यंत हद्दपार कर-ण्यास कोणतेंही कारण नव्हतें. **सीतादेवी** रामाची बहीण होती आणि तिच्यावर आत्यंतिक प्रेम करणाऱ्या तिच्या पित्यानें तिला बंधूंबरोबर १२ वर्षेंपर्यंत रानावनांत जावयास परवानगी दिली, हें कोणताही समंजस मनुष्य कबूल करणार नाहीं. शिवाय हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, वनवासांत जाण्याच्या अगोदर, अथवा वनवासां-तही सीतेचें रामाशीं लग्न झालें होतें अथवा व्हावयाचें ठरलें होतें असें जातकांत मुळींच दाखविलें नाहीं. वनवासांतून परत आल्यावर ती रामाची पत्नी झाली.

आणखीही कित्येक विसंगत गोष्टी सहज दाखविता येतील.

जातकामध्यें राम, लक्ष्मण, सीता हीं **बनारसहून** निघतात तीं मोठ्या लवाजम्यानिशीं निघतात. रामायणांत कैकयीनें लवाजमा नेऊं नये असें स्पष्ट सांगितलें आहे. परंतु जातकांतील कथा खरी मानून त्यांजबरोबर लवाजमा होता असें क्षणभर धरून चालल्यास "आम्ही कंदमुळें आणून तुझी उपजीविका चालवूं" असें म्हणण्याची लक्ष्मण व सीता यांस काय जरूर होती? रामायणांत राम व लक्ष्मण हे दोघे **सीतेची** उपजीविका चालवितात व हेंच जास्त स्वाभाविक होय. जातकामध्यें मांसाशनाचा मुळींच उल्लेख नाहीं. हीही महत्वाची गोष्ट आहे. पुन्हां जातकांत म्हटलें आहे कीं, दशरथराजा पुत्रशोकानें (पुत्र वनांत गेल्यावर) ९ **वर्षांनीं** मरण पावला— खरोखर वृद्ध अशा पित्याला हृदय फुटून मरण्याला हा काळ फारच अल्प होय! परंतु दुसरी विसंगत गोष्ट अशी कीं, राजानें स्वतः आपल्या मुलांना आपल्या बायकोच्या कारस्थानांनीं त्रास होईल या भीतीनें दूर पाठविलें होतें; तेव्हां दूरदेशीं गेल्यानें आपलीं मुलें सुखांत आहेत असें वाटून त्यास सुखच व्हावयास पाहिजे होतें. शिवाय आपल्या आयुष्यांत आपल्या तरुण पत्नीला व आपाततः आपल्यालाही नाखूष न करतां आपल्या कर्तव्यतत्पर पुत्रांना आपल्या मृत्यूनंतर गादी मिळेल अशीही त्याला खात्री होती. आणि इतकें असूनही पुत्रांच्या जाण्यानें, अगोदर अनुमान केल्यापेक्षां त्याला जास्त वाईट वाटलें असेल, तर पुत्रांना परत बोलावून त्यांना खुद्द वाराणसींतच सुरक्षित ठेवण्यास, त्यानें कोणापाशीं कांहीं प्रतिज्ञा केली नसल्यामुळें, त्यास कोणतीच हरकत नव्हती. अशा अनेक विकृत परिवर्तनांवरून असें दिसतें कीं; जातककथा *

* ही जातककथा आम्ही परिशिष्टांत तुलनेकरितां दिली आहे, तीं वाचकांनीं काळजीपूर्वक वाचावी.

ही स्वाभाविक नाहीं; आणि अर्थातच मग ती मूळ खरी कथा होऊं शकत नाहीं.

परंतु रामायणाची स्वाभाविक कथा बौद्धमतें वगैरेशीं जुळती करावयाची असल्यानें तिचीं हीं अशीं भलतींच रूपांतरें अवश्य झालीं. बुद्धदंतकथेंतील शिरस्त्याप्रमाणें कथेचें स्थळ काशी योजिलेलें आहे; आणि हद्दपारी—अथवा जास्त बिनचूक बोलावयाचें म्हटल्यास स्वसरंक्षणाकरितां निवासाची जागा हिमालयांत केलेली होती; याच हिमालयांत वेळोवेळीं बौद्धधर्मीय लोक नेहमीं आश्रयाकरितां धांव घेत. सीता रामाची बहीण कां दाखविण्यांत आली हें पूर्वीं सांगितलेंच आहे. रामाला वनांत कांहीं विशिष्ट मुदतीपर्यंत राहावयाचें होतें व ही मुदत ज्योतिषशास्त्राच्या आधारावर कायम करण्यांत आली होती; कारण बुद्धधर्म हा ज्योतिषशास्त्राला अनुकूल नव्हता. आणि वरील प्रकारानें त्याच्यावर चांगलाच आक्षेप आणण्याचा बेत असावा. पित्याच्या मृत्यूमुळें दुःख करणाऱ्या पुत्राचें शांतवन करण्यासाठीं ही कथा सांगितली असल्यामुळें लक्ष्मण व सीता यांचें दुःख अतिशयोक्तीनें वर्णिलें आहे;

राम मात्र ज्याच्यावर सुखदुःखाचा कांहींच परिणाम होत नाहीं असा एखाद्या बुद्धकथेंतील नायकाप्रमाणें दाखविला असून, असें दाखविणें हें मात्र अस्वाभाविक झालें आहे.

आणि याच ठिकाणीं, या बुद्धकथेंत सीताहरण व रावणयुद्ध कां सांपडत नाहींत या प्रश्नाच्या उत्तराची गुरुकिल्ली सांपडते. आपल्याला आपला सिद्धान्त खुद्द प्रो. वेबरच्या शब्दांत मांडतां येईल. बापाच्या मरणामुळें अत्यंत दुःखित होऊन ज्यानें आपला कामधंदा सोडून दिला आहे, अशा एका शेतकऱ्याचें शांतवन करण्याकरितां दशरथजातक सांगितलेलें आहे. (Indian

Antiquary, 1892, पान १२७ पहा) प्रो. वेबर यानेंच म्हटल्याप्रमाणें महाभारतांतील रामोपाख्यानांत "दशरथाचा यज्ञ" किंवा जनकाच्या पणाची पूर्तता करून मग रामाला झालेली सीतेची प्राप्ति या गोष्टींचा मुळींच उल्लेख नाहीं. पुढें ज्या ठिकाणीं प्रो. वेबर यानें महाभारतांतील रामोपाख्यान हेंच मूळ असून, त्यावरून रामायण उत्क्रांत झालें आहे कीं काय? अशी शंका उपस्थित केली आहे; त्याच ठिकाणीं टीपेमध्यें तो म्हणतो, "ही कल्पना रामायणांतील सगळ्या कथाभागाला न लागतां ३ ऱ्या कांडांतील ३६ व्या अध्यायापासून पुढें लागूं पडेल. कारण महाभारतांत हें उपाख्यान ज्या कारणास्तव (धर्माची पत्नी द्रौपदी हिला जयद्रथानें पळविली असतां धर्माचें सांतवन करण्याकरितां) घालण्यांत आलें आहे, त्या कारणाच्या दृष्टीनें पाहतां रामायणाच्या या अध्यायाच्या मागील इतिहासाचें मुळींच महत्त्व नाहीं; व अर्थातच तो इतिहास येथें कमी आहे." महाभारतांतील रामोपाख्यानांत बालकांडांतील विस्तृत हकीकत नाहीं, एवढ्यावरून वाल्मीकीच्या मूळ रामायणांत तो भाग नव्हता असें म्हणतां येत नाहीं. कारण रामोपाख्यान ज्या हेतूस्तव महाभारतांत घातलें आहे त्या हेतूच्या दृष्टीनें त्या भागांची उपाख्यानास मुळींच जरूर नाहीं, ही गोष्ट प्रो. मजकुरांस पटते. परंतु त्याचप्रमाणें जातक हें पितृनिधनामुळें दुःखित झालेल्या पुत्राचें शांतवन करण्याकरितां सांगितलेलें असल्याकारणानें त्यांत सीताहरण किंवा रावणयुद्ध यांची मुळीच जरूर नाहीं; व यामुळें तीं तशीं जातकांत नाहींत, एवढ्याच जोरावर जातक ही खरी मूळ रामकथा होय, असें म्हणता येणार नाहीं, हें मात्र प्रो. वेबर यांस समजूं नये अथवा पटूं नये हें आश्चर्य होय. आमच्या मतें प्रो. वेबरची

सर्व उपपत्ति कोळ्याच्या जाळ्यांतील अति सूक्ष्म धाग्यासारख्या सूक्ष्म धाग्यावर अवलंबून असून, तो धागा त्या उपपत्तीच्या पुष्टीकरणार्थ मांडलेल्या मुद्यांच्या भाराखालींच तुटण्याच्या बेतांत आला आहे. दशरथजातकांत सीताहरण व रावणयुद्ध हीं वगळण्यांत आलीं आहेत यांत भयंकर अथवा विचित्र कांहींच नसून, प्रो. वेबर यांची उपपत्ति अतिशय ठिसूळ अशा पायावर उभारलेली असल्यामुळें तिजकडे आपणास दुर्लक्ष करितां येईल.

यापुढें इतर उपपत्त्यांचीं विवेचनें करण्याची जरूर उरलेली नाहीं; कारण वरील विवेचनांत त्यांना अप्रत्यक्ष रीत्या उत्तरें मिळालेलींच आहेत. बुद्धधर्माच्या आधीं वाल्मीकीचें रामायण अस्तित्वांत होतें; व बुद्धधर्मीयांनीं आर्य लोकांचे लोकप्रिय नायक आपल्या धर्मकथांत ओढण्याचा प्रयत्न जातक लिहून स्वाभाविकपणेंच केला; या गोष्टी एकदां कबूल केल्यावर, रामायणांत बुद्धधर्म व हिंदुधर्म यांतील झगडा वर्णिला आहे; किंवा विजयानगरच्या राज्यसंस्थापनेचा इतिहास त्यांत आहे, या व अशाच दुसऱ्या कित्येक कल्पनांना थारा मिळत नाहीं. आतां जर कोणी असा वाद घालूं लागेल कीं, वाल्मीकीचें रामायण हें बुद्धधर्माच्या उदयाच्या पूर्वी अस्तित्वांत असलें तरी, त्यास इतिहासाचा कांहींही आधार नसून तो केवळ कवीच्या कल्पनेचा सर्व खेळ आहे, तर मात्र तें शक्य आहे. रामायणांतील प्रसंग व पात्रें हीं इतकीं अद्भुततायुक्त आहेत कीं, त्यामधून एखादी सुसंगत व स्वाभाविक कथा बाहेर काढतां येणार न हीं, अशी सामान्य वाचकांची कल्पना होणें संभवनीय आहे. तेव्हां असली कल्पना साफ नष्ट करण्याचा आणि सुसंगत, सरळ व सर्वसंमत इतिहासापेक्षां जास्त अद्भुतता ज्यांत नाहीं असेंच रामायणाचें कथानक आहे हें दाखविण्याचा पुढील पानांत आम्ही प्रयत्न केला आहे.

प्रकरण २ रें.

भारतीय पुराणांचें ऐतिहासिक दृष्ट्या विवरण.



रामायण व मेक्सिको देश पादाक्रांत केल्याचा इतिहास बरोबर वाचल्यास त्या दोहोंमधील चमत्कारिक साम्य, वाचणाऱ्याच्या लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. वास्तविक विचार करतां, अज्ञात व विस्तृत अशा भरतखंडांतील आर्य लोकांच्या प्रसृतीची हकीकत भारतीय पुराणांत मुख्यतः वर्णिली आहे, या मुद्यावरच त्या पुराणांचें योग्य व बुद्धिग्राह्य असें स्वरूपाविष्करण करतां येईल असें आम्हांस वाटलें. याच सिद्धांताचा जास्त पूर्णतेनें अभ्यास करीत असतां आम्हांस असें आढळून आलें कीं, पौर्वात्य आर्यांच्या प्रसाराचा इतिहास व पाश्चात्य आर्यांच्या अमेरिकेच्या शोधाचा व ती आक्रांत करण्याचा इतिहास यांमध्यें विलक्षण साम्य आहे; व अशा रीतीनें एकमेकांपासून हजारों मैलांच्या अंतरावर व हजारों वर्षांच्या अन्तरानें घडलेल्या प्रसंगांत सुद्धां "इतिहासाची पुनरावृत्ति होते," हें तत्त्व दिसून येतें.

या बाबतींत हिंदुस्थानच्या पौराणिक इतिहासाचे मुख्य तीन भाग, निरनिराळ्या वाङ्मयात्मक ग्रंथांनीं निर्दीशित केले जाणारे, असे पाडणें फायदेशीर होईल. (१) मध्य अशियांतील शूर व साहसी आर्यांचा इतिहास; ज्यांनीं आपल्या इराणी बंधूंपासून वेगळे होऊन आपलीं वसतिस्थानें बदलून अफगाणिस्थान, कपिश, गांधार, पंजाब यांसारखे देश वसविले; त्या असल्या साहसी व शूर आर्यांची उत्कृष्ट स्वरूपें आपले वैदिक, देव, इन्द्र, विष्णु होत. कोलंबस व त्याच्या हाताखालील स्पॅनिश लोक आणि इंग्लंड व फ्रान्स मधील केल्टस लोक

यांच्या अमेरिकेच्या शोधाच्या इतिहासाशीं हा इतिहास मिळता आहे. या भारती ऐतिहासिक काळचें वर्णन मुख्यत्वेंकरून वेदांत सांगोपांग आढळतें; परंतु रामायणांतही कोठें कोठें त्याचा निर्देश सांपडतो. (२) मुख्यतः रामायणांत वर्णिलेला गंगेपासून थेट दक्षिणेच्या टोंकापर्यंत म्हणजे लंकेपर्यंतच्या हिंदुस्थानांतील प्रदेशांच्या शोधाचा व ते आक्रांत केल्याचा इतिहास, खऱ्या खुऱ्या इतिहासांतील असूनही कल्पित गोष्टींतील नायकांच्या कृत्यांइतक्या अद्भुत व विलक्षण वाटणाऱ्या, कोर्टेझ (Cortez) पिझारो (Pizzaro) आणि इतर धाडसी स्पॅनिश लोकांच्या साहसाच्या व धाडसाच्या कृत्यांनीं भरलेला, मेक्सिको व पेरु हे देश पादाक्रांत केल्याचा इतिहास आणि वरील इतिहास हे अगदीं मिळते आहेत. (३) तिसरा व शेवटचा भाग म्हणजे महाभारतांत वर्णिलेला आपापसांतील महान् युद्धाचा इतिहास होय. हा इतिहास पुष्कळ अंशीं अमेरिकेच्या स्वातंत्र्ययुद्धाशीं मिळता आहे. या पुस्तकांत दुसऱ्या म्हणजे राम व इतर आर्य लोकांच्या धाडसाच्या कृत्यांच्या इतिहासाशीं आपला संबंध आहे, परंतु त्या विषयाकडे वळण्याच्या आधीं आपण पहिल्या भागावरून ओझरती नजर टाकूंया, म्हणजे आपणांस हा दुसरा भाग नीट समजण्यास सुलभ पडेल. या पुस्तकांत आम्हीं वाल्मीकि-रामायणावर टीका करीत आहोंत; यासाठीं पहिल्या भागाच्या निरीक्षणासाठींही शक्य तितका आम्हीं वाल्मीकिरामायणाचाच उपयोग करूं.

यूरोपियन अथवा भारतीय विचारवंत लोक वेद व **पुराणांचा** कांहींही उलगडा लावोत; सर्व बाजूंनें एक गोष्ट मात्र संमत असल्यासारखी दिसते ती ही कीं, **देव** हे दुसरे तिसरे कोणी नसून हिंदुस्थानांत आलेले व वसति करून राहिलेले आर्यांचे पूर्वज होत. ज्या ठिकाणीं

अग्नि व सूर्य यांचें विशेष महत्व आहे अशा एखाद्या थंड वर्फाच्छादित प्रदेशांत ते मूळचे राहणारे असावे. आर्यांच्या इतर संघांहून निराळीं मतें प्रस्थापित करणारे असे हे देव होते, व त्याचमुळें त्यांना आपलें मूळ वसतिस्थान सोडावें लागलें. त्यांची प्रिय देवता इंद्र असून वेदांमध्यें वेळोवेळीं उल्लेखिलेल्या परंतु आम्हा हल्लींच्या हिंदुस्थानांतील आर्यांना ज्याविषयीं अंधुकसुद्धां कल्पना नाहीं, अशा एका सोम नांवाच्या मत्त करणाऱ्या पेयाचे ते मोठे भोक्ते होते. या सिद्धांताच्या पुष्टीकरणार्थ विस्तृत प्रमाणें देण्याचें काम या लहानशा पुस्तकांत होणें अशक्य असल्यानें खुद्द रामायणांतून मिळणाऱ्या कांहीं थोड्याशा महत्त्वाच्या गोष्टींवरच आम्हांस समाधान मानून घेतलें पाहिजे. देव व असुर यांमधील अव्याहत चाललेल्या युद्धांचा वेदांत व रामायणांतही उल्लेख आहे. देव हे अदितीपासून उत्पन्न झाले असून, असुर हे दितीपासून उत्पन्न झाले होते. अदिति व दिति या कश्यपाच्या पत्न्या होत्या. याप्रमाणें ते सावत्र बंधु असून एकाच वंशाचे होते; परंतु ते दोन्ही वंश एकमेकांशीं अत्यंत शत्रुत्वानें वागत आल्यामुळें वैदिक संस्कृत वाङ्मयांत " भ्रातृव्य " हा शब्द शत्रुवाचक बनला. दुसरें, आम्ही हिंदुस्थानचे आर्य जर देवांना मोठ्या उदार देवता समजतों व असुरांना वाईट प्रवृत्तींच्या देवता समजतों तर परशियांतील झेंड लोकांची अगदीं याच्या विरुद्ध समजूत होती. ते देवांना 'पिशाच' समजत व असुरांना 'अहुर' म्हणजे देवदूत समजत. यावरून अगदीं स्पष्ट होतें कीं, हिंदुस्थानांतील आर्यांचे पूर्वज जे देव त्यांच्याशीं नेहमीं शत्रुत्वानें वागणारी अशी जी दुसरी एक आर्यांची शाखा त्या शाखेचे झेंड हे लोक असले पाहिजेत. देवांचा अत्यंत पूज्य ईश्वर जो इंद्र त्याला हे झेंड लोक नरकांतील सैतान समजत, तर

असुरांचा देव जो त्वष्टा त्याला वेदांमध्यें एक अशुभ देवता समजण्यांत आलें आहे. परंतु सूर्य व अग्नि हीं त्या दोघांसही साधारण पूज्य असणारीं दैवतें असून अजूनही झेंड व हिंदुलोक त्यांची पूजा ब स्तुति करितात.

या चुलत भावांच्या वंशामध्यें विरोध व भेद जर कशासंबंधानें असेल तर तो देवांच्या मादक पेयें पिण्याच्या संवयीसंबंधानें होता. "इंद्र ही एक वाईट देवता असून, तो मादक सोम पिण्यांत फार आनंद मानतो. यास्तव व तो शौर्यविक्रमांतच केवळ आनंद मानणाऱ्या पशुवृत्ति वीरांना मदत करितो, म्हणून झेंड लोक त्यांचा द्वेष करीत." असें कुंटे यांच्या "**हिंदु सुधारणा**" या पुस्तकांत लिहिलेलें आढळतें. या कल्पनेला पुष्टि देणारी अशी एक विलक्षण मनोरंजक कथा रामायणांतच आढळते. देव व असुर हे समुद्रमंथन करित असतां, सुरा अथवा मद्य बाहेर निघालें त्या वेळीं असुरांनीं ती प्राशन करण्याचें नाकारिलें; परंतु देवांनीं मात्र तिचें सेवन केलें. या प्रसंगापासून या दोन पक्षांना असुर आणि सुर—सुरा न पिणारे, व सुरा पिणारे--या नांवानें ओळखिण्यांत येऊं लागलें.* आधुनिक हिंदुधर्मात असुरांची कल्पना ही मद्याच्या बाटलीपासून वेगळी करणें अशक्य आहे; आणि जुन्या आर्य पुराणांत "वारुणी ही अनिंदिता" म्हणजे दोषरहित असून, असुर म्हणजे दारूचे निषेध करणारे होते; तेव्हां आतां मनुष्यांत व श्रद्धेंत किती विचित्र फेरबदल होतो तो पहा!!!

सुरेनंतर समुद्रांतून अमृत म्हणून जें कांहीं बाहेर पडलें, तें

---

* दितेः पुत्रा न तां राम जगृहुर्वरुणात्मजाम् ।
आदितेस्तु सुता वीर जगृहुस्तामनिंदिताम् ॥
असुरास्तेन दैतेयाः सुरास्तेनादितेः सुताः । १, ४५, ३७

अमृत म्हणजे काय याविषयीं कल्पना करणें कठीण आहे. बहुधा तें एखाद्या तत्वज्ञानविषयक मतांचें प्रत्यक्ष चिन्ह असावें; व त्यावरून देव व असुर यांच्यामध्यें केवळ चालीरीतींचाच फरक नसून धर्म-तत्वांचाही विरोध व भेद असावा असें दिसतें. आणि या व इतर कारणांनींच परस्परांशीं शत्रुत्वानें वागणाऱ्या या दोन पक्षांची शेवटीं फाटाफूट झाली.

एरियाना अथवा आपलें मूळ वसतिस्थान सोडून जे आर्य लोक हिंदुस्थानाकडे आले, त्यांचा नायक होण्यासारखे गुण बहुधा देवांचा राजा जो इंद्र त्याच्या ठायीं कल्पिले असावे. त्यानें पुष्कळ शहरें काबीज केलीं; यावरून त्याला 'पुरंदर' हें नांव पडलें आहे. दऱ्याखोऱ्यांतून डोंगरांपर्वतांतून त्यानें मार्ग खोदविले म्हणून त्यास 'गोत्रभिद्' असें म्हणतात. शूर व धामवत् अशा आर्यांच्या मूळ रहिवाशांशीं अथवा दासांशीं चाललेल्या झगड्यांत इंद्रानें त्यांस हिंमत दिली. आणि त्यानें पुढारी होऊन त्यांना त्या नवीन भूमींत विजयी केलें. यामुळें तो "देवांचा राजा" (King of Gods) झाला. त्यानें आर्यांना पूर्वेकडे आणलें म्हणून तो पूर्वेचा अधिपति होय आपल्या वसतिस्थानांतून हिंदुस्थानाच्या उत्तर दिशेपलीकडच्या ज्या जुन्या प्रांताकडे ते प्रेमानें नजर टाकीत, त्या स्वर्गाचें आधिपत्यही इंद्राकडेच होतें.

या आर्यांचा प्रसार होत होत ते जेव्हां खऱ्याखुऱ्या हिंदुस्थानांत म्हणजे पंजाबच्या मैदानांत आले, तेव्हां हिंदुस्थानच्या वायव्य दिशेच्या ज्या प्रांतांतून इंद्रानें त्यांना आणलें होतें, त्या प्रांतांतील भूमीपेक्षां ही नवीन भूमि हवेच्या आणि सुपीकपणाच्या बाबतींत त्यांना निराळी आढळली. त्यांच्या ज्या पूर्वजांना —सुंदर स्त्री-पुरुषांना—त्यांनीं देव व देवकन्यांचीं रूपें दिलीं त्यां-

विषयींची त्यांची कल्पना आतां अंधुक झाली. ते वसाहत करीत असतां त्यांना नवीन अडचणी उपस्थित झाल्या आणि त्यांना नवीन लोकांकडून विरोध होऊं लागला. या त्यांच्या नव्या वसति-स्थानांत त्यांचा नायक होण्याला योग्य असे गुण ज्याच्या ठिकाणीं होते, असा एक वैदिक देव विष्णु या ठिकाणीं पुढें होतो. हिंदुस्थानांतील आर्य सुधारणेच्या इतिहासावरील आपल्या उत्कृष्ट ग्रंथांत कुंटे यांनीं विष्णूच्या परिस्थितीविषयीं कांहींच विवेचन केलेलें नाहीं. आमच्या मतें विष्णु मुख्यत्वेंकरून निव्वळ हिंदुस्थानाचा देव असून, ज्या आर्यांनीं वायव्येकडून येऊन हिंदुस्थान शोधण्यांत व मूळ रहिवाशांना काबीज करण्यांत जलद प्रगति केली, त्या आर्यांचा तो शेवटचा नायकस्थानापन्न पुरुष असून त्यांनीं त्याला यापुढें देवत्वाप्रत चढविलें असावें. याच कारणानें त्यास देवांतील कनिष्ठ अथवा शेवटचा म्हणत असावे.

यथावेरण देवानामदितिर्विष्णुना पुरा ।

रामायण.

आर्य लोकांना आपली वसाहत हिंदुस्थानांत वाढविण्याच्या कामीं आणि आपल्या शत्रूंचा नाश करण्याच्या कामीं विष्णूची मदत इंद्राच्या खालोखाल झाली होती, हें लक्षांत घेतां त्याला उपेंद्र कां म्हणतात हेंही ध्यानांत येईल.

भ्राता भव यवीयांस्त्वं शक्रस्यासुरसूदन ।
शोकार्तानां तु देवानां साहाय्यं कर्तुमर्हसि ॥

रामायण.

शिवाय, वेदामध्यें विष्णूचें पावलें लांब टाकणारा असें वर्णन नेहमीं केलें आहे. याचा आर्यांच्या लांब लांब लष्करी स्वाऱ्याशींहि संबंध

असूं शकेल. धांबणारा ओघ, अत्यंत स्वच्छ व चांगलें पाणी व जमिनींना सुपीक करण्याची अद्भुत शक्ति इत्यादि गुणांमुळें भव्य व दिव्य गंगेचा आर्यांच्या मनावर अतिशय परिणाम झाल्यानें ज्या गंगेला आपली धार्मिक नदी भारतीय आर्यांनीं ठरविली त्या गंगेच्या काठांवर प्रथम पाऊल ठेवणारा आर्य विष्णु असावा असें दिसतें; आणि यावरूनच कदाचित् गंगा विष्णूच्या पायापासून वहाते या कल्पनेचा उगम असावा.

विष्णूचे मोठें आयुध म्हणजे त्याचें धनुष्य व बाण होत. या वेळीं आर्यलोक आपल्या प्राथमिक स्थितींतून निघून धनुर्विद्या शिकले असावे असें दिसतें. आर्यांच्या शस्त्रांत विष्णूचें धनुष्य व बाण ही मोठीच सुधारणा होय. इंद्राचीं आयुधें म्हणजे वज्र व शक्ति हीं होत. वरुणाजवळ **पाश** असून शंकराजवळ शूल होता. परंतु विष्णूजवळ मात्र धनुष्य व बाण होते; व त्यामुळेंच तो सर्व देवांत श्रेष्ठत्वाप्रत पोहोंचला. या बाबतींत तैत्तिरीय आरण्यकांतील एक उतारा मोठा अर्थसंबोधक आहे. (Vo.II Muir's Sanskrit Texts) " विष्णु कीर्तिसहित निघाला; व देव त्याच्या मागें कीर्ति मिळविण्यासाठीं गेले. विष्णूच्या डाव्या हातापासून धनुष्य उत्पन्न झालें; आणि उजव्या हातापासून बाण उत्पन्न झाले. याप्रमाणें धनुष्य आणि बाण यांचें उगमस्थान पवित्र आहे. " " ते जरी पुष्कळ होते तरी त्या एकट्याचा ते पराभव करूं शकले नाहींत. यास्तव धनुर्बाणविरहित असे पुष्कळ लोक धनुर्बाणसहित अशा एकट्याचाही पराभव करूं शकत नाहींत. " म्यूर यानें दिलेल्या आणखी कित्येक उताऱ्यांवरून हेंच सिद्ध होतें कीं, विष्णु आपल्या धनुर्बाणाच्या योगानें सर्व देवांत श्रेष्ठत्व पावला.

याप्रमाणें पाहिलें असतां विष्णु निव्वळ हिंदुस्थानचा मुख्य देव असून ऐतिहासिक दृष्ट्या, हिंदुस्थानाचे शोध लावणाऱ्या शेवटच्या आर्य वीरांचा तो एक निदर्शक होता. त्याला उपेन्द्र या नांवानें संबोधणें; त्याच्या पायापासून गंगचा उगम आहे ही कथा; त्याचें शाङ्गीं असें वर्णन; आणि आर्य देवांत त्याचें श्रेष्ठत्व प्राप्त जाणें; इत्यादि विषयक त्याजसबंधींच्या वेदकालानंतरच्या कथांचा या रीतीनेंच आपणांस उलगडा करितां येईल.

भारती आर्यांचे पूर्वज असे जे देव आणि त्यांचे भ्रातृव्यवंशज जे असुर तद्विषयक; त्याचप्रमाणें या दोन वंशांतील विरोध व फरक याविषयीं; व इंद्र व विष्णु या दोन वैदिक देवतांच्या संबंधीं ज्या गोष्टी वर लिहिल्या आहेत त्यांची, वाल्मीकिरामायणांत मुख्यतः वर्णन केलेल्या आर्यांच्या धाडसी कृत्यांच्या इतिहासाचा यापुढील म्हणजे दुसरा भाग समजण्यास मदत बरीच होईल. आर्यांचे देव व आर्यांचीं पुराणें यांची ऐतिहासिक दृष्ट्या संगति लावण्याची ही पद्धत नवी नसून ती यास्कादिकांइतकी जुनी आहे. वैदिक रहस्यांचा अर्थ लावणारे नैरुक्त व ऐतिहासिक असे दोन पक्ष पूर्वीपासून नेहमीं होते, हें लो. टिळक यांनीं आपल्या "Arctic Home in the Vedas" या पुस्तकांत दाखविलेंच आहे उदाहरणार्थ पुढील प्रकार पहा:—इंद्राचा शत्रु जो वृत्र यांचें स्पष्टीकरण नैरुक्त म्हणजे निव्वळ शब्दव्युत्पत्तीकडे पाहणारे; "ज्याच्यावर चैतन्याचा आरोप केला आहे असा ढग" असें करितात. व ऐतिहासिक 'तो असुर असून त्वष्ट्याचा मुलगा होता असें मानितात." सूर्य, वायु, प्रभात यासारख्या कांहीं वैदिक देवता या जरी केवळ चेतनारोप केलेल्या सृष्टींतील शक्तिच असल्या तरी इंद्र, विष्णु, इ. इतर देवतांचें मूळ सृष्टिविषयक व ऐतिहासिक असें दोन्ही तऱ्हेचें होतें हेंच

२९६
[१०१]
निबंध

आमच्या मतें जास्त संभाव्य होय, त्या देवता मूळ चैतन्यारोपित अशा सृष्टींतील शक्ति असल्या, तरी त्यांच्या भोवतीं, लोकांच्या आयुष्यांतील ऐतिहासिक प्रसंगावर ज्यांचा पाया उभारलेला आहे अशा जमा झालेल्या पुराणकथा असल्या पाहिजेत; आणि कांहीं पौराणिक कथांतून वृत्राला जी ढगापेक्षां कांहीं निराळा अर्थ नसला तरी इतर ठिकाणीं, ज्या आपल्या इराणी बंधूंपासून मोठ्या लढाईनंतर भारती आर्य लोक वेगळे झाले, त्या त्यांच्या इराणी बंधूंचा देव जो त्वष्टा त्याचा तो मुलगाही असूं शकेल. पुढें पुढें असेंही झालें असलें पाहिजे कीं, पुढील राम-कृष्णासारख्या आर्यांच्या वीरांचें मूळ केवळ ऐतिहासिकच मानलें पाहिजे. आणि याच पायावर आम्हीं वरून गूढ दिसणाऱ्या अशा रामकथेचें विवरण यापुढें करीत आहों.

प्रकरण ३ रें.

अयोध्येचा सूर्यवंश.

ज्या वेळीं आर्य लोक हिंदुस्थानांत म्हणजे कुरुक्षेत्र व गंगा आणि हिमालय यांमधील प्रदेशांत राहूं लागले, त्या वेळीं ज्या दूरच्या प्रदेशापासून ते आले, त्या प्रदेशाची त्यांची आठवण पूर्ण बुजाली होती. गंगा आणि सरस्वती या नद्या आतां त्यांच्या पवित्र नद्या बनून कुरुक्षेत्र त्यांचें पवित्रतम क्षेत्र बनलें होतें. शेतकीला हा नवीन देश अत्यंत चांगला असल्याकारणानें त्यांच्यापैकीं पुष्कळजण शेतकी करूं लागले; व त्या प्रदेशांतील कांहीं गरीब मूळ रहिवाशांस ते मजूर म्हणून वागवून त्यांजकडून काम करून घेऊं

झाले. अशा रीतीनें आर्य व अनार्य लोकांचा असा एक मिश्र समाज अस्तित्वांत आला; व अगदीं आजपर्यंत हिंदुसमाजांत दिसून येणारें स्वदेशाविषयींचें अनिवार्य व अपरावर्त्य प्रेम त्यांच्या ठायीं उत्पन्न झालें.

परंतु आर्यांतील जे जास्त हुशार व जास्त उत्साही होते, त्यांचीं मनें त्यांच्या पूर्वजांप्रमाणेंच धाडसाचीं व साहसाचीं कामें करण्याच्या भावनेनें उद्दीपित होत होतीं. ब्राह्मण व क्षत्रिय हे लोकच 'विश्' अथवा आर्यावर्तांत कायमचा वसति करून राहिलेल्या लोकांपासून निराळे दिसूं लागून ते देशाचे धार्मिक व आर्थिक पुढारी बनले; व हें पुढारीपण साहजिकपणेंच मानसिक व शारीरिक शक्ति ज्यांजवळ असते त्यांच्याकडे आलें. ब्राह्मण-क्षत्रियांमध्यें सुद्धां निरनिराळे धंदे व निरनिराळीं कामें यामुळें फूट पडली; परंतु तिला अजून जातीचें स्वरूप आलें नसून ती तितकी स्पष्ट व कडकही नव्हती. क्षत्रिय ब्राह्मणकन्यांशीं विवाह करीत; व राजकन्यांचेही ब्राह्मणाशीं निःशंक विवाह होत; जनकासारखे क्षत्रिय धार्मिक कर्मठपणांत व तत्वज्ञानविषयक विवेचनांत ब्राह्मणांशीं तोडीस तोड करीत; तर परशुरामासारखे ब्राह्मण धनुर्बाणांचा असा विलक्षण उपयोग करीत कीं, तसा उपयोग कोणीही क्षत्रिय करूं शकला नाहीं.

हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासांत आर्यांच्या काळीं ब्राह्मण व क्षत्रिय हे दोन अत्यंत उदात्त व अत्यंत प्रबल असे वर्ग होते. वर्णानें गोरे; बांध्यानें उंच व शरीरानें बळकट अस ते असल्यामुळें, ते स्वाभाविकच येथील मूळ रहिवाशांपेक्षां श्रेष्ठ दर्जाचे असत; परंतु आर्यांना आपल्या नैतिक श्रेष्ठत्वाविषयीं जास्त अभिमान वाटे. सर्व कांहीं उच्च व उदात्त, सत्य व पवित्र, थोडक्यांत

सांगावयाचें तर नैतिक दृष्ट्या जे जें म्हणून उदात्तगंभीर असेल, तें तें आर्य शब्दांत सांठविलेलें आहे. असें ते मानीत. आपल्याला आर्य नांवानें संबोधण्यांत त्यांना अपरिमित आनंद होत असे ख्रिस्ती धर्माचे प्रथमचे प्रवर्तक आपल्या धर्माचा नैतिक उच्चतेशीं निकट संबंध जोडीत व त्यांचें तें करणें सत्यास धरूनही होतें. त्यांना ख्रिस्ती पावित्र्य, ख्रिस्ती दयाळूपणा, ख्रिस्ती परोपकार असें बोलण्यांत फार आनंद वाटे. हल्लींच्या काळीं मात्र हीं विशेषणें पोकळ भासत त. त्याचप्रमाणें अधोगतीस आलेल्या हल्लींच्या हिंदूना आर्य हें नांव शोभत नसलें, तरी त्यांचे पूर्वज जेव्हां, आर्यांची सत्यप्रियता, आर्य पातिव्रत्य, आर्यांचें औदार्य यांविषयीं रसभरित वर्णन करितात; आणि जें जें कांहीं पापात्मक नीतिविरुद्ध आणि हलकटपणाचें असेल तें तें सर्व अनार्य असें वर्णन करितात, तें सर्वथैव खरें आणि न्याय्य होय. रामायणांत आपल्याला

स्त्रीणामार्यस्वभावानां परमं दैवतं पतिः ।
यत्त्वमार्ये प्रभाषेथाः सत्त्ववान् सत्पथे स्थितः ॥

यासारखीं वचनें ठिकठिकाणीं आढळतात रामायणामध्यें

उपप्लुतमिवादित्यमुक्तानृतमृषिं यथा ॥

असें आपण वाचलें म्हणजे भारती आर्यांच्या नैतिक श्रेष्ठतेपुढें आपण थक्क होऊन जातो; व त्यांची सत्यप्रियता खरोखरच अनुकरणीय व अलौकिक असली पाहिजे अशी आपली खात्री होते. हिंदुस्थानांतील प्राचीन आर्यांचा दुसरा एक विशेष म्हटला म्हणजे त्यांची निष्काम वृत्ति होय. ब्राह्मण व क्षत्रिय आपल्या उतार वयांत वनाचा आश्रय करीत आणि सुविनीत व संसारविमुख असें आयुष्य घालवून, अंतःकरणयुक्त व अविरत भक्तियोगानें ते आपल्याला ऋषि म्हणवून घेण्याचा प्रयत्न करीत. पुढें पुढें ही

वृत्ति इतक्या थराला जाऊन पोहोंचली कीं, क्षत्रिय राजे सिंहासनधिष्ठित असतांनाच आपल्या तपःसामर्थ्यानें व निष्कलंक आचरणानें आपल्याला राजर्षि म्हणवून घेण्याचा प्रयत्न करूं लागले.

प्राचीन ब्राह्मण व क्षत्रिय पशुमांस निःशंक भक्षण करीत. आणि यज्ञ व अन्न याकरितां पशूंची हत्त्या करण्यास त्यांस हरकत नसे. मात्र मेध्य म्हणजे स्वच्छ व अमेध्य म्हणजे अस्वच्छ, असा भेद ते करीत असत यांत संशय नाहीं; कारण

पंच पंचनखा भक्ष्या ब्रह्मक्षत्रेण राघव ।

असें वालीनें रामास म्हटलें आहे. पण यासरीज खाद्याच्या दुसऱ्या कसल्या निर्बंधाचें चिन्ह सुद्धां आपणास सांपडत नाहीं. नानाविध मांसानें सीतेनें रामाला कसें संतोषित केलें या विषयींचें अति स्पष्ट वर्णन आपल्याला हल्ली चमत्कारिक वाटतें, व निरनिराळ्या प्रकारच्या मांसावर ताव मारीत असलेल्या प्राचीन बलिष्ठ व मांसाहारी पाश्चात्य वीरांची आठवण होतें.

निषसाद गिरिप्रस्थे सीता मांसेन च्छंदयन् ।
इदं मेध्यमिदं स्वादु निष्टप्तमिदमाग्निना ॥

भारती आर्यांच्या ईश्वरार्चनेचा मुख्य प्रकार यज्ञ हा होय. आर्य लोक या यज्ञानें इतकें भारलेलें होतें कीं, जगांतील सर्व कांहीं एवढेंच नव्हे तर प्रजोत्पत्ति सुद्धां त्यांस एक प्रकारचा यज्ञ वाटे. वेदांतील **पुरुषसूक्त** हें यज्ञाच्या कल्पनेनें सृष्टीवर रचलेलें असें एक रूपक आहे. ध्यान सुद्धां एक प्रकारचा यज्ञच समजण्यांत येत असे. ब्रह्मयज्ञ हा यज्ञ असून त्यांत वेदपठणाशिवाय दुसरें

कांहीं करावयाचें नसें. थोडक्यांत सांगावयाचें तर यज्ञ हा त्या-वेळीं फार प्रचलित होता; आणि म्हणूनच ब्राह्मणांच्या पर्ण-कुटिकांच्या वर्णनांत, यज्ञांतील धूर कसा वर येत आहे; त्यांच्या विनीत वसतिस्थानांतून निरनिराळ्या देवतांकरितां यज्ञवेदि कोणत्या क्रमानें तयार केल्या आहेत, इत्यादि विषयक बारीक सारीक सुद्धां गोष्टींचे विस्तृत वर्णन रामायणांत आढळतें. ज्या यज्ञावर शूर क्षत्रियांचें अतिशय प्रेम असें तो यज्ञ अश्वमेध होय (क्षत्रिय वीरांचे सैन्य ज्याचें रक्षण करीत आहेत असा एक घोडा या यज्ञांत मोकळा सोडीत; त्याला वाटेल तिकडे फिरण्याची मुभा असे. तो जेथें जेथें जाई तेथें तेथें त्याचें रक्षण करणारे क्षत्रिय वीर आपल्या राजाचें चक्रवर्तित्व मान्य करावयास लावीत. जर तेथील लोकांनीं तें मान्य करण्याचें नाकारिलें तर ते युद्धास सज्ज होत आणि आपल्या धनुर्बाणाच्या जोरावर आपल्या नृपाचें चक्रवर्तित ते प्रस्थापित करीत.) वास्तविक पाहिलें तर अश्वमेध हा आर्यांच्या अमर्यादित साम्राज्याचा एक प्रकारचा डंका अथवा जाहीरनामाच होय. हिंदुस्थानांतील अज्ञात अशा प्रदेशांना जिंकून त्यांना आपल्या आधिपत्याखालीं आणण्याच्या भारती आर्यांच्या महत्वाकांक्षेत या अश्वमेधाचें मूळ असलें पाहिजे हें निःसंशय होय. परंतु या यज्ञाचें जें मूळचें काम तें एकदां झाल्यावर मात्र त्याचे वाईट परिणाम हाऊं लागले. कारण चक्रवर्तित्वाचें चिन्ह जो अश्वमेध तो करण्यांत आनंद मानून क्षत्रिय आपापसांत लढूं लागले. परंतु प्राचीन आर्यांच्या कालीं क्षत्रिय-ब्राम्हणांच्या या महत्वाकांक्षेची पूर्तता होण्यास पुष्कळ वाव होता; आणि या सार्वत्रिक साम्राज्य स्थापण्याच्या कल्पनेच्या पाठीमागें लागून, त्यानीं स्वस्थ मुळींच न बसतां, दूर देशीं जाऊन

जे पराक्रम केलें त्याचाच इतिहास आपल्याला आपल्या राष्ट्रीय काव्यांतून सांपडतो.

भारती पौराणिक इतिहासाच्या दुसऱ्या भागांतील आर्य वरप्रमाणें होते. आणि कडक नीति व साहसी वृति यांकरितां प्रसिद्ध असलेल्या या आर्यांत अयोध्येचा सूर्यवंश प्रमुख होता. हें राज्य मनु राजनें स्थापलें असून हाच मनु अलीकडील दंतकथांप्रमाणें, मानवजातिचा पिता व आर्य लोकांचा कायदे करणारा होय. मनूपासून दशरथापर्यंतची या वंशाची वंशावळी पुराणांतून निरनिराळी आढळते. परंतु या वंशांत केवळ आपल्या उदात्त कृत्यांनींच नव्हे तर दिलदार व धाडसी प्रवृतीमुळें प्रसिद्धीस आलेले असें पुष्कळ राजे झाले यांत मुळीच संशय नाहीं. १६ व्या शतकांतील स्पॅनिश लोकांप्रमाणें ते अद्भुत साहसाविषयीं साहजिक प्रेमानें प्रेरित झालेले होते. ते धाडसानें हिंदुस्थानच्या तत्कालपावेतो अज्ञात असलेल्या प्रदेशांत शिरले; व या ठिकाणीं स्पॅनिश लोकाप्रमाणेंच ते ईश्वरी कृपेच्या छत्राखालीं हे ते असें दिसतें अमेरिकेंतल्याप्रमाणेंच हिंदुस्थानामध्येंही वसाहतीचें काम दुसऱ्या म्हणजे हस्तिनापुरच्या चंद्रवंशासाठीं राखून ठेवलेलें होतेंसें दिसतें.

ज्या वेळीं प्राचीन भारती आर्य प्रथम या अफाट, अज्ञात, बहुशः अथवा पूर्णपणें दाट जंगलांनीं भरलेल्या आणि चमत्कारिक लोकांनीं तुरळक वसलेल्या हिंदुस्थानांत आले त्या वेळीं त्यांच्या मनांत काय भावना उत्पन्न झाल्या असतील त्याचें चित्र रेखाटणें अथवा त्याची कल्पना करणें हे ज्या आम्हांला हिंदुस्थानांतील प्रत्येक ठिकाण माहीत आहे, त्या आम्हांला फार कठीण आहे. त्यांचीं कृत्यें अथवा त्यांच्या भावना ही समजून घेण्याच्या या असामर्थ्यामुळें या धाडशी व शूर वीरांच्या पराक्रमाचें ऐति-

हासिक संशोधन करणारापुढें गूढ प्रश्नांचा गोंधळ माजून राहतो. परंतु आमच्या सुदैवानें पाश्चिमात्य आर्यांचा अगदीं सारख्या परिस्थितींत, अमेरिकेमध्यें ज्या वेळीं अज्ञात प्रदेश व लोक यांच्याशीं संबंध आला त्यावेळचे त्यांचे पराक्रम व भावना इतिहासांत लिहिलेल्या आहेत व त्यांच्या साहाय्यानें हिंदुस्थानांतील प्राचीन आर्य लोकांच्या भावना व पराक्रम यांचे बुद्धिग्राह्य असें स्वरूपविष्करण करतां येईल.

या धाडसी सूर्यवंशांतील एक प्रसिद्ध राजा सगर होया त्याच्या ६०००० पुत्रांनीं आपल्या पित्याचा हरवलेला यज्ञाश्व शोधीत असतां समुद्र खणला असें वर्णन आढळतें. ही कथा म्हणजे बहुधा सगरपुत्रांच्या नायकत्वाखालीं आर्यांच्या एखाद्या स्वारीनें पूर्व सागर शोधून काढ ग या गोष्टींचें पौराणिक रूपांतर असावें. आणि देश व समुद्र यांना त्यांच्या संशोधकांचीं नांवें देण्याच्या पद्धतीस अनुसरून ज्या या समुद्राची आर्यांना कल्पना मुळींच नसण्याचा संभव आहे. त्या या समुद्राला त्यांनीं सगराच्या पुत्रांचें नांव (सागर) दिलें असावें. या स्वारीचा मार्ग यज्ञाश्वाच्या भटकण्यानें निश्चित व्हावयाचा असल्यामुळें, ती स्वारी गंगेच्या कांठानें गेली नसावीसें दिसतें; आणि याच कारणास्तव त्या स्वारीस फार अडथळे येऊन तींतील पुष्कळ लोक नाश पावले. अयोध्यच्या पुढील राजांनीं सगरपुत्रांच्या मृत्यूचा सूड घेण्याचा कसा प्रयत्न केला याचें वर्णन याच कथेंत पुढें सांपडतें. या सगरपुत्रांना एखाद्या प्रदेशांतील मूळ राहवाश्यांनीं कैद करून ठार केलें असावें; व यज्ञाश्व परत आला नाहीं, हा परिणाम त्याचा असावा. अनेक राजांनीं पूर्वेस दूरपर्यंत स्वाऱ्या केल्या; परंतु त्या सर्व निरर्थक होऊन त्यांना समुद्र गांठतां आला नाहीं. हें यश सगराचा नातु भगीरथ याजकरितां नियतीनें राखून

ठेवलें होतें; आणि त्यामुळेंच भगीरथाचें नांव भारतीय भाषेंत निश्चित ध्येयासाठीं अविरत प्रयत्नांचें निदर्शक होऊन बसलें आहे. भगीरथानें स्वर्गातून गंगा इहलोकीं आणिली, व त्यानें तिला समुद्राच्या काठाशीं नेलें; याच ठिकाणीं सगराच्या ६०००० पुत्रांची राख असून ती गंगाजलानें शुद्ध करावयाची होती; व गंगा तेथें नेल्यानें भगीरथानें आपल्या वंशाचें उद्दिष्ट कार्य (Mission) साधलें; अशी कथा रामायणांतील **गंगाख्यानात** दिली आहे.

स सेनां महतीं कर्षन् पूर्वसागरगामिनीम् ।
बभौ हरजटाभ्रष्टां गंगामिव भगीरथः ॥

या श्लोकांतील भव्य उपमा कालिदासाला या कथेंतूनच मिळाली आहे. या कथेंत फक्त एकच फरक करून तिला सरळ व स्वाभाविक स्वरूप देतां येईल. भगीरथ अश्वरथांत बसून पुढें चालला असतां गंगा स्वेच्छेनें त्याच्या मागोमाग कशी आली; व ज्या ठिकाणीं आपल्या पूर्वजांची राख होती तेथपर्यंत त्यानें तिला कसें नेलें यांचें वर्णन रामायणांत सांपडतें. केवळ हेंच चित्र उलट केल्यास, व महंमदाच्या " जर पर्वत माझ्याकडे न येईल तर मीच पर्वताकडे जाईन. " या वाक्याच्या अनुरोधानें वरील कथेचा अर्थ लाविल्यास भगीरथानें गंगाजलौघाच्या मार्गानें समुद्र कसा गांठला याचा आपल्याला सरळ वृत्तांत मिळेल. मूळ रहिवाशांमध्यें निरनिराळ्या बातम्या ज्या गूढमार्गानें पसरत असल्याचें आपण ' मेक्सिको पादाक्रांत केल्याच्या इतिहासांत ' वाचतों त्याच गूढमार्गानें अयोध्येस भगीरथाला आपल्या पूर्वजांच्या मृत्यूची वार्ता कळली असेल; आणि म्हणूनच त्या श्रेष्ठ सरितेच्या ओघानें गेलें असतां आपण समुद्राप्रत खास पोचूं असा विचार करून भगीरथ त्या मार्गानें गेला असेल. हल्लींच्या दिवसांत सुद्धां कानपूर-

पासून कलकत्त्यापर्यंत गंगेच्या ओघानें पायीं जाऊं म्हटल्यास तें मोठेंच जिकिरीचें काम आहे. आणि ज्या वेळीं तो प्रदेश पूर्णपणें अज्ञात होता; ज्या वेळीं गंगेच्या अफाट जलौघाच्या दोन्ही ही बाजूंस मनुष्यानीं कधीं न कापलेलीं अशीं भव्य अरण्यें होतीं; ज्या वेळीं मनुष्याचीं मुळींच भीति न बाळगतां हजारों वाघ, सिंह, हत्ती त्या अरण्यांतून अनिरुद्ध संचार करीत असत; थोडक्यांत सांगावयाचें तर बंगालमधील सुंदरबनमध्यें हल्लीं जी स्थिति आहे तिजपेक्षांही जास्त भयंकर स्थिति ज्या वेळीं कानपूरपासून कलकत्त्यापर्यंतच्या सर्व प्रदेशभर होती, त्या वेळीं भगीरथानें जी कार्यसिद्ध केली ती किती अद्भुत, किती कठीण व केवढ्या पराक्रमाची आहे बरें ? तेव्हां वस्तुतः गंगेच्या जलौघाच्या मार्गानें जाण्याच्या या गोष्टीचें पुढें पुढें लोकमत नें भगीरथानें मोठ्या समारंभानें गंगा नदीला समुद्राप्रत नेलें या विलक्षण गोष्टींत रूपांतर केलें असल्याम विशेष आश्चर्य वाटावयास नको.

भगीरथानें गंगेला स्वर्गातून खालीं आणण्याकरितां तप कसें केलें; मी स्वर्गातून खालीं उडी घेत असतां माझा जोर कोणालाही सहन होणार नाहीं हा जो गंगेला गर्व झाला होता तो उतरविण्यासाठीं शंकरांनीं तिला आपल्या जटेंत गडप कशी केली; नंतर त्याला प्रसन्न करून त्याच्या जटेंतून तो पवित्र प्रवाह भगीरथानें कसा सुरू केला इत्यादि गोष्टींचें वर्णन त्याच गंगाख्यानांत आहे. हिमालयाच्या स्वर्गाप्रमाणें उंच अशा उंचीवरून ज्या गंगेचा पवित्र प्रवाह खालीं येतो, त्या गंगेच्या प्रवाहाच्या भगीरथानें केलेल्या शोधाचें वर्णन या पौराणिक कथेंत बहुधा असावें. हिमालयामध्यें हल्लींसुद्धां दिसून येणाऱ्या, व त्या वेळीं शिवस्वरूपी देवतेमध्यें संकलित केल्या गेलेल्या अशा कांहीं सृष्टींतील जगड्व्याळ व

बिघडलेल्या शक्तीच्या योगानें भगीरथाच्या काळांत गंगेच्या ओघांत एखादा पर्वताचा कडा आडवा येऊन त्यामुळें तेथें पाणी जमा झालें असण्याचा पुष्कळ संभव आहे. आपल्या हल्लींच्या काळांत याच रीतीनें गोहना सरोवर आपोआप बनून नंतर फुटलेलें आपण ऐकिलें आहे. त्यावरून वरीलप्रकारच्या सृष्टिचमत्काराची कल्पना करितां येईल. भगीरथाच्या काळीं असला भव्य सृष्टिचमत्कार झाल्यावर हिमालयाचा अधिपति देव जो शिव त्यानें गंगेचा गर्व हरण करण्याकरितां तिला आपल्या जटेंत धारण केली; व भगीरथानें प्रसन्न केल्यावर तिला सोडून दिलें अशी कल्पना प्रसृत झाली असल्यास तें स्वाभाविक आहे.

अयोध्येच्या पहिल्या पहिल्या राजांचा काळ गंगानदीच्या आसपासच्या (उगमापासून मुखापर्यंतच्या) प्रदेशाच्या शोधांतच गेला असावा. त्यानंतरचे व रामाचे अगदीं जवळचे पूर्वज यांनीं दक्षिणेकडे शोध करण्याचें काम अंगिकारिलेलें दिसतें. रघूचें नांव तर इतकें प्रसिद्ध झालें कीं, तें त्या वंशाचें नांवच होऊन बसलें. चारी दिशांना दिग्विजय करून त्यानें पुष्कळ यज्ञ केले, एवढ्या वर्णनाशिवाय त्याच्या इतर विशिष्ट पराक्रमाचें वर्णन रामायणांत सांपडत नाहीं. रामाचा पिता दशरथही दक्षिणेस दूरवर गेला असावा असें दिसतें. त्यानें कैकयीला दोन वर दिल्यासंबंधींच्या गोष्टींचें स्थल त्या दिशेकडे होतें असें दिसतें. आणि ज्यांच्या स्वरूप, आचरण, आणि कृत्यें यांसंबंधीं अतिशयोक्तिपूर्ण वर्णनामुळें नानाविध चुकीचे सिद्धांत जगापुढें मांडले गेले आहेत त्या चमत्कारिक (राक्षस वैगेरे) लोकांशीं याच ठिकाणीं आपला प्रत्यक्ष संबध येतो.

प्रकरण ४ थें.

"हिंदुस्थानांतील नानाविध जातींचे मूळचे रहिवासी व त्यांची अतिमानुष कोटींत गणना"

भारतीय आर्य दक्षिणेकडे प्रसार करीत असतांना, पूर्वी (उत्तरेकडे) त्यांचा ज्या लोकांशी संबंध आला होता त्याच्यापेक्षां जास्त बलाढ्य, जास्त भयंकर व जास्त सुधारलेले अशा लोकांशीं त्यांचा संबंध आला. वेदांमध्यें यातु अथवा यातुधान आणि रक्षः अथवा ज्यांना पुढें राक्षस ही संज्ञा मिळाली ते, यांसंबंधीं थोडे उल्लेख आहेत; परंतु इंद्राचे अ णि आर्यांचे शत्रू या नात्यानें दस्यु अथवा दास या लोकांचा उल्लेख फार जास्त ठिकाणीं आढळतो. हे पंजाब व त्याच्या आसपासच्या प्रदेशांतील मूळ रहिवासी दक्षिणेंतील रहिवाशांपेक्षां फार निराळ्या तऱ्हेचे होते. उच्च गुणापेक्षां त्यांच्या अप्रतिहत व शिक्षातीत अशा चोरी करण्याच्या संवयीमुळेंच ते जास्त प्रसिद्ध होते. आणि त्यांचे वंशज ज्या उत्तर–हिंदुस्थानांतील सांसी लोकांसारख्या टोळ्या त्यांच्या स्वभावामध्यें अजून सुद्धां त्यांच्या पूर्वजांचा हा विशेष गुण आढळून येतो; व प्रत्यक्ष अनुभवासही येतो. परंतु दक्षिणेंतील निरनिराळ्या जातींचे मूळचे लोक सुधारणेच्या बाबतींत बरेच पुढें असून, स्वारी करणाऱ्या आर्यांशीं त्यांच्यांतील कांहीं जाती सख्य करीत; आणि कांहीं त्यांच्या प्रसाराला दुर्दम व बळकट अडथळा करीत.

आमच्या मतें हिंदुस्थानांतील मूळ रहिवाशांच्या जातींचीं नांवें अमरकोशांतील

विद्याधराप्सरोयक्षरक्षोगंधर्वकिन्नराः ।
पिशाचो गुह्यकः सिद्धो भूतोऽमी देवयोनयः

या श्लोकांत मिळतें. टीकाकार देवयोनयः या शब्दाचें देवांशकाः " देवांच्या अंशापासून उत्पन्न झालेले " असें स्पष्टीकरण करतो. देव हे वास्तविकरीत्या आर्यांचे पूर्वज असून त्यांना उच्च पदावर चढवीत चढवीत समर्थ ईश्वराच्या स्वरूपांच्या पदवीला चढविण्यांत आलें आहे हें आपण मागें पाहिलेंच. त्याप्रमाणेंच या सर्व जाती हिंदुस्थानांतील मूळच्या रहिवासी असून त्यांनीं जसजसें आर्यांशीं सख्य केलें अथवा त्यांना विरोध केला, तसतसें त्यांना चांगल्या अथवा वाईट अमानुष सत्वांच्या पदवीप्रत चढविण्यांत आलें. देवांच्या अंशापासून अथवा शरीरापासून या जाती कशा उत्पन्न झाल्या याविषयीं आपल्याला एकही दंतकथा सांपडत नसल्याकारणानें " देवयोनयः " या शब्दाचा अर्थ कांहीं तरी निराळा केला पाहिजे. अमरकोशांतील वरील शब्द व्याकरणशुद्ध नाहीं अशी त्याच्यावर टीका करून अमरकोशावरील टीकाकार मुकुट यानें त्याचें जें स्पष्टीकरण दिलें आहे, तें जास्त सरळ व पुराणपरंपरेला जास्त अनुसरून आहे. " देवाना योनिरिव योनिरुत्पत्तिकारणमाविभाव्यामिति यावत् येषाम् " " ज्यांचें मूळ देवांच्याप्रमाणेंच अज्ञात होतें " असें ' देवयोनयः ' याचें स्पष्टीकरण तो करतो. भारतीय आर्यलोकांचा ज्या वेळीं या लोकांशीं संबंध आला त्या वेळीं हे लोक मूळ, भाषा, धर्म इत्यादि बाबतींत आपल्याहून भिन्न आहेत, असें जरी त्यांना दिसून आलें तरी त्यांचें मूळ काय, ते तेथें कोठून आले इत्यादिविषयीं त्यांस कांहीच माहिती मिळाली नसण्याचा संभव आहे.

या लोकांपैकीं प्रत्येक जात आपआपल्या कांहीं विशिष्ट गुणानें

दुसरीपासून निराळी दिसे; व हे विशिष्ट गुण त्यांच्या वंशजांत अजूनही दिसून येतात. अर्वाचीन गारोड्यांप्रमाणें विद्याधर (जादूगार) ही गारोड्यांची जात असावी. हिमालयाच्या दक्षिण उतारावर अजूनही आढळणाऱ्या डोंगरी जातींचे लोक अप्सरा व गंधर्व यांचे पूर्वज होत यांत तर मुळींच संशय नाहीं; सौंदर्य व गोड आवाज हे त्या जातींचे विशेष गुण असून शिवाय पतिपत्नीसंबंधविषयक शिथिल नीति हा जो त्यांच्या पूर्वजांचा विशिष्ट गुण तो त्यांच्यांत अजूनही दिसून येतो. किन्नर ही घोड्यासारखीं तोंडें असणारी गंधर्वांची सोयरेसंबंधीं जात असून विवाहित पतिपत्नींचें महत्तम प्रेम हा त्यांचा विशिष्ट गुण होय. हें त्यांचें प्रेम इतकें जाज्वल्य असे कीं, किन्नरीचें प्रेम हें संस्कृत कवि नेहमीं उपमेकरितां योजतात. गुह्यक ही हल्लीं नष्ट झालेली अशी, सोनें खणणारांची जात असावी; त्यांचा द्रव्याचे अधिपति म्हणून अलीकडच्या वाङ्मयांत उल्लेख सांपडतो. या सर्व जाति व सिद्ध यांना हल्लीं चांगले ईश्वरांश मानण्यांत येत असून, त्यांचें वसतिस्थान हिमालयांत आहे, असें मानण्यांत येतें. बहुधा या सर्व हिमालयांतील डोंगरी टोळ्या असून आर्यांच्या प्रसाराच्या वेळीं त्यांस त्यांनीं विरोध केला नसावा अथवा त्यांचा यांचा युद्धप्रसंगही आला नसावा.

इतर जाति दक्षिणेंत राहणाऱ्या असून त्या स्वभावानें भयंकर व आचरणानें हीन होत्या. "भूत" हे दुसरे तिसरे कोणी नसून ती एक रात्रीं इकडे तिकडे फिरणारी व दिवसा दडून बसणारी रानटी जात होती. अर्थात् त्यांना लोकसमजांत पिशाच, सैतान यांचें स्वरूप देण्यांत आलें आहे. हिंदुस्थानांत जरी आज असल्या पुरातन जाती नसल्या तरी त्या इतर देशांत अजून आढळत त. मेलेल्या माणसाचें मांस खाणारी " **अघोरी** " नांवाची जी अर्वाचीन जात

आहे, तिचे पिशाच हे पूर्वज असले पाहिजेत. आस्ट्रेलिया व अमेरिका यांमध्यें राहणाऱ्या कांहीं जातींतून मेलेल्या माणसाचें मांस खाण्याची हिडिस पद्धत हल्लींही विशेष रीतीनें दिसून येते; व प्राचीन काळीं हिंदुस्थानांतही अशा कांहीं जाति असल्यास कांहीं आश्चर्य नाहीं. अलीकडील पुराणांत पिशाच म्हणजे मृत माणसांचे आत्मे असून ते स्मशानाच्या आसमंतात वावरतात * आणि प्रेतावर उदरनिर्वाद करितात असें मानतात. मेलेल्या माणसांचें नव्हे तर जिवंत माणसांचें मांस खाणारे राक्षस त्यांच्यापेक्षाही जास्त भयंकर होते. हल्लीं ते केवळ कल्पनेचे खेळ आहेत असें आपणास वाटतें; परंतु मेक्सिकोंतील भयंकर असूनही सुधारलेल्या 'आझटेक' (Aztec) लोकांविषयींची माहिती झाल्यावर या राक्षसांचें अस्तित्व आपणांस कबूल करतां येतें. त्यांचा रामाच्या इतिहासांत विशेष संबंध आला असल्याकारणानें त्यांजविषयीं व त्यांचेच संबंधी जे यक्ष त्याजविषयीं आपण पुढील भागांत स्वतंत्र विचार करूं.

वर दिलेल्या श्लोकांत ज्यांचा निर्देश नाहीं अशा आणखीहि जाती प्राचीन हिंदुस्थानच्या रहिवासी असून त्यांचीं नांवें पशू-

---

* या ठिकाणीं कथा-सरित्सागरांतील एका गोष्टींची आठवण होते. तींत लिहिलें आहे कीं, एक ब्राह्मण मुलगा थंडीनें अत्यंत कुडकुडल्यामुळें शेकण्यासाठीं एका चितेजवळ गेला; तेव्हां त्या जळणाऱ्या प्रेताच्या शरीरांतून चरबीचा एक चिळकांडी त्याच्या मुखांत शिरली आणि लगेच तो पिशाच बनला. केवळ यदृच्छेनें मानवी चरबीचा अंश त्याच्या तोंडांत गेल्यामुळें, भयंकर नुकसान करण्याइतकी अतिमानुष शक्ति त्याच्या आंगीं एकदम येण्याचा चमत्कार घडावा यावर विश्वास बसणें अशक्य होय.

वरून पडलेलीं होतीं. त्यांच्या जातींना ज्या प्राण्याचें नांव दिलें होतें त्याचप्रमाणें त्यांचीं शरीरें व स्वभाव होते, असें मत पुढें पुढें लोकांमध्यें प्रसृत झालें. नाग, वानर, आणि अस्वल इत्यादि जाति माणसेंच असून त्यांचीं तीं केवळ नांवें होतीं हें ओळखणें फार सोपें आहे. त्यांना हीं नांवें त्यांच्या चेहऱ्यांतील कल्पित सादृश्यावरून पडलीं असावींत; अथवा त्या त्या प्राण्यांची ते भक्ति करीत म्हणून पडलीं असावीं. या जातींना सुद्धां हलके हलके अतिमानुषत्वाचा मक्ता देण्यांत आला व हल्लींच्या रामायणाच्या रचनेच्या काळीं अतिमानुष शक्ति ज्यांच्यामध्यें आहे अशा यक्षादि इतर जातींत त्यांची गणना होऊं लागली. जेव्हां जेव्हां एखादा महान् वृत्तान्त घडतो, तेव्हां तेव्हां या अतिमानुष जाती आकाशामध्यें तो भव्य देखावा पाहण्यासाठीं जमतात व आपल्या अधृष्य ठिकाणाहून त्या फुलें उधळतात अशी कल्पना वारंवार आढळते. रामानें परशुरामाचा पराभव केला त्या वेळच्या वर्णनांत रामायणांत म्हटलें आहे,

गंधर्वाप्सरसश्चैव सिद्धचारणकिन्नराः
यक्षराक्षसनागाश्च तद्द्रष्टुं महदद्भुतम् ॥

रामाचे भविष्यत्कालीन शत्रू जे राक्षस त्यांनीं आपलेपणा अगदीं विसरून इतर अमानुषशक्ति जनांबरोबर आकाशांत जमावें यावरून रामायणाच्या पुनर्रचनाकाराच्या काळीं सर्व परिस्थिति बदलली असून राक्षसांच्या विषयींसुद्धां ते पूर्वी होते त्यापेक्षां अत्यंत विसंगत कल्पना प्रसृत झालेल्या होत्या हें अगदीं स्पष्ट दिसतें. ज्याअर्थीं राक्षसांचा मूळ व खरा स्वभाव त्यांच्या अंगीं मागाहून चिकटविण्यांत आलेल्या अतिमानुषत्वाच्या शक्तीखालीं अगदीं पूर्ण दडपून

गेलेला हल्लींच्या रामायणांत दिसतो, त्याअर्थी खरी गोष्ट घडली तो काळ व रामायणाची पुनर्रचना झाली तो काळ यांमध्यें फारच अंतर असलें पाहिजे.

पुढील भागांत राक्षसांवरील अतिमानुषत्वाचा हा पडदा दूर करून आम्हीं त्यांचें खरें स्वरूप आविष्कृत करणार आहों; व त्याच वेळीं या असल्या अतिशयोक्तिपूर्ण कल्पना त्यांच्या भोंवतीं कशा जमल्या असाव्या याविषयींही चर्चा करूं.

प्रकरण ५ वें.

राक्षस; त्यांचें उत्पत्तिस्थान व वसतिस्थान.

अलीकडील पुराणांत राक्षस व असुर यांजमध्यें अगदीं गोंधळ झालेला दिसतो; व या कल्पनांच्या गोंधळाचा प्रथमतःच निकाल लावणें अवश्य आहे. असुर हे आर्यांचें बंधु असून ते बहुतकरून इराणांतील झेंड लोकांचे पूर्वज होते; अर्थात् राक्षस हे हिंदुस्थानचे मूळ रहिवासी असल्यामुळें त्यांच्यापासून अगदीं भिन्न होत. भारतीय पुराणांवरूनच असें दिसतें कीं, असुर हे अदितीची सवत जी दिति हिचे पुत्र होते व देव ज्या प्रदेशांत राहत त्याच प्रदेशांत ते राहात असत. देव करीत तेच यज्ञ असुर करीत व देव ज्या शक्तींनां भजत त्यांनाच तेही भजत. ययाति असुरांच्या राज्यांत वाट चुकून गेला असतां, असुरांचा राजा जो वृषपर्वा त्याच्या कन्येशी त्यानें विवाह केला, या कथेवरून हिंदुस्थानांतील आर्य व असुर हे किती निकट राहत असत, व त्यांचा परस्परांतील संबंधही किती निकट होता हें दिसून येतें. सारांश, असुर हे आर्यांचे बांधव होते, ह्या हल्लीं सर्वमान्य

झालेल्या सिद्धांताला वेदांवरून व पुराणांवरून पुष्टिच मिळते. अमरकोशांत सुद्धां असुरांची नांवें सुरांचीं अथवा देवांचीं नांवें संपल्याबरोबर दिलीं आहेत.

याच्या उलट राक्षस हे अगदीं भिन्न लोक असून त्यांचीं नांवें अमरकोशांत यमाच्या नांवानंतर दिलेलीं आहेत. त्यांची उत्पत्ति रामायणांत पुढीलप्रमाणें वर्णन केली आहे "ब्रह्मयानें जल उत्पन्न केल्यावर त्याच्या रक्षणार्थ कांहीं प्राणी उापन्न केले. त्यांपैकीं जे कांहीं भुकेलेले होते ते 'आम्ही रक्षण करूं असें म्हणाले' आणि जे भुकेलेले नव्हते ते 'आम्हीं यज्ञ करूं' असें म्हणाले. पहिल्या लोकांना ब्रह्मयानें राक्षस हें नांव दिलें, व दुसऱ्यांना यक्ष हें नांव दिलें."

रक्षाम इति तत्रान्यैर्यक्षाम इति चापरैः ।
भुंक्षिताभुंक्षितैरुक्तस्ततस्तानाह भूतकृत् ॥१॥
रक्षाम इति यैरुक्तं राक्षसास्ते भवंतु वः।
यक्षाम इति यैरुक्तं यक्षा एव भवन्तु वः ॥२॥

उच्चारांतील कल्पित सादृश्यावरून संस्कृत कवि व पुराणकार नांवांचा कसा चमत्कारिक अर्थ लावतात याचें अनेकांपैकीं हें एक उदाहरण आहे. कांहींही असलें तरी आपल्याला वरील कथेवरून दोन अनुमानें काढतां येतील. एक राक्षस हे मनुष्य जातीचे असून ते समुद्रतीरावर राहून जलाचें संरक्षण करीत; व त्यांचे संबंधी जे यक्ष यांच्यापेक्षां राक्षसांचा स्वभाव निराळा असून, त्यांतील विशिष्ट धर्म म्हणजे खादाडपणा हा होय; अथवा दुसऱ्या शब्दांत बोलावयाचें तर, ते क्रूर व नरमांसभक्षक होते. यक्ष व राक्षस हे परस्परांचे संबंधी होते हें, ते दोघेही आपल्याला पुण्यजन म्हणवून घेत यावरून दिसून येईल. रावणाशीं यक्षराज कुबेर याचें नातें होतें असें म्हटलें आहे,

त्यावरूनही हीच गोष्ट सिद्ध होते; आणि लंका ही पूर्वी कुबेराची असून त्यानें ती आपला बंधु जो रावण याच्याकरितां सोडून दिली, या कथेचा अर्थही आपल्याला याच गोष्टीच्या अनुरोधानें लावतां येईल. या दोन्हींही जाति पूर्वी दक्षिणेकडे राहात असाव्या; परंतु यक्षांना तेथून त्यांचे क्रर बंधू जे राक्षस यांनीं वर उत्तरेकडे हाकललें असावें.

राक्षसांसंबंधीं बोलावयाचें तर वर दिलेल्या रामायणांतील गोष्टीवरून ती एक हिंदुस्थानच्या दक्षिण समुद्रकिनाऱ्यावर राहणारी नरमांसभक्षक जात असावी हें स्पष्ट होतें. या नरमांसभक्षक जातीचे अवशेष अजूनही, अंदमान, बोर्निओ, सुंडा आणि हिंदी महासागरांतील इतर बेटें यांवर दिसून येतात. आर्यांनीं ज्या वेळीं दक्षिणेवर स्वारी केली त्या वेळीं सालकटंकट नांवाची राक्षसांची एक जात लंकेंत होती असा रामायणांत उल्लेख सांपडतो. ज्या वंशावळींत रावण पित्याच्या बाजूनें आर्य कश्यपाचा संबंधी होता असें दाखविण्यांत आलें आहे, ती वंशावळ अलीकडील काळांतील वेडसरपणाची कल्पना असावी. हल्लींच्या रामायणांप्रमाणें सुद्धां रावण हा मातेच्या बाजूनें राक्षसांच्या सालकटंकट जातीचा संबंधी होता; आणि या नांवांत अतिप्राचीनत्वाचा झांक स्पष्ट आहे असें मनाला वाटतें. या नांवावरून मेक्सिकोच्या इतिहासांतील लास्काला (Lascala) येथील राजांपैकीं एकानें आपल्याला जें झिकोटेनकाटल (Xicotencatl) हें नांव लावून घेतलें होतें त्याची आठवण होते. तात्पर्य, अगस्त्य ऋषीच्या कालीं सिंहलद्वीपांत या नांवाची एक नरमांसभक्षक जात राहात असे असें धरून चालण्यास आपणास हरकत नाहीं.

राक्षस प्रथम या बेटांत राहत असत व नंतर त्यांनीं आपल्या

वसाहती हिंदुस्थानांत वाढविल्या व पराक्रम गाजविले किंवा ते प्रथमच हिंदुस्थानांत गइत होते हें स्पष्ट कळत नाहीं. परंतु मेक्सिकोंतील रहिवांशाप्रमाणेंच आपल्या लहानशा राज्याबाहेर अवाढव्य अशा प्रदेशावर त्यांचा ताबा होता यांत मुळींच संशय नाहीं. गोदावरीजवळील **जनस्थाना**पर्यंत इतक्या दूर प्रदेशांत निरनिराळ्या ठिकाणीं त्यांच्या अधिकाऱ्यांच्या हाताखालीं त्यांचीं ठाणीं असत; किंबहुना उत्तरेंतहि लांबवर खुद्द यमुनेच्या दक्षिण तीरापर्यंत राक्षस सांपडत असत.

अरण्यकाण्डांत आपल्या तक्रारी रामाजवळ सांगताना ऋषि म्हणतातः—"राक्षस पंपेच्या आसपास राहणाऱ्या एव्हढेंच नव्हे, तर मंदाकिनीच्या तीरावर व चित्रकूट पर्वतावर राहणाऱ्या मानवांनासुद्धां मारतात." विश्वामित्राचा यज्ञ गंगेच्या दक्षिण तीरावर चाललेला असून याच यज्ञाकरितां राक्षसांपासून होणाऱ्या विघ्नहरणासाठीं त्याला रामाची मदत घ्यावी लागली होती. यावरून असें दिसतें कीं, हिंदुस्थानांत राक्षसांची फार दूरवर म्हणजे यमुना व गंगायमुना यांच्या दक्षिण तीरापर्यंत वसति असावी.

या परिस्थितीवरून राक्षसांना दिलेलें नांव नैर्ऋत व दक्षिण आणि पश्चिम यांमधील दिशेस दिलेलें नांव नैर्ऋत्या या नांवांचा अर्थ लावतां येईल. निर्ऋति याचा अर्थ नरक असा आहे, आणि राक्षसांना नरकपुत्र* असें नांव दिलें गेलें असल्यास तें योग्यच होय.

---

* वेदांत सुद्धां यातुधान अथवा राक्षस यांचें नरमांसभक्षक व यज्ञामध्यें विघ्न आणणारे असेंच वर्णन सांपडतें; त्यांच्यापासून संरक्षण व्हावें म्हणून वेदांत इंद्र व अग्नि यांची प्रार्थना केलेली आढळते व यावरून इंद्र व अग्नि यांच्या साहाय्यानें आर्यांच्या स्वाऱ्या गंगेच्याही दक्षिणेकडे होत असाव्या असें दिसतें.

गंगेच्या उत्तरेस बहारपर्यंत आर्यांचा चांगला पाय रोवला गेल्यावर त्यांनीं पश्चिम बंगालमधून दक्षिणेकडे व नैर्ऋत्येकडे वसाहत वाढविली; व त्या ठिकाणीं त्यांना राक्षस भेटून त्यांस त्यांनीं नैर्ऋत अथवा नरकपुत्र हें नांव दिलें; आणि याचमुळें नैर्ऋतांचें वसतिस्थान जी दक्षिण व पश्चिम यांमधील दिशा तिलही नैर्ऋत्य दिशा असें नांव पडलें. याच कारणासाठीं यमाला दक्षिण दिशेचा स्वामी करण्यांत आलें असेल व त्यावरून दक्षिणेंत शिरून वसाहत करण्याचे आर्यांचे प्रयत्न त्यांना कसे हानिकारक झाले याचा बोध होऊं शकतो. या गोष्टी व दंडकारण्य हें यमुनेच्या दक्षिणेपासूनच सुरू होतें, (ही गोष्ट राम दंडकारण्यांत १४ वर्षें राहण्याच्या प्रतिज्ञेची पूर्तता करण्याकरितां चित्रकूट पर्वतावर येऊन राहिला यावरून स्पष्ट होते;) ही गोष्ट यावरून असें सिद्ध होतें कीं, राक्षसांची तुरळक असली तरी यमुनेच्या दक्षिणेस सर्व हिंदुस्थानभर वसति असून त्यांचे मुख्य राज्य लंकेंत अथवा अर्वाचीन सीलोनांत होतें.

प्रकरण ६ वें.

राक्षसांची शरीररचना व नरमांसांशनप्रवृत्ति.

राक्षसांविषयींचीं अर्वाचीन कल्पना इतकी भयंकर आणि असमर्पक आहे कीं, तीमुळें, राक्षसांची शरीररचना कशी होती हें विस्तारानें सांगून, वाल्मीकीच्या मूळ रामायणांत हल्लींच्या कल्पनेला मुळींच आधार नाहीं हें सिद्ध करण्याची जरूर उत्पन्न झाली आहे. दक्षिण हिंदुस्थानांतील अर्वाचीन रहिवाशी जसे बहुतेक कृष्णवर्ण आहेत, त्याचप्रमाणें राक्षसांचा वर्णही काळा असला पाहिजे हें

निःसंशय होय. पार्श्वभागाच्या ठायीं आर्यांचा शुभ्र वर्ण ठेवून केलेलीं राक्षसांच्या कृष्णवर्णाचीं वर्णनें रामायणांत भरपूर आहेत. गौरवर्णी सीतेला जेव्हां कृष्णवर्ण रावण पळवून नेत होता, त्या वेळीं, एखाद्या कृष्ण गजासभोंवती असणाऱ्या सुवर्णाच्या पट्ट्याची सुंदर उपमा कवीनें तिला दिलेली आहे.

सा हेमवर्णा नीलांगं मैथिली राक्षसाधिपम् ।
शुशुभे कांचनी कांची नीलं गजमिवाश्रिता ॥१॥

त्याचप्रमाणें नीलांजनचयोपम हें व याच्याचसारखीं दुसरीं कित्येक विशेषणें रामायणामध्यें राक्षसांना लावण्यांत आलीं आहेत; आणि तींच हल्लींच्या द्रविडदेशच्या लोकांपैकीं पुष्कळांना लावल्यास कांहीं विशेष चूक होईल असें वाटत नाहीं.

परंतु राक्षस जरी वर्णानें काळे असले तरी ते रूपानें मात्र कुरूप नव्हते. त्यांचे अवयव नीटनेटके आणि रेखीव असून पुष्कळदां सुंदर व आकर्षकही असत. दक्षिणेंतील कृष्णवर्णीयांयध्यें सुद्धां हल्लीं अशीं मनोहर स्वरूपाचीं माणसें पुष्कळ दृष्टीस पडतात. कित्येक राक्षसी सुंदर व निटस होत्या असें रामायणांत पदोपदीं वर्णिलेलें आहे.

रूपयौवनसंपन्ना रावणस्य वरस्त्रियः ।

लंकेंतून रात्रीं प्रवास करीत असतां मारुतीला कुरूप आणि सुरूप दोन्हीं प्रकारचे स्त्रीपुरुष दिसले.

विरूपान्बहुरूपांश्च सुरूपांश्च सुवर्चसः ।

मारुतीतर रावणसुद्धां सुंदर होता असें वर्णन करितो.

वृतमाभरणैर्दिव्यैः सुरूपं कामरूपिणम् ।

हे राक्षस निद्रित असतांना मारुतानें पाहिलेले आहेत; तेव्हां राक्षस निद्रित असतां अथवा मृत्यूनंतर आपलें खरें स्वरूप पावत,

या अपरिमित काळपर्यंत चालत आलेल्या लोकसमजुतीचा विचार करतां, त्यांनीं तशीं सुंदर बाह्य रूपें धारण केलीं होतीं या कल्पनेस थाराही देतां येत नाहीं.

मोकळें केस, बाहेर लोंबणारी जीभ, तप्त गोळ्याप्रमाणें लाल डोळे, वाघाप्रमाणें पुढें आलेले दांत, पुढें आलेली व भीतिप्रद हनुवटी, आणि अक्राळविक्राळ अवयव इत्यादींनी युक्त असा एक भयंकर प्राणी ही जी राक्षससंबंधीं अर्वाचीन कल्पना तिच्याशीं वरील वर्णनें विसंगत आहेत. राक्षससंबंधी लोकांत जी कल्पना आहे तीप्रमाणें राक्षसांचें विस्तृत वर्णन येथें दिल्यास तें फारच किळसवाणें होईल. राक्षस हे मनुष्य जातीचे शत्रू असल्याकारणानें पुढील काळांत त्यांच्यावर असल्या भयंकर स्वरूपाचा आरोप करण्यांत आला असावा. पिशाचें आणि राक्षस यांच्यावर जगांतील सर्व लोकांकडून अस्वाभाविक व किळसवाण्या स्वरूपांचा आरोप करण्यांत आला आहे; परंतु वाल्मीकीच्या मूळ रामायणांत राक्षसांसंबंधीं असल्या कल्पनेला मुळींच थारा नाहीं. त्यावेळीं राक्षस हे सर्व साधारण मर्त्यच आहेत असें मानलें जात असे. याविषयीं एक मनोरंजक उतारा युद्धकांडांत सांपडतो. " तुम्हीं मानवरूप मुळींच धारण करूं नका; असें केलें असतां आपल्याकडे बिभीषण व त्याचे अनुयायी यांसह सात मनुष्यें राहतील व या साताशिवाय दुसऱ्या कोणाही मनुष्याला मारण्यास आपल्यास हरकत नाहीं " असें राम त्या ठिकाणीं वानरांना सांगत आहे.

नचैवं मानुषं रूपं कार्यं हरिभिराहवे।
वयं तु मानुषेणैव सप्त योत्स्यामहे परान् ॥१॥
अहमेव सहभ्रात्रा लक्ष्मणेन महौजसा ।
आत्मना पंचमश्चायं सखा मम बिभीषणः ॥२॥

टीकाकार पुढील भर घालतो—एवं च अस्मान् सप्त हित्वा मनुष्याकारो निःशंकं वध्यः वानराकारो वानरैर्युध्यते तदा वध्य एव ।

यावरून रामायणाच्या पुनर्रचनाकाराच्या काळीं सुद्धां राक्षस **सर्वसाधारण प्रसंगीं** मनुष्यरूपींच असत हें मान्य होतें असें सिद्ध होतें.

राक्षस किळसवाण्या व अक्राळविक्राळ स्वरूपाचे होते ही जी सर्व साधारण समजूत तिचें मूळ कदाचित् निराळें असेल. रावणानें सीतेला जेव्हां बंदींत ठेविलें होतें, त्यावेळीं तिला भिवविण्याच्या उद्देशानें तिच्या सभोंवतीं कुरूपतम अशा पुष्कळ राक्षसींना बसविण्यांत आलें होतें. प्रतिरावण असा जो मेक्सिकोचा राजा मॉंटेझूमा (Montezuma) यानें केलेल्या कुरूप मानवांच्या संग्रहाविषयीं जेव्हां आपण वाचतों, तेव्हां रावणाच्या पदरीं असल्या कुरूप स्त्रिया असतील या कल्पनेस जास्तच पुष्टि मिळते. मेक्सिकोचा इतिहासकार प्रेस्कॉट म्हणतो; "आपल्या नेहमीच्या ठरीव नियमांना छांदिष्टपणानें सोडून देऊन सृष्टीनें ज्यांची रचना केली आहे असे खुजे, अगडबंब व दुर्दैवानें इतर विकृतस्वरूप झालेले मानव यांच्या चमत्कारिक संग्रहाचा उल्लेख करण्याचें मला विसरून चालतां येणार नाहीं. हे असले अगडबंब, व **क्रमबाह्य** प्राणी आपल्या संस्थानचें एक अंगच होत असें (Aztec) आझटेक राजे मानीत." रावणाचे पदरींही असले कुरूप आणि व्यंगयुक्त असे मानव असतील. असलीं विकृतशरीरें असणाऱ्या राक्षसी सीतेच्या भोंवतीं सतत होत्या; त्यामुळें त्या बिचारीच्या मनावर जो परिणाम झाला असेल, त्याचाच **परिणाम** राक्षस–राक्षसींच्या स्वरूपासंबधींच्या अतिशयोक्तिपूर्ण कल्पनांत झाला असेल.

दक्षिण हिंदुस्तानांतील अर्वाचीन काळच्या कामाठी लोकांप्रमाणें, शरीरानें बळकट, बांध्यानें उंच आणि आकारानें मोठे अशा लोकांची राक्षस ही जात असावी; आणि कुंभकर्ण हा त्या सर्वांत मोठा असावा.

यस्य प्रमाणाद्विपुलं प्रमाणं नेह विद्यते ।

याचा अर्थ "ज्याच्यापेक्षां मोठा मनुष्य इहलोकीं नव्हता;" याशिवाय दुसरा तिसरा कांहींही होत नाहीं. वरील वर्णन बुद्धिग्राह्य आहे, आणि तो पर्वताएवढा उंच व मोठा असून त्याला जागें करण्यासाठीं त्याच्या आंगावरून दहा हजार राक्षस व हत्ती चालवावे लागत ही कुंभकर्णाविषयींची कल्पना केवळ अतिशयोक्ति होय, असें मानण्याशिवाय दुसरा मार्ग नाहीं. या संख्येवरूनच सिद्ध होतें कीं, नेहमीं समजण्यांत येतें त्याप्रमाणें राक्षसांचा आकार नसून त्यांचा आकार साधारण मानवाएवढाच होता. आपल्या काव्याला सुशोभित करण्याकरितां अतिशयोक्तींचा उपयोग करणाऱ्या वाल्मीकीच्या पुढील काळांतील कवींच्या या केवळ कल्पना होत असें म्हणून या अतिशयोक्तींची आपणांस वाट लावतां येईल.*

राक्षसांची नरमांसाशनप्रवृत्ति हीही त्यांच्या स्वरूपाविषयींच्या लोकांच्या वांकड्या तिकडच्या कल्पनेला दृढ करण्यास कारणीभूत झाली असेल; किंवा कदाचित् ती त्या कल्पनेचें मूळही असूं शकेल. मेक्सिकोंतील आझटेक (Aztec) लोकांच्या १६ व्या शतकांतील इतिहासाचें उदाहरण जर डोळ्यापुढें नसेंत तर इतर दृष्टींनीं पुष्कळच सुधारलेला, परंतु नरमांस भक्षणाच्या तिरस्कारार्ह पद्धतीला चिकटून असलेला असा संबंध देशच्यादेश असूं शकेल अशी कल्पना

---

* रावणाच्या १० मुखांसंबंधीं व २० हातांसंबंधीं विवरण पुढें करूं.

करणें सुद्धां कठीण झालें असतें. आझटेक (Aztec) लोकांप्रमाणेंच राक्षस जिवंत मनुष्यांच्या मांसावर निर्वाह करीत, व मेजवान्याही करीत. इतर लोकांमधून धरून आणलेल्या कैद्यांच्या मांसावरच नेहमीं अवलंबून न राहतां ते आपल्या जातींतील लोकांचेंही मांस कधीं कधीं खात असावे, व त्यावरूनच त्यांना यातु आणि यातुधान हीं नांवें पडलीं असावीं. ते इतर मांस, म्हणजे पशुपक्ष्यांचें मांस व शाकान्नही भक्षण करीत असें रामायणांत वर्णिलेलें आहे हें निःसंशय. परंतु राक्षसांना नरमांसाशनानें फार आनंद होई आणि शत्रूशीं गांठ पडून आपली मनुष्यभक्षणाची अस्वाभाविक लालसा पूर्ण होण्याची संधि आली म्हणजे तर त्यांचा आनंद गगनांत मावेनासा होई.

ईश्वराच्या पशुसृष्टींत सुद्धां कचितच दिसून येणारी, आपल्याच जातीवर उपजीविका करण्याची घोर पद्धत कांहीं आर्य त्याचप्रमाणें अनार्य, कांहीं पाश्चात्य त्याप्रमाणें पौर्वात्य जातींत एकाकाळीं प्रचलित होती, यांत मात्र संशय नाहीं. परंतु ईश्वराची ज्यांच्यावर विशेष कृपा होती व ज्या सुधारणेंत पुढें गेल्या होत्या अशा मानवजातींनीं ही भयंकर पद्धत लवकरच सोडून दिली; आणि सुधारणा व सत्ता वाढल्यावर, त्यांनीं ज्या जातींत ही अघोरी पद्धत अद्यापही चालूं होती त्यांचा नाश करून त्यांना या जगांतून नाहींसें केलें. प्रेस्काटच्या शब्दांत लिहावयाचें तर राक्षसांची भूमी पशुतुल्य अंधश्रद्धा व प्रवृत्ति यांपासून मुक्त व्हावी असें ईश्वरानेंच ठरविलें होतें. (हे **त्याचे जगतावर फार उपकार होत**). आणि राम दुसरा तिसरा कोणी नसून कोर्टेझप्रमाणें, मानवजातीचा उध्दारक होता. आम्ही पुढें वर्णन करणार आहोंत त्या प्रसंगांच्या ओघानें आणि सर्वज्ञानी ईश्वराच्या

योग्य व्यवस्थेनुसार तिरस्कृत अशा राक्षसांशीं रामाचा संग्राम झाला, आणि त्यानें शेवटीं हिंदभूमीला मनुष्यभक्षणाच्या अवनतिकारक प्रघातापासून मुक्त केलें. कारण राक्षस आपल्या अन्नाला व शरीर सामर्थ्याला अनुरूप अशा वृत्तीचे—म्हणजे भयंकर, द्वेष धरून राहणारे, कोणत्याही सुविकारानें ज्यांच्या मनावर मुळींच परिणाम होणें अशक्य, असे लोक असून ते शत्रूशीं अगदीं शेवटपर्यंत युद्ध करीत आणि अरण्यांतील मनुष्यभक्षक हिंस्रपशूंप्रमाणें त्यांना विजय अथवा मरण यांमधला दुसरा मार्गच माहीत नसे. मेक्सिकोंतील आझटेक लोकाप्रमाणेंच लंकेंतील राक्षसांनींही आर्यांशीं अगदीं अखेरपर्यंत युद्ध केलें आणि शेवटीं ते जवळ जवळ नाहींसे झाले.

वास्तविक सत्यसृष्टींत, राक्षस हे वरीलप्रमाणें बळकट आणि काटक, कृष्णवर्ण, तांबडया वस्त्रांचे शोकी, क्रूर आणि घातकी मनुष्यभक्षणाच्या राक्षसी पद्धतीस बळी पडलेले, परंतु इतकें असूनही मनुष्य जातीचेच लोक होते; परंतु पुढें त्यांना पुराणांतून दुष्ट मनाचे, हिंस्र व अतिमानुषशक्ति असे स्वरूप देण्यांत आलें. आणि ते आर्यांशी नेहमीं युद्ध करीत त्यांच्या यज्ञांतून व वैदिक कर्मांतून विघ्नें आणीत व ऋषींना व ब्राह्मणांना भक्षण करीत असें दाखविलें आहे.

प्रकरण ७ वें.

त्यांचीं भारतीय आर्यांशीं झालेलीं रामापूर्वीचीं युद्धें.

रामानें आपलें सैन्य लंकेवर नेण्याच्या अगोदर, दक्षिणहिंदुस्थानांत हळूंहळूं स्वाऱ्या व वसाहत करणाऱ्या आर्यांशीं राक्षसांचीं पुष्कळ युद्धें झालीं असलीं पाहिजेत, अशी कोणी अपेक्षा केल्यास ती स्वाभाविक होय. पूर्वी सांगितलेंच आहे कीं, राक्षस हे गंगा-यमुनांच्या दक्षिण तीराइतक्या उत्तरदिशेपर्यंत स्वाऱ्या करीत; वैदिक कालामध्यें आर्यांनीं विदेह अथवा बहारचें राज्य स्थापलेंच होतें; तेव्हां गंगेच्या पलीकडील तीरावर दक्षिणेकडे ज्या प्रदेशांत आर्य प्रथम आपली वसाहत वाढवूं लागले, त्याच प्रदेशांत म्हणजे पश्चिम बंगालमध्यें त्यांचा राक्षसांशी संबंध आला असला पाहिजे असें दिसतें. कारण रामायणामध्यें, वामनानें बलीला जिंकल्याचें स्थळ याच प्रदेशांत असल्याबद्दलचा उल्लेख सांपडतो; बलीला जिंकण्यांत यश येण्याकरितां गंगेच्या उत्तर तीरावरील याच प्रदेशांत त्यानें तप केलें यांत तर मुळींच संशय नाहीं. बली हा असुर होता असें म्हटलेलें आहे; परंतु तो राक्षसच असावा, कारण असुराला गंगेच्या दक्षिण तीरावर येण्याचें कांहीं काम नाहीं. जरी रामायणामध्यें सामान्यतः राक्षस आणि असुर यांमधील भेद राखण्यांत आला आहे, तरी कित्येकदां या दोन जातींचा गोंधळही करण्यांत आला आहे. बलीच्या पत्नीचें नांव **विंध्यावली** असून, या नांवावरून गंगेच्या दक्षिणतीरावर मिर्झापूरच्या जवळपर्यंत ज्याचा विस्तार आहे अशा विंध्य पर्वतांत बली राज्य करीत असावा अशी

कल्पना सुचते. बली पाताळांत लोटला गेला याचा अर्थ राक्षसांना त्या पर्वतराजीच्या खालीं दक्षिणेकडे कायमचे घालविण्यांत आलें असा कदाचित् असेल.

विश्वामित्राचा **सिद्धाश्रम** गंगेच्या दक्षिण तीरावर वसलेला असून " वामनानें ज्या ठिकाणीं तप केलें त्याच ठिकाणीं हा आश्रम आहे " असें स्वतः विश्वामित्रच म्हणतो. यावरून आर्य ईशान्येकडून ओरिसामधून, आणि पूर्वकिनाऱ्यावरून दक्षिणेंत उतरले असावे असें दिसतें. तेव्हां पर्वतमय अशा विंध्यप्रदेश उलंघून जाणें त्यांना अत्यावश्य होतें, आणि याच पर्वतानें आर्यांच्या प्रसारांत फार मोठी व दुस्तर अडचण आणिली. त्या अडचणींतून पार पाडण्याचें यश आर्यांच्या दाक्षिणेकडील वसाहतीचा आद्य संस्थापक अगस्त्य त्याच्याकरितां नियतीनें राखून ठेविलें होतें. तो त्या प्रदेशांत दूरवर घुसला, त्यानें विंध्य व इतर पर्वत ओलांडिले व गोदावरीच्या उत्तर तीरावर जनस्थाना शेजारीं वसाहत स्थापन केली; हा प्रदेश आणि हल्लींचा सपाट, संपत्तिमान् असा महाराष्ट्राचा प्रदेश हे एकच असावें असें वाटतें. विश्वामित्राप्रमाणें अगस्त्य **धर्मोपदेशक** असून **योद्धाही** होता; तो स्वतः राक्षसांशीं लढला व विंध्य आणि गोदावरी यामधील प्रदेश त्यानें त्यांच्या उपद्रवापासून बहुतांशीं मुक्त केला, थोडक्यांत सांगावयाचें तर दक्षिणदेश शोधून काढून त्यानेंच तेथें प्रथम वसाहत केली, आणि म्हणूनच भारतीय पुराणांत दक्षिण दिशा त्याच्या नांवानें ओळखिली जाते हें योग्यच होय. ज्याप्रमाणें उत्तरेकडील सात ताऱ्यांना (सप्तर्षींना) वेदकालांतील सात महाऋषींचीं नांवें देण्यांत आली आहेत, त्याचप्रमाणें दक्षिण गोलार्धांत दिसणाऱ्या तेजानें सुस्पष्ट अशा एका ताऱ्याला अगस्त्याचें नांव देण्यांत आलें आहे.

रामायणांतील पुढील श्लोकानें आपल्या वरील मुद्यांचें स्पष्टीकरण व दृढीकरण होईल.

निगृह्य तरसा मृत्युं लोकानां हितकाम्यया ।
दक्षिणा दिक् कृता येन शरण्या पुण्यकर्मणा ॥
तस्येदमा मपदं प्रभाव व्यस्य रक्षसैः ।
दिगियं दक्षिणा त्रास दृश्यते नोपभुज्यते ॥
नाम्ना चेयं भगवतो दाक्षणा दिक् प्रदक्षिणा ।
प्रथिता त्रिषु लोकेषु दुर्धर्षा क्रूरकर्मभिः ॥

या श्लोकांच्या खालील श्लोकामध्येंच दिग्दर्शित केलेली व इतर

मार्ग निरोद्धुं सततं भास्करस्याचलोत्तमः ।
संदेशं पालयंस्तस्य विंध्यशैलो न वर्धते ॥

ठिकाणीं जास्त विस्तृत रीतीनें दिलेली कथा पुढीलप्रमणें आहे. " विंध्यपर्वत इतका उंच आणि विशाल झाला कीं, त्यामुळें सूर्य-प्रकाशाच्या प्रसारासच अडचण येते कीं काय, अशी भीति पडली. ऋषींनीं विनंति केल्यावरून अगस्त्यानें त्या गर्विष्ठ पर्वताची वाढ बंद करून, असलें भयंकर संकट प्राप्त होणार नाहीं असें करण्याचें अभिवचन दिलें. तो त्या विंध्य पर्वतापुढें गेला व त्याचा मान राखण्यासाठीं विंध्यपर्वतानें त्याच्या समोर लोटांगण घातलें. मी परत येईपर्यंत तूं असाच रहा अशी अगस्त्यानें त्यास आज्ञा केली; परंतु तो परतच आला नाहीं, आणि तो पर्वत त्या महाऋषींची परत येण्याची वाट पहात अद्याप तसाच पडला आहे. " या पौराणिक गोष्टीवरून बुद्धिग्राह्य अशी गोष्ट पुढीलप्रमाणें सहज बनवितां येईल. विंध्य पर्वताची रांग व तीबरोबरच सातपुड्याची रांग या फार रुंद आहेत; हा पर्वतमय प्रदेश गंगेच्या दक्षिण तीरापासून मध्य हिंदुस्तानांतून आणि मध्यप्रांतांतून वऱ्हाडपर्यंत पसरलेला

आहे. याच प्रदेशाला दख्खनचा उत्तर प्रदेश म्हणतां येईल. प्राचीन काळीं या पर्वतमय प्रदेशांतून जाणें अत्यंत दुर्घट होतें; अगस्त्यानें मात्र मोठ्या धैर्यानें हा प्रदेश ओलांडला आणि दक्षिणेंत वसाहत केली व त्यानंतर तो हिंदुस्तानांत पुन्हां परत गेला नाहीं. अशा रीतीनें त्यानें विंध्यप्रदेश ओलांडणें व्यवहार्य आहे असें सर्वांस दाखवून दिलें; आणि हेंच अलंकारिक भाषेंत सांगावयाचें तर अगस्त्य समोर लोटांगण घातल्यावर आजपर्यंत विंध्यपर्वत जसाच्या तसाच राहिला अहे अगस्त्याच्या मागून पुष्कळ ऋषि अथवा ब्राह्मण दक्षिणेंत गेले आणि रामाच्या वेळीं दक्षिणेंत गोदावरीच्या उत्तर तीरावर ब्राह्मणांचे पुष्कळ आश्रम अथवा वसतिस्थानें होतीं.

वामन, विश्वामित्र, अगस्त्य आणि इतर वसाहत करणारे आर्य हे जरी ब्राह्मण * असले तरी, दक्षिणेंतील आपल्या सुरक्षित ठिकाणांतून बाहेर पडून आर्यांवर वेळोवेळीं स्वाऱ्या करणाऱ्या त्रासदायक राक्षसांपासून आपल्या वसतिस्थानाचें व शेतांचें रक्षण करण्याकरितां ब्राह्मणांना धनुष्यबाण हातीं घ्यावे लागत. वीर या दृष्टीनें

---

* ब्राह्मण दक्षिणेंत वसाहत करीत असतां क्षत्रिय त्यांजबरोबर गेले नसावे; विंध्यपर्वताच्या दक्षिणेस हल्लीसुद्धां क्षत्रिय लोकसंख्या अत्यंत कमी आहे. यावरूनही हीच गोष्ट दिसून येते. उत्तर हिंदुस्थानांतील लोकसंख्येंत क्षत्रियांचा फारच भरणा आहे आणि ते आर्य असल्याबद्दल पुरावा देऊन सिद्धहि करितां येईल. दक्षिणेंत मात्र मराठे व इतर कांहीं मिश्र जाती या शिवाय खरे क्षत्रिय मुळींच नाहींत. प्राचीन हिंदुस्थानांतील पांडव सुद्धां मिश्र जातीचे असले पाहिजेत; कारण त्यांच्यामध्यें ज्या ज्या आप्तसंबंधांतून लग्नें होऊं नयेत असा धार्मिक निर्बंध आहे त्यांमधून सुद्धां लग्नें होत असत.

अगस्त्याचा पराक्रम व त्याच्या राक्षसांशी झालेल्या लढाया यांचा पूर्वी उल्लेख आलाच आहे. त्यानें रामाला धनुष्य, खड्ग, आणि बाणांचा भाता हे जिन्नस दिले यावरूनही हेंच अनुमान निघतें.

इदं दिव्यं महच्चापं हेमवज्रविभूषितम् ।
वैष्णवं पुरुषव्याघ्र निर्मितं विश्वकर्मणा ॥
अमोघः सूर्यसंकाशो ब्रह्मदत्तः शरोत्तमः ।
दत्तो मम महेंद्रेण तूणी चाक्षय्यसायकौ ॥
महाराजतकोशेयमसिर्हेमविभूषितः ।
जयाय प्रतिगृह्णीष्व वज्रं वज्रधरो यथा ॥

या टिकाणीं ऐतिहासिक क्रम दिसून येतो; आर्यांचे शत्रु जे असुर आणि राक्षस त्यांच्याशीं युद्ध करण्याची इंद्र व विष्णु यांची जबाबदारी अगस्त्यावर येऊन पडली होती; व त्यानें ती नंतर रामावर टाकिली.

मध्यप्रांत अथवा दंडक हे प्रांत अलीकडेपर्यंत भयंकर होते; आणि तेथें वसाहत करून राहणारे ब्राह्मण जरी वीर असले, तरी वाङ्मयविषयक, धार्मिक अगर शेतकीविषयक कामांत त्यांचा बहुतेक वेळ व शक्ति खर्च होत असल्यामुळें, त्यांना उत्तरेकडील क्षत्रिय राजांची मदत ध्यावी लागे. दशरथ माझा मित्र आहे असें अगस्त्य रामाला सांगतो; व दशरथानें दंडकांतील राक्षसांवर पुष्कळ स्वाऱ्या केल्या असा उल्लेखसुद्धां रामायणांत आपल्यास सांपडतो. असल्या स्वाऱ्यांपैकीं एका स्वारींत आपला प्राण वांचविल्याबद्दल त्यानें कैकेयीला वर दिला होता असें म्हटलें आहे. दंडक अथवा गंगा आणि गोदावरी यांमधील जंगली प्रदेश यांत जरी उत्तरेकडील क्षत्रिय राजांची मदत असलेल्या ब्राह्मण वसाहती होत्या, तरी सुद्धां

लोकांना तो प्रांत फार भीतिप्रद वाटे; व रशियांत ज्याप्रमाणें आतांपर्यंत सैबेरिया प्रांताचा राजकुलांतील हद्दपार केलेल्या लोकांना पाठविण्याच्या कामीं उपयोगी होत होता, तसलाच उपयोग दंडकाचा उत्तरेकडील क्षत्रिय नृपांना होत असे; व त्यांत गेलेल्यांना एक तर राक्षसांशीं लढावें लागे अथवा मरावें लागे. रामाच्या आधीं या ठिकाणीं आर्य व राक्षस यांमध्यें पुष्कळ युद्धें झालीं असें तें स्थल असून राक्षसांच्या विरुद्ध लढण रा राम सर्वांत बलिष्ठ योद्धा होता यांत मुळींच शंका नहीं. त्याच्या पराक्रमाचीं वर्णनें अत्यंत अद्भुत असून प्रथमदर्शनीं ते त्याचे पराक्रम आपणाला केवळ कल्पित आहेत असें वाटतें; परंतु कोर्टेझ (Cortez) च्या मेक्सिकोमधील अविश्वसनीय अशा धाडसांच्या कृत्याविषयीं विचार केला असतां, रामाच्या पराक्रमाचा वर्णनांना सत्याचा आधार आहे ही गोष्ट सहज ध्यानांत येईल. राम हा तर कोर्टेझपेक्षांही ज्यास्त उदात्त स्वभावाचा वीर होता. रावणाशीं युद्ध कांहीं त्यानें स्वतः उपस्थित केलें नव्हतें; आणि मेक्सिकन लोकांशीं कोर्टेझ जसा निर्दयपणें वागला तसा राम राक्षसांशीं वागला नाहीं; शिवाय त्याचें आचरणही अत्यंत शुद्ध व उदात्त असून त्याची बरोबरी जगांतील कोणीहां मनुष्य अजून करूं शकलेला नाहीं; नीतिआचरणांत त्याच्याशीं स्पर्धा करील असा इतिहासांत कोणीही नाहीं. यामुळें व त्याच्या अद्भुत पराक्रमामुळें हिंदुस्तानांत त्याला देवकाटींत यथार्थ बसावेलें आहे. ते हां असें जें त्याचें उदात्त चरित्र त्याचें चित्र रामायणांतील अतिशयोक्तिपूर्ण वर्णनांतूनच जो कांहीं ऐतिहासिक आधार मिळेल तेवढ्या ऐतिहासिक आधारावर पुढील भागांत आम्ही रेखाटणार आहों.

———

प्रकरण ८ वें.

रामाचा जन्म, त्याचें बाळपण, व त्याचा सीतेशीं विवाह.

अयोध्येचा वृद्ध राजा दशरथ याला तीन पट्टाभिषिक्त राण्या असूनहां पुत्र नव्हता. तो स्वभावें वैदिक काळच्या अंतःकरणाचा आर्य असल्या कारणानें संततीकरितां अगदीं झुरत होता; आणि तो जसजसा वृद्ध होऊ लागला तसतशी त्याची काळजी जास्त जास्तच वाढूं लागली. तो अशा दुःखांत असतां त्याचा गुरु वसिष्ठ यानें त्याला अश्वमेध यज्ञ करण्याचा उपदेश केला. वैदिक ब्राह्मणांच्या मताप्रमाणें अश्वमेध यज्ञ कोणतीही इच्छित वस्तु प्राप्त करून देणारा आहे. मग ती इच्छित वस्तु पुत्र असो, संपत्ति असो, स्वर्ग असो, एवढेंच नव्हे तर प्रत्यक्ष मुक्तीच असली तरीही हरकत नाहीं. वसिष्ठाच्या उपदेशास अनुसरून त्या वृद्ध राजाच्या आज्ञेनें चक्रवर्तित्वाचें चिन्हच असणारा तो यज्ञाश्व मोकळा सोडण्यांत आला. अयोध्येच्या सूर्यवंशाचें चक्रवर्तित्व कोणीही नाकबूल करीत नव्हता; तेव्हां अर्थातच शेवटीं तो घोडा यज्ञभूमीवर परत आला अथवा आणला गेला. घोडा मोकळा सोडून दिला असतांना दशरथ व त्याच्या तीन राण्या यांनीं, इतर पुष्कळ ऋषि ज्याला साहाय्य करीत होते अशा त्या वसिष्ठाच्या मार्गदर्शकत्वाखालीं एक वर्षभर अनेक यज्ञ व इतर धार्मिक विधि केले. घोडा परत आल्यावर दशरथाची ज्येष्ठ राणी शूर कौसल्या हिनें तरवारीच्या तीन घावांनीं त्याला ठार मारिलें व त्याच्या शरीराच्या निरनिराळ्या भागांच्या आहुत्या अग्नीमध्यें ऋषींकडून विधिपूर्वक टाकण्यांत

आल्या. मोठा उत्सवसमारंभ केल्यानंतर, आणि विद्वान् ब्राह्मणांना उदार दक्षिणा व पुष्कळ भेजवान्या दिल्यानंतर यज्ञ समाप्त झाला.*

योग्य कालीं दशरथाच्या तीनही राण्या गर्भवती झाल्या व त्यांच्या पोटीं चार पुत्र जन्मास आले. त्या वृद्ध राजाला पुत्र प्राप्त करून देण्याइतकें अश्वमेध यज्ञांत काय सामर्थ्य होतें याचा आम्हीं स्वाभाविक असा उलगडा करतों. राजे महाराजे, राण्या महाराण्या अथवा श्रीमान् स्त्रीपुरुष यांनीं जर मधून मधून बराच कालपर्यंत उपवास व इंद्रियसंयमन केलें नाहीं तर अपत्य-सुख मिळणें त्यांच्या नशिबीं नसतें; आणि हिंदुधर्मानें जे यज्ञ अथवा इतर व्रतें करण्यास सांगितलीं आहेत त्यांचा हेतुही मितोपभोग व मोकळें सोडल्यास जें मन वाईट विचारांनीं आणि विकारांनीं उद्दाम होतें त्या मनाला कांहीं तरी धार्मिक अथवा पवित्र कार्यव्यापृतता या दोन गोष्टी साधण्याचाच आहे. तेव्हां एकादें धार्मिक व्रत, यज्ञ अथवा दीर्घकालमर्यादेची यात्रा यामुळें मितोपभोग, मनःशुद्धि आणि शरीराचा सुटसुटीतपणा इत्यादि गोष्टी साधत असल्यामुळें, श्रीमंत स्त्रीपुरुषांना अपत्यप्राप्तीत या यज्ञ वगैरेंचा जर यशस्वी तऱ्हेनें उपयोग झाला तर कांहीं आश्चर्य मानण्याचें कारण नाहीं. † यासंबंधांतील

---

* ऋष्यशृंगाची कथा व त्यानें या यज्ञानंतर "पुत्रेष्टि" म्हणजे पुत्रदायक यज्ञ केला ही गोष्ट उघड मागाहूनची आहे. तिच्या समावेशामुळें उद्भवणारी विसंगतता व पुनरावृत्ति यांचें विवेचन दुसरीकडे झालेलेंच आहे.

† लंका जिंकून अयोध्येस परत येईपर्यंत रामाला मुलींच मूल झालें नाहीं या गोष्टीच्या आधारावर ज्या दोन चमत्कारिक उपपत्त्या लावण्यांत आल्या आहेत त्यांचा याठिकाणीं आपणांस विचार केला पाहिजे. प्रो. वेबरचें म्हणणें असें आहे कीं, सीता ही रामाची बहीण असून अरण्यांतही

खरें स्पष्टीकरण कांहींही असलें तरी दशरथाच्या तीन राण्यांना चार पुत्र झाले यांत कांहीं वाद नाहीं. कौसल्येचा पुत्र राम हा ज्येष्ठ, बलिष्ठ आणि सर्वांत जास्त पाणिदार होता. त्याच्या पाठचा भरत असून तो वृद्ध दशरथाची कनिष्ठ व अत्यंत लावण्यवती परंतु कैकयी हिचा मुलगा होय. शत्रुघ्न व लक्ष्मण हे दशरथाची मधली राणी सुमित्रा इचे पुत्र होत. योग्य कालानें हे चार मुलगे सुंदर व सबल असे चार क्षत्रिय राजपुत्र झाले. त्या सर्वांमध्यें राम हा बलिष्ठ होता, आणि त्याच्या सबल व शूर (अश्वमेधांतील अश्व तीन घावांनीं मारणाऱ्या) आईकडे पाहतां हें योग्यच होतें. वेदकालांतील

तीं दोघेजण त्याच नात्यानें रहात होतीं, व त्यांचा विवाह अरण्यांतून परत आल्यावर झाला, ही जी बौद्धकथेंतील गोष्ट तिला वरील कारणानें पुष्टीच मिळतें. वेबरच्या दृष्टीनें विचार केल्यास अश्वमेध यज्ञ करीपर्यंत दशरथाचा कौसल्या व दुसऱ्या तिच्या दोन सवती यांच्याशीं विवाहच झाला नव्हता असें सुद्धां एखादा म्हणेल. सीता जर रामाची बहिण असती तर तिला अरण्यांत रामाबरोबर जावें लागलें नसतें हें आम्हीं मागें दाखविलेंच आहे; शिवाय आपल्या बहिणीसमवेत, तिच्याशीं लग्न करण्यास कोणतीही हरकत नसतां एखादा क्षत्रिय राजपुत्र १४ वर्षेपर्यंत अविवाहित राहील हें मुळींच संभवत नाहीं. वेबरची उपपत्ति इतकी लेचीपेची आहे कीं, तिचें जास्त खंडण करण्याची मुळींच जरूरी नाहीं. टाल्बाईझ व्हॉलर यांचीं या बाबतींतील कल्पना यापेक्षांहि अस्वाभाविक आहे. रावणानें सीतेला बलात्कारानें आपणाबरोबर रहावयास भाग पाडलें असलें पाहिजे; आणि सीता रावणापासून गर्भवती राहिली असली पाहिजे; यास्तव संशयावर रामानें तिला टाकून दिली, असें त्याचें म्हणणें आहे. या बाबतींत पहिली स्पष्ट गोष्ट ही आहे कीं, रामानें जेव्हां सीतेला रावणाच्या कैदेतून मुक्त केलें त्या वेळीं ती गर्भवती आहे

सर्व क्षत्रियांप्रमाणें त्यांना धनुर्विद्येचें व वेदांचें शिक्षण देण्यांत आलें. वेदकालीन क्षत्रिय हा वीर असून श्रोत्रियही असे. त्याला सुचा-सुवापेक्षां शस्त्रास्त्रांचा राजकर्तव्यामुळें जास्त उपयोग करावा लागे ही गोष्ट अलाहिदा. त्याकाळीं 'वृद्धजनप्रधान कौटुंबिक' व्यवस्था अमलांत होती; म्हणजे बाप हा कुटुंबाचा निर्विवाद मालक समजला जात असे. कुटुंबामध्यें ज्येष्ठ पुत्रालाही बापाचाच मान मिळे; व या पद्धतीस अनुसरूनच रामाचे तीनही बंधु त्याच्यावर प्रेम करीत व त्याला पित्यासारखा मान देत; लक्ष्मण मात्र रामाची विशेष सेवा करीत असे; आवडत्या राणीचा मुलगा भरत याची सेवा शत्रुघ्न करीत असे; परंतु भरताची आई कितीहि मत्सरी व गर्विष्ठ असली तरी भरताचें रामावरील प्रेम व आदर हीं त्याच्या इतर भावापेक्षां यत्किंचितही कमी नव्हतीं. 'वृद्धजनप्रधान' कौटुंबिक अवस्थेच्या काळीं कनिष्ठ बंधू ज्येष्ठ बंधूवर प्रेम करून त्याची करी सेवा करी याविषयींचें मोठें अंतःकरणबेधक चित्र एकाच श्लोकांत रामायणामध्यें काढलेलें आहे.

[पान १३५ वरून.]

कीं काय, हें त्याला सहज समजले असतें. एवढेंच नव्हे तर त्याला त्या-संबंधीं थोडा जरी संशय आला असतां तर त्यानें ती बाळंत होईपर्यंत स्वस्थ राहून तिच्यावर नजर ठेविली असती. टाल्बाईझ व्हीलर सारख्या मोठ्या इतिहासकाराच्या ग्रंथांतून असल्या भयंकर सिद्धांतांना थारा मिळावा हें खरोखर चमत्कारिक होय. आमचें या बाबतींत मत असें आहे कीं,--त्याबद्दल आमचे मुद्दे आम्ही वर दिले आहेत--राम व सीता यांच्यासारख्या सुंदर जोडप्याला पूर्वी कांहींएक अपत्य न होतां दुःखद व चिंताजनक अशा एक वर्षाच्या विरहानंतर संगम झाल्या-वर एकाच्या ऐवजीं दोन पुत्र झाले यांत मुळींच आश्चर्य नाहीं.

यदा हि हयमारूढो मृगयां याति राघवः ॥
अथैनं पृष्ठतोऽभ्येति सधनुः परिपालयन् ॥

"राम अश्वारूढ होऊन मृगयेला जाऊं लागला म्हणजे त्याचा बंधु लक्ष्मण हातांत धनुष्य घेऊन त्याच्या मागें चालत जात असे."*

राजपुत्रांचें धनुर्विद्या व वेद यांतील शिक्षण संपल्यावर एके दिवशीं विश्वामित्र ऋषि एकाएकीं दशरथ राजाकडे आला. त्या वृद्ध राजानें त्याचें योग्य स्वागत करून पूजा केली व 'आपण काय हेतु धरून मजकडे आला' अशी त्यास पृच्छा केली; परंतु, 'मी यज्ञ करणार आहें; राक्षसांच्या विध्वंसनापासून त्याचें रक्षण करण्याकरितां मला तूं राम दे.' असें विश्वामित्रानें सांगितल्यावर मात्र त्याला काळजी वाटून तो गांगरला. रामावर त्या वृद्ध राजाचें आपल्या प्राण पलीकडे प्रेम असल्याकारणानें तो होय नाहीं करूं लागला. मायावी राक्षसांशीं लढण्यांत काय संकटें आहेत हें स्वतःला पूर्णपणें माहीत असल्याकारणानें 'आपल्या यज्ञाचें संरक्षण करण्याकरितां मीच माझी सेना बरोबर घेऊन येतों' असें तो म्हणूं लागला; परंतु या म्हणण्यास ऋषि कबूल होईना. रामाशिवाय दुसर कांहीं घेणार नाहीं असें त्यानें निश्चयात्मक सांगितलें व याचें कारण त्याच्या मनांत यज्ञरक्षणाशिवाय आणखीहि कांहीं असेल. त्या सन्मान्य ऋषीची विनंति मान्य करणें रोवटीं वसिष्ठाच्या आग्रहानें दशरथाला भाग पडलें आणि राम व त्याचा प्रेमळ

---

* रामाचें बाळपण आणि शिक्षण याविषयीं वाल्मीकींचें वर्णन इतकें सार्धे, थोडक्यांत आणि सुंदर आहे कीं, ज्याअर्थीं टाल्बाईझ व्हीलर रामाच्या आयुष्यांतील या काळचें पोरकट वर्णन ज्यांत आहे असे इतर ग्रंथांतील उतरे देतो त्याअर्थीं त्याला हा रामायणाचा मूळ झरा सांपडला नव्हता असें म्हणावें लागतें.

बंधु लक्ष्मण यांस बरोबर घेऊन विश्वामित्र आपल्या आश्रमाकडे जाण्यास निघाला.

पुष्कळ लहान लहान नद्या ओलांडल्यावर, अयोध्येची नदी शरयू हिचा महान गंगेशीं ज्या ठिकाणीं संगम होतो त्या ठिकाणीं त्यांनीं गंगा नदी ओलांडिली. वाटेमध्यें त्या राजपुत्रांना त्यांच्या पूर्वजांविषयीं गोष्टी सांगून, त्यांच्या पराक्रमाचीं व विशेषतः गंगेच्या प्रवाहानुरोधानें समुद्र गांठणाऱ्या भगीरथाच्या पराक्रमाचीं वर्णनें सांगून विश्वामित्र त्यांचीं मनें उल्हसित करून त्यांच्यांत उत्साह उत्पन्न करी. भविष्यकालीं आपण पराक्रम करून आपल्या पूर्वजांच्या पराक्रमाची बरचढ न झाली तरी बरोबरी खास करूं अशा महत्त्वाकांक्षेनें त्या तरुण राजपुत्रांचीं अंतःकरणें त्यामुळें उद्दीपित झालीं असलीं पाहिजेत.

गंगा ओलांडल्याबरोबर ज्या प्रदेशांत हिंदुस्थानचे राक्षसादि मूळ रहिवाशी स्वाऱ्या करूं शकत अशा प्रदेशांत ते शिरले. या विशिष्ट प्रांतांत, राक्षसांशीं तुलना केल्यास कमजोर ठरतील अशा यक्षांची वसति होती. रामाच्या आगमनाचें स्वागत ताटका नांवाच्या यक्षस्त्रीनें दगडांचा वर्षाव करून केलें, व ती रामाच्या बाणाघातानें मृत्यु पावली. त्यानंतर कोणतेंही विघ्न आडवें न येतां ते विश्वामित्राची पर्णकुटिका जी सिद्धाश्रम तीमध्यें जाऊन पोहोंचले. या ठिकाणीं सर्व कांहीं तयार होतें. ऋषीनें तात्काळ आपल्या यज्ञास सुरवात केली व राम लक्ष्मण हे त्यावर अविरत पाहरा करूं लागले. पांच दिवसपर्यंत विरोधाचा प्रयत्न झाला नाहीं. सहाव्या दिवशीं मात्र राक्षस तेथें आले—राम त्यांचें स्वागत करण्यास तयार होताच—त्यानें त्यांचा पुढारी सुबाहु यास बाणानें ठार मारिलें; तेव्हां सुबाहूचा भाऊ मारीच हा इतर राक्षसांबरोबर विंध्य पर्वताचर

पळून गेला. या बालवीरांचें धैर्य पाहून विश्वामित्र फार खूष झाला; व त्या कालीं तो धनुर्विद्येंतही मोठा कुशल म्हणून गाजला असल्यानें त्यानें रामलक्ष्मणांस धनुर्विद्येंतील पुष्कळ महत्वाचे धडे शिकविले.

जनकाच्या घरीं यज्ञ होत आहे ही बातमी त्यास लागल्यामुळें दोघांही राजपुत्रांना बरोबर घेऊन तो जनकाच्या मिथिला नामक राजधानीस जाण्यास निघाला. जनकाची मुलगी सीता ही लग्नाला योग्य झालेली आहे, हें त्याला माहीत होतें; आणि जो कोणी आपल्या जवळ असलेल्या एका जुन्या व जड धनुष्याला प्रत्यंचा चढवील त्याला सीता द्यावयाची हा जनकाचा पणही त्यास माहीत होता. आपला तरुण शिष्य राम याच्या अफाट शक्तीबद्दल आतां विश्वामित्राची खात्री झाली होती; व त्याला सीता मिळवून द्यावी अशी त्याची इच्छा ही होती. तेव्हां त्यानें त्या दोन्ही राजपुत्रांसह पुन्हां एकदां गंगा ओलांडिली व तो जनकाच्या महानगरीच्या शिवेपर्यंत येऊन पोहोंचला.

याच ठिकाणीं धैर्यहीन मनाच्या अहिल्येची सुंदर कथा येते. जनकाचा धर्मगुरु गौतम याची ती स्त्री होय. मनाच्या अत्यंत कमकुवत स्थितींत तिच्या कमनशिबानें तिनें इंद्राशीं संगम करण्याचें कबूल केलें; ती गोष्ट गौतमाच्या नजरेस आली. संतप्त झालेला तिचा पति फक्त इंद्रालाच शाप देऊन राहिला नाहीं, तर निराळें राहून उग्र तपश्चर्या करण्याची शिक्षा त्यानें आपल्या पत्नीसही केली. राम आणि विश्वामित्र त्या ठिकाणीं आले, त्या वेळीं अहल्या स्त्रीस झाली एवढी शिक्षा पुरी झाली, असें वाटून गौतमानें तिला क्षमा करून असल्या सन्मान्य पाहुण्यांचें आदरातिथ्य करण्याचें आपलें कर्तव्य करण्यास परवानगी दिली असावी असें दिसतें.

रामायणांतील मूळ कथा ही अशी असून अलीकडील पुराणांनीं अलीकडील म्हणजे हल्लींच्या रामायणाच्या सुद्धां अलीकडील पुराणांनीं तीवर एक सुंदर जाळें विणलें आहे. अहल्येला तिच्या पतीनें शिळा होण्याचा शाप दिला होता; व रामाच्या पवित्र पदधूलीचा स्पर्श होईपर्यंत युगानुयुगें ती त्याच स्थितींत होती, या कल्पनेचा आम्हीं पूर्वी उल्लेख केलाच आहे.

पुन्हां एकत्र झालेल्या त्या दांपत्याचें आदरातिथ्य स्वीकारून ते तिघेजण जनकाच्या नगरास गेले. सन्मान्य विश्वामित्र चें स्वागत करण्याकरितां जनक नगराबाहेर आला, आणि ऋषीबरोबर आलेल्या त्या क्षत्रिय राजपुत्रांच्या स्वरूपानें त्याच्या मनावर विलक्षण परिणाम झाला. त्या वेळीं जनकाच्या घरीं स्वयंवर मुळींच नव्हता. रावणासुद्धां सर्व राजे त्याच्याकडे जमल होते; व त्या सुंदर वधूच्या प्राप्तीकरितां धनुष्याला प्रत्यंचा चढविण्याची त्यांची तयारी झालेली होती, असें जे आधुनिक पुराणात वर्णिलें आहे तसला प्रकार त्यावेळीं जनकाच्या घरीं मुळींच नव्हता हे राजपुत्र कोणाचे अशी **जनकानें** विश्वामित्राला पृच्छा केल्यावरून त्यानें त्यास त्यांची ओळख करून दिली व तेथें येण्याचा उद्देशही सांगितला. त्यावर जनकानें आज्ञा केल्यावरून पुष्कळ सेवकांनीं मिळून एक मोठी व जड पेटी त्या ठिकाणीं आणिली व उघडिली. रामानें तींतील तें धनुष्य सहज बाहेर काढलें व तें वांकविलें. त्याबरोबर अत्यंत जुनाट झालेलें तें धनुष्य कचकलें व त्याचे मोडून तुकडे होऊन मोठा भयंकर आवाज झाला.* इतक्या तरुण व स्वतः

* हें धनुष्य शिवाचें असून तें जनकाच्या वंशाजवळ ठेव म्हणून ठेवण्यांत आलें होतें, असें रामायणांत म्हटलें आहे. शैव अथवा वैष्णव यां-

[पुढें चालूं]

इच्छिलेल्या वराकडून जवळ जवळ अशक्य वाटणाऱ्या प्रतिज्ञेची पूर्ति झालेली पाहून जनकाचा आनंद गगनांत मावेनासा झाला. त्यानं यज्ञ लौकर आटोपला व विवाहसामग्री तयार करण्याची आज्ञा केली, आणि रामाच्या या अद्भुत पराक्रमासंबंधी बातमी दशरथाला अयोध्येंत कळवून त्याला रामचंद्राच्या विवाहाचा शुभ समारंभ करण्याकरितां आमंत्रण पाठविलें. योग्य वेळीं वरपक्षाकडील बऱ्हाड मिथिलेस आलें व निश्चित दिवशीं वसिष्ठ व गौतमाचा पुत्र शतानंद यांनीं खऱ्या रजपूत पद्धतीप्रमाणें राम व सीता यांच्या वंशावळी म्हणण्यास सुरवात केली. योग्य संधि साधून विश्वामित्र ऋषीनें, जनकाचा भाऊ कुशध्वज याच्या तीन कन्या रामाच्या तीन भावांना देऊन दोन घराण्यांत घडून येत असलेला हा संबंध जास्त दृढ करण्यांत यावा अशी सूचना केली. ही सुखद सूचना दोन्ही पक्षांनीं मोठ्या आनंदानें मान्य केली. व वृद्ध राजांनीं व वृद्ध-ऋषींनीं आपल्या पुत्रांचे व शिष्याचे विवाह मोठ्या समारंभानें व आनंदानें साजरे केले.

याच ठिकाणीं जातां जातां आपण, सीता 'अयोनिजा' होती ही समजूत कां पडली याचा विचार करूं. बहुधा मूळ रामायणांत सीता अयोनिजा होती असें दाखविण्यांत आलेलें नसेल. कारण पहिल्याच सर्गात — व हाच सर्ग फार जुना दिसतो हें आम्हीं

पान १४० वरून

मधील भांडणाचा उल्लेख करण्याचा मात्र यांत मुळींच उद्देश नाहीं. कारण यांपैकीं कोणताच पक्ष जनकाच्या अथवा वाल्मीकीच्या वेळीं नव्हता. तें धनुष्य शिवाचें होतें, असें म्हणण्यांत धनुष्याचें महत्व दर्शविण्याचाच फक्त कवीचा उद्देश आहे. दुसऱ्या एका ठिकाणीं तें वरुणाचें धनुष्य होतें असेंही म्हटलेलें आहे.

दाखविलें आहेच—सीता जनकाच्या वंशांत उत्पन्न झाली होती, असें लिहिलेलें आढळतें. या ठिकाणीं घडून येणारी विसंगतता टीकाकाराच्या सुद्धां ध्यानांत आली असून तो तिजवर पांघरूण घालण्याचा प्रयत्न करतो. सीता जमिनींतून नांगराच्या तासांतून उत्पन्न झाली ही अलीकडील कल्पना सीता या शब्दाचा अगदीं अक्षरशः अर्थ लावण्याच्या प्रवृत्तीमुळें उत्पन्न झाली असेल; कारण सीता या शब्दाचा अर्थ तास असा असून, लोकमतानें सीतेला लक्ष्मीचा अवतार बनविल्यावर त्याला महाभारतांतील द्रौपदी यज्ञाग्नीपासून उत्पन्न झाली होती या गोष्टीचें अनुकरण करण्याचा मोह आवरला नसावा. या सिद्धांतास अनुसरून रामायणांत दुसऱ्या एका ठिकाणीं जनक स्वतः जमीन नांगरीत असतां सीता त्याला सांपडली, असें लिहिलेलें आहे.* परंतु जनक स्वतः जमीन नांगरील हीच गोष्ट असंभाव्य होय नांवांचा अगदीं शब्दशः अर्थ लावण्याच्या प्रवृत्तीमुळें यापेक्षांही अस्वाभाविक कल्पना लोक समजांत शिरल्या आहेत, त्या कोणत्या हें आम्हीं पुढें दाखविणारच आहों.

विवाहसमारंभ विधिपूर्वक पार पडल्यानंतर दशरथ आपल्या चारी विवाहित मुलांसह अयोध्येस परत आला. वाटेंत क्षत्रिय जातीचा प्रसिद्ध शत्रु जो परशुराम त्याची त्यास भेट होणें हीच विशेष गोष्ट घडून आली. हा प्रसंग ऐतिहासिक असो अगर दृष्टांतरूप असो; त्याचा रामायणांतील कथेशीं मुळींच संबंध नाहीं; व कथौघाला तर त्याची मुळींच जरूर नाहीं.

———

* तस्य लांगलहस्तस्य कृषतः क्षेत्रमंडलम् ।
अहं किलोत्थिता भित्त्वा जगतीं नृपतेः सुता ॥

प्रकरण ९ वें.

देव देतो आणि देव नेतें.

रामाचा सीतेशीं विवाह झाल्याला आतां बारा वर्षें झालीं असून तो आतां चांगला पोक्त वयाचा व अनुभविक पुरुष झाला आहे व वृद्धत्वामुळें आतां राज्यकारभार करण्याची शक्ति आपल्या आंगीं राहिला नाहीं असें पाहून दशरथानें रामाला युवराज नेमण्याचा निश्चय केला. धर्मगुरु, नागरिक व मांडलिक यांची एक राजकारण-विषयक सभा भरवून त्यांचा या बाबतींत राजानें सल्ला विचारिला. त्या सभेनें रामाची अमर्याद स्तुति करून राजाच्या त्या विचाराला पूर्ण संमति दिली. अर्थात् समारंभाची तयारी करण्यासाठीं हुकूम सुटले व उद्यां रामाला यौवराज्याभिषेक करण्यांत येईल असें जाहीर करण्यांत आलें.

लगेच नगराला अत्यंत आनंदी स्वरूप प्राप्त झालें. निशाणें उभारलीं गेलीं; रस्ते धुवून त्यावर सुगंधी जलाचे सडे घालण्यांत आले; राजवाडे व घरें सुशोभित होऊन दीपांनीं चमकूं लागलीं; देवालयें पुष्पमालांनीं भरलीं; व लोक अत्यंत भपकेबाज पोषाख करून बाहेर पडूं लागले. पुनर्रचनाकारानें पाटलिपुत्रासारख्या मोठ्या नगरांत व अग्निमित्रासारख्या महान राजाच्या काळीं जें स्वतः डोळ्यांनीं पाहिलें असेल त्यावरून हें वरील वर्णन बहुधा रामायणांत घेतलें असावें; कारण रामाच्या वेळीं देवालयें अस्तित्वांत नव्हतीं व त्या धामधुमीच्या काळांत असे सार्वत्रिक उत्सवही होत नसावें; हें आम्ही दुसरीकडे दाखविणारच आहों; परंतु त्यावरून एवढें मात्र

धरून चालण्यास हरकत नाहीं कीं, हा महाप्रसंग साजरा करण्या-करितां त्या वेळीं अस्वस्थचांत असणाऱ्या सुधारणेच्या मानानें त्या नगरीनें शक्य तेवढ प्रयत्न केले.

नगरीचें तें सुखद व आनंदी स्वरूप पाहून प्रत्येकाला आनंद झाला; परंतु दशरथाची तरुण व सुस्वरूप पत्नी कैकेयी हिची धात्री मंथरा हिला मात्र आनंद झाला नाहीं. कैकेयीच्या प्रासादाच्या गच्चीवरून ती अयोध्या नगरीकडे पहात असतां, "रामाला जें उन्नत स्थान देण्यांत येणार आहे तें स्थान त्यास प्राप्त झाल्यावर कौसल्येचें महत्व वाढणार व याच कौसल्येला मी कित्येक वेळां दुखावलें असेल; शिवाय तिचें महत्व वाढलें म्हणजे दशरथाच्या धाकट्या पण आवडत्या राणीची धात्री म्हणून जें माझें महत्व आहे तें कमी होणार" असे विचार तिच्या मनांत घोळूं लागले. आपल्या उच्छृंखल स्वामिनीचें छांदिष्ट मन वळविण्याच्या प्रयत्नास ती लागच लागली. "भरत मामाकडे गेला असतां त्याच्या गैरहजिरीचा फायदा घेऊन दशरथ रामाला यौवराज्याभिषेक करीत आहे व अशा रीतीनें तो तुझा अवमान करून तुला धुळीस मिळवीत आहे; तो तुझी निव्वळ खुशामत करितो व तुला तोंडानें तूं मला प्रियतम आहेस म्हणून सांगतो. परंतु त्याची खरी मर्जी कौसल्या व राम यांच्यावरच आहे" असें ती कैकयीच्या मनांत भरवून देऊं लागली. रामाला उन्नत स्थान मिळण्याविषयीं तिचें मन कलुषित करण्यांत मंथरेला लौकरच यश आलें, व 'दशरथानें तुला पूर्वी दिलेले वर तूं आतां मागून घे; आतांच ते पूर्ण करून घेण्याची खरी वेळ आहे; एका वरानें तूं भरताला यौवराज्य मागून घे व ज्या ठिकाणीं भयंकर नरमांसभक्षक असे राक्षस नेहमी स्वाऱ्या करितात व आर्यांना खातात त्या दंडकामध्यें रामाला १४ वर्षें हद्दपार

करा असें दुसऱ्या वरानें मागून घे " असा तिनें कैकयीला उपदेश केला. असें करण्याची किती जरूरी आहे हें त्या छांदिष्ट राणीच्या मनांत चांगलें बिंबलें व धात्रीनें सांगतल्याप्रमाणें वागण्याचा तिनें निश्चय केला.

दशरथाला या प्रकाराबद्दल मुळींच संशय नव्हता; तेव्हां तो नेहमींप्रमाणें निःशंक मनानें आपल्या आवडत्या राणीसह रात्र घालविण्याच्या उद्देशानें तिजकडे आला; तों ती त्याला एखाद्या संतप्त नागिणीप्रमाणें भासली. केस अस्ताव्यस्त मोकळे सोडून ती धुळींत लोळत होती, व दशरथानें ती जें काय मागेल तें देण्याचें कबूल केल्याशिवाय ती त्याचें कांहीही ऐकेना. तुला कय वाटेल तें देईन असें राजानें सांगितल्यावर तिला पढावलेलें सर्व कांहीं तिनें राजास सांगितलें. रामाला हद्दपार करा हें तिचें वज्राघातासारखें मागणें ऐकून राजानें धरणीवर अंग टाकलें. 'तूं एवढी मागणी मागूं नको, मी दुसरें पाहिजे तें तुला देतों' अशी त्यानें तिची शक्य तितक्या प्रकारांनीं विनंति केला; परंतु आपल्या हेतूपासून ती मुळींच ढळेना. त्यामुळें सर्व रात्र जागलेला राजा सकाळीं अगदीं निस्तेज होऊन हंथरुणावर पडला व त्याचा श्वासोश्वास अति मंद चालूं लागला. नेमलेल्या वेळीं अभिषेकाच्या आनंददायक समारंभांत भाग घेण्याकरितां ऋत्विज व प्रधान एकाठिकाणीं मिळाले; परंतु राजा आजारी असून त्याला हालतां चालतां येत नाहीं असें ऐकण्याचें मात्र त्यांचे नशिबांत होतें! त्या उद्धत राणीनें आज्ञा केल्यावरून, व तिच्या आज्ञेला राजानें मानेनें संमति दिल्यावरून रामाला बोलावणें पाठावण्यांत आलें. आदल्या दिवशीं रात्रभर उपाशी राहून सीता ईश्वराची प्रार्थना करीत होती. तिनें मोठ्या प्रेमानें रामाला नरोप दिला, व आतां लौकरच आपला पति राजचिन्हांनीं

युक्त असा परत येईल अशी तिला आशा वाटूं लागली. परंतु ईश्वराची इच्छा निराळी होती !!

राम महाराजासमोर आला; परंतु राजा आजारी व दुःखी असून बोलत नाहीं हें पाहून तो स्तंभितच झाला माझ्यावरी नेहमींप्रमाणें प्रेमानें बोला अशी त्यानें राजाला विज्ञप्ति केली; परंतु राजाचा घसा दाटून आला. रामानें दशरथाच्या त्या दुःखद स्थितीचें कारण आपल्या सावत्र आईस विचारिलें, तेव्हां, " दशरथानें माझ्या मुलास युवराजपद दिलं आहे व तुला दंडकांत १४ वर्षेपर्यंत हद्दपार केलें आहे; तूं जवयास निघाल्याशिवाय ता बोलणार नाहीं " असें त्या मायावी स्त्रीनें त्यास सांगितलें. राजानें निषेधपूर्ण किंकाळा फोडली आणे त्याच्या नेत्रांतून अश्रुधारा सुरू झाल्या. सर्व परिस्थिति रामाच्या ध्यानांत येऊन तो आपल्या पित्याचें शांतवन करूत म्हणाला. "मला कहीं राज्यश्रीचें विशेष प्रेम नाहीं; माझ्या पित्यानें आपलें वचन खरें करून आपली दुष्कीर्ति टाळावी हेंच मला जास्त श्रेयस्कर वाटतें; भरताला राज्य देऊन मी हद्दपार होण्यास तयार आहें " असें त्यानें कैकेयीस सांगितलें. त्याला शब्दांतच पकडण्याचा मोह त्या कपटी स्त्रीस आवरला नाहीं, व " आजच तयारी करून राज्याच्या पार हो " अशी तिनें त्यास आज्ञा केली. रामाला अंतर्मनीं दुःख झालें; पण आपले मनोविकार लपविण्याचा प्रयत्न करीत तो कौसल्यला आपल्या दैवचक्राच्या आकस्मिक फेऱ्याची बातमी सांगण्याकरितां तिजकडे गेला. तें ऐकून कौसल्येच्या सर्व आशा पार वितळून गेल्या. तिचा पुत्र राम हा बापाचा लाडका असूनही तिला कोणी विचारीत नसे. आतां राम गेल्यावर तर सवत तिचा पदोंपदीं अपमान केल्यावांचून राहिली नसती. परंतु तिचें सांतवन करून पित्याची आज्ञा मानणें

हें तुझें व माझें दोघांचेंही कर्तव्य आहे, असें रामानें तिला सांगितलें. रोहटीं त्याचें म्हणणं कबूल करून " दशरथाच्या पुत्रास हें सर्वस्वी योग्यच होय" असें ती म्हणाली. " मी १४ वर्षपर्यंत हें दुःख कसबसें सहन करीन; परंतु त्यानंतर परत येऊन मला वृद्धपणीं आनंद देण्यास चुकूं नको " अशी तिनें त्याची विनवणी केली.

केवळ आपल्या आवडत्या राणीकरितां आपला ज्येष्ठ पुत्र राम याचा त्याग करणाऱ्या या चळलेल्या म्हाताऱ्याला कैदेंत टाकून आपली कायदेशीर वडिलोपार्जित संपत्ति रामानें आपल्या ताब्यांत घ्यावी अशी जा त्या वेळेस शीघ्रकोपी लक्ष्मणानें सूचना केली तिचा इतिहासकारांनीं मोठा बाऊ केला आहे. कौसल्येनें सुद्धां लक्ष्मणाच्या या सूचनेला संमति दिली होती असें रामायणांत म्हटलेलें आहे.* त्या दोघांचे हे असले घाणेरडे विचार केवळ क्षणिक असून आपल्या अंतःकरणांत भिनून राहिलेल्या व प्रियतम अशा आशा दैवाच्या वादळांत सांपडून एकाएकीं भंग पावल्या असतां शुद्धतम मनुष्याच्या मनांत सुद्धां कधीं कधीं नाच विचार आल्याशिवाय कसें रहात नाहींत हें दाखवेण्याकरितांच कवीनें हे विचार त्यांच्या तोंडीं घातले असावे. आपल्या ज्येष्ठ व पूर्ण वारस असलेल्या भावाच्या हक्कावर आलेली गदा सहन न होऊन लक्ष्मणाच्या मनांत व मस्तकग्रस्त होऊन आपल्या पुत्राचा आधार नाहींसा होणार या भीतीनें राणीच्या मनांत, असले अन्याययुक्त विचार थोडा वेळ आले असतील. या असल्या क्षणिक विकारावर त्यांनीं तेव्हांच जय

---

* राम हा वनवासांत गेल्यानंतर दशरथ कौसल्येकडे रहावयास गेला असतांना तिनें त्यास विष घालून मारलें, असा या तिच्या संमतीच्या जोरावर टाल्बाईज व्हीलर यानें तर्क बांधिला आहे.

मिळविला व बापाच्या इच्छेनुसार अरण्यांत जाणाऱ्या रामाला त्याचा भाऊ व आई या दोघांनीहि परवानगी दिली.

राम नंतर आपल्या घरीं गेला. त्या ठिकाणीं त्याची प्रेमळ पत्नी भावी यौवराज्याच्या वैभवसह तो आतां येईल मग येईल, अशा आशेनें वाट पहात होती; परंतु पुढें जातांच राम वैभव विना व दुःखी मुद्रेनें येतांना पाहून तिच्या हृदयानें ठाव सोडला, व तिनें मोठ्या अधीरपणानें विचारिलें "हें असें कां?" आनंद आणि कीर्ति, दुःख आणि अपकीर्ति या सर्वांची भागीदारीण अशी आपली प्रिय व प्रेमळ पत्नी पुढें येतांच, ज्या धैर्यानें आतांपर्यंत रामेंसा अपलें दुःख आवरून धरिलें होतें तें त्याचें धैर्य पार गळलें, अनें दाखवून कवीनें मानवी स्वभावातील एक अत्यंत नाजुक पडदा खुला केला आहे. बौद्ध कथेंत दाखविल्याप्रमाण राम त्या वेळींही शांत व विकाररहित राहिला असें जर त्यानें दाखविलें असतें तर तें अत्यंत अस्वाभाविक दिसलें असतें. तें चंचल व भंगुर अशा मानवी मनाचें ओढून ताणून काढलेलें अस्वाभाविक चित्र झालें असतें. अत्यंत दुःखानें व अश्रुपातामुळें दाटून गेलेल्या आवाजानें त्यानें सीतेला आपल्या नशिबाचा फेरा कसा फिरला तें सांगून "आतां माझा दीर्घ विरह सोसण्यास तयार हो व अत्यंत पवित्र आचरण ठेवून राजा भरताची कोणतीही आज्ञा निमूटपणें मानीत जा" असा त्यानें तिला मोठ्या दुःखभरानें उपदेश केला.

परंतु ती प्रेमळ पत्नी आपणास असें दूर लोटून घेण्यास तयार नव्हती. तिनें त्याच्या बरोबर जंगलांत जाण्याचा हट्ट धरला. "पत्नी ही एकटी पतीच्या सुखदुःखाची वाटेकरीण होय. आपल्या सहवासांत मला अरण्य हें स्वर्गाहूनहि सुखकर वाटेल; परंतु आपला विरह झाल्यास मला प्रासादसुद्धां नरकासारखे दुःखद होईल

माझें संरक्षण करण्यास आपण समर्थ आहां; व जर नसाल तर जनकाचे जामात होण्यास आपण मुळींच योग्य नाहीं" असें आपल्या क्षत्रिय स्वभावास अनुसरून तिनें सांगितलें. "मी कोणत्याही तऱ्हेची कुरकुर अथवा तक्रार करणार नाहीं; मी आपल्या सहवासानें आपल्यास सुख देईन; एवढेंच नव्हे, तर आपल्या पुढें चालून मी आपल्या पायांनें काट्यांचा सुद्धा चुराडा करीन व आपला मार्ग निष्कंटक व सुखद करीन." इत्यादि रीतीनें ती त्याची विनवणी करूं लागली. या प्रसंगाइतका हृदयविदारक व कल्पनारम्य असा दुसरा प्रसंग कोठेंच नाहीं. या ठिकाणीं वाल्मीकीनें आपल्या कौशल्याची कमाल केली आहे. अरण्यवासांतील सर्व अडचणी व दुःखें आपल्यास अगदीं हलकीं वाटतात असें सांगून व त्याची रुंद छाति व आपला धडधडणारा उर अश्रूनें भिजवून टाकून तिनें मला मागें न ठेवतां आपल्याबरोबर घेऊन चला अशी त्याची करुणा भाकली. तिचें धैर्य व स्थैर्य याविषयीं याप्रमाणें खात्री पटून "मी तुझी केवळ परीक्षा घेतली; तुझ्यावांचून मला स्वर्गातही सुख लागणार नाहीं. तुझ्या सर्व वस्तु नोकरचाकरांना व ब्राह्मणांना देऊन टाकून वनांत जाण्याची आतांच्या आतां तयारी कर" असें रामनें तिला सांगितलें.

लक्ष्मणानेंही त्यानंतर वनांत जाण्यास परवानगी मागितली. रामानें त्याला परावृत्त करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला; परंतु नाइलाज होऊन शेवटीं त्यालाही बरोबर येण्यास त्यानें परवानगी दिली. आपल्याजवळ असणारी संपत्ति व इतर वस्तु नोकर चाकर, मित्रमंडळी व ब्राह्मण यांमध्यें वाटून टाकून ते निघेहीं आपल्या प्रिय पित्याचें राज्य जाण्यास अन्वार्णच निघाले. त्याच्या दैवगतींतील काय विलक्षण फेर हा! युवराजपद प्राप्त होऊन चार घोड्यांच्या

सोनेरी गाडींत बसला आहे; पुढें हत्ती डुलत डुलत चालले अहेत; मागून घोडे चालत आहेत अशा स्थितींत राम रस्त्यांतील लोकांना दिसण्याऐवजीं तो भिक्षुकासारखा पायींच चालला आहे; त्याच्या पाठीमागें त्याची पतिनिष्ठ बायको व प्रेमळ भाऊ असून सीताही पायींच चालत आहे असा देखावा त्यांच्या दृष्टीस पडला. हलके हलके स्त्रीसुलभ बातमी लोकांच्या कानावर देऊन ते म्हणूं लागले, "कैकेयीचा धिक्कार असो, त्या चळलेल्या म्हातारीलाही धिक्कार असो. ही कपटी स्त्री बिचारा राम व सीता यांचे कायदेशीर हक्क हिरावून घेत आहे" परंतु राम, सीता व लक्ष्मण मार्गानें अत्यंत शांतपणें चालून राजवाड्यांत येऊन पोंहोचले. लोकांच्या चुकीनें राम, सीता व लक्ष्मण आपला निरोप घेण्याकरितां आले असून ते देवडीवर उभे आहेत अशी दशरथाला वर्दी दिली.

आपल्या सर्व पत्न्यांना त्या पितृभक्तिशाली व धैर्यसंपन्न राजपुत्रांचें शेवटचें दर्शन मिळावें या हेतूनें त्यानें आपल्या स्त्रियांना एकत्र बोलाविलें. तेव्हां सहेतानशें (ही संख्या मागूनची अतिशयोक्तीची असावी) तरुण, शोकनें डोळे लाल झालेल्या स्त्रिया क्षणोक्षणीं मूर्च्छित होत असलेल्या कौसल्येच्या मागोमाग राजाजवळ आल्या व नंतर रामास आंत येण्यास परवानगी मिळाली. राम आंत येतांच आपल्या आवडत्या अपत्यास मिठी मारण्याकरितां तो प्रेमळ पिता पुढें धांवला; परंतु श्रमाअळें व पश्चात्तापामुळें तो मध्येंच मूर्च्छित पडला. शोकवरीत वरीतच त्याच्या मुलांनीं त्याला उठविलें व बिछान्यावर निजविलें. तो शुद्धींत आल्यानंतर "आपल्या या पुत्राला शांत व मोकळ्या मनानें वनांत जाण्याची परवानगी द्या; सीता व लक्ष्मण हींही मागें रहाण्यास तयार नाहींत; आपल्या मुलांचे आपण धनी आहां; तरी त्यांनाही मजबरोबर

येण्याची परवानगी असावी" अशी रामानें राजास विनंति केली. तो निराश झालेला राजा, त्याला जाण्यापासून परावृत्त करण्याचा शेवटचा वेडेपणाचा प्रयत्न करण्यासाठीं म्हणाला, "रामा, कैकयीनें या तुझ्या पित्याला फसवून त्याच्यापासून दोन वर मागून घेतले आहेत. तरी त्याला कैद करून त्याच्याऐवजीं तूं राज्य कर." परंतु बापानें परवानगी दिली तरी अशला मार्ग स्वीकारण्याइतका राम दुष्ट नव्हता. हक्काच्या व अनुभवाच्या दृष्टीनें पृथ्वीचें राज्य करण्यास आपणच योग्य आहां, व मलाही राज्याविषयीं मुळींच प्रेम नाहीं असें त्यानें राजास सांगितलें. वनांतील आयुष्य सुखकर व सोपें व्हावें, याकरितां त्याजबरोबर नोकर चाकर, धनधान्य व संपत्ति इत्यादि पाठवा अशी नंतर दशरथानें आपल्या प्रधानास आज्ञा केली; परंतु कारस्थानी कैकेयीला तें एकून भीति वाटली व तीं तें मान्य करीना. "सोमाचा पात्रांतील सर्व सोम पिऊन झाल्यावर त्यांतला गाळ जसा कोणी घेऊं इच्छणार नाहीं; त्याप्रमाणें माझ्या पुत्रालाही कोरडें राज्य नको आहे." अशी ती उद्गारली. दशरथ "धिक्कार धिक्कार" असें ओरडला; परंतु त्याचा त्या निर्लज्ज स्त्रीच्या मनावर कांहींच परिणाम झाला नाहीं. शेवटीं राम मध्यें पडला व "मला वनवासाचे वेषांत आयुष्य घालवावयाचें आहे. तेव्हां असलीं व दुसरीही सुखें त्या आयुष्यांत योग्य नाहींत; वनवासांना फक्त वल्कलें व जमीन खणण्याचा बुदळ एवढ्याच जिनसा लागतात." असें ते म्हणाला. लगेच कैकयीनें त्या जिनसा आणवून त्याच्या पुढें ठेविल्या. रामानें कांहींही गोंधळ न दाखवितां वल्कलें धारण केलीं व लक्ष्मणानेंही तोच मार्ग स्वीकारिला; परंतु सुंदर सीतेला नेहमीं फक्त रेशमी वस्त्रें नेसण्यापांघरण्याची सवय असल्याकारणानें आपल्यापुढें ठेवलेलीं तीं दोन दर्भाचीं वस्त्रें पाहून तिला भीति

वाटली व डोळ्यांत अश्रू आणून व हातांत तीं वस्त्रें घेऊन गंधर्व-राजपुत्राप्रमाणें सुंदर अशा आपल्या पतीकडे तिनें पाहिलें व गोंधळून जाऊन विचारिलें. " ऋषिपत्न्या वल्कलें कशीं धारण करतात ? " अशा गळ्याभोंवती एक वस्त्र घेऊन शून्य चित्तानें तें हालवीत ती उभी राहिली, व तिला लाज वाटून ती इतकी गोंधळली कीं ती आतां मूर्च्छित होते कीं काय असें प्रतिक्षणीं वाटूं लागलें. असल्या संतापजनक प्रकाराचा कधींच अनुभव नसलेल्या त्या राजपुत्रीच्या शोकामुळें प्रासादांतील स्त्रियांच्या डोळ्यांतून अश्रु वाहूं लागले, व गाईवरून जाऊन त्या एकदम ओरडल्या. " रामा सीतेला अरण्यांत नेऊं नको; तिला वाघीं हद्दपार केलेली नाहीं, वनांत ऋषिपत्नीप्रमाणें राहण्याला सीता योग्य नाहीं, " परंतु रामानें त्याच्या म्हणण्याकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं. तो आपल्या साध्या पत्नीच्या मदतीला धांवला व तिच्या रेशमी साडीवरूनच त्यानें तिला तें वल्कल नसावलें.

आपल्या कल्पनाशक्तीला मोकळी सोडून वाल्मीकीनें मोठ्या कौशल्यानें वठविले या सुंदरतम व अत्यंत हृदयदारक चित्रांपैकीं एक चित्र वर्णिलेप्रमाणें आहे. हा प्रसंग इतका करुणरसपूर्ण, परंतु त्याचप्रमाणें इतका सुंदर आहे कीं, सुख व दुःख यांनीं हृदयावर एकदमच ताबा मिळविणें हें जें करुणसाधान काव्याचें सार तें त्यांत आपणास पूर्णपणें दिसून येतें. उच्च कुलांत जन्मलेल्या त्या राजपुत्रीची दुःखद स्थिति पाहून वसिष्ठ सुद्धां विकरवता झाला व मानवी पित्याच्या जर कैकेयी तिची निंदा करून ' रामाबरोबर आम्ही वनांत जाऊन तुझा मुलगा भरत याला हें नगर वनासारखें करून देऊं ' असा त्यानें तिला धाक घातला. दशरथ सुद्धां " विचाऱ्या सीतेनें काय पाप केलें आहे ? तूं तिला नेसण्यास वल्कलें द्यावींस

असें तिनें तुझें काय केलें आहे ?" असें ओरडला व तिला वनवासात लागतील तितकीं वस्त्रें व भूषणें देण्याचा त्यानें हुकूम केला. कोसल देशाच्या सरहद्दीपर्यंत रामाला पोहोंचविण्यासाठीं रथ तयार करण्याचा हुकूम झाला; त्याप्रमाणें रथ तयार झाला. रामही आतां आपल्याला येथून पाय काढण्यासाठीं या भेटीचा शेवट लवकर केला पाहिजे असा विचार करून जास्ती कांहीं न बोलतां प्रथम पित्याला नंतर आईला व नंतर इतरांना अशा अनुक्रमानें शेवटचा नमस्कार करून राजवाड्यांतून घाईनें बाहेर पडला. लक्ष्मणानें आपली आई सुमित्रा हिला निरोपाचा नमस्कार केल्यावर तिनें त्याला केलेला उपदेश मोठा सुंदर व तेजस्वी आहे. "रामाला दशरथ समज, सीतेच्य ठिकाणीं मी आहे असें जाण, वन हेंच अयोध्या नगरी आहे असें मान व माझ्या पुत्रा, निर्भयमनानें अरण्यांत जा" असा तिचा त्याला हा उपदेश होता.

राम, सीता व लक्ष्मण यांसह रथांत बसला व सारथी सुमंत याने घोड्यास चाबूक लगावला. राजवाड्यांतून एकदम दुःखपूर्ण आक्रोश बाहेर ऐकूं आला व दशरथ बाहेर येऊन "रामा थांब, एक क्षणभर थांब" असें ओरडत रथामागें धावूं लागला; परंतु रामाला ऐकूं गेलें नहीं, अथवा ऐकूं येतेसें त्यानें दाखविलें नाहीं; आणि शेवटीं त्या अरुक्त राजाच्या दृष्टिपथाच्या पार जेव्हां तो निघून गेला, तेव्हां दशरथ अयोध्येच्या रस्त्यांत मूर्च्छित पडला.

शुद्धींत आल्यावर, त्यानें मला कौसल्येच्या महालांत न्या असें सांगितलें. त्या ठिकाणीं सहा दिवस व सहा रात्रीं त्या वृद्ध दांपत्यानें शोकांत व दुःखांत घालविल्या. शेवटीं सातव्या दिवशीं तो निराश झालेला राजा "रामा, रामा. आपल्या पित्याच्या आवडत्या पुत्रा तूं कोठें रे गेलास !" असा शोक करीत असतां

अंत पावला. अगदीं शेवटीं त्याला एक पूर्वीची आठवण झाली. उन्हाळ्या दिवसांत एके दिवशीं रात्रीं तो शिकारीला गेला असतां एका जलाशयावर एक तरुण आपल्या वृद्ध पितरांना पाणी नेण्याकरितां आला होता. तो कमंडलू पाण्यानें भरून घेत असतां हत्तीच्या पाणी पिण्यासारखा आवाज वाटल्यामुळें दशरथानें बाण सोडला; परंतु मनुष्याची किंकाळी ऐकून तेथें जातांच आपला बाण एका मनुष्याला लागल्याचें त्याला दिसून आलें. त्याच्या शेवटच्या इच्छेप्रमाणें व सांगण्याप्रमाणें त्यानें तें पाण्याचें भांडें त्याच्या वृद्ध व आंधळ्या आईबापाकडे नेलें; परंतु हा आपला प्रिय पुत्र नव्हे असें जाणून त्यांनीं तें पाणी घेतलें नाहीं, शेवटीं त्यांनीं आपल्या अपत्याच्या शवावर अंग टाकिलें व प्राण सोडिले. मरते-समयीं 'तूंही पुत्रशोक होऊन मरशील' असा त्यांनीं त्याला शाप दिला. अशी ती गोष्ट आहे. श्रावणाच्या मृत्यूसंबंधी व त्याच्या पित्यानें दिलेल्या व अक्षरशः खऱ्या झालेल्या शापासंबंधाची ही गोष्ट इतकी करुणरसपूर्ण आहे कीं, आजपर्यंत कोणत्याही कवीची कल्पन (ही गोष्ट जर खोटी असेल) याच्यापेक्षां जास्त करुण रस उत्पन्न करूं शकलेली नाहीं.

रामाला अयोध्येंतून झालेली हद्दपारी व दशरथाचा मृत्यु या-विषयींची हकीगत आम्हीं जरा विस्तारानें सांगितली यांतील हेतु, वरील्प्रमाणें अत्यंत साधा व अतिशयोक्तीपासून अलिप्त असूनही करुणरसपूर्ण व नैतिक दृष्ट्या अत्यंत उदात्त व अत्यंत सुंदर असा रामायणांतील भाग जें अयोध्याकांड त्यांतील काव्य-विषयक गुणांची वाचकाना चांगली ओळख व्हावी हाच होय. वाचक ज जसा हीं वर्णनें व भाषणें वाचीत जातो तसतसे त्याला शोकाचें भरतें येतें व सर्व गोष्टी आपल्या डोळ्यांसमोर घडत अहेत

असा त्याला भास होतो. नैतिक दृष्ट्या या कथाभागाचा परिणाम इतका जोरदार आहे कीं, तो भाग हिंदुस्थानच्या आर्यांच्या डोळ्यांपुढें सतत उदात्त दैवी उदाहरण म्हणून राहील; तो सज्जनांना आपली प्रतिज्ञा पाळण्यास शिकवील; सत्पुत्रांना तो आपल्या पितरांच्या आज्ञा पाळण्यास लावील; कुलीन पत्न्यांना तो आपल्या पतींचें नशीब किंवा हीन खडतर असलें तरी त्यांतही त्याची भागीदारीण आनंदानें होण्यास तयार करील, व कुमार्गगामी व हटवादी स्त्रियांना तो आपल्याला कुब्जा कैकेयीचें नांव मिळेल या भीतीस्तव अन्यायाच्या मार्गात फार दूरवर जाऊं देणार नाहीं. अतिशयोक्तींचा आश्रय न घेतां, अस्वाभाविकाची भसळ न करितां, केवळ साध्या व खऱ्या गोष्टींनें* आपले विकार जागृत करून कवी आपलें मन सर्वसाधारण आयुष्यांतील सिद्धान्तावर अगदीं जखडून टाकतो कीं, ते आपल्या अंतःकरणांत अगदीं खोलवर जाऊन भिनतात; व कोणत्याही परिस्थितींत आपलें कर्तव्य करण्याची शक्ति व धैर्य अंगीं आल्याची आपल्यास साक्ष पटते.

---

* या अत्यंत उदात्त प्रसंगाची हंटरनें आपल्या हिंदुस्थानच्या माझ्या इतिहासांत एका तिरस्कारपूर्ण वाक्यानें वाट लाविली आहे. "दशरथाच्या जनान्यामध्यें एक कारस्थान होऊन त्याचा परिणाम रामाला हद्दपार करण्यांत झाला" असें ते वाक्य असून हंटरसारख्या इतिहासकाराची अशी दृष्टि असावी हें चमत्कारिक होय.

प्रकरण १० वें.

भरताची भ्रातृनिष्ठा.

दशरथामागून गादीवर कोणास बसवावें याविषयीं निश्चित निर्णय झाला नसल्याकारणानें दशरथाचें शव बुजूं नये म्हणून तेलाच्या हौदांत ठेवण्यात आलें. ही चमत्कारिक पद्धत अलीकडील आर्यांत दिसून येत नाहीं. नंतर एक रजदरबार भरून वारसदार नेमण्याबद्दल चर्चा झाली. वसिष्ठाच्या सूचनेवरून भरताला आजोळाहून परत बोलावून त्याच्या पित्याच्या इच्छेप्रमाणें त्यालाच गादीवर बसविण्यांत यावें असें ठरलें. लगेच त्याला आणण्याकरितां दूत पाठविण्यांत आले. दशरथाचा मृत्यु अथवा रामाचा वनवास यांबद्दल कांहींही उल्लेख न करण्याबद्दल त्या दूतांना वसिष्ठानें बजाविलें. ही बातमी कळल्यास केकेयीचा पिता व भाऊ हे स्वतःच राज्य कार्भार करतील अशी कदाचित् वसिष्ठाला शंका आली असावी. या भीतीचीं कारणें पुढें दिलीं आहेत. अश्वपतीची राजधानी गिरिव्रज या नगरीला ते दूत गेले व त्यांनीं "तुझी अयोध्येंत अत्यंत जरूरी आहे" असें भरताला सांगितलें व त्यानें चिंतेनें विचारलेल्या कुशल प्रश्नाला त्यांनीं "तूं ज्यांच्या विषयीं काळजीनें चौकशी करीत आहेस तीं सर्व खरोखर कुशल आहेत" असें शहाणपणाचें उत्तर दिलें. भरतानें तावडतोब आपला आजा व मामा यांचा निरोप घेतला. त्यांनीं त्याला मोठे मौल्यवान् नजराणे दिले, व तो अयोध्यास परत जाण्यास निघाला

भरताचें आजोळ अयोध्येहून अत्यंत लांब असून तें अर्वाचीन

अफगाणिस्थानांत अथवा त्याच्या ही पश्चिमेस असावें. केकय हा शब्द कानाला फारसी शब्दासारखा वाटतो व तो वाचतांच कैकुश्र. कैकोबाद यांची आठवण होते. तो अश्वपति या नांवानें प्रसिद्ध होता; यावरून तर वरील तर्काला जास्तच पुष्टि मिळते. कारण इराण हा देश सुंदर घोड्यांकरितां नेहमीं प्रसिद्ध होता व आहे. भरताला दिलेल्या नजराण्याच्या स्वरूपावरूनही याच मुद्यास बळकटी येते. त्यामध्यें नानातऱ्हेच्या चित्रविचित्र धाबड्या अथवा शाली व हरणांचीं कांतडीं, त्याचप्रमाणें मोठ्या शरीराचे व बळकट जबड्याचे असे अंतःपुरांत वाढविलेले कुत्रे व चांगलीं शिकविलेलीं गाढवें या जिन्नसा होत्या. बळकट कुत्रे व सुशिक्षित गाढवें यांच्या उल्लेखानें या प्राण्यांना अवच्छ मानणाऱ्या हिंदू मनाला कसेसेंच वाटतें. अफगाणिस्थान व इराण यांच्या मधील प्रदेशाच्या राजानें आपली मुलगी अयोध्येच्या राजाला द्यावी; यावरून, सिंधू नदीपलीकडील आपल्या आप्त बांधवांशीं भारतीय आर्य सामाजिक संबंध रामाच्या काळीं ठेवीत असें दिसतें. भारतीय राजे त्यांच्या सुंदर कन्यांशीं नेहमीं विवाह करीत व तिकडील आर्य भारतीय आर्यांपेक्षा धर्मानें अथवा आचारविचारांनीं त्या काळीं विशेष भिन्न नव्हते. *

याच बाबतींत अश्वपति संबंधाची आणखी एक गोष्ट फार महत्त्वाची आहे. अयोध्याकांडच्या १०६ व्या सर्गात सांगितलें आहे कीं, दशरथानें कैकेयीशीं विवाह करतेसमयीं अश्वपतीला शुल्क किंवा मुलीची किंमत म्हणून आपलें सर्व राज्य दिलें होतें. वायव्य सरहद्दीपलीकडील आर्यांत वरापासून पैसा घेण्याची पद्धत

* केकय देश पंजाबांतला असावा असाही तर्क होऊं शकेल.

प्रचलित होती असें दिसतें. आणि विशेष आश्चर्याची गोष्ट ही कीं, आपली मुलगी पंडूला देतांना माद्रीच्या पित्यानें याच पद्धतीचा पुरस्कार केला होता, व भीष्माला त्याला त्याच्या मुलाबद्दल मोठ-मोठे नजराणे द्यावे लागले होते. भारतीय आर्यांचे चुलतबंधु इराणी आर्य यांना भारतीय पुराणांत असुर म्हणतात. व वरील तऱ्हेच्या लग्नांना स्मृतींतून " आसुर विवाह " हें नांव दिलेलें आहे. या गोष्टीवरून अश्वपति असुर अथवा इराणी आर्य होता असेंच दिसून येतें. याच गोष्टीचा आपणास पुढें विचार करावा लागणार आहे.

आपण आतां पुन्हां भरताकडे वळूं. मोठ्या त्वरेनें तो अयोध्येस आला; परंतु ती नगरी आनंदरहित अहे हें पाहून त्याला आश्चर्य वाटलें. तो नगराच्या मार्गातून जड अंतःकरणानें जात राजवाड्यांत पोंचून त्यानें आपल्या मातेस नमस्कार केला. ज्याच्याकरितां तिनें एवढं सगळं केलें होतें तो आलेला पाहून तिला फार आनंद झाला. तिनें त्याला सर्व हकीकत सांगून राजमुकुट धारण करण्यास सांगितलें, व त्यांत त्याला आनंद होईल अशी तिची अपेक्षा होती; परंतु इतक्या दुष्ट कृत्यांनीं मिळावेलेल्या राज्याचा उपभोग घेण्याइतका भरत नीच नसून तो सुपुत्र तसाच भ्रातृनिष्ठ होता. हृदय फुटून मेलेल्या आपल्या बापाकरितां, व स्वतःचा कांहींही दोष नसतां हद्दपार झालेला अपला बंधु राम याच्याकरितां त्यानें फार शोक केला. कैकयीची निर्दयपणाबद्दल त्यानें निर्भर्त्सना केली. व तुझ्या महत्वाकांक्षेची निराशा करण्याकरितां तरी मी रामाला परत बोलावून आणीन अशी त्यानें प्रतिज्ञा केली. वसिष्ठाच्या आज्ञेवरून त्या कष्टी झालेल्या भरतानें दशरथाचा सर्व प्रेतविधि केला. सुतकाच्या बाराही दिवसपर्यंत त्याच्या डोळ्यांतून अश्रु खळले नाहींत. राजदरबारानें त्याला देऊं केलेलें राज्य त्यानें नाका-

रिलें व रामाला अरण्यांतून परत आणण्य करितां मी स्वतः जाणार असें त्यानें लोकांस सांगितलें. लगेच कूच करण्याची तयारी करण्यास्तव हुकूम सोडण्यांत आल.

कारागिरांनीं अरण्यांतून मार्ग तयार केल्यानंतर भरत मोठें सैन्य, कुलगुरु वसिष्ठ व आपल्या तीनही माता यांसहवर्तमान निघाला. लौकरच तो शृंगवेरपुर नांवाच्या नगरांत प्राप्त झाला. हें नगर गंगेच्या अलीकडील तीरावर वसलेलें होतें. त्या ठिकाणीं अयोध्येच्या राजांचा मित्र निषादाधिपति गुह हा राज्य करीत होता. गुहानें दिलेल्या नावांच्या सहाय्यानें भरतानें सैन्य नदीपार होऊन त्या वेळीं अरण्यमय असणाऱ्या "दुआबांत" उतरलें व गंगा यमुना यांच्या संगमाकडे जाण्याकरितां त्यानें कूच केलें या ठिकाणीं भरद्वाजानें आश्रम अथवा ब्राह्मणांचा वसाहत वसविली होती. आश्रमांतील रहिवाशी हे धर्मिक आयुष्य घालवीत असले तरी ते शेतकी करीत असत व वेळ पडल्यास शस्त्रही धरीत असत.

भरत व वसिष्ठ यांचें भरद्वाजानें योग्य स्वागत केलें व "यमुनेच्या पलीकडील तीरावर चित्रकूट नांवाच्या टेकडावर तूं जा, त्याच ठिकाणीं मी रामास गहण्यास सांगितलें आहे" असें त्यानें भरतास सांगितलें. पूर्वी रामानें यमुनाजलाचा खोल ओघ कसा ओलांडिला यांचें सरस वर्णन रामायणांत आपणांस सांपडत असूनही या वेळीं भरतानें यमुना नदी करीं ओलांडिली याविषयीं उल्लेख सुद्धां सांपडूं नये ही आश्चर्याची गोष्ट होय. यमुनानदीच्या दक्षिणेकडील सर्व भाग ओसाड असल्या कारणानें त्या ठिकाणीं नाव अथवा तर मिळणें शक्यच नव्हतें. राम व लक्ष्मण यांनीं लांकडाच्या वाळलेल्या खांद्या एके जागीं वेतींनीं बांधून एक तराफा तयार केला. नंतर त्या दिलदार व शौर्यशाली राजपुत्रांनां सीतेला त्याव

बसविलें व तिला पोहत पोहत तराफ्यासह पलीकडे नेलें. अगदीं अपरिचित असलेल्या अंमझन नदींत असल्याच तऱ्हेचा तराफा तयार करून कित्येक मैलपर्यंत कुशाग्र बुद्धीचे स्पॅनिश लोक तरत गेले या त्यांच्या साहसाच्या कृत्यांची याठिकाणीं ऐतिहासकास आठवण झाल्याखेरीज राहत नाहीं.

मोठ्या श्रमानें नदी ओलांडून रामानें चित्रकूट पर्वताच्या एका उंचवट्यावर आपली पर्णकुटिका बांधली होती. त्या ठिकाणीं दंडकारण्यांतील ब्राह्मण वस्तीला असल्याचें कांहीं पुढारलेंही राहत असत. जटा धारण करणारा व योग्या माणें वल्कलें परिधान केलेला असा तो राम त्या ठिकाणीं आपल्या पर्णकुटिकेसमोर संतेचें मन मांसांच्या तुकड्यांना रंजवीत बसला होता. तेथें त्याला पाहिल्याबरोबर तो सौंदर्य, शौर्य व कडकडीत निश्चय यांचा पुतळाच आहे असें भरताला वाटलें; दुःखभाराखालीं दडपून जाऊन भरत त्याच्या पायाशीं साष्टांग पडला. रामानें त्याला उठवून आपल्या मुलाप्रमाणें आलिंगिलें. भरतापासून आपला पिता मेल्याची बातमी ऐकून रामाला अतिशय दुःख झालें व तो आपल्या सहचरांना म्हणाला. "सीते तुझा सासरा मृत्यु पावला; लक्ष्मणा तुझा पिता इह लोक सोडून गेला. अयोध्येचा राजा स्वर्गवासी झाला. ही भयंकर बातमी हा भरत सांगत आहे." तीं तिघेहीं जण मग जवळूनच वाहात असलेल्या नदीवर गेलीं व स्नान करून त्यांनीं मृत पित्याचें तर्पण केलें. नदीवरून परत येत असतां त्यांना कौसल्या, सुमित्रा, कैकेयी, वसिष्ठ व इतर मंडळी भेटला. माता आणि पुत्र, गुरु आणि शिष्य, प्रजा व तिचा खराखुरा राजा यांच्यामधील ही भेट दुःखद व सुखद अशी दोनही प्रकारची होती.

पहिला दुःखावेग नाहींसा झाल्यानंतर भरतानें रामाला अयो-

ध्येस परत येऊन आपलें राजपद स्वीकारण्याची विनंति केली; परंतु रामानें तो स्पष्ट नाकारिली व तो निश्चयपूर्वक म्हणाला, " ज्याअर्थीं मातेच्या सांगण्यावरून मी माझ्या पित्याजवळ दंडकारण्यांत १४ वर्षें राहण्याची प्रतिज्ञा केली आहे त्याअर्थीं माझी प्रतिज्ञा पाळणें मला प्राप्त आहे " भरतानें कैकेयीची निर्भर्सना करून पुन्हा पुन्हां रामाला राज्य घेण्याविषयीं आग्रह केला, तरी राम आपल्या निश्चयापासून ढळला नाहीं.

या संधीस जाबाली नास्तिकवाद्यांची भाषा अंगिकारून म्हणाला, "पिता तुझा कोण व तूं त्याचें काय देणें लागतोस ? हीं नातीं म्हणजे केवळ कर्मधर्मसंयोगानें उत्पन्न होतात; भरत जर स्वतः होऊन तुला राज्य देत आहे तर तें तूं कां उपभोगीत नाहींस ? ज्या गोष्टी निव्वळ अनुमानसिद्ध आहेत त्यांचाच फक्त विचार करून तूं दृश्य व खात्रीच्या गोष्टी कां नाकारितोस ? लोकांनीं दानें द्यावीं एवढ्यासाठींच हीं श्राद्धें व हे यज्ञ काढलेले आहेत; मेलेल्या माणसाला किंवा दुसऱ्या शरीरांत वास करणाऱ्या त्याच्या आत्म्याला जर श्राद्धांत दिलेल्या आहुत्या पोंचत असतील तर अशाच आहुत्या अथवा असलीं दानें दूर प्रांतीं गेलेल्या आपल्या मित्राला पोंहोचून त्याची भूक त्यांनीं कां शमूं नये ? "

अर्लीकडील काळांत जुन्या धर्ममताविरुद्ध नास्तिकवादी (जैन व बौद्ध यांचाही यांत समावेश होतो) लोकांकडून पुढें आणल्या जाणाऱ्या ठराविक मुद्द्यांपैकी हे कांहीं आहेत व असल्या मुद्द्यांची रामाच्या तोंडून खंडना करवावी या हेतूनें रामायणपुनर्रचनाकारानें ते विस्तारपूर्वक येथें दिले असावे. तत्त्वज्ञानाचा वादविवाद ज्यांत आहे असा हा एकच संवाद रामायणांत असून त्यांत नास्तिक व बौद्ध मतांचें खंडण आहे. जाबालीला रामानें दिलेलें

उत्तर सार्वत्रिक व चिरकालिक सत्यांनीं आणि चिरकालिक नैतिक तत्त्वानीं भरलेलें आहे. सत्यवादित्वाची रामानें केलेली स्तुति खरोखर उदात्तगंभीर आहे. रामानें जाबालीला सांगितलें कीं, जगांतील कोणत्याही वस्तूपेक्षां मला सत्य जास्त प्रिय आहे. कारण—

यद्वृत्ताः सन्ति राजानस्तद्वृत्ताः संति हि प्रजाः ।
अस्ति सत्यात्मकं राज्यं सत्ये लोकः प्रतिष्ठितः ॥

(थोडा फेर करून)

असो; नंतर वसिष्ठानेंही जुन्या मताप्रमाणें ज्येष्ठत्वाचा अधिकार सांगून रामाचें मन वळविण्याचा प्रयत्न केला; परंतु त्यालाही यश आलें नाहीं. तेव्हां शेवटीं भरत म्हणाला "जर मी राज्य केलेंच तर तें तुझ्या नांवानें करीन. आणि जर तूं १४ वर्षांच्या शेवटीं परत आला न हींस तर चितेवर मी स्वतःला दग्ध करून घेईन." मग सोन्यानें भूषविलेल्या खडावांवर पाय ठेवण्यास त्यानें रामास विनंति केली व त्या खडावा आपलें प्रतिनिधित्व दाखविण्याच्या म्हणून तो घेऊन गेला. अयोध्या नगराशीं आल्यावर तो त्यांत न शिरतां बाहेरच जवळ नंदिग्राम नांवाच्या वाडीशीं थांबला व त्याच ठिकाणीं वास्तव्य करून रामाच्या पादुकांच्या नांवानें तेथूनच तो राज्यकारभार पाहूं लागला.

आपला आश्रम अयोध्येपासून फार जवळ आहे व येथें राहिल्यास आपल्या दुःखी आईच्या व बंधूच्या भेटीचा पुनःपुनः प्रसंग येईल अशा विचारानें रामानें चित्रकूट सोडिलें व दंडकारण्यांत तो दूरवर गेला. प्रथम तो अत्रि व त्याची सात्त्विक आणि प्रेमळ गृहिणी अनसूया यांच्या आश्रमाशीं आला. त्यानंतर त्यानें ब्राह्मण वसाहतवाल्यांच्या अनेक आश्रमांना भेट दिली व दक्षिणेंत प्रबल किल्ल्यांत राहणार नरमांसभक्षक अथवा राक्षस यांच्या स्वाऱ्यांनीं या

वसाहतींना वेळोवेळीं अतिशय त्रास पोंहोचत असल्याकारणानें त्याचें आगमन हा एक आपल्यावर ईश्वरी प्रसादच होय अशा बुद्धीनें ऋषींनीं त्याचें प्रत्येक ठिकाणीं चांगलें स्वागत केलें. मेक्सिकोंत स्पॅनिश लोक आपला शिरकाव करून घेत असतां त्यांना जशी निरनिराळ्या देवालयांतून देवास अर्पिलेल्या माणसांचीं प्रेतें सांपडत त्याचप्रमाणें या ब्राह्मणांनीं राक्षसांनीं मारलेल्या आर्यांचीं प्रेतें रामास दाखविलीं. या वसाहतींत रामानें कित्येक वर्षें काढिलीं व या काळांत त्याला राक्षसांशीं पुष्कळ वेळां दोन हात करावे लागले. दंडकारण्यांत सर्वांपेक्षां जास्त दूरवर गेलेल्या अगस्त्याच्या सांगण्यावरून शेवटीं रामानें गोदावरीवर वास्तव्य केलें; व हीच गोदावरी राक्षसांचें राज्य जें जनस्थान किंवा हल्लींचें महाराष्ट्र याची उत्तरेकडील सीमा होती.

प्रकरण ११ वें.

सीताहरण.

मागील पृष्ठांत वर्णिलेले मनोरम प्रसंग रामायणाच्या बालकांडांतील व अयोध्याकाडांतील असून त्यांत अपूर्व, अस्वाभाविक अथवा अतिमानुष असें कांहींच नाहीं. उलटपक्षीं अरण्य व त्यापुढील कांटांत वर्णिलेले प्रसंग दिसण्यास इतके आश्चर्यकारक, इतके अशक्य व इतके अमानुष अथवा अतिमानुष आहेत कीं, ते केवळ कल्पित किंवा अतिशयोक्तिपूर्ण आहेत असें नेहमीं समजण्यांत येतें. सुवर्णमृगाच्या अस्तित्वाला आधार काय व नरमांसभक्षक झाला म्हणून राक्षसाला दहा मस्तकें व वीस हात कोठून येतील? वानरें बोलूं कशीं शकत व मनुष्यांशीं सहकार्य करून त्यांनीं राक्षसांशीं युद्ध कसें केलें? कमीत कमी शंभर मैल रुंदीच्या सामुद्रधुनीवरून एक वानर उड्डाण कसें करूं शकला व वानरांच्या साहाय्यानें केवळ दोन मानवी प्राण्यांनीं प्रत्येक अडचण तरून जाऊन नरमांसभक्षकांचें सबंध राष्ट्र नष्ट कसें केलें? या व अशाच दुसऱ्या अशक्य गोष्टी यापुढील कांडांतून वर्णिलेल्या आहेत; व पुढील कथेला साधारण ऐतिहासिक स्वरूप देण्याचे अगोदर या अशक्य व अस्वाभाविक गोष्टींचें स्पष्टीकरण करणें अवश्य आहे.

परंतु आपण जर हल्लीं उपलब्ध असणाऱ्या रामायणाचेंच

योग्य पृथक्करण केलें तर आपणास आढळून येईल कीं, यांपैकीं कित्येक अस्वाभाविक गोष्टी वाल्मीकीच्या मूळ काव्यांत नव्हत्या अथवा कधींच तोड न केलेल्या दाट अरण्यांनीं भरलेल्या प्रदेशांत प्रथमच शिरकाव करण्याऱ्या लोकांचा अनेक चमत्कारिक रानटी मानवजातींशीं संबंध आला असतां त्या लोकांविषयीं त्यांच्या मनांत साहजिक जी अतिशयोक्तिपूर्ण भावना उत्पन्न होते त्या भावनेंत या अस्वाभाविक गोष्टींचें बीज असावें. अगदीं हिंदुस्थानासारख्याच परिस्थितींत सांपडलेल्या स्पॅनिश लोकांच्या मेक्सिकोवरील विजयाच्या इतिहासाच्या आधारानें या कल्पित अगर अस्वाभाविक अतिशयोक्तिपूर्ण गोष्टी सरळ रामकथेपासून वेगळ्या केल्या तर बुद्धिग्राह्य व बहुधा ऐतिहासिक अशी कथा बाकी उरते, हें कसें तें आम्ही पुढें दाखविणार आहो.

इतिहासांतील अतिशय भयंकर उलाढालींचा प्रारंभ अतिशय लहान असतो; व आश्चर्याचा गोष्ट ही कीं मेक्सिको पादाक्रांत केल्याच्या इतिहासाप्रमाणेंच लंका पादाक्रांत करण्याच्या इतिहासाचा आरंभही एका मूळच्या रानटी रहिवासी स्त्रीच्या प्रेमांत झाला आहे. लंकेचा राजा रावण याची बहीण म्हणून प्रसिद्ध असलेली शूर्पणखा जनस्थानांत राहत असे व जनस्थानांतील या लोकांशीं गोदावरीवरील आपल्या आश्रमांतून राम लक्ष्मण यांचा संबंध साहजिक आला. रामाच्या सुंदर व मनोहर मुखास पाहून तिचें त्याच्यावर प्रेम बसलें व एकदम सरळ मार्ग स्वीकारून तिनें आपली त्याजजवळ विवाह करण्याची इच्छा प्रकट केली. तिच्यापेक्षां रामाची पत्नी पुष्कळ चांगली असल्यानें त्यानें तिची विनंति मान्य केली नाहीं व तूं लक्ष्मणाशीं विवाह कर असें त्यानें सुचविलें; कदाचित् त्यानें हें थट्टेनेंही सुचविलें असल अथवा मनापासून-

ही सुचविलें असेल.* लक्ष्मणाचें रूपही रामापेक्षां वाईट नव्हतें. तेव्हां तिनें रामाची सूचना कबूल केली परंतु तिचें स्वरूप न आवडल्यामुळें म्हणा अथवा तिच्याशीं विवाह केल्यानें भावाच्या सेवेंत व्यत्यय येईल म्हणून म्हणा लक्ष्मणानें तिच्याशीं विवाह करण्याचें नाकारिलें. रामानेंच आपल्या कुरूप पत्नीचा त्याग करून तुझ्या सारख्या अत्युत्तम स्त्रीशीं विवाह करणें योग्य आहे अशी त्यानें तिची आणखी थट्टा केली. लक्ष्मणाच्या या भाषणानें शूर्पणखा चढून गेली व " मी मुळींच रामाच्या कुरूप स्त्रीला खाऊन टाकतें म्हणजे मग मी सवतीशिवाय सुखानें रामाबरोबर नेहमीं राहीन " असें ती म्हणूं लागली. ती एवढें बोलूनच राहिली नाहीं तर भयंकर हावभाव करीत बिचाऱ्या सीतेच्या अंगावर धावून गेली. राम आश्चर्यचकित होऊन मध्यें पडला, त्यानें तिचा हात धरून तिला लक्ष्मणाच्या स्वाधीन केलें व तिला योग्य शिक्षा करण्यास सांगितलें. सीतेवर तिनें केलेल्या नीचपणाच्या हल्ल्याबद्दल आधीच कुरूप असलेल्या त्या स्त्रीचें नाक तरवारीनें कापून लक्ष्मणानें तिला अधिकच कुरूप केलें.

शूर्पणखा रडत रडत जनस्थानांतील आपल्या बांधवांकडे गेली व मोठा आक्रोश करून त्यांस तिनें या दोन नीच मानवांवर सूड घेण्यास सांगितलें. लगेच राक्षसराज्याचा अवमान करण्याचें धाष्टर्य करण्याऱ्या त्या बंधुद्वयाचा नाश करण्याकरितां खर व दूषण हे बरोबर मोठी राक्षससेना घेऊन निघाले. आपल्या भयंकर कृत्यानंतर काय घडून येणार हें रामलक्ष्मणांनीं आधींच जाणलें होतें; व

---

* मेक्सिको देश जिंकण्याच्या इतिहासांत स्पॅनिश लोकांनीं मेक्सिकन स्त्रियांशीं विवाह केल्याचीं उदाहरणें सांपडतात.

सीतेला सुरक्षित ठिकाणीं नेऊन ठेऊन, आपल्यावर चाल करून येणाऱ्या शत्रूवर ज्या ठिकाणावरून चांगला नेम धरतां येईल व जेथून शत्रूच्या हल्ल्यापासून स्वतःचा सहज बचाव करितां येईल अशा एका उंचवट्याच्या जागीं ते उभे राहिले. शेवटीं निकराची लढाई होऊन तींत राक्षसांचा पराभव होऊन त्यांचे दोघेही नेते मारले गेले व इतर राक्षस पळून गेले. रामाची पुढें जी दिगंत कीर्ति पसरली व त्याला राक्षस जे अत्यंत भिऊं लागले त्याचा प्रारंभ रामाचा हा अपूर्व विजय होय. रामायणांत या विजयाचा उल्लेख ठिकठिकाणी मोठ्या अभिमानानें येतो.

चतुर्दश सहस्राणि रक्षसां भीमकर्मणाम् ।
हतान्येकेन रामेण खरश्च सहदूषणः ॥

" अत्यंत भयंकर कृत्यें करणारे चौदा हजार राक्षस व त्याचप्रमाणें खर व दूषण, यांना एकट्या रामानें मारिलें " रामाच्या विरुद्ध पक्षाची संख्या बहुधा अतिशयोक्तिपूर्ण असेल; परंतु त्यावरून त्याच्या या महान् विजयाबद्दल शंका घेण्याचें कारण नाहीं. मेक्सिको पादाक्रांत केल्याचा इतिहास लिहिणारा प्रेस्कॉट असें लिहितो कीं, ओटुंबाच्या (Ottumba) लढाईमध्यें २०० हून कमी अशा स्पॅनिश लोकांनीं केवळ तरवार व भाला या हत्यारांच्या साह्यानें काटक व हट्टवादी मेक्सिकन सैन्याचा मोठा पराभव केला; व हें मेक्सिकन सैन्य अनेकांच्या अनेक मतांप्रमाणें १ पासून २ लाख होते. मेक्सिकोवरील विजयाच्या प्रारंभीं जी ओटुंबाची अविश्वास्य वाटणारी लढाई झाली तिजमधून प्रेस्कॉट पुढील तत्त्व काढतो. "समुद्रकांठावरील गोटे अथवा शरदतूंत झाडाखालीं पडणारीं पानें यांची मोजदाद करणें जसें जवळ जवळ अशक्य आहे, त्याचप्रमाणें

या अव्यवस्थित व रानटी लोकांच्या समूहाचा मोजदाद करणें अशक्य होय. परंतु असें असूनही " नव्या जगांतील " हा एक संस्मरणीय विजय आहे यांत शंका नाहीं. व याचें कारण स्पॅनिश लोकांची संख्याच केवळ कमी होती हेंच नाहीं तर सर्व बाजूनें त्यांची परिस्थिति मेक्सिकन लोकांच्या बरोबरीनें नव्हती हेंही आहे. कारण रेड इन्डियन्स सर्व बाजूनीं दृढ होते. उलटपक्षीं स्त्रिश्चन लोकांचा रोग, दुष्काळ व दीर्घकालीन दुःख यामुळें फार खराबा झाला होता. त्याचप्रमाणें ज्या तोफांनीं अथवा अग्नयस्त्रांनीं ते प्रतिपक्षाचा धुव्वा उडवीत त्या तोफा वैगेरेही त्यांच्याजवळ या वेळीं नव्हत्या. परंतु त्यांच्यामध्यें शिस्त (कवायत) होती. त्यांचा निश्चय दृढतम होता; व आपल्या नेत्यावर त्यांची पूर्ण निष्ठा होती." असो; प्रेस्कॅटच्याही पुढें जाऊन आपणांस असें म्हणतां येईल कीं, राक्षस व्यक्तिदृष्ट्या जरी आझटेक लोकांइतकेच शूर असले तरी त्यांचा समुदाय विस्कळित होई व त्यामुळें त्यांना त्यांच्या संख्येचा विशेष उपयोग होत नसे. उलटपक्षीं राम व लक्ष्मण यांना युद्धकला पूर्णपणें अवगत होती. स्पॅनिश लोकांप्रमाणेंच त्यांनीं शत्रुसैन्याचे नेते प्रथम खालीं आणले व नेते जातांच त्या अडाणी लोकांच्या सैन्याची स्थिति सुकाणूविरहित जहाजाप्रमाणें शोचनीय झाली. परंतु आमच्या मतें रामाच्या विजयाची गुरुकिल्ली धनुष्यबाण वापरण्याच्या त्याच्या अत्यंत कौशल्यांत आहे. राक्षस व दक्षिणेकडील मूळ रहिवासी यांना धनुष्याचा उपयोग त्याकाळीं माहीत नसावा असें दिसतें. ते नेहमीं काठ्यांनीं अथवा दगडांनीं लढत व त्यांच्याजवळ अस्त्र असें एकच होतें तें शक्ति हें होय. राक्षसांच्या नरमांसभक्षणाच्या पद्धतीपासून अलिप्त असणारे व त्यांच्याच इतके प्रबळ जे वानर तेही याच शस्त्राचा म्हणजे काठ्या व दगड यांचा उपयोग करीत;

यामुळें व त्यांचें विकृतरूप आणि कर्णकर्कश आरोळ्या यामुळें त्यांना " वानर " हें नांव पडलें असावें. याप्रमाणें धनुष्यबाण हें आयुध राक्षसांना फार हानिकारक झालें व स्पॅनिश लोकांच्या अग्नयस्त्रांनीं मेक्सिकन लोकांमध्यें जितकी भीति उत्पन्न केली तितकीच भीति या आयुधानें राक्षसांना उत्पन्न झाली. बाणामुळें फार दूरवर उभे राहून शत्रूचा नेम आर्य साधतां येई व शत्रूच्या काठ्या, दगड अथवा शक्ति यांपासून त्यांना मुळींच त्रास होत नसे. आणि यास्तवच ऐतरेय ब्राह्मणांतील पूर्वोक्त उताऱ्यांत म्हटलें आहे कीं, " धनुष्य-बाणासह असलेल्या मनुष्याचा पुष्कळजणसुद्धां पराभव करूं शकत नाहींत. " प्राचीन आर्यांनीं धनुर्विद्या फार उच्च स्थितींत पोंचविली होती व सतत व्यासंगानें आर्य योद्धे तीमध्यें फार प्रावीण्य मिळवीत. या त्यांच्या प्रावीण्यामुळें खुद्द ग्रीकांनासुद्धां आश्चर्य व कौतुक वाटलें हें आम्ही योग्य प्रसंगीं दाखविणारच आहों. तेव्हां रामलक्ष्मणांनीं या युद्धांत शेंकडों राक्षसांचा पराभव करून त्यांचा धुव्वा उडवून दिला याबद्दल कोणास आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं.

याप्रमाणें जरी शूर्पणखेचा हेतु सिद्धीस गेला नाहीं, तरी सूड घेण्याची तिची इच्छा नष्ट झाली नाहीं; यास्तव त्या प्रदेशाच्या दक्षिणेस दूर राहणारा राक्षसराजा रावण याजकडे ती गेली. भव्य प्रबल आणि नाना तऱ्हेच्या विभूषणांनीं व रत्नांनीं शोभायमान असें ज्याचें शरीर, रंगानें काळा व दिसण्यांत क्रूर असूनही ज्याचा चेहरा मनोहर होता व बलात्कारानें पळवून आणलेल्या एक हजार तरुण व सुंदर स्त्रिया ज्याच्या अन्तःपुरांत होत्या असा तो राक्षसराज आपल्या दरबारांत बसलेला तिला आढळला. आपला स्वतःचा दोष दिसून येऊं नये म्हणून तिनें मोठ्या कपटानें खऱ्या

गोष्टीचा विपर्यास करून रावणाला म्हटलें, "मी रामाची सर्वोत्तम व सुंदर स्त्री तुला मिळावी याकरितां तिला पकडण्यास गेलें, तों रामानें मला आडविलें व लक्ष्मणाकडून माझें नाक कापविलें. या अपमानाचा सूड घेण्यास्तव १४००० राक्षस रामावर चालून गेले; परंतु रामलक्ष्मणांनीं त्यांची कत्तल करून धुव्वा उडविला आणि खर व दूषण हे दोघेही या लढाईत पतन पावले. अशा प्रकारें आपल्या जातीच्या बांधवांचा व त्याचप्रमाणें राक्षससत्तेचा असा अपमान होत असतां तूं मात्र त्याकडे मुळींच लक्ष न देतां सुखानें झोंपा काढीत आहेस." आपल्या मोठ्या नांवाला बट्टा लागला याविषयीं त्या रानटी राजाला कांहीं विशेष वाटलें नाहीं; परंतु सीतेच्या सौंदर्याच्या वर्णनानें मात्र तो मोहित झाला व राक्षसांच्या सहजप्रवृत्तीस अनुसरून त्यानें सीतेस धरून आणण्याचा बेत करून तिचा पति व दीर यांना मारण्याचा विचार केला.

हा दुष्ट हेतु साध्य करण्याकरितां आपला मित्र मारीच यास बरोबर घेऊन रावण निघाला. यापुढील प्रसंग इतक्या सुंदर रीतीनें कल्पिले आहेत व इतक्या बहारीनें वर्णिले आहेत कीं, रामायणांतील काव्यदृष्ट्या अत्यंत प्रौढ व उदात्तगंभीर अशा प्रसंगांमध्यें त्यांची गणना करतां येते. राम, लक्ष्मण व सीता हीं आपल्या पर्णकुटिकेच्या द्वारांत बसलीं असतां मारीच त्यांच्यापुढें सुवर्णमृगाच्या रूपानें येतो. सीता कशी झाली तरी स्त्रीच होती; ती त्या हरिणास पाहून मोहित झाली व त्याला जिवंत धरून आणण्याची तिनें रामास विनंति केली. आपल्या आवडत्या बायकोचें कोड पुरविण्यासाठीं राम त्याच्यामागें धावूं लागला. कांहीं वेळानें रामाच्या ओरडण्याप्रमाणें आवाज ऐकूं आला, त्यावरून तो संकटांत सांपडला असें वाटून सीतेनें लक्ष्मणाला त्याच्या मदतीस जावयास सांगितलें.

रामाचा कोणीही पराभव करूं शकणार नाहीं व ही मायावी राक्षसांची माया आहे असें त्यानें तिला पुष्कळ सांगितलें; परंतु त्याच्या निष्काळजीपणाबद्दल ती त्याला पुष्कळ टाकून बोलली व "तुझी माझ्यावर वांकडी नजर आहे आणि राम मरावा अशी तुझी इच्छा आहे." असें म्हणण्यापर्यंत तिची मजल गेली. तेव्हां लक्ष्मणाच्या मानी व तेजस्वी स्वभावाला हा आरोप मुळींच सहन न होऊन आपल्या मनाविरुद्ध तिला त्या मुक्या वृक्षांच्या व आश्रमाच्या आश्रयाला ठेवून तो निघून गेला.

कांहीं वेळानें उघड्या व रेखिव अंगावर एक सुंदर तांबडसर वस्त्र पांघरलेलें आहे व डाव्या खांद्यावर काठी व लांकडी लोटा लोंबत आहे असा एक भव्य भिक्षु त्या ठिकाणीं आला. इतक्या एकांत स्थळीं एकटींच स्त्री पाहून आश्चर्य वाटल्यासारखें दाखवून त्यानें तिला "तूं कोणाची व येथें कशी आलीस?" असा प्रश्न केला. सीतेनें त्याचें चांगलें आगतस्वागत केलें, व त्याला आपली सर्व हकीकत संक्षेपानें सांगून शेवटीं "माझा पति अरण्यांतून हरणाचें मांस घेऊन येईपर्यंत आपण या ठिकाणीं थांबा" अशी तिनें त्यास विनंति केली. यानंतर त्या तपस्व्यानें "मी राक्षसराजा रावण असून मजजवळ अगणित संपत्ति आहे. तुझ्यावरील प्रेमानें मी अगदीं वेडा होऊन गेलों आहें. मी तुला माझी पट्टराणी करीन" असें सांगून राज्यभ्रष्ट व दरिद्री अशा या रामाला टाकून देऊन मजबरोबर माझ्या विशाल राज्याचा उपभोग घेण्यास तूं चल अशी त्यानें तिला विनंति केली. हें ऐकून आश्चर्यचकित झालेली सीता त्याला संतापानें म्हणाली "माझ्या पतीशीं तुलना केल्यास सिंहापुढें जसा जंबूक अथवा क्षुद्र उंदिर तसा तूं आहेस. व या तुझ्या दुष्ट हेतूपासून तूं जर परावृत्त न होशील तर वृथा प्राणास

मुकशील. " यामुळें रावणाचा क्रोध जागृत झाला व उजव्या हातानें डाव्या हातावर टाळी मारून दहा मुखांनीं व वीस हातांनीं युक्त असें पर्वताएवढें स्वरूप त्यानें एकदम धारण केलें. त्यावेळीं अरण्यांतील वृक्षसुद्धां भीतीनें कांपत आहेतसें वाटूं लागलें व गोदावरी नदीचा प्रवाह भीतीनें बंद झाला. भीतीनें वेड्या झालेल्या सीतेला पकडून रावण आपल्या रथाकडे जाऊं लागला. तेव्हां जटायू नांवाच्या गृध्रानें उंचवट्यावरून हें नीच कृत्य पाहिलें व त्याच्या रथाकडे उडून जाऊन त्यानें त्याचे घोडे ठार केले. परंतु कांहीं झालें तरी तो कांहीं रावणाच्या बरोबरीचा प्रतिस्पर्धी नव्हता; तेव्हां रावणानें त्याच्याशीं थोडा वेळ लढून त्याचे पंख कापले. पुन्हां सीतेला धरून त्यानें आकाशांत उड्डाण केलें, व थोड्या वेळांत लंकेस पोहोंचून सीतेला अशोकवन नांवाच्या उद्यानांत ठेविलें व तिच्यावर पहारा करण्याकरितां विरूप राक्षसींची योजना केली.

सीताहरणाची गोष्ट ही अशी काव्यमय व अद्भुत आहे. व थोड्या विचाराअंतीं ती अस्वाभाविक आहे हें कोणासही दिसून येईल. सीतेनें लक्ष्मणाला असें टाकून बोलावें, किंवा नुकतेंच राक्षसांच्या मायेविषयीं तिला लक्ष्मणानें सांगितलें असतां गुप्त वेषांत आलेल्या रावणाला आपली सर्व हकीगत शंका न येतां सांगावी या गोष्टी अस्वाभाविक वाटतात. व जर सीता इतकी निरागस आणि साधी होती तर मी सुवर्णमृग पाहिला; त्याला धरण्यासाठीं राम गेला आहे; त्याचा भीतिप्रद आवाज मीं ऐकिला; तुम्हीही त्याच्या मदतीला जा इत्यादि गोष्टी तिनें रावणाला कां सांगितल्या नाहींत ? नानाविध पशु मारून त्यांच्या मांसाचा भार घेऊन राम येईल एवढेंच ती सांगते; यावरून सुवर्णमृगाची गोष्ट मागाहून घातलेली असावी असें दिसतें; व हें आम्हीं दुसरीकडे दाखविलेंच

आहे. नेहमींप्रमाणें सीतेला जटायू नांवाच्या आपल्या नोकराच्या हवालीं करून रामलक्ष्मण हे त्यावेळीं शिकारीकरितां वनांत गेले असावे असें दिसतें. व रावणानें जटायूला मारून सीतेला पळविली असावी आणि मारीचाला त्या दोघां बंधूंच्या पाळतीवर रहावयास सांगितलें असावें. परंतु रामानें मारीचाला मारिलें व त्यामुळें संशय येऊन ते दोघेही बंधु आश्रमांत परत आले आणि तोंपर्यंत जिवंत असणाऱ्या जटायूनें सीतेला रावणानें पळवून नेलें असें त्यांस सांगितलें. बहुधा सीताहरणाची मूळ व साधी गोष्ट वरील प्रमाणें असावी. पुनर्रचनाकारानें दिलेल्या काव्यमय वर्णनांत ती स्पष्टपणें दिसून येते.

परंतु रावणाच्या दहा मस्तकांचा उलगडा कसा करावयाचा? जर त्याला दहा मस्तकें होतीं तर त्याला वीस डोळे हे असलेच पाहिजेत. पण वीस पायही होते किंवा कसें? या सर्व प्रश्नांना आमचें असें सरळ उत्तर आहे कीं, रावणाला दहा मस्तकें नव्हतीं; दहा माना नव्हत्या; वीस हात व पाय नव्हते, किंवा वीस डोळेही नव्हते. मूळ रामायणांत त्याच्या स्वरूपाचें वर्णन बहुधा असें नसावें. दंतकथांचा सिद्धांत असा आहे कीं, प्रथमतः केवळ अलंकारिक असणारीं वर्णनें पुढेंपुढें खरीं आहेत असें लोकमतांत परिवर्तन होतें; व अशाच परिवर्तनाचा मासला रावणाचें वरील स्वरूपवर्णन असावा. रावणाचें दहा मस्तकांचें वर्णन प्रथमतः अलंकारिक असून आतां तें वर्णन लोक शब्दशः खरें मानूं लागले. पुष्कळ मजबूत माणसांप्रमाणें रावणाची मान व मस्तक दोन्हीं मोठ्या आकाराचीं होतीं; व यामुळें मुळांत त्याला अलंकारिकरीत्या दशग्रीव म्हणजे दहा माना एके ठिकाणीं जुळविल्या असतां जेवढी मान होईल तेवढी मान ज्याची आहे तो असें नांव देण्यात आलें असावें. अशा अर्थानें दहा या आंकड्याचा पुष्कळदां

पुष्कळांनीं उपयोग केलेला आहे व त्याचें आणखी एक उदाहरण खुद्द रामायणांतच "दशरथ" या नांवांत सांपडतें. या नांवाचा अर्थ रामाचा पिता जो अयोध्येचा राजा त्याच्याजवळ फक्त दहाच रथ होते; किंवा तो एकाच वेळीं दहा रथांत बसे असा करतां येत नाहीं. कदाचित् त्याचा रथ साधारण रथांपेक्षां दसपट मोठा असेल, किंवा आपल्या बरोबरीच्या दहा रथींच्या योग्यतेचा तो होता असा दशरथ नांवाचा अर्थ होईल; व हा दुसरा अर्थच अधिक ग्राह्य होय. अशाप्रकारें त्या नांवांत तुलना अथवा उपमा गर्भित होती. त्याचप्रमाणें दशग्रीव अथवा दशमुख हें नांव उपमेच्या पायावर दिलेलें असावें. पुष्कळसा काळ लोटल्यानंतर लोकांना या उपमेचा विसर पडून रावणाला खरोखरीचींच दहा मस्तकें व वीस हात होते असा त्यांचा समज झाला.

रामायणांतील कित्येक श्लोकांमुळें—हे श्लोक बहुधा पुनर्रचनाकारानें मूळ काव्यांतले राखून ठेविले असावे—आमच्या वरील उपपत्तीस पुष्टि येते, व रावणाला साधारण लोकांप्रमाणें एकच मस्तक, दोनच डोळे आणि दोनच हात होते; मात्र साधारण माणसांपेक्षां त्याचे हे अवयव जास्त मोठे होते अशीच पूर्वी समजूत होती असें त्या श्लोकांवरून दिसून येतें. मारुतीनें जेव्हां रावणाला आपल्या महालांत निजलेला पाहिला त्यावेळीं रामायणांत म्हटलें आहे कीं,

तस्य राक्षसराजस्य निश्चक्राम महामुखात् ।
शयानस्य विनिश्वासः पूरयन्निव तद्गृहम्

पुन्हां दुसरीकडे आपणाला पुढील श्लोकार्ध आढळतो;

नीलजीमूतसंकाशं महाभुजशिरोधरः ।

यावरून रावणाला फक्त मोठी मान व मोठें डोकें हात हीच गोष्ट सिद्ध होते; त्याचप्रमाणें,

कांचनांगदसन्नद्धौ ददर्श स महात्मनः ।
निक्षिप्तौ राक्षसेंद्रस्य भुजाविंद्रध्वजोपमौ ॥

या ठिकाणीं फक्त दोन हातांचा उलेख आहे व तोही रावण निजलेला असतांना म्हणजे त्याला त्यांचें खरें स्वरूप प्राप्त झालेलें असतांना आहे. टीकाकाराला ही अडचण दिसून आलेली आहे. खालील श्लोकावरील टीकेंत तो तिचें स्पष्टीकरण करतो.

ताभ्यां स परिपूर्णाभ्यां भुजाभ्यां राक्षसेश्वरः ।
शुशुभेऽचलसंकाशः शृंगाभ्यामिव मंदरः

भुजद्वयमेव सर्वदा । युद्धादौ स्वेच्छया दशभुजत्वमिति द्विवचनम् । वामदक्षेषु भुजत्वैकवचनमित्यन्ये । टीकाकाराच्या मताप्रमाणें रावणाला सर्वसाधारणसंगीं दोन हात असत व युद्ध वैगेरे विशेष प्रसंगीं २० हात असत. हें जर खरें मानलें तर त्याप्रमाणें सर्वसाधारणसंगीं रावणाला एकच मस्तक असे व युद्धप्रसंगीं मात्र दहा असत असें कां म्हणूं नये ? व असें जर म्हणावयाचें नसेल तर पुढील श्लोकांत त्याला दोनच डोळे होते असें म्हटलें आहे तेव्हां त्या श्लोकाचा अर्थ कसा लावावयाचा ?

तस्य क्रुद्धस्य नेत्राभ्यां प्रापतन्नश्रुबिंदवः ।
दीप्ताभ्यामिव दीप्ताभ्यां सार्चिषः स्नेहबिन्दवः ॥

युद्धामध्यें सुद्धां त्याला एकच मस्तक असे असें कोठें कोठें रामायणांत वर्णिलेलें आहे. राम रावणाला म्हणतो,

अद्य ते मच्छरैश्छिन्नं शिरो ज्वलितकुण्डलम् ।
क्रव्यादा विनकर्षन्तु विकीर्णं रणपांसुषु ॥

परंतु या ठिकाणीं जर कांहीं थोडी संशयास्पदता असेल तर रावण मेल्यावर त्याचें जें वर्णन रामायणांत सांपडतें त्या ठिकाणीं मुळींच संशय उरत नाहीं. रावणाच्या स्त्रिया जेव्हां रणांगणावर रडत आल्या तेव्हां रामायणांत पुढील श्लोक आढळतात.

उत्क्षिप्य च भुजौ काचित् भूमौ सुपरिवर्तते ।
हतस्य वदनं दृष्ट्वा काचिन्मोहमुपागता ॥
काचिदंके शिरः कृत्वा रुरोद मुखमीक्षती ॥

दहांचा समुदाय अशा अर्थी एकवचन वापरलेलें आहे, हा जो गौण अर्थ टीकाकारानें प्रारंभीं दिला आहे तो सुद्धां या ठिकाणीं लागू पडत नाहीं. कारण रावण मेल्यानंतर त्याचीं मस्तकें अथवा हात अस्ताव्यस्तच पडले असले पाहिजेत.

यावरून असें दिसतें कीं मूळ रामायणांतील शिलक ठेविलेल्या कांहीं विशिष्ट श्लोकांतून रावणाला दोनच हात व एकच डोकें होतें असें वर्णिलेलें आहे. परंतु त्याला पुष्कळ मस्तकें व हात होते अशाविषयींही रामायणांत स्पष्ट उल्लेख सांपडतात. उदाहरणार्थ—

विचित्रं दर्शनीयैश्च रक्ताक्षैर्भीमदर्शनैः ।
शिरोभिर्दशभिर्वीरो भ्राजमानं महौजसम्
बाहुभिर्बद्धकेयूरैश्चन्दनोत्तमरूषितैः
भ्राजमानांगदैर्भीमं पंचशीर्षैरिवारिणिः ॥

परंतु हा व यासारखे उतारे व आम्ही वर दिलेले उतारे यांमध्यें स्पष्ट विरोध दिसून येतो व तो कमी करण्याचा कितीही प्रयत्न केला तरी वाल्मीकीच्या मूळ रामायणांत रावणाचें वर्णन साधारण मनुष्यापेक्षां जास्त नव्हतें असेंच आम्हांस वाटतें.

असो, हें प्रकरण संपविण्यापूर्वी आपल्यास आणखी एका गोष्टीचा विचार केला पाहिजे. व तीमुळें सीताहरणाची गोष्ट जास्तच

विश्वास्य ठरते. हल्लीं सुद्धां हिंदुस्थानांतील कांहीं रानटी जातींत बायका पळवून त्यांजबरोबर विवाह करण्याची जी पद्धत आहे ती पद्धत त्यावेळीं राक्षसांमध्यें प्रचलित असावी असें आम्हांस वाटतें. आणि याच कारणास्तव असल्या प्रकारच्या विवाहाला सूत्रकालाइतक्या जुन्या संस्कृत वाङ्मयांत 'राक्षस' हें नांव आहे. सूत्रांनीं व स्मृतिकारांनीं जे आठ प्रकारचे विवाह मान्य केले आहेत त्यांस निरनिराळीं नांवें आहेत व तीं नांवें निरर्थक नसून ऐतिहासिक आधारावरून पडलेलीं आहेत. पहिले चार, ब्राह्म, दैव, आर्ष व प्राजापत्य हे धार्मिक हेतूनें केलेलें कन्येचें दान या विवाहाच्या कल्पनेच्या उत्क्रांतीचे निदर्शक आहेत. या उत्क्रांतीच्या उच्च पायरीवरील ब्राह्म विवाह हा अत्यंत शुद्ध व साधा असून त्यांत कन्येचें उपायनासह व कोणतीही अट न घालतां दान करावयाचें असतें. प्रजापति हे आर्यांचे धुरीण असून त्यांच्यामध्यें प्रचलित असलेल्या विवाहांत वधुवरांनीं गृहस्थाश्रमांतील सर्व धार्मिक कर्तव्यें करावीं या एकाच अटीवर कन्यादान करावयाचें असतें. हिंदुस्तानांतील आर्यांचे प्राचीन पूर्वज जे देव त्यांच्यांत प्रचलित असलेल्या विवाहप्रकाराला "दैव" म्हणत व ऋषी म्हणजे त्यांचे जवळचे पूर्वज यांच्यामध्यें प्रचलित असणाऱ्या प्रकाराला आर्ष म्हणत. यांमधून सुद्धां कन्यादानाची कल्पना आहे; परंतु ती शुद्ध व सात्विक नाहीं. कारण वधूच्या बदला कांहींतरी मिळण्याची अपेक्षा—एखादा यज्ञ—अथवा दोन गाईंचीं नांवाची किंमत—वधूपक्षाला असे. वर जितकी किंमत देऊं शकेल तितकी वधूची किंमत द्यावयाची हा जो कमी दर्जाचा प्रकार त्यांतून हे चार प्रकार उत्क्रांत झाले आहेत. आर्यांच्या प्राचीन पूर्वजांचे चुलत संबंधी जे असुर त्यांच्यामध्यें हा प्रकार चालू असल्या कारणानें त्यास आसुरविवाह

हें नांव आहे. राक्षसविवाह यापेक्षांही कमी दर्जाचा आहे. त्यांत बायका बलात्कारानें पळवून आणीत. हा प्रकार राक्षस अथवा दक्षिणेंतील नरमांसभक्षक द्राविड लोकांत प्रचलित होता. गांधर्व विवाहाचें तत्व परस्पर संमति हें होतें व हा गंधर्व लोकांत प्रचलित होता. हे गंधर्व म्हणजे हिमालयांत राहणारी एक सुंदर स्त्रीपुरुषांची जात असून पतिपत्नीविषयक अत्यंत शिथिल नीतीमुळें ती प्रसिद्ध आहे हें आम्ही पूर्वी दाखविलेंच आहे. शवावर उपजीविका करणारे पिशाच यांच्यामध्यें चालू असणाऱ्या विवाहाला पैशाच हें नांव होतें; पशुप्रमाणें नुसतें रतिसमयीं संबंध जोडण्याच्या प्रवृत्तिमुळें हें नांव पडलें आहे. अशा रीतीनें हे आठ प्रकारचे विवाह म्हणजे नुसत्या पाशवी संबधापासून ब्राह्मविवाहांतील उच्च तत्वापर्यंत विवाहकल्पनेच्या उत्क्रतीच्या पायऱ्या होत. परंतु आपल्याला त्यांमधील महत्वाची गोष्ट पहावयाची ती ही कीं, हीं नावें कांहींतरी नसून त्यांना ऐतिहासिक आधार आहे. महाभारतांत माद्रीच्या विवाहासंबंधीं व रामायणांत कैकयीच्या विवाहासंबंधीं जें कांहीं लिहिलेलें आहे त्यावरून आसुरविवाह असुरांत प्रचलित होता यांत मुळींच संशय नाहीं. माद्रीच्या बाबतींत वर इच्छीत असतांही शुल्क घेतल्याशिवाय मुलगा देणार नाहीं असें माद्रीच्या भावानें निक्षून सांगितलें होतें व तिची किंमत म्हणून त्यास पुष्कळ बहुमूल्य नजराणे भीष्माला द्यावे लागले होते. याचप्रमाणें राक्षसांत बायका पळवून आणण्याची पद्धत सर्रास सुरू होती; व रावणानें हजार स्त्रिया पळवून आणल्या होत्या असें जें रामायणांत आपण वाचतों तें मुळींच चमत्कारिक नसून त्यानें सीतेस पळवून नेलें ही गोष्टही तशीच चमत्कारिक व असंभवनीय नाहीं.

प्रकरण १२ वें.

वानरसख्य.

साधारण मानवी प्राणी व प्रेमळ पति आपल्या पत्नीच्या विरहाबद्दल जितका आवेगपूर्ण शोक करील तितका रामानें सीता-विरहामुळें केला. एकसारखा सीते, सीते, अशा आपल्या पत्नीला हांका मारीत तो त्या अरण्यांत एखाद्या वेड्याप्रमाणें फिरूं लागला. व पुष्कळदां झाडाझुडपांच्या मागें लपून बसलेली सीता आपल्यास सांपडली असा त्याला भास होई. दंडकारण्यांत आपल्याला हद्दपार करण्यांत कैकयीचा काय हेतु होता हें त्याला आतां पूर्णपणें कळून चुकलें व त्यामुळें "कैकेयी आतां मात्र तुझा हेतु साध्य झाला खरा; भरताला जरी इच्छा नसली तरी राज्योपभोग त्यालाच आतां मिळणार" असे उद्गार त्यानें काढले. "तूं पुरुष असून सीतेचा पति आहेस. तेव्हां तुझ्या पत्नीचें अपहरण करणाऱ्याचा दुसऱ्या कशाकरितां नसला तरी निदान आर्याच्या नांबाकरितां तरी शोध लावणें तुझें कर्तव्य आहे" इत्यादि गोष्टी सांगून लक्ष्मणानें रामाची दुःखी मनःस्थिति घालविली; राक्षसांचा राजा रावण यानें सीतेला पळवून नेलें हें त्यांना जटायूपासून समजलेंच होतें. तेव्हां आपल्या प्रवासांत जे कोणी भेटतील त्यांच्याकडून त्याच्या प्रदेशाची व तेथील लोकांची माहिती मिळवीत रावणाच्या शोधार्थ ते भ्रमण करूं लागले. मध्येंच **मारुति व सुग्रीव** यांच्याशीं त्यांचा संबंध आला. त्यांनीं रावणाला रथांतून सीतेला नेतांना पाहिलें होतें.

सुग्रीव व आपण स्वतः समदुःखी असून त्याचें दुःख आपल्यापेक्षां किंचित् जास्तच आहे असें रामाला दिसून आलें. सुग्रीवाला त्याच्या वडील व बलवान् भावानें हद्दपार करून वर त्याची सुंदर स्त्रीही बळकावली होती. सुग्रीव आपल्या मित्रासह-वर्तमान—या मित्रांत मारुति प्रमुख असून तो पुढें रामाचा अत्यंत प्रेमळ भक्त झाला—प्रस्रवण पर्वताच्या एका निर्जन अशा दरींत राहत असे. रामसुग्रीवांमध्यें लौकरच तह घडून आला व त्याअन्वयें रामानें वालीला मारण्याच्या व आपली पत्नी सोडविण्याच्या कामीं सुग्रीवाला मदत करावी व वानरांच्या राज्यपदावर आरूढ झाल्यावर सुग्रीवानें सीतेला शोधून काढून तिला पळविणारास चांगलें शासन करण्याच्या कामांत रामाला मदत करावी असें ठरलें. मात्र हा तह रामानें सात ताडवृक्षांचा एकाच बाणानें भेद केल्यावर सुग्रीवाची त्याच्या शौर्याबद्दल खात्री पटली तेव्हां घडून आला.

नंतर ते तिघे किष्किंधा राजधानीस जाण्यास निघाले. सुग्रीवानें वालीला द्वंद्वयुद्ध करण्यास बोलवावें व त्या दोघांचें युद्ध होत असतां रामानें वालीस बाणानें मारावें अशी व्यवस्था ठरविण्यांत आली होती. सुग्रीव नीट ओळखूं यावा म्हणून त्याच्या गळ्यांत एक पुष्पमाला घातली होती.* सुग्रीवाचा द्वंद्वयुद्धाला येण्यासंबंधी

---

* स्पॅनिश लोक व त्यांचे दोस्त (Tlascalans) लास्कालन् लोक यांनीं जेव्हां चोलूला (Cholula) येथील लोकांवरहल्ला केला तेव्हां कोर्टेझनें अशीच युक्ति अमलांत आणली होती. "चोलन लोकांपासून आपण लौकरच निराळें दिसून यावें म्हणून त्यांनी कोर्टेझच्या आज्ञेवरून सेज् (Sedge) नांवाच्या झाडाच्या पर्णमाळा गळ्याभोंवतीं घातल्या होत्या." Prescott, Conquest of Mexico Vol-II.

उद्धट निरोप वालीला पोहोंचल्यानंतर बलवान व रानटी असा तो वानरराजा नगराबाहेर आला, व आपल्यापासून फार दूर अंतरावर एक तिसरा मनुष्य उभा असून तेथून तो आपल्याला मारील अशी मनांत कल्पनाही नसल्यामुळें त्यानें द्वंद्वयुद्ध करण्यास कबुली दिली. लगेच त्या दोघां भावांमध्यें युद्ध सुरू झालें. त्यांचीं हत्यारें म्हणजे केवळ हात होत. सुग्रीव आतां पराभूत होणार असें रामाला वाटतांच त्यानें बाण सोडला व वाली जमिनीवर विद्ध होऊन पडला.

त्या वानरराजाकरितां शोक करीत करीत त्याची पत्नी तारा व पुत्र अंगद हीं नगरीबाहेर आलीं. "माझें तुझें कांहीं भांडण नसतांना तूं मजविरुद्ध हात उचलावास हें अन्याय्य व असमर्थनीय होय" अशी वालीनें रामाची निर्भर्त्सना करून "झालें तें झालें; आतां माझ्या पुत्राची काळजी घे" असें त्यानें त्यास सांगितलें. आपण दोषी नाहीं हें सिद्ध करण्याकरितां रामानें वालीस दिलेलें उत्तर वाल्मीकीनें असें दिलें आहे—"अरण्य, पर्वत इत्यादिकांसहित सर्व पृथ्वीवर इक्ष्वाकुवंशाचा ताबा आहे व त्यांतील पशुपक्षी आणि मानव यांना त्यांच्या त्यांच्या कृत्याप्रमाणें बक्षीस देणें अथवा शिक्षा करणें हें त्यांचें कर्तव्य आहे. भरत हल्लीं राजा आहे; व आम्हीं त्याचे प्रतिनिधि असून धर्मस्थापनेकरितां विश्वपर्यटण करीत आहों. तूं अतिशय निंदास्पद असें कृत्य केलें आहेस. सुग्रीव जिवंत असतां त्याची पत्नी तुला तुझ्या स्नुषेच्या ठिकाणीं असणारी जी रुमा तिजबरोबर तुला संभोग करितां येत नाहीं. जो आपल्या बहिणीशीं, मुलीशीं अथवा सुनेशीं रममाण होतो त्याला मृत्यूच योग्य आहे; व अपराध झालेला माहीत असूनही अपराध्याला शिक्षा न करणारा राजा दोषीच होय." शेवटीं "सुग्रीवाला मुलगा नाहीं,

त्याअर्थी तो अंगदाला युवराज करून आपल्यामागें त्यालाच राज्य देईल " असें सांगून रामानें वालीचें समाधान केलें. रामानें मग मोकळ्या पडलेल्या किष्किंधेच्या सिंहासनावर सुग्रीवाला बसविलें. अशा रीतीनें सुग्रीवाला त्याची पत्नी व राज्यच मिळालें असें नसून आपल्या मृत भावाची सुंदर पत्नी तारा हिलाही त्यानें आपली पत्नी करून घेतलें.

सुग्रीव व राम यांच्यामधील तहाची गोष्ट ही अशी आहे, व त्यामुळें रामानें वालीला मारल्यावर सुग्रीवाला वानरांचें राज्य मिळालें. या गोष्टीचा ऐतिहासिक दृष्ट्या विचार करूं लागलें असतां, पहिला प्रश्न अगदीं साहजिक उत्पन्न होतो कीं, "वानर हे कोण ?" वानरासारखीं तोंडें असल्यामुळें वानर हें नांव पडलेली ती एक मनुष्यांची जात होती यांत शंका नाहीं. या ठिकाणींही आपणास अलंकारिकाला व्यावहारिक बनविण्याच्या लोकप्रवृत्तीचा मासला दिसून येतो. वानरांप्रमाणेंच ते चपळ व क्रूर असून सुखोपभोगाकडे त्यांची सार्वत्रिक प्रवृत्ति असे. राक्षसांप्रमाणें तेही युद्धांत काठ्या व दगड यांचाच उपयोग करीत असें दिसतें. ते दुसऱ्या एखाद्या शस्त्रानें लढल्याचा रामायणांत कोठेंही उल्लेख नाहीं. आतां कांहीं काळानंतर वानरांना जेव्हां अतिमानुषत्व दिलें गेलें, तेव्हां अत्युक्तीच्या भाषेप्रमाणें दगडांना मोठमोठ्या खडकांचें स्वरूप प्राप्त झालें व काठ्यांना लढाईंत हलक्या खडचाप्रमाणें सहज उपटून फेंकून दिलेल्या वृक्षांचें स्वरूप प्राप्त झालें. जवळ काठ्या व दगड यांशिवाय दुसरें हत्यार नाहीं, दिसण्यांत चमत्कारिक असे हे लोक प्रथमच पाहिल्यावर ते वानर असावे असें आर्यांना वाटलें असेल; व एकदां या कल्पनेला चालना मिळाल्यावर ती काळ व प्रदेशांतर यामुळें जास्त दृढ झाली असेल. मेगास्थीनीसच्या

वेळीं सुद्धां एकच पायाचे व कानानें सर्वांग झांकून टाकणारे मनुष्य जगांत आहेत, यावर लोक विश्वास ठेवीत; तेव्हां मेगास्थेनीसच्याही पलीकडील काळांत रामाला वानरांनीं साहाय्य केलें असा लोकांचा भरंवसा असल्यास त्यांत कांहींच नवल नाहीं.

वानर हे निःसंशय मनुष्य होते. त्यांची संस्कृति मात्र हीन दर्जाची होती. तरी सुद्धां ते मनानें व शरीरानें प्रबल असून राक्षसांच्या विरुद्ध त्यांनीं आर्यांबरोबर सहकार्य केलें याचें कारण बहुधा त्यांचेंही राक्षसांशीं वैर होतें हें असावें. ते कांहीं नरमांसभक्षक नसावे व राक्षस बहुधा त्यांच्यापैकीं लोक खाण्याकरितां नेत असावे. तेव्हां स्पॅनिश लोकांच्या आझटेक् (Aztecs) लोकांबरोबरच्या युद्धांत ज्याप्रमाणें स्पॅनिश लोकांस लास्कालन (Tlascalans) नांवाच्या तेथील मूळ रहिवाशी जातीनें सहाय्य केलें त्याप्रमाणें वानरांनीं आर्यांस मनापासून साहाय्य केलें असावें. लास्कालन (Tlascalans) आणि चोलुलन (Cholulans) यांच्यामधील खाजगी भांडणामुळेंच लास्कालन (Tlascalans) लोकांनीं स्पॅनिश लोकांची चोलुलन (Cholulans) लोकांविरुद्ध मदत घेऊन आपला फायदा करून घेतला. त्याचप्रमाणें वानरांचें आर्यांशीं सख्य होण्याचा प्रसंग सुग्रीव व वाली यांच्या खासगी भांडणामुळेंच घडून आला.

याप्रमाणें मेक्सिकोवरील विजयाच्या इतिहासांत लास्कालन (Tlascalans) लोकांची जी परिस्थिति आपण वाचतों तीवरून राम व राक्षस यांमधील युद्धांत वानरांचा काय भाग व संबंध होता हें आपणास समजूं शकतें. त्याच इतिहासांत आपणास रामानें वालीशीं केलेल्या वर्तनाची उपपत्ति लावण्यास साधनें सांपडतात. वरून पाहिल्यास रामाचें हें वर्तन अत्यंत निंद्य व हिंदुस्थानच्या

या अनुपमेय वीराच्या निष्कलंक यशावर काळाकुट्ट डाग आहे असें वाटतें. या ठिकाणीं अयोध्येच्या रामाची खरी वैदिक गोष्ट संपून हिंदूंचा बुद्धधर्मीयांविरुद्ध असणारा वीर व दक्षिणेंतील लिंगपूजक असा जो राम त्याची कथा सुरू होते असा टाल्बाईस व्हीलरनें (Talboys Wheeler) चमत्कारिक तर्क केला आहे तो रामाच्या या वर्तनाच्या पायावरच होय. हा इतिहासकार आणखी म्हणतो— दक्षिणेकडील लिंगपूजक राम पूर्वीच्या रामापेक्षां निराळा असून वर्तनाच्या बाबतींत तो कांहीं विधिनिषेध पाळीत नसे व मानसिक रचनेच्या बाबतींतही त्याची पूर्वीच्या रामापेक्षां खालची पायरी होती.

त्याचप्रमाणें "निरनिराळ्या परिस्थितीशीं व प्रदेशाशीं संबद्ध असलेल्या दोन सुधारणांचें संमिश्रण रामायणांत आढळतें" असेंही त्यानें म्हटलें आहे. आतां (Talboys Wheeler) टाल्बाईस व्हीलरसारख्या इतिहासकारानें असले निरर्गल सिद्धांत पुढें मांडावे हें चमत्कारिक होय. याचें कारण मात्र उघड आहे व तें हें कीं, त्यानें खुद्द वाल्मीकिरामायणाचा मुळींच अभ्यास केला नसून त्याला मिळालेली माहिती इतर ग्रंथांतून मिळालेली आहे. हें अगदीं साहजिक होय; कारण राम लिंगपूजक होता असें वाल्मीकिरामायणांत कोठेंही वर्णिलेलें नाहीं. ही गोष्ट खुद्द बहुतेक हिंदूंना माहीत नसते. हिंदुस्थानच्या दक्षिण टोंकाला रामानें रामेश्वराचें महालिंग स्थापिलें या गोष्टीचा वाल्मीकिरामायणांत उल्लेख सुद्धां नाहीं ही गोष्ट वाचून कित्येक हिंदू वाचक आश्चर्यचकित होऊन जातील. बहुतकरून ही गोष्ट रामायणानंतर रचण्यांत आलेली असावी. राम लंकेहून परत येते वेळीं आकाशांतून विमानामधून पृथ्वीवरचीं स्थळें सीतेला दाखवीत असतां वाल्मीकिरामायणांत

अत्र प्रसादमकरोन्महादेवः स्वयं मम ।

अशी एक ओळ सांपडते हें मात्र खरें. रामेश्वराच्या देवळाच्या गोष्टीच्या पुष्टीकरणार्थ बहुधा ही ओळ मागाहून घातलेली असावी. या ओळीचा वैष्णव निराळा अर्थ करितात व साधारण लोकांची यासंबंधीं जी कल्पना आहे ती या ओळींत मुळींच नाहीं, असें ते म्हणतात. परंतु त्यांचा अर्थ जरी बाजूस ठेवला तरी लिंगप्रस्थापनेची गोष्ट किंवा राम आपल्या सैन्यासह किनाऱ्यावर तळ देऊन राहिला असतां व सामुद्रधुनीपार जाण्याच्या अडचणींत तो पडला असतां त्यानें केलेला महादेवाचा धांवा यांचा पूर्वी कवीनें उल्लेख तरी करावयास पाहिजे होता अशी कोणीही साहजिकच अपेक्षा करील असें म्हटल्यावांचून आम्हास राहवत नाहीं. शिवाय ज्याला संध्या व यज्ञ यांखेरीज दुसरें तिसरें कांहीं ठाऊक नव्हतें असा वैदिक आर्य राम होता असें सर्व रामायणभर दाखविलेलें आहे. तो लिंगपूजा करीत असे असा कोठेंही उल्लेख नाहीं.*व टाल्बाईस व्हीलर याच्या उपपत्तीला वाल्मीकिच्या रामायणांत मुळींच आधार नाहीं हें सांगणें आवश्यक आहे.

अशा रीतीनें टाल्बाईस व्हीलर याचा एक मुद्दा खोडून टाक-

---

* उलट रावण लिंगपूजक होता असें उत्तरकांडांत म्हटलेलें आहे—

यत्र यत्र च याति स्म रावणो राक्षसेश्वरः ।
जांबूनदमयं लिंगं तत्र तत्र च नीयते ॥

परंतु ही सुद्धां अलीकडची कल्पना दिसते; कारण त्यानें आपले वर ब्रह्मयापासून मिळाविलेले असून शिवापासून नव्हते; व कुबेरावरील स्वारींत तर तो शिवाविषयीं अत्यंत तिरस्कारपूर्ण उद्गार काढतो—

कोयं शंकर इत्युक्त्वा शैलमूलमुपागतः ।
केन प्रभावेण भवो नित्यं क्रीडति राजवत् ।
विज्ञातव्यं न जानीते भयस्थानमुपागतम् ॥

ल्यावर रामानें वालीवरोवर केलेल्या वर्तनासंबंधींच्या त्याच्या दुसऱ्या मुद्द्याकडे वळूं. रामानें आपल्या वर्तनाचें केलेलें समर्थन वर दिलें तें धर्माधर्मविचारपूर्ण आहे हें निःसंशय; परंतु हिंदुस्तानांतील मूळ रहिवाशांपेक्षां आपण उच्च आहोंत या स्पष्ट भावनेमुळें आपल्याकडे सार्वत्रिक सत्ता आर्य ओढून घेत व या सार्वत्रिक सार्वभौमत्वावर रामाच्या समर्थनाची इमारत रचिलेली आहे. स्पॅनिश बादशहाचें सार्वभौमत्व तुम्ही कबूल करा, न करील त्याला या भूमीचा हक्क नें राजा असणारा जो स्पॅनिश राजा त्याच्या विरुद्ध बंड करणारा समजून त्यास मी तसें बागवीन असें जें (Cortz) कोर्टेझनें रेड इंडियन लोकांना सांगितलें यांतलें इंगित तरी स्पॅनिश लोक आपल्याला त्यांच्यापेक्षां उच्च समजत हेंच होय. व हाच हक्क सांगून अव्यवस्थेच्या सबबीवर प्रबल राष्ट्रें कमजोर राष्ट्रांच्या कारभारांत हात घालतात. शिवाय वाली पापी असून तो लोकरीतिविरुद्ध वागत होता याबद्दल कोणीही वाद घालणार नाहीं. आपल्या जिवंत भावाची बायको आपल्याला घेण्याचा वालीचा अपराध व वाली मेल्यानंतर त्याची बायको तारा इजबरोबर सुग्रीवानें लग्न केलें हें त्याचें वर्तन यांत टाल्वाइज व्हीलर यास कांहींच फरक दिसला नाहीं. परंतु हा फरक कित्येक जातींत व रानटी लोकांत प्रत्यक्ष मानला जातो. हॅमलेटच्या आईची गोष्ट व रुमेची ही गोष्ट यांत कांहींच फरक नाहीं. असो रामानें वालीला मारलें हें त्याचें कृत्य अनिंद्य नसलें तरी समर्थनीय खास आहे * राम कसा झाला तरी मनु-

---

* वालीस रामानें समोरासमोर युद्ध करून कां मारलें नाहीं याचें कवीनें आणखी एक कारण दिलें आहे. वाली हा वानर होता व सृष्टीचे नियमानुसार रानटी पशूची शिकार करण्याला मनुष्याला केव्हांही हक्क आहे.

प्यच होता व त्याच्या आयुष्क्रमावरील या डागामुळें त्याच्या इतर आयुष्यांतील नैतिक उदात्तता जास्तच स्पष्ट खुलून दिसते.

थोडक्यांत सांगावयाचें तर, निरपराधी व निर्बोध अशा प्राण्याला मुद्दाम मारण्याच्या शिकाऱ्याच्या हक्कावर राम आपल्या कृत्याचें समर्थन करीत आहे. परंतु हें स्पष्टीकरण कल्पनामय असून वाली खरोखरच वानर होता या समजुतीच्या आधारावर रचिलेलें आहे. बहुधा राम व सुग्रीव हे दोघेही वालीशी लढले असावे. परंतु हल्लीं कथा आहे अशीच ती घडून आली असें मानलें तरी हल्लीं सुधारलेलीं राष्ट्रानें असुधारलेल्या राष्ट्रांना आपण स्वत: उपगोभीत असलेले हक्क अथवा तत्वें लागू करीत नाहींत हें पाहिलें म्हणजे रामाच्या परिस्थितीची आपणास योग्य कल्पना येईल. कारण असें जर नसतें तर " डमडम गोळी " कोठच्याही लढाईत उपयोगांत आणली गेली नसती.

प्रकरण १३ वें.

लंकेचा वेढा.

जवळच आलेला पावसाळा रामानें सुग्रीवाची राजधानी जी किष्किंधा तिच्या जवळील एका टेंकडीवर मोठ्या कष्टानें व चिंतेंत काढिला. परंतु सैन्याची हालचाल करितां येईल इतकी जमीन वाळतांच सुग्रीवास आपली प्रतिज्ञा पुरी करण्यास रामानें सांगितलें व एक चांगलें सैन्य जमा कर म्हणजे त्याच्या साहाय्यानें आपणास आपल्या शत्रूंचें निर्दलन करितां येईल असेंही त्यानें सुग्रीवास सांगितलें. वानरांचा राजा सुग्रीव याच्या आज्ञेवरून हजारों वानर किष्किंधेंत जमा झालें. रामायणाच्या अत्युक्तिपूर्ण भाषेंत ही संख्या अब्ज, खर्व इत्यादिकांनीं दिद्गर्शित केलेली आहे. हनुमानाच्या नेतृत्वाखालीं वानरांची एक टोळी, सीता खरोखरीच लंकेंत कैदेंत आहे कीं काय हें पाहण्याकरितां, पाठविण्यांत आली. हनुमानाची टोळी लौकरच दक्षिणमहासागराच्या किनाऱ्याशीं आली परंतु आपला मार्ग समुद्रामुळें खुंटला आहे असें त्यास आढळून आलें. हिंदुस्थान व सीलोन यांना जोडणाऱ्या त्या अफाट समुद्रांतून पलीकडे कसें जावें हा त्यांना एक मोठा प्रश्नच पडला. परंतु "वायुपुत्र" हनुमान हाच फक्त समुद्रावरून उडून जाऊं शकेल असें त्यांनीं ठरविलें. वृद्ध जांबुवानानें त्याची पुष्कळ स्तुति केल्यावर हनुमान मोठा होऊं लागला व त्यानें तीरावरील एका टेंकडीवरून उडी मारण्याची तयारी केली. मोठा होतां होतां अत्यंत मोठ्या पर्वताचें रूप त्यानें धारण केलें व श्वास आंत घेऊन

मोठी उडी मारून तो आकाशांतून जाऊं लागला. उडी मारतांना त्यानें टेंकडी जोरानें खालीं दाबल्यामुळें तींतून जुणूं काय त्या महत्कृत्याबद्दल त्याच्यावर उधळण्याकरितां म्हणून झाडें व फुलें इतस्ततः उडालीं. मारुति आकाशांतून बाणाच्या वेगानें चालला होता व त्याची भव्य छाया खालीं समुद्रावर पडली होती. शेवटीं तो पलीकडल्या तीरावर पोहोंचला व अशा रीतीनें ४०० मैल रुंदीचा समुद्र ओलांडिल्यावर त्यानें विश्रांति घेतली.

काव्य दृष्ट्या अत्यंत उदात्त असणारा हा प्रसंग रामायणाचें ऐतिहासिक दृष्ट्या विवरण करणारापुढें सोडविण्यास अत्यंत कठिण असा गूढ प्रश्न म्हणून उभा राहतो. मनुष्य समुद्रावरून उडून कसा जाऊं शकेल याचें बरोबर स्पष्टीकरण देतां न आल्यामुळें कित्येकांनीं या प्रसंगाचें स्थळ सीलोन मधून उचलून हिंदुस्तानांत आणून ठेविलें आहे. आणखी कित्येकांना लंका सिंगापूरच्या दक्षिणेस आहे असें वाटतें; व बहुतेकांना मारुतीची ही उडी म्हणजे कवीच्या कल्पनेचा खेळ वाटतो. परंतु आश्चर्याचा गोष्ट ही कीं, मेक्सिकोवरील विजयाच्या इतिहासांत याच्याशीं अगदीं सदृश असें उदाहरण दिसून येतें आणि त्याच्या साहाय्यानें आपल्याला या प्रसगांचा सुष्कळ समाधानकारक उलगडा करितां येतो. प्रेस्कॉट यानें मेक्सिकोच्या वेढ्याचें मोठें मनोहर व विस्तृत वर्णन दिलें आहे व त्यावरून लंकेतील प्रसंग व मोक्सिकोंतील प्रसंग कसे सदृश आहेत हें आपणास दिसून येतें. मेक्सिको शहर एका उंच पठारावर असून समुद्रसपाटीपासून तें कित्येक फूट उंच होतें. त्या शिवाय त्याच्या सभोंवार एक मोठें तळें असून त्यामुळें त्याच्या आसपासच्या प्रदेशाशीं त्याचा संबंध तुटलेला होता व त्या तळ्यावर बांधलेल्या सेतूच्या साहाय्यानेंच फक्त बाहेरच्या प्रदेशाशीं

दळणवणळण ठेवितां येई. हे पूल काढतां येत व काढले म्हणजे स्वारी करणाराला शहरांत जातां येत नसे. शहरांत प्रथम मित्रभावानें राहणाऱ्या स्पॅनिश लोकांनीं जेव्हां आपल्या असह्य वर्तनानें मेक्सिकन लोकांचा राग जागृत केला व आतां शहर सोडणेंच सुरक्षित आहे असें वाटून जेव्हां ते शहर सोडून पळाले तेव्हां संतप्त झालेल्या मेक्सिकन लोकांनीं त्यांचा पाठलाग केला. पूल व मार्ग मोडून टाकून त्यांनीं स्पॅनिश लोकांचा मार्ग बंद करण्याचा प्रयत्न केला. परंतु ॲल्वॅरेडो (Alvarado) नांवाचा एक इसम खेरीज करून स्पॅनिश लोक पुलाच्या पलीकडे पूल तुटण्याच्या अगोदर आले. तो मात्र पाठलाग करणाऱ्यांच्या तावडींत सांपडण्याच्या बेतांत आला; तो त्यांना सांपडता तर निःसंशय त्यांनीं त्यास आपल्या देवास बळी दिलें असतें. त्याच्यापुढें रुंद व खोल असें एक पूल काढलेलें भगदाड होतें;व साधारण माणसाला त्याच्यावरून उडून जाणें अशक्य होतें. परंतु मानवी शक्तीच्या बाहेरचे असें अद्भुत कृत्य ॲल्वॅरॅडोच्या निश्चयामुळें, शक्तीमुळें व निराशेमुळें घडून आलें. प्रेस्कॉट लिहितो, स्पॅनिश लोकांच्या या नाशपूर्ण पळामध्यें ॲल्वॅरॅडो यानें जेव्हां तें रुंद तळ्याचें भगदाड ओलांडिलें तेव्हां आझ्टेक व लास्कालन लोक मूढ होऊन त्याजकडे पाहत राहिले व हा खरोखरीच "**सूर्यपुत्र** आहे" असे त्यांनीं उद्गार काढले. "ग्रीस लोकांच्या काल्पनिक गोष्टींतील देवांच्या अद्भुत कृत्यांच्यावर ताण करणाऱ्या या कृत्याची आठवण तें कृत्य जेथें घडलें त्या ठिकाणाचें 'ॲल्वॅरॅडोची उडी' हें नांव अजूनही देतें."

यावरून मारुतीनें समुद्रावरून उडी मारली हा समज कसा अस्तित्वांत आला व त्याला "**वायुपुत्र**" हें नांव कसें पडलें

याचा उलगडा करितां येईल. पूर्वकाळीं सीलोन बेट हें बहुधा हिंदुस्तानाला खडकाच्या सांखळीनें जोडलेलें असावें; या सांखळीचीं चिन्हें अजूनही कोठें कोठें दिसतात. या सांखळीच्या डाव्या आंगचा समुद्र खोल असून त्या ठिकाणीं मुळींच आवाज होत नाहीं व उजव्या बाजूचा समुद्र उथळ असून तो एकसारखा कुरबुर करीत असतो ही गोष्ट कालिदासाच्या सुद्धां ध्यानांत आलली होती. या सांखळीच्या मध्यें कोठें तरी एखादें भगदाड असून त्यामुळेंच रावणाला आपल्या राजधानींत सुखानें व सुरक्षितपणानें झोंप घ्यावयास सांपडत असेल. आझटेक लोकांप्रमाणें रावण व राक्षस यांच्या वेळीं हें भगदाड उलंघून जाण्यास कांहीं तरी पुलासारखा उपाय असेल व तो एकदां दूर करून ठेवला म्हणजे शत्रूला आपल्या बेटाजवळ येतांही येणार नाहीं मग वेढा देण्याची व हल्ल्याची गोष्ट दूरच राहिली या बुद्धीनें ते शत्रूला तुच्छ मानीत असावे. अशा एखाद्या भगदाडावरून उडी मारण्याचा मारुतीचा प्रयत्न यशस्वी झाला असला पाहिजे व त्यामुळेंच त्याच्या शत्रूंना व मित्रांना सारखेंच आश्चर्य वाटलें असलें पाहिजे.

अशा रीतीनें समुद्र ओलांडिल्यावर मारुति नगरीकडे जाऊं लागला. त्यानें आक्रमिलेला प्रदेश, लंका नगरी ज्या टेकडीवर वसलेली होती ती टेकडी व खुद्द लंका यांचें रामायणांत दिलेलें भव्य व मनोहर वर्णन प्रेस्कॉटनें दिलेल्या मेक्सिकोच्या वर्णनाशीं इतकें जुळतें आहे कीं, तें सबंध देण्याचा मोह आम्हाला अवरत नाहीं. " समुद्रतीराजवळ आल्यावर निरनिराळ्या वृक्षांनीं व देवदार वृक्षांच्या अरण्यांनीं भरलेलें असें एक बेट त्याला दिसलें. समुद्र, त्याची वांकडी तीररेषा, आंचळ्याप्रमाणें शोभणाऱ्या अनेक वेलीलता, व चुंबनसुख अनुभविणाऱ्या नद्या, इतक्या गोष्टी मारुतीच्या

नजरेस एकसमयावच्छेदेंकरून पडल्या. तीरावर उतरल्यावर टेकड्यांनीं भरलेला त्याचप्रमाणें सुंदर, मधुर व मेघांनीं भरलेल्या वनानीं गजबजलेला असा हिरवागार प्रदेश त्यानें ओलांडिला. फुलांनीं गच्च भरलेलीं झाडें जीवर विपुल आहेत अशी एक पर्वतराजी मग तो वानर चढून वर गेला. त्या पर्वतांच्या रांगेच्या शिखरावर पोहोंचल्यावर एका टेकडीवर वसलेली व उद्यानांनीं आणि सहजोद्भव वनराजीनीं परिवृत अशी लंका त्यानें पाहिली." प्रेस्कॉटनें आझटेक लोकांच्या भूमीचें जें वर्णन दिलें आहे त्याच्याशीं वाल्मीकीनें दिलेलें हें भूप्रदेशवर्णन अत्यंत जुळतें. त्यांच्या वर्णनांत प्रथम Tiera Calienta नांवाचा, वालुकामय मैदानें, तशींच सुगंधित झाडाझुडपांनीं व त्यांच्यामधून भव्य व उंच जाणाऱ्या वृक्षांनीं गजबजलेलीं दुसरीं कित्येक सुपीक मैदानें यांनीं भरलेला ॲटलांटिक समुद्राच्या कांठच्या एक अफाट प्रदेश आहे. त्यानंतर पर्वताच्या पायथ्यापायथ्यानें जातां जातां आझटेक लोकांच्या वेळीं वन्य वृक्षांनीं निबिड असलेल्या, Tiera Templata वर प्रवाशी जातो. व त्याच्याही पेक्षां वर गेल्यावर कार्डिलेराज पर्वताच्या शिखरावरील पठारावर वसलेलें मेक्सिको शहर त्यास दिसतें. मेक्सिकोच्या भोंवतीं जें अफाट तळें होतें व ज्यामुळें मेक्सिकोच्या स्वाभाविक संरक्षणास फार मदत झाली होती त्याच्या जोडीला लंकेच्या आसपास कांहीं नाहीं. परंतु त्या तळ्याची उणीव हिंदुस्थान व सीलोन यांमधील सामुद्रधुनीनें भरून काढली असून ती जणूं काय त्या बेटाच्या उत्तरेकडील भागापुढील खंदकच आहे.

सोन्याच्या भिंती सभोंवार असून जिला चार वेशी होत्या ती लंका नगरी पाहून मारुतीला फार आश्चर्य वाटलें. हें विधान

वाचतांना कल्पनामय व खोटें असावें असें वाटतें. परंतु त्याला सत्याचा आधार आहे यांत मुळींच संशय नाहीं. मेक्सिकन लोकांजवळ सोनें किती अमर्याद होतें हें वाचलें, त्याचप्रमाणें पेरु देशांत सूर्याचें एक भव्य देवालय असून त्याच्या भिंती सोन्याच्या जाड पत्र्यांनीं मढविल्या होत्या हें वाचलें व ल्हासा शहरांतील एका देवालयाच्या सबंध शिखरावर सोन्याचा पत्रा आहे असें आपणास समजलें म्हणजे रानटी लोकांच्या स्वाभाविक प्रवृत्तीस अनुसरून राक्षसांनीं आपल्या नगरीच्या तटावर मधून मधून तरी सोन्याचे पत्रे लावलेले असतील हें आपणास कबूल केलें पाहिजे. त्यांच्याजवळ फार सोनें असावें हें संभवनीय आहे. दक्षिण हिंदुस्तान व सीलोन यांत पूर्वी फार सोनें असून तें त्यांना खाणींतून व नद्यांवरील वाळूंतून सांपडत असे; एवढेंच नव्हे तर हल्लींही म्हैसूर संस्थानांत खाणींतून पुष्कळ सोनें सांपडतें तेव्हां कल्पनामय वाटणारें हें वर्णन केवळ कवीच्या कल्पनेंतून बाहेर पडलेलें नसावें. मात्र तें मुळांतल्या थोड्याचें अतिशयोक्तिपूर्ण वर्णन आहे असें आमचें मत आहे.

मारुतीनें शांतपणें नगरींत प्रवेश केला व तींत त्याला पुष्कळ प्रासाद दिसले; हे बांधण्यांतही पूर्वी भिंतींमध्यें वर्णिलेला भव्यपणा व बांधणारांची प्रतिभा हीं दिसून येत होती. कवीनें रावणाच्या राजवाड्याचें दिलेलें वर्णन आमच्या कल्पनेच्या बाहेर वाटेल. या सर्व राजवाड्याचा विस्तार सभोवार फिरल्यास ३ मैल भरेल एवढ्या भूमीवर होता. व "माँटेझूमाच्या राजवाड्याच्या वेदिकेंत ३० घोडेस्वार एकदम शर्यत खेळूं शकले असतें" इतका तिचा विस्तार होता हें वाचलें म्हणजे त्यापुढें रावणाच्या प्रासादांचा विस्तार कांहीं फार नाहीं. मारुति रावणाच्या अगदीं आंतल्या दिवाणखान्यांत सीता सांपडेल या उद्देशानें तेथें निर्भय गेला; परंतु प्रत्येक

कवीला व इतिहासकाराला असणाऱ्या जन्मसिद्ध हक्काची—कोणालाही कोठेंही नेणें याची—ही बहुधा अंमलबजावणी असावी. तेथें त्याला १००० सुंदर स्त्रिया दिसल्या. त्या सर्व निजलेल्या होत्या. त्या बहुतेक जरी बलात्कारानें आणलेल्या असल्या तरी रावणावरील प्रेमानें मोहित होऊन आलेल्या त्यांत कोणीच नव्हत्या असें नाहीं. या गोष्टींतही मुळींच अतिशयोक्ति नसावी; कारण मेक्सिकोंतील प्रतिरावण मॉंटेझूमा याला सुद्धां एक हजार स्त्रिया असून "त्या सर्व त्यानें त्यांच्या नाखूष व दुःखी मातापितरांपासून बलात्कारानें आणलेल्या होत्या. मॉंटेझूमा आपल्या जनान्यांत ठेवण्याकरितां स्त्रिया किती निर्दयपणें नेतो याविषयीं स्पॅनिश लोकांच्या कानावर पुष्कळ गोष्टी येत. अंतःपुर सोडून मारुति मग सर्व वाडाभर व त्याच्या आसपास सीतेला शोधीत हिंडला; पण ती न सांपडल्यामुळें निरनिराळ्या मनोहर मार्गांनीं भूषित झालेल्या व पक्ष्यिनींनीं भरलेल्या रावणाच्या उद्यानांतून तो हिंडला. "इतक्या नवीन, अनपेक्षित व कल्पनेला इतक्या अद्‌भुत वाटणाऱ्या देखाव्यांचें दर्शन झाल्यावर वर्णन करितांना साहजिकपणेंच उत्पन्न होणारी जी अतिशयोक्तिपूर्ण वर्णन करण्याची इच्छा तिची या वर्णनावर कदाचित् छाया पडली असावीसें दिसतें. इतका काळ लोटल्यामुळें व आपली परिस्थिति त्या काळाहून अगदीं भिन्न असल्यामुळें आपणास जरी हें वर्णन खोटें अथवा काल्पनिक वाटलें तरी त्याला सत्याचा आधार मात्र खास आहे.

त्या उद्यानांतील अशोकवनांत विवर्ण, कृश व दुःखी अशी सीता एका झाडाखालीं बसलेली मारुतीनें पाहिली. हीच रामाची राज्ञी याबद्दल खात्री करून घेऊन तो सावकाशपणें तिजपुढें आला व आपण शत्रुपक्षाचा नाहीं हें दाखविण्यासाठीं त्यानें रामाची अंगठी

तिजपुढें टाकिली. ती अंगठी एकाएकीं पाहिल्यामुळें सीतेला अमर्यादित आनंद झाला व तिला तिच्या सर्व अपेक्षा व आकांक्षा यांचें विस्मरण होऊन ती कांहीं वेळपर्यंत मारुतीकडे केवळ टक लावून पहात राहिली. तिच्या गालावरून आनंदाश्र घळघळां वाहूं लागले. आपण येथें कसे व कां आलों हें सांगून " राम लौकरच मोठ्या बलाढ्य सैन्यासह तुला सोडविण्याकरितां येईल " असें म्हणून मारुतीनें तिचें समाधान केलें. तिला आत्यंतिक आनंद व सुख होऊन इतके दिवस भोगलेलें दुःख फुकट गेलें नाहीं असें वाटलें. 'मनुष्याला दुःख व कष्ट कितीही सोसावे लागले तरी शेवटीं त्याला आनंद प्राप्त होतोच' असे उद्गार काढून " मी एकनिष्ठ असून जिवंत आहें आणि रावण व त्याचें नरमांसभक्षक सैन्य यांचा नाश झाल्यावर माझी माझ्या प्रियपतीशीं भेट होईल अशी मला पूर्ण आशा आहे. परंतु परिस्थितीचा विचार करण्याकरितां रावणानें मला एक वर्षाची मुदत देऊन त्या मुदतीच्या अखेरीस त्यानें मला मारण्याची धमकी घातली आहे व ती मुदतही आतां सरत आली आहे. " असा सूचनावजा निरोप तिनें मारुतीजवळ सांगितला.

मारुतीनें तिच्याजवळूनही खुणेची वस्तु घेतली व सुप्रभातसमयीं तो आलेल्या मार्गानें परत हिंदुस्थानास येण्यास निघाला. योग्य कालानंतर तो किष्किंधेस आला व आपण लंकेंत सीतेचा शोध लावल्याविषयींची शुभ वार्ता व सीतेचा निरोप त्यानें रामास सांगितला. निराश होऊं पहाणाऱ्या त्या सीतापतीनें आपल्या मित्राला पोटाशीं घट्ट आवळून धरलें व त्याची आणि त्याच्या सामर्थ्याची गगनांत मावेनाशी स्तुति केली.

त्यानंतर रामानें आपल्या वानरसैन्यासह (कदाचित् रुसो, जपानी युद्धाचे वेळीं रशियन लोक जपानी लोकांना 'पिंवळीं माकडें'

म्हणून जसे चिडवीत तसेंच आपल्या सामर्थ्याविषयीं राक्षसांना फार घमेंड असल्यामुळें त्यांनीं रामाच्या सैनिकांना वानर हें नांव दिलें असेल.) कुच केलें व तो लौकरच समुद्रकिनाऱ्यावर आला. भावाच्या सगर्व वर्तणुकीला कंटाळून निघालेला रावणाचा भाऊ बिभीषण त्याला येथेंच येऊन मिळाला. मेक्सिकन लोकांचा पक्ष सोडून आझटेक जातीचा एक राजवंशी पुरुष इक्स्ट्लिल्क्सॉचिट्ल यानें स्पॅनिश लोकांना मेक्सिकोवरील हल्ल्यांत मदत करून जी कामगिरी बजाविली तीच कामगिरी बिभीषणानें या राक्षसयुद्धांत बजावली. मागासलेल्या लोकांचा आपल्यांमधील मनुष्यांच्याच अयोग्य वर्तनानें नाश होतो असें आपणास इतिहासांत नेहमीं दिसून येतें. आपल्या भावाच्या या देशद्रोही वर्तनाचा अत्यंत राग येऊन रावणानें जो श्लोक उच्चारला त्यांतील मनोहर सत्यता कोणत्याहि काळांत सारखीच राहील. तो म्हणतो, "आम्हांला आमच्या बांधवांशिवाय कोणाचीही भीति वाटत नाहीं असें जें पूर्वी हत्ती वनांत म्हणत त्याची मला यावेळीं आठवण होते. "*

असो; समुद्रकिनारीं आल्यावर एवढें मोठें सैन्य समुद्राच्या पलीकडे कसें न्यावें याचा रामापुढें मोठाच प्रश्न पडला. समुद्र उथळ व क्षुब्ध; आणि मनांत आल्यास योग्य वेळींच तोंड देणारा शत्रु पलीकडील तीरावर–तेव्हां अशा परिस्थितींत होड्यांचा उपयोग करण्याचा विचारसुद्धां अशक्य होता. परंतु या अडचणींतून स्पॅनिश लोक ज्या मार्गानें पार पडले त्याच मार्गानें रामानें आपली सुटका करून घेतली. स्पॅनिश लोकांनीं

---

*यावरून पाळलेल्या हत्तीकडून नवीन हत्ती पकडण्याची पद्धत फार प्राचीन असावी असें दिसतें.

आपल्या मेक्सिकन दोस्तांना, दगड, माती जें काय सांपडेल त्यानें खाड्या व कालवे भरून काढण्यास लाविलें; आणि या कामासाठीं त्यांनीं जेव्हा आझटेक लोकांच्या इमारती पाडण्यास सुरवात केली त्या वेळीं ते लोक त्यांना तिरस्कारानें म्हणाले, "मूर्खांनो ! चालूं द्या, तुमचा उद्योग असाच चालूं द्या. आमचा जर जय झाला तर या इमारती तुम्हांला पुन्हां आमच्याकरितां बांधाव्या लागतील; जर तुमचा जय झाला तरीही तुम्हांला त्या स्पॅनिश लोकांकरितां बांधाव्या लागतील." परंतु वानर खाडी भरून काढीत असतां रावण व त्याचे राक्षस यांनीं आझटेक लोकांप्रमाणें त्यांच्याकडे दृष्टि ठेविली नाहीं; आणि आपली शक्ति व सृष्टिनिर्मित सुरक्षित जागा यांच्या भरावर आपल्यावर कोसळणाऱ्या संकटाचें स्वप्नहि न पडतां ते खुशाल झोंपा काढीत बसले. अतिशय उत्साही अशा त्या वानरांनीं रात्रंदिवस काम करून मधला तो समुद्राचा पट्टा भरून काढला व रामलक्ष्मणांनं पुढें करून त्यांच्यामागून त्यांनीं त्या धक्कारूपी सेतूवरून समुद्र सुरक्षितपणें ओलांडिला. नंतर आपल्या चार टोळ्या करून ते लंकेच्या चारी वेशींशीं तळ देऊन राहिले.

प्रेस्कॉटनें दिलेलें मेक्सिकोच्या वेढ्याचें वर्णन अथवा अत्यंत तीव्र अशा विरोधासही न जुमानतां अन्य शहरें काबीज केल्याचीं जगाच्या इतिहासांतील इतर वर्णनें यांच्याशीं रामायणांतील लंकेच्या वेढ्याचें वर्णन अगदीं सदृश आहे. अत्यंत तीव्रतेनें शहराच्या निरनिराळ्या वेशींतून आंतील लोकांनीं केलेले, सर्वसाधारणतः निरुपयोगी होणारे, व ज्यांत पुष्कळदां सेनापति मारला जातो असे हल्ले या वेढ्यांतही झालेले आहेत. हलके हलके शहरांतील लोकांना उपासमारींत दिवस काढावे लागूं लागले व रणसाहित्याचाही तुटवडा भासूं लागला. वान-

रांनीं शहराच्या तटावर जमावानें हल्ले केले; परंतु पुष्कळदां ते हल्ले परतविले जाऊन दोन्ही बाजूंस खूपच कत्तल उडे. शेवटीं शहराच्या एका भागांत अग्निप्रलय झाल्यामुळें सार्वत्रिक धुमाकूळ व अव्यवस्था माजून निराशेचें साम्राज्य पसरलें आणि अन्न व रणसाहित्य मिळत नाहींसें झाल्याकारणानें शहर शत्रूच्या ताब्यांत जाण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. आझटेक लोक आणि त्यांचा तरुण राजा ग्वाटेमोझिन—मॉंटेझुमाचा जांवई व वारस—यांच्याध्यें दिसून येणारा अचल निश्चय व रानटी आवेश रावणाच्या आंगींही होता आणि त्याच निश्चयानें व आवेशानें तो शेवटपर्यंत लढला. त्याच्या हुकुमावरून केलेल्या हल्ल्यांतून सेनापतीमागें सेनापति धारातीर्थीं पडले. या हल्ल्यांचीं बारीकसारीक वर्णनें देत बसण्याची जरूर नाहीं; परंतु रावणाचा मुलगा इंद्रजित व भाऊ कुंभकर्ण हे कसे मरण पावले याचा उल्लेख आम्ही करितों. धनुर्विद्येतील कौशल्यानें इंद्रजितानें रामलक्ष्मणांना जवळजवळ मारलेंच होतें; व ज्या रथांत बसून लढाईस गेलें असतां अपयश प्राप्त होणार नाहीं असा रथ मिळविण्याकरितां तो करीत असलेला यज्ञ अगदीं संपण्याच्या बेतांत आला असतां, बिभीषणानें लक्ष्मणाला त्याच्या यज्ञस्थानीं नेलें, व लक्ष्मणानें त्याच्यावर छापा घालून त्यास ठार केलें अशी कथा लोकांत प्रसृत आहे. राक्षस बलिष्ठ व दृढनिश्चयी असले तरी ते रानटी दशेंत होते हें आम्हीं सांगितलेंच आहे. तेव्हां ते धनुष्याचा उपयोग करीत किंवा आर्य लोकांप्रमाणें वैदिक मंत्र म्हणून यज्ञ करीत या कल्पना अलीकडिल कवींच्या होत. स्पॅनिश लोकांचें महत्त्वाचें आयुध ज्याप्रमाणें तोफ त्याप्रमाणें या वेळीं आर्यांचें महत्त्वाचें आयुध धनुष्यबाण हें होतें हें आम्हीं मागें सांगितलेंच आहे. उच्च सुधारणेचा कमी दर्जाच्या सुधारणेवर जो नेहमीं जय होतो त्याचें

शस्त्रास्त्रांतील त्यांचा उच्चपणा हें अगदीं स्पष्ट व प्रमुख कारण आहे. रावण व इंद्रजित यांखेरीज सर्व राक्षस आझटेक लोकांप्रमाणें काठ्या शूल व शक्ति वगैरे आयुधांनींच लढत असें रामायणांत वर्णिलेलें आहे. इंद्रजितानें कांहीं वेळ त्या बंधुद्वयावर ताण केली असेल अथवा तो दबा धरून बसला असतां बिभीषणानें त्याची जागा दाखविल्याकारणानें लक्ष्मणानें त्यास मारलें असेल. यावर भरंवसा बसतो; परंतु त्याच्याजवळ धनुष्यही नव्हतें अथवा तो यज्ञही करीत नव्हता ही गोष्ट मात्र खरी. कुंभकर्ण जेव्हां उत्तरवेशींतून हल्ला करण्याकरितां बाहेर पडला त्या वेळीं त्याचा सुद्धां फक्त आपला अवाढव्य आकार व शक्ति यावरच भरंवसा होता. प्रथम तो त्रिशूल घेऊन लढला व नंतर तो केवळ हातांनींच लढला असें रामायणांत वर्णन आहे. रामानें त्याचे हातपाय तोडले व तो अवजड राक्षस जमनिवर पडला; परंतु पडतां पडतां व मरतां मरतां नुसत्या आपल्या शरीराच्या आकारानें व वजनानें त्यानें शत्रुपक्षाकडील कित्येक लोक मारिले असें कवींनें अतिशयोक्तीचें वर्णन केलें आहे.

ज्यांच्यावर रावणाचा अत्यंत भरंवसा होता असे त्याचा भाऊ व मुलगा हे दोघेहि वीर मारले गेलेले; त्यांचें सैन्य विस्कळित व पराभूत होण्याच्या मार्गाला लागलेलें; त्याच्या शहराला आग लागलेली; आणि त्याची प्रजा त्याला शाप देऊन त्याच्या नांवानें खडे फोडूं लागलेली; अशा स्थितींत नरमांसभक्षकांच्या त्या राजाला कांहीं सुचेनासें झालें. निराशेनें व संतापानें तप्त होऊन नरमांसभक्षकांच्या सहजप्रवृत्तीस अनुसरून त्याच्या या सगळ्या दुःखाला कारणीभूत होणाऱ्या सीतेचा वध करण्याचा त्यानें विचार केला व हातांत तरवार घेऊन तिला ज्या ठिकाणीं अटकेंत ठेविलें होतें त्या ठिकाणीं तो गेला. परंतु सीतेच्या

अनुपम सौंदर्यामुळें व त्याच्या प्रधानाच्या शांतवनामुळें तो रानटी राजा आपल्या दुष्ट बेतापासून परावृत्त झाला व आपण कबीज केलेलें सुंदर सावज गमावण्याच्या अगोदर एकदां शेवटचा व जोराचा हल्ला करून आपल्या कट्टया शत्रूस मारण्याचा त्यानें निश्चय केला. संतप्त झालेल्या त्या लंकाधिपाच्या मागून लाखों राक्षस उत्तरद्वारांतून बाहेर पडले व अत्यंत निकराची लढाई सुरू होऊन ती पुष्कळ वेळ टिकली. या लढाईत रावणानें धनुष्यबाणांचा उपयोग केल्याचा उल्लेख आहे; परंतु लक्ष्मणाला मात्र त्यानें शक्तीनेंच जबर जखम केली. रणांगणांतून त्याला दूर नेऊन त्याची काळजीपूर्वक शुश्रूषा करण्यांत आली.* लढाई चालूच होती.

प्राचीन आर्यांच्या इतिहासांत या लढाईशीं सदृश अशी लढाई झालीच नाहीं. 'रामरावणांच्या युद्धास उपमा त्याचीच' असें कवींनें म्हटलें आहे तें योग्यच होय. शेवटीं रामानें सोडलेला बाण छातींत घुसल्याकारणानें तो राक्षसराजा मरून पडला; त्यामुळें देव, मानव, वानर यांना अतिशय आनंद होऊन रावणाच्या विजयी शत्रूला सोन्याच्या भिंती असणाऱ्या लंकेसह त्याची सर्व अगणित संपत्ति प्राप्त झाली.

---

*लक्ष्मणाला रणांगणांतून बाहेर आणल्यावर त्याची भयंकर जखम संजीवनी नावाच्या वनस्पतीच्या उपयोगानें बरी करण्यांत आली; ही वनस्पति हिमालयाच्या एका शिखरावर उगवलेली असून मारुतीनें तें शिखरच्या शिखर तेथून लंकेपर्यंत आपल्या हातावर आकाशांतून आणलें; असें रामायणांत वर्णन आहे; व हा देखावा रामायणांत तीनदां दृष्टीस पडतो. पुनर्रचनाकाराला रामरावणांच्या युद्धाच्या या अद्भुत कथेंत अद्भुतावर अद्भुत गोष्टी घालण्याची इच्छा असल्यामुळें, मारुतीनें पर्वतशिखर आणल्याची कथा केवळ त्याच्या कल्पनाशक्तीचें कर्तृत्व होय असें म्हटल्याबांचून या गोष्टीचा उलगडाच होत नाहीं.

लंकेच्या वेढ्याची व रावणाच्या मृत्यूची कथा अशी असून ती अत्यंत साधी असली तरी पुष्कळ अद्‌भुत आहे. ही गोष्ट होऊन गेल्यास कित्येक हजार वर्षें झालीं आहेत व एवढ्या काळांत अगदीं न पचण्याजोग्या अतिशयोक्तीचा तींत भरणा झाला असल्यास नवल नाहीं. एवढेंच नव्हे; मॉन्टेझूमा जिवंत असतांनाच त्याच्या-विषयीं लोकांत अतिशयोक्तिपूर्ण गोष्टी किती पसरल्या होत्या हें वाचलें म्हणजे रामाच्या रावणाशीं झालेल्या युद्धाविषयींच्या कथेंत रामाचें सामर्थ्य, रावणाचें महत्त्व व लंकेंतील संपत्ति इत्यादिकां-संबंधीं विसंगत, अतिशय अलौकिक, भपकेबाज व अत्युक्तिपूर्ण अशीं वर्णनें रामाच्या हयातींतच पसरलीं असतील असें वाटतें. इतका मोठा काळ मध्यें गेल्यानंतर हिंदुस्थानांतील लोकांच्या रावणाविषयीं ज्या कल्पना आहेत त्याच कल्पना मॉंटेझूमाच्या हयातींतच त्याच्या-विषयीं पसरल्या होत्या. स्पॅनिश लोकांना तो हंसून म्हणतो "मी देव असून सोन्यारुप्याच्या राजवाड्यांतून राहातों असें लोकांनीं तुम्हांला सुद्धां सांगितलें असेल. परंतु पहा ही गोष्ट खोटी आहे. माझीं घरें जरी मोठीं असलीं तरी तीं इतरांच्याप्रमाणें दगड, माती व लांकूड यांचींच आहेत. माझ्या शरीराविषयीं म्हणाल तर हा माझा हात पहा; तुमच्याप्रमाणें त्याच्यांतही मांस व हाडेंच आहेत." मॉंटेझूमानें स्वतः असें म्हणणें ही खेदाची गोष्ट होय; परंतु ज्याअर्थीं त्यामुळें लंकेच्या व रावणाच्या वर्णनांतील अद्‌भुत, भ्रामक व अतिशयोक्ति-पूर्ण असा भाग आपणांस दूर करितां येतो, त्याअर्थीं त्याचें हें भाषण आपल्यास फायदेशीरच आहे.

परंतु रावण व लंका यांच्या महत्त्वांतील खोटा भाग जरी दूर केला तरी लंकेवर हल्ला करून ती काबीज करण्यांत रामानें जें महत्कार्य केलें तें आपणांस आश्चर्यकारक वाटल्यावांचून राहत नाहीं. आपल्या

पश्चिमेकडील बांधवांप्रमाणें प्राचीन आर्यांचीं मनेंही साहसाच्या प्रवृत्तीमुळें प्रज्वलित झालीं होतीं. व त्यांचा ज्यांच्याशीं संबंध आला ते लोक कमी सुधारलेले असले, व कमी सुधारलेल्या लोकांचा ज्या दोन विशिष्ट कारणांमुळें पराभव व्हावयाचा हें ठरलेलें असतें असें आम्हीं मागें विवरणाच्या ओघांत सांगितलें आहे त्या दोन कारणामुळें (हीं दोन कारणें म्हणजे एक हत्यारांच्या बाबतींतील कमीपणा व दुसरें स्वपक्षद्रोह व भेद यांनीं विशेष भरलेली हलक्या दर्जाची राजकीय नीति हीं होत.) राक्षसांचा पराभव होणार हें जरी ठरलेलें होतें तरी ज्या-अर्थीं दोघां वीरांनींच क्रूर अशा नरमांसभक्षकांचें सबंध राष्ट्र जिंकिलें त्याअर्थीं त्यांच्या अंगीं असामान्य धैर्य, वाटेल त्या वेळीं जागृत असणारी कल्पनाशक्ति व स्वतांवर अपरिमित विश्वास हे गुण असलेच पाहिजेत. व या गुणांनीं भरलेल्या अशा रामाच्या उदात्त चारित्र्याचा विचार केला म्हणजे कोर्टेझ (Cortez) किंवा कधीं कधीं अज्ञात प्रदेशांत व अज्ञात लोकांत एकटे शिरून आपल्या इच्छेच्या व उत्साहाच्या जोरावर ज्यांनीं संपत्ति व कीर्ति मिळविली असे त्याच्याचसारखे कांहीं अर्वाचीन पाश्चात्य साहसी लोक यांच्यापेक्षां उच्चतम अशा या वीराचें आपल्यास कौतुक केल्याशिवाय राहवत नाहीं.

प्रकरण १४ वें.

दुःखद शेवट.

विजयी रामानें मग, 'माझा शत्रु मेला; आतां माझें त्याच्याशीं वैर संपलें ' असें म्हणून त्या महान् राक्षसराजाचा अंत्यविधि करण्यास विभीषणाला सांगितलें. नंतर त्यानें लक्ष्मणाला सुवर्णकलशांतून समुद्राचें पाणी आणविण्यास सांगितलें, व लंकेच्या मोकळ्या पडलेल्या सिंहासनावर विभीषणाला बसवून आणि त्याच्या मस्तकावर त्या जलाचा अभिषेक करून त्यानें त्याला त्या देशाच्या राज्यपदावर स्थापिलें. आपल्या दोस्तास असें बक्षीस दिल्यावर मग त्याच्या मनांत सीतेविषयीं विचार आला व "तुला दुःख देणारा राक्षस मेला असून तुझा पति विजयी झाला आहे" अशी बातमी तिला कळविण्याकरितां त्यानें हनुमानाला तिजकडे पाठविलें. निराश झालेल्या त्या बिचारीला ती बातमी ऐकून जिवांत जीव आल्यासारखें झालें व आनंदाच्या भरांत सुद्धां मारुतीनें आपण आजपर्यंत कधीं ऐकिली नाहीं इतकी आनंदाची बातमी सांगितल्याबद्दल त्याला बक्षीस देण्याजोगें आपणाजवळ कांहीं नाहीं म्हणून तिला वाईट वाटलें. ज्या वीराचा मला अत्यंत दीर्घ व दुःखद असा विरह सोसावा लागला त्याला भेटण्याची माझी इच्छा आहे असें ती म्हणाली. हनुमानानें तसा तिचा निरोप रामाला सांगितल्यावरून रामानें तिला योग्य तऱ्हेनें स्नान घालून व वस्त्राभरणांनीं भूषित करून आणण्यासाठीं बिभीषणाची रवानगी केली. कांहीं तासांनीं, राक्षसांनीं उचललेली

अशी एक पालखी आली व विभीषणानें आपल्या चोपदारांना रामाच्या भोंवतीं जमलेली गर्दी दूर करण्याचा हुकूम केला. " यज्ञाच्या वेळीं अथवा विवाहाच्या वेळीं अथवा एखाद्या महासंकटाच्या वेळीं स्त्रिया लोकांत आल्या तरी तें निंद्य नाहीं " असें म्हणून राम मध्यें पडला. आपल्या सगळ्या मित्रांना सीता पाहावयास मिळावी म्हणून रामानें विभीषणाला तिला चालत घेऊन येण्यास सांगितलें. लक्ष्मण, हनुमान, विभीषण व सुग्रीव यांना रामाच्या तोंडून असे शब्द निघालेले पाहून फार दुःख वाटलें व सीतासुद्धां शून्य अंतःकरणानें व भीतीनें त्याच्यापुढें येऊन उभी राहिली. आनंद, आश्चर्य व प्रेम या मिश्रित विकारांनीं त्या पतिव्रता पत्नीनें आपल्या पतीच्या मुखाकडे टक लावून पाहिलें. परंतु त्याच्या तोंडावर लज्जा व राग हे विकार एकामागोमाग येत असलेले तिला दृष्टीस पडले. राम तिला सावकाशपणें म्हणाला, " सीते, ही तुला मी माझ्या शत्रूपासून सोडविली आहे. शूर मनुष्यानें जें करावयास पाहिजे तें मीं केलें आहे व माझा शत्रु व माझा अपमान यांचा मीं एकदमच नाश केला आहे. मीं माझी प्रतिज्ञा पुरी केली असून तुला कैदेंतून सोडविलें आहे. समुद्रावरून उडी मारून एकटाच लंकेंत जाऊन हनुमानानें जें महत्कार्य केलें तें आतां फळास आलें आहे व त्याचप्रमाणें सुग्रीवाचें शौर्य व विभीषणाचें सख्य यांनाही आतां यश आलें आहे. परंतु हें तूं लक्षांत ठेव कीं, हें सर्व मीं माझ्या व रघुकुलाच्या कीर्तीला धवल करण्यास्तव केलें आहे. तुझ्याविषयीं म्हणशील तर दुखऱ्या डोळ्यांना जसें दिव्यानें समाधान होत नाहीं, त्याप्रमाणें तुला पाहून मला मुळींच सुख होत नाहीं. तुला आतां वाटेल तिकडे तूं जा. कारण दुसऱ्याच्या येथें पुष्कळ दिवस राहून कलंकित

झालेल्या स्त्रीला कोणता स्वाभिमानी व कुलीन मनुष्य घरांत घेईल ?" त्या दुःखी स्त्रीच्या कानावर हे शब्द विजेप्रमाणें पडले व आपल्या शरीरांतून प्राणवायु निघून जात आहे असें तिला वाटलें. परंतु शांतपणें धैर्य धरून तिनें उत्तर दिलें—"हे असले कठोर वाक्प्रहार करून तूं मला एखादा प्राकृत मनुष्य आपल्या हलकट बायकोला जशी वागवितो तशी कां वागवीत आहेस ? मी पवित्र व शुद्ध असल्याचें मी शपथेवर सांगतें व हें सिद्ध करून देण्यास मी तयार आहें. रावणानें मला स्पर्श केला ही गोष्ट खरी, परंतु त्या गोष्टीस माझा इलाज नव्हता. इतक्या वर्षांच्या सहवासानें सिद्ध झालेली माझी तुजवरील निष्ठा जर माझ्या मनाच्या शुद्धतेबद्दल तुझ्या मनाची खात्री करण्यास पुरी नसेल तर मग माझ्या दुर्दैवाला शेवट नाहीं असें म्हटलें पाहिजे. रागानें यावेळीं तुझ्यावर स्वामित्व मिळाविल्याकारणानें तूं मला एक साधारण स्त्री समजतो आहेस व माझी भक्ति, माझें चारित्र्य व विवाहाच्या वेळीं केलेला पवित्र हस्तग्रह यांची तुला कांहींच किंमत वाटत नाहींशी झाली आहे." निष्प्रभ अशा गालावरून अश्रूंचे प्रवाह चालले आहेत अशा स्थितींत ती लक्ष्मणाला म्हणाली—"लक्ष्मणा, एक चिता तयार कर. असले निराधार आरोप मजवर केले गेल्यानंतर मी जिवंत राहूं इच्छीत नाहीं. नाराज झालेल्या माझ्या पतीनें मला सर्व लोकांसमक्ष टाकिलें असतां मला चितेवर जाऊन घेण्याशिवाय दुसरा मार्गच मोकळा नाहीं." यामुळें लक्ष्मणाला अतिशय वाईट वाटून त्यानें रामाकडे पाहिलें. परंतु त्याच्या चेहऱ्यावर हा मार्ग पत्करण्याविरुद्ध मुळींच चिन्ह न दिसल्यामुळें त्यानें लगेच लांकडांची एक रास करविली व तिला आग लावून दिली. सीतेनें त्या चितेला प्रदक्षणा घालतेवेळीं रामाला नमन केलें, त्या वेळीं त्यानें मान खालीं घातली. नंतर अग्नीजवळ

जाऊन सीता म्हणाली, "ज्या अर्थी माझें हृदय शुद्ध आहे व माझी रामावर अविरत निष्ठा आहे त्या अर्थी हा अग्नि माझें सर्व बाजूंनीं रक्षण करो. मी शुद्ध असतांही ज्याअर्थी रामाला मी कलंकित झालें आहें असें वाटत आहे त्याअर्थी हा अग्नि माझें सर्व बाजूंनीं रक्षण करो." व असें म्हणून पतिव्रतेला अनुरूप अशा धैर्यानें तिनें त्या जळणाऱ्या चितेंत उडी टाकिली. तेथें जमलेल्या स्त्रीपुरुषांच्या समुदायांतून एकदम भीतीची आरोळी बाहेर पडली व अश्रुपूर्ण नेत्रांनीं रामानें वर पाहिलें. परंतु अग्निदेवानें सीतेला चितेंतून सुरक्षित बाहेर काढलें. व ती शुद्ध व 'अपाप' आहे असें रामास सांगितलें. राक्षस व वानर यांनीं तें भयंकर दिव्य पाहिलें, "माझी पत्नी त्या नीच राक्षसाच्या घरीं पुष्कळ दिवस राहिली असल्या-कारणानें तिचा मी स्वीकार करण्यापूर्वी तिनें असें दिव्य करणें अवश्य होतें" असें म्हणून आपल्या पत्नीचा रामानें मोठ्या आनंदानें स्वीकार केला.

आपण निष्पाप आहों हें सिद्ध करण्याकरितां सीतेनें हें असें महान् दिव्य केलें. असलीं दिव्यें करणें शक्य आहे, कीं नाहीं याचा आम्हीं येथें विचार करीत नाहीं; कारण सीतेनें असलें दिव्य केलें असतांही रामाच्या वेळीं सीतेच्या शुद्धाशुद्धतेविषयीं लोक संशय घेतच असत; व अजूनसुद्धां टालबाईज व्हीलरसारखे लोक तोच संशय उपस्थित करतात. परंतु रावणानें सीतेवर कधींही बलात्कार केला नाहीं याबद्दल मनाची खात्री करणारीं कारणें मात्र सबळ आहेत. सीता केवळ स्त्री असतांना तिला बलात्कारानें पत्नी करून घेण्यापा-सून रावण परावृत्त कां झाला याला कारण म्हणून पुनर्रचनाकारानें नलकूबराच्या शापाची एक व ब्रह्मयाच्या शापाची एक अशा दोन गोष्टी दिल्या आहेत. परंतु याच्यापेक्षां सबळ ऐतिहासिक आधारा-

वर रावणानें हा मार्ग कां स्वीकारला नाहीं याचें उत्तर देतां येईल. स्त्रिया बलात्कारानें पकडून पळवून नेऊन त्यांच्याशीं लग्न लावण्याची चाल राक्षसांत होती हें आम्हीं सांगितलेंच आहे. परंतु त्यांच्यामध्यें अशीही एक चाल होती कीं, जिवंत माणसाची बायको पळवून आणल्यास तिला आपल्या नवीन परिस्थितींत समाधान वाटूं लागावें म्हणून व तिच्या नवऱ्याला आपल्या बायकोला पळवून नेणाराला मारून अथवा पराभूत करून आपल्या पत्नीला सोडवून नेण्याची संधि मिळावी म्हणून पळवून आणलेल्या स्त्रीला एक वर्षाची मुदत देण्यांत येत असे. महाभारतांत असा स्पष्ट उल्लेख आहे कीं, राक्षसविवाहांत पत्नीशीं संभोग करण्याच्या अगोदर तिला एक वर्षाची मुदत अवश्य दिली पाहिजे. रामायणांतही रावणानें सीतेला आपल्या नव्या परिस्थितींत समाधान वाटूं लागावें म्हणून जी मुदत दिली आहे तीही एक वर्षाची आहे ही गोष्ट विशेष लक्ष्यांत ठेवण्याजोगी आहे. आणि जर रामानें तिला एक वर्षाच्या आंत सोडविलें नसतें तर रावणानें सीतेच्या इच्छेविरुद्ध तिच्याशीं लग्न केलें नसतें; तर नरमांसभक्षक व राक्षस यांच्या चमत्कारिक प्रेमाप्रमाणें त्यानें तीस कापून तिचें मांस खाऊन टाकलें असतें असें दिसतें, कारण तिची प्रेमयाचना करीत असतां त्यानें तिला एकदां असाच धाक घातला आहे. आझ्टेक लोक आपल्या भयंकर देवाला ज्या पुरुषाला बळी देत त्या पुरुषाला बळी देण्याच्या आधीं एक वर्षपर्यंत पुष्कळ तरुण स्त्रियांचा उपभोग देत व मग त्याला बळी देऊन त्याचें मांस खात. बहुधा त्याच्या सख्याही तें मांस खात असाव्या. असो. नरमांसभक्षकांमध्यें सुद्धां कांहीं योग्य चालीरीति होत्या व कैद केलेल्या स्त्रीच्या इच्छेविरुद्ध तिच्याशीं संभोग करण्यास राक्षसांच्या चालीरीतात परवानगी

नसतां ती चाल झुगारून देऊन रावणानें तिच्या अगदीं विरुद्ध वर्तन केलें असेल हें संभवत नाहीं.

अशा रीतीनें आपल्या पत्नीशीं संगत होत्साता राम आपले दोस्त सुग्रीव व विभीषण व त्यांचे दरबारी यांसह अयोध्येस आला. त्याच्या दोन दोस्त व सामर्थ्यवान राजांनीं कितीही सोयी करून दिल्या असल्या* तरी त्याला त्याचा प्रवास संपविण्यास पुष्कळ महिने लागले असतील यांत मुळींच संशय नाहीं. राम मोठी थोरली लढाई जिंकून सुरक्षित परत आलेला पाहून भरताच्या आनंदास पारावार नाहींसा झाला. प्रामाणिक प्रतिनिधीप्रमाणें वागून आपण त्याच्यामोंग राज्य कसें चालविलें, खजिन्यांतील शिल्लक दसपट कशी केली वगैरे गोष्टी सांगून " मी आतां ज्याचें राज्य त्याला परत करीत आहें " असें म्हणून त्यानें पादुका रामाच्या चरणीं अर्पण केल्या. रामलक्ष्मण व त्यांच्या माता यांची भेट, लंकेच्या विजयानें कीर्तिमंदिराच्या शिखरास पोहोंचलेला लोकांचा खराखुरा राजा व त्याचे प्रजाजन यांचा भेट, यांविषयीं वर्णन देण्यापेक्षां त्यांची वाचकानींच कल्पना करणें जास्त चांगलें, रघुकुलाचा आतां वृद्ध झालेला पुरोहित वसिष्ठ यानें मुळींच वेळ न घालवितां रामाला

---

* कुबेराच्या विमानांत बसून राम एक दिवसांत अयोध्येस गेला ही कल्पना आम्हांस अतिशयोक्तिपूर्ण वाटतें. परंतु बिभीषणानें दिलेल्या व अतिशय चांगल्या कारागिरानें बनाविलेल्या अशा पालखींत तो बसून गेला आणि त्या पालखीचे भोई फार जलद चालत; एवढ्यावर विश्वास ठेवतां येईल. जवाहिरानें व सोन्यानें विभूषित केलेलीं, चमत्कारिक तऱ्हेचीं ज्यावर चित्रें आहेत अशा उशा आंत असलेलीं, व जिला हिरव्या पंखांचें आच्छादन आहे अशा पालखींत मॉंटेझूमा बसून जात असे. रामही अशाच पालखींत बसून अयोध्येस गेला एवढें कबूल करतां येईल.

आणि त्याच्या सुंदर व एकनिष्ठ पत्नीला सुवर्णासनावर बसवून राज्याभिषेक केला व मनूपासून चालत आलेला अयोध्येचा प्राचीन मुकुट त्याच्या मस्तकावर ठेवून त्यानें सर्वत्र आनंदीआनंद करून टाकिला. सीतेनें मारुतीला या मंगल प्रसंगाच्या स्मरणार्थ आपल्या गळ्यांतील मौक्तिकांची माळ काढून दिली, कारण त्याच्या प्रयत्नाशिवाय हा दिवस उजाडताच ना. इतर पाहुणे मंडळीनांही योग्य बक्षिसें व नजराणे मिळाले व मग ते आपापल्या दक्षिणेंतील राज्यांत निघून गेले.

आतां मात्र राम अत्यंत सुखांत होता; परंतु त्याचें हें सुख कांहीं थोडे महिनेच टिकलें. सीता आतां गरोदर राहिली होती; तेव्हां हिंदु पद्धतीप्रमाणें रामानें जेव्हां तिला काय इच्छा आहे याची चौकशी केली तेव्हां गंगातीरावरील ब्राह्मणांच्या आश्रमांत एक दिवस जाऊन राहण्याची आपली इच्छा त्याजपाशीं तिनें प्रगट केली. तिची इच्छा पूर्ण करण्याचें तिला आश्वासन देऊन राम महालाबाहेर आला व नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणें त्यानें बातमीदारांस त्या दिवशींची बातमी विचारिली; तेव्हां त्याच्या बातमीदारांनीं, " सर्व लोक आपल्या अंमलाखालीं सुखी असून ते आपल्या पराक्रमाची स्तुतिही करितात. परंतु 'राक्षसाच्या येथें पुष्कळ दिवस राहून कलंकित झालेल्या सीतेच्या सहवासांत रामाला सुख कसें वाटतें' असें ते आश्चर्य प्रगट करितात आणि 'मोठ्या माणसाची वर्तणूक दुसऱ्यांनीं अनुसरावयाची असते, तेव्हां आम्हींही असेंच वर्तन ठेवावयाचें कीं काय ?' असा ते प्रश्न विचारितात " अशी बातमी सांगितली. रावणानें सीतेचें हरण केल्यामुळें रामाच्या नशिबांतलें सुख पार नाहींसें झालें होतें. ती बातमी ऐकून रामानें दीर्घ निश्वास टाकले; परंतु शेवटीं काय करावयाचें हें नक्की ठरवून त्यानें आपल्या भावांस जवळ बोलाविलें,

"माझ्यावर जर तुमचें प्रेम असेल तर मी सांगतों ही गोष्ट मुळींच कांकूं न करतां करा" असें त्यानें त्यांस डोळ्यांत अश्रू आणून सांगितलें. लोक आपल्याला व आपल्या पत्नीला काय म्हणतात व त्यासाठीं आपण काय करण्याचा विचार केला आहे हें त्यानें त्यांस सांगितलें. "प्रजेला संतुष्ट ठेवण्यासाठीं आपण पत्नी, भाऊ एवढेंच नव्हें; तर प्राण देण्यासही तयार आहों" असें तो म्हणाला. नंतर त्यानें लक्ष्मणाला सीतेला गंगेच्या पलीकडील तीरावर ब्राह्मणांच्या आश्रमांत नेऊन—तिनें त्याच्याजवळ तेथें जाण्याची इच्छा प्रगट केली होती हें त्याच्या पथ्यावरच पडलें— तेथें तिला कायमची सोडून येण्यास सांगितलें.

दुसऱ्या दिवशीं सकाळींच सीता व लक्ष्मण यांचा रथ अयोध्या प्रांतातून गंगेकडे वेगानें जाऊं लागला. लक्ष्मणाचे डोळे रक्तासारखे लाल कां झाले आहेत हें बिचाऱ्या सीतेला मुळींच कळेना. मनांत कोठच्याही तऱ्हेचा संशय नसल्यामुळें "आज तुला एवढें दुःख कां होत आहे? त्या विशालवक्ष रामाच्या विरहामुळें मलाही दुःख होत आहे; परंतु ही महार्ह वस्त्राभरणें गरीब ब्राह्मणस्त्रियांना देऊन आपण उद्यां परत येऊं" असें सीता त्याला म्हणाली. दुःखानें हृदय भरून आल्यामुळें लक्ष्मणाला तोंडातून एक शब्दही काढवेना. लौकरच तीं दोघेंजण गंगेच्या किनाऱ्यावर आलीं व कोळ्यांनीं त्यांना पलीकडे नेलें. नंतर सीतेच्या पाया पडून, डोळ्यांतून दुःखाश्रु ढाळीत लक्ष्मण सीतेला म्हणाला, "हे अनिंदित राज्ञि, मी जें काय करीत आहे याबद्दल मला तू क्षमा कर. तुला घरांत ठेवल्याबद्दल लोक रामाला नांवें ठेवतात; तेव्हां तुझा येथें त्याग करण्याचा मला हुकूम झाला आहे". अनेक वर्षें दुःखाचा अनुभव असलेल्या सीतेला सुद्धां हें दुःख फार होऊन ती मूर्च्छित पडली

गंगेच्या जलानें लक्ष्मणानें तिला शुद्धीवर आणल्यावर ती मोठ्यानें व ओक्साबोक्शीं रडूं लागली. शेवटीं ती म्हणाली, "पूर्वजन्मीं मी कोणतें पाप केलें, अथवा कोणत्या स्त्रीला तिच्या पतीपासून दूर केलें हें कांहीं मला कळत नाहीं. मीं दण्डकारण्यांत पुष्कळ वर्षें काढिलीं; परंतु तेथें राम माझ्या सहवासाला तरी होता. आतां मी त्याच्याशिवाय कशीं राहूं ? माझ्या पोटांत जर हा अमूल्य भार नसता, तर माझा मी खरोखर नाश करून घेतला असता. जा, लक्ष्मणा जा. आपल्या राजाची आज्ञा पाळ आणि त्याला माझा निरोप सांग कीं, मी शुद्ध व एकनिष्ठ आहे हें माहित असूनहीं प्रजेच्या इच्छे-नुरूप तू माझा त्याग करीत आहेस.तुझ्या मोठ्या नांवाला काळिमा लागूं नये यासाठीं या स्थितीस मान तुकावणें माझें कर्तव्य आहे. पती हा पत्नीला देव, गुरु, मित्र यांच्या ठायीं असून त्याला खूष करण्याकरितां आपल्या जिवाचीही पर्वा न ठेवतां मी वाटेल तें करण्यास तयार आहें.' लक्ष्मणानें तिला नमस्कार केला व तिला वाल्मीकीच्या आश्रमांत आश्रय घेण्यास सांगून हृदय विदीर्ण झाल्यामुळें मूढ होत्साता तो परत आला,

रामानें आपलें दुःखी मन आपल्या प्रजेला चांगल्या तऱ्हेनें वागविण्यांत व पुष्कळसे अश्वमेध यज्ञ करण्यांत गुंतविलें. अशीं कित्येक वर्षें निघून गेल्यावर एका वर्षीं एका अश्वमेध यज्ञाच्या समयीं दोन ब्राह्मण मुलांच्या गाण्याकडे रामाचें मन वेधलें. त्यानें त्या मुलांना आपल्याजवळ बोलाविलें, त्यांच्याकडे न्याहाळून पाहिलें व त्याचें गायन अगदीं एकचित्तानें ऐकिलें. हलकें हलकें त्याचें हृदय त्यांच्याकडे ओढलें जाऊं लागलें व ते कोण कोणाचे अशी चौकशी करितां सीतेच्या पोटीं जन्मास आलेले व वाल्मीकीनें वाढविलेले असे ते आपले जुळे मुलगे असून वाल्मीकिही यज्ञाला

आला आहे असें त्याला समजलें, त्यामुळें रामाचें मन अत्यंत त्रस्त झालें व आपल्या प्रेमळ पत्नीशीं आपला पुन्हां केव्हां सहवास होईल असें त्याला झालें. "माझ्या अश्वमेध यज्ञांत मला मदत करण्याकरितां आलेले ऋषि, राजे, वानर, राक्षस व माझी प्रजा यांच्यासमोर सीतेनें आपण निष्पाप व निरपराधी आहों असें सांगावें अशी माझी इच्छा आहे." असा त्यानें वाल्मीकीस निरोप पाठविला. दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्यासाठीं यज्ञागारांत ऋषि, राजे, प्रजाजन यांचा मोठा समाज गोळा झाला. वाल्मीकीच्या मागून हात जोडून चालणारी, व फक्त रामाचेंच चिंतन करणारी आणि कृश व कांपणारी अशी सीता पाहून आशेच्या उत्सुकतेनें सर्वजण दगडासारखे निश्चल झाले. 'राम धन्य आहे' असें कांहीं म्हणाले. 'सीता धन्य आहे' असें कांहीं म्हणाले. ती रामाच्या समोर आल्यावर वाल्मीकि म्हणाला, " हे दशरथाच्या पुत्रा, जिला तूं लोकनिंदेवरून टाकून दिलीस ती ही सीता येथें आली आहे. तुझी परवानगी असेल तर ती आतां आपल्या शुद्धपणाबद्दल शपथ घेईल. मी माझ्या आश्रमांत वाढविलेले तुझे जुळे मुलगे हे येथें आहेत. " रामानें उत्तर दिलें. "सीता शुद्ध आहे व हे माझे जुळे मुलगे आहेत हें मला माहीत आहे. लेकिन तिनें आपल्या शुद्धपणाविषयीं खात्री पटविण्याकरितां दिव्य केलें होतें व म्हणून मी तिचा स्वीकार केला होता. परंतु लोकानां अद्यापिहीं संशय वाटतो. तेव्हां ऋषि व प्रजाजन यांची खात्री करण्यासाठीं तिनें पुन्हां दिव्य करावें," जमिनीवर दृष्टि खिळवून व हात जोडून सीतेनें शपथ घेतली " ज्याअर्थी माझ्या मनांत रामाशिवाय इतर पुरुष कधीं आलेला नाहीं त्याअर्थी भूमिमाता मला आपल्या उदरांत स्थान देवो. कायावाचामनानें ज्याअर्थी मीं रामावरच प्रेम केलें त्याअर्थी भूमिमाता मला

आपल्या उदरांत स्थान देवो " ही शपथ तिनें उच्चारतांच भूमि खरोखरीच दुभंग झाली व सीतेला सुवर्णसिंहासनावर बसवून आंत घेऊन गेली. स्वर्गीतून सीतेवर फुलें उधळलीं गेलीं व प्रेक्षकसमाज तटस्थावस्था प्राप्त झाल्यानें निश्चल झाला. राम मान खालीं घालून व गालावरून अश्रु गाळीत पुष्कळ वेळ आपला दंड घट्ट धरून निश्चल राहिला, परंतु शेवटीं दुःखानें व संतापानें वेडा होऊन, "माझ्या सीतेला परत दे! भूमिमाते माझ्या सीतेला परत दे. नाहीं तर तुझ्या उदरांत तरी मला जागा दे; म्हणजे तेथें तरी मी तिजबरोबर नेहमीं राहीन. जिला मी लंकेहून परत आणलें त्या माझ्या सीतेला भूमिमाते परत दे; नाहींतर या समुद्रापासून त्या समुद्रापर्यंत मी तुला खणून काढीन;" असें तो ओरडूं लागला. भानावर आल्यावर त्यानें तेथें जमलेल्या सर्व ऋषींना निरोप दिला व यज्ञभूमीवर घातलेल्या एका पर्णकुटिकेंत तो जाऊन बसला.

रामाचा आतां आपल्या पत्नीशीं कायमचा वियोग झाल्या-कारणानें त्याला साहजिकच संसार व आयुष्य यांचा कंटाळा आला असेल. पूर्वीच्या आर्य लोकांत दिसून येणाऱ्या आयुष्या-विषयींच्या धार्मिक तिरस्कारामुळें त्यानें महाप्रस्थानास निघण्याचा विचार केला असला पाहिजे. आयुष्यांतील कर्तव्यकर्म संपल्यावर अथवा त्यांतील सुख संपल्यावर प्राचीन आर्य लोक संसाराशीं जास्तच निगडित न होतां वानप्रस्थाश्रम अथवा संन्यासाश्रम स्वीकारून आपलें उरलेलें आयुष्य ईश्वरचिंतनांत घालवीत; किंवा जे जास्त शूर असत ते धर्मशास्त्रांत ज्याचें महाप्रस्थान म्हणून वर्णन आहे तें करीत. ते मृत्यूची वाट पहात नसत तर ते स्वतः त्याच्याकडे जावयास निघत व वाटेंत त्यांना तो येऊन भेटे, घरीं कुजून अथवा रोगानें मरण्याचा धिःकार करून युधिष्ठिर व राम दोघेही महाप्रस्थान

नांवाच्या शेवटच्या यात्रेला गेल्याचें वर्णन आहे. राम महाप्रस्थानाला निघाल्यावर अयोध्येंतील प्रत्येक स्त्रीपुरूष व पशुपक्षी रामाच्या मागोमाग गेले व शरयू नदींत स्नान केल्यावर रामाच्या कृपेनें त्या सर्वांना स्वर्ग प्राप्त झाला असें वाल्मीकीच्या रामायणांत वर्णिलेलें आहे.

रामाच्या मृत्यूनंतर त्याचे मुलगे लव व कुश हे कुशावती व शरावती या नगरांतून त्याच नांवांच्या राज्यांवर राज्य करूं लागले; व अयोध्येचा अगदीं लोप झाला. पुष्कळ रजपूत घराणीं रामाच्या या पुत्रांच्या वशांतील आहेत. त्यांच्यापैकीं मुख्य जें शिसोदिया घराणें तें वीरशिरोमणि व हिंदुस्थानचा देव जो राम त्याचा मुलगा कुश याच्यापासून थेट उतरलेलें आहे असा हिंदुस्थानांत हल्लीं समज आहे.

परिशिष्टें.

अ.

रामायणाचा विस्तार आणि त्याच्या बंगाल व मुंबई आवृत्या.

रामायणाच्या मुंबई आवृत्तीमध्यें बालकांडाच्या प्रारंभीं पुढील श्लोक आहे.

चतुर्विंशत्सहस्राणि श्लोकानामुक्तवानृषिः ।
तथा सर्गशतान्पंच षट्कांडानि सहोत्तरम् ॥

याप्रमाणें रामायणाचा विस्तार २४००० श्लोक असून त्याचे ५०० सर्ग आहेत. व त्याचीं सहा कांडें असून त्यांत सातवें उत्तरकांड आणखी घातलेलें आहे असें खुद्द रामायणांतच सांगितलेलें आपणास आढळतें. गोरेशियोच्या नांवानें ओळखिली जाणारी जी बंगाल अथवा गौड आवृत्ति आहे, तिजमध्यें उत्तरकांड नव्हतें असें कांहींना वाटतें. असें वाटणाऱ्यांमध्यें रा. अभ्यंकर हे प्रमुख होत, (यांनीं मराठींत रामायणावर एक उत्तम त्रोटक लेख लिहिला आहे,) व गोरेशियोनें जी आवृत्ति छापिली आहे तींत उत्तरकांड खरोखरच छापलेलें नाहीं; परंतु तें न छापण्याचें कारण तें त्या आवृत्तींत नव्हतेंच हें नसून तें आतां हरवलें आहे हें होय अशी आमची कल्पना आहे. कारण आदिकांडांत (त्या आवृत्तींत बालकांडाला हें नांव आहे,) एका सर्गामध्यें काव्याचा विस्तार व विषय दिला असून प्रत्येक कांडांत किती श्लोक आहेत याची संख्या दिली आहे. ती संख्या पुढीलप्रमाणें असून मुंबई आवृत्तींतील संख्येच्या कोष्टकाशीं ती जवळ जवळ जुळती आहे.

कांडांचें नांव.	सर्गांची संख्या.	श्लोकांची संख्या.
अदिकांड	६४	२८५०
अयोध्याकांड	८०	४१७०
अरण्यकांड	११४	४१५०
किष्किंधाकांड	६४	२९२५
सुंदरकांड	४३	२०४५
युद्धकांड	१०५	४५००
अभ्युदयिक	९०	३३६०
(अभ्युदयिकं सभविष्यं सहोत्तरम्)		
	५६०	२४०००

यावरून गोरेशियोच्या आवृत्तींत उत्तरकांड उर्फ अभ्युदयिक होतें हें स्पष्ट दिसतें. शिवाय जर उत्तरकांड त्या आवृत्तींत मुळींच नसेल तर वाल्मीकींनें शिकवून तयार केलेले रामाचे पुत्र कुश व लव यांनीं म्हटलेलें म्हणून जें त्या ग्रंथाच्या आरंभीं एक पद्य आहे त्याचा उलगडा कसा करावयाचा ? कालिदासानें आपल्या रघुवंशांत ज्याअर्थीं उत्तरकांडाचा उत्तरकांडाच्याच भागेंत सारांश दिला आहे त्याअर्थी तें कांड रामायणाच्या पुनर्रचनेच्या काळाइतकें तरी जुनें असावें हें आम्हीं सिद्ध केलेंच आहे. बंगाल आवृत्तींत उत्तरकांड मुळींच नव्हतें असें रा. अभ्यंकर म्हणतात; परंतु ती त्यांची चुकी आहे. तें कांड गहाळ झालें असलें पाहिजे अशी आमची दृढ कल्पना आहे. अयोध्याकांडांतील "काचित्" सर्ग व किष्किंधा कांडांतील भौगोलिक वर्णनांत किष्किंधा मध्य कल्पावयाचें सोडून कुरुक्षेत्र मध्य कल्पिल्यामुळें प्राप्त झालेली विसंगति वगैरेवरून पुनर्रचनाकरानें घातलेली भर

महाभारताच्या नमुन्यावर आहे, या मुद्याच्या जोरावर आम्हीं रामायणाच्या पुनर्रचनेचा काळ इ. स. पूर्वी एक शतक हा ठरविला आहें. तेव्हां रामायणाच्या या दोन निराळ्या आवृत्त्या त्या काळानंतर झाल्या असाव्या असें दिसतें. कारण वर उल्लेखिलेले दोनही सर्ग गोरेशियोच्या ग्रंथांत सांपडतात. रामाच्या जन्माच्या वेळीं राशींचा शुभ संयोग झाला होता हें वर्णन करणारा श्लोक व बुद्धाची अतिशय निंदा करणारा श्लोक हे दोन्हीही गोरेशियोच्या आवृत्तींत नाहींत (ही गोष्ट रा. अभ्यंकर यांनींही निदर्शित केली आहे) व त्यावरून ते मुंबई आवृत्तींत याच्याही नंतर घातले गेले असावे. रामायणांत एकसारखी कशी भर पडत गेली आहे व जात आहे ही गोष्ट आम्ही या पुस्तकांत सिद्ध केलीच आहे.

दोन्ही आवृत्यांमधील गोरेशियोची आवृत्ति जास्त जुनी व अधिक विश्वसनीय आहे असें रा. अभ्यंकर म्हणतात. रामायणाच्या दोन आवृत्त्या होण्याचे काम पुनर्रचनेनंतर झालें असलें पाहिजे हें आम्हीं दाखविलेंच आहे. मुंबई व बंगाल या दोनही प्रांतांत पुनर्रचित रामायणांत थोडी कमी दर्जाची भर आपआपल्यापरी टाकून त्याला निराळें स्वरूप देण्याचा प्रयत्न झाला अशी वास्तविक स्थिति आहे. परंतु दक्षिणेकडे भर जास्त टाकलेली आहे तर बंगालमध्यें स्वरूप जास्त बदलण्यांत आलें आहे. पुनर्रचनेच्या पूर्वीचे श्लोक— व या श्लोकांच्या जोरावरच आमच्या पुस्तकातील विवरण उभारलेलें आहे—बंगाल आवृत्तींत किती आहेत हें पाहण्याचे आम्हीं श्रम केले. व आश्चर्याची गोष्ट ही कीं, जुन्यापैकीं कित्येक श्लोकांचें स्वरूप त्या आवृत्तींत पुष्कळ बदललें असून कित्येकांत अर्वाचीन कल्पनांशीं ते श्लोक जुळते होतील अशा प्रकारच्या सुधारणा केलेल्या आम्हांला आढळल्या, तुलनेकरितां आम्हीं ते श्लोक खालीं देत आहों.

आदि अगर बालकांड

(१) दश वर्षसहस्राणि दश वर्षशतानिच ।
रामो राज्यमुपासित्वा ब्रह्मलोकं प्रयास्यति ॥

हा श्लोक दोन्ही आवृत्तींमधून सांपडतो.

(२) पहिल्या सर्गांत नारद जेव्हां वाल्मीकीला रामाची कथा थोडक्यांत सांगतो, त्या प्रसंगीं बंगाल आवृत्तींत पुढील श्लोक जास्त आहे.

नारदस्य तु तद्वाक्यं श्रुत्वा वाक्यविशारदः ।
वाल्मीकिः शिष्यसहितो विस्मयं परमं ययौ ॥

यावरून वाल्मीकीला आधीं रामकथा माहीत नव्हती हें स्पष्ट होतें.

(३) मा निषाद प्रतिष्ठां त्वमगमः—हा श्लोक दोन्हींतही सांपडतो.

(४) बंगाल आवृत्तींत ब्रह्मा वाल्मीकीला म्हणतो,

वृत्तं कथय रामस्य यथा ते नारदाच्छ्रुतम् ।
सर्वं विदितमेतत्ते मत्प्रसादाद्भविष्यति ॥
वैदेह्याश्चैव यद्वृत्तं प्रकाशं यदि वा रहः ॥

यावरून वाल्मीकीला रामकथा माहीत नव्हती या कल्पनेला पुष्टि मिळते. त्याचप्रमाणें पुढील श्लोकावरूनही तीच गोष्ट सिद्ध होते.

श्रुत्वा पूर्वं काव्यबीजं देवर्षेर्नारदादृषिः ।
लोकादन्विष्य भूयश्च चरितं चरितव्रतः ॥

(५) ज्या सर्गांत विषयांचें कोष्टक दिलें आहे त्यांत या आवृत्तीतही उत्तरकांडांतील विषयासंबंधानें पुढील श्लोक आहेतच.

राक्षसानां समुत्पत्तिं रावणस्य जयं तथा ।
सीतायाश्च परित्यागं प्रकृतीनांच रंजनम् ॥
प्राप्तराज्यस्य रामस्य चरितं यच्च श्रीमतः ।
अथागममृषीणां च शत्रुघ्नस्य विसर्जनम् ॥
वने प्रसूतिं सीतायार्लवणस्य रणे वधम् ।
कालदुर्वाससोः प्राप्तिर्लक्ष्मणस्य विसर्जनम् ॥
स्थापयित्वा तथा पुत्रान् रामो राज्ये दिवं गतः ॥

(६) मुंबई आवृत्तीप्रमाणें या आवृत्तींतही रामायणाचा विस्तार २४००० श्लोक दिला आहे.

चतुर्विंशतिसाहस्रं सर्वपापभयापहम् ।

(७) या आवृत्तींत शांता व ऋष्यशृंग यांचीं आख्यानें वाशिष्ठाच्या उपदेशाच्या आधीं आलेलीं आहेत. मुंबई आवृत्तीमध्यें ही सुधारणा होय. तरी पण पुत्रेष्टि यज्ञ निरर्थकच वाटतो. कारण अश्वमेध संपवून जातेवेळीं ऋषींनीं दशरथाला चार मुलगे देण्याचें वचन दिलें आहे.

(८) स्वतः खड्ग घेऊन अश्व मारणारी कौसल्या येथें बदलली आहे. ही मूलग्रंथातील गोष्टीमध्येंच सुधारणा होय. यांतील श्लोक असे आहेत.

कौसल्या तं हयं तत्र परिगम्य प्रदक्षिणम् ।
अध्वर्युसहिता चैनं समालभ्य शुचिव्रता ॥
रजनीं पर्युपास्तैका कौसल्या पुत्रकाम्यया ॥

(९) मुंबई आवृत्तीप्रमाणेंच या आवृत्तींतही राम विष्णूच्या अर्ध्या अंशापासून झाला असें आहे.

विष्णोर्वीर्यार्द्धतो जज्ञे रामो राजीवलोचनः ।

(१०) सीता लग्नाच्या वेळीं ६ वर्षांची होती असें ज्या श्लोकांतून वर्णिलेलें आहे ते श्लोक प्रक्षिप्त आहेत असें सिद्ध करणाऱ्या मुंबई आवृत्तींतील श्लोकांचें (परिशिष्ट 'ऋ' पहा) स्वरूप बंगाल आवृत्तीमध्यें बंगालमधील हल्लींच्या बालविवाहाच्या पद्धतीस दुजोरा देण्याच्या हेतूनें बदलले आहेत. (यांत रहस् शब्द बदलला आहे)

अभिवाद्याभिवाद्यांश्च तत्र पूज्यान्गुरूंस्ततः ।
रेमिरे मुदितास्तत्र भर्तृप्रियहिते रताः ॥

(११) अहल्येची कथा एकच आहे. तिला दगडाचें स्वरूप प्राप्त झालेलें नाहीं. **"तप्यमाना निरालंबा सततं भूमिशायिता'**

अयोध्याकांड

(१२) **अनेकवर्षशतिको वृद्धोयस्य नरेश्वरः ।** असें या आवृत्तींत दशरथाचें वर्णन आहे. **"वर्षाणामयुतं ययौ"** यापेक्षां यांत अत्युक्ति पुष्कळच कमी आहे.

(१३) राम कौसल्येला भेटावयास गेला त्यावेळीं कौसल्या या आवृत्तींत यज्ञ करीत नव्हती.

ददर्श याचमानां तु देवतावेश्मनि श्रियम् ।
प्राणायामेन पुरुषं ध्यायन्ती सा जनार्दनम् ॥

हा श्लोक व त्याप्रमाणेंच पुढील चरण हे अगदीं अर्वाचीन आहेत.

अकरोत्प्रयता पूजां देवानां नियतव्रता ।

(१४) सीतेला हद्दपार करण्याची आज्ञा दिल्यानंतर रामाचें वर्तन जास्त कठोर दाखविलेलें आहे. **"ततो विवृततां गतः"** हा श्लोक याआवृत्तींत सांपडत नाहीं.

(१५) **आर्यपुत्र कथंचीरमहं बध्नामि शंस मे**—यांत मुंबई आवृ-

त्तींतील श्लोकापेक्षां काव्यसौंदर्य कमी असून या आवृत्तींत सीता स्वतःच वल्कलें धारण करिते असें दाखविलेलें आहे.

(१६) सीतेनें गंगा ओलांडितांना प्रार्थना करितेवेळीं "सुरेचा" नैवेद्य दाखविला असें मुंबईप्रतींत आहे. या प्रतींत तिनें यज्ञानें प्रार्थना केली असा फरक केलेला आहे.

(१७) ' **अद्य दुःखं तु वैदेही वनवासस्य वेत्स्यति** ' या चरणाशीं अत्यंत विसंगत असलेला लांब वृत्तांतील वत्सदेशासंबंधींचा श्लोक गोरेशियोच्या ग्रंथांत नाहीं.

(१८) भवभूतीनें उतरून घेतलेला " **त्वदर्थमिव विन्यस्तः शिलापट्टोयमग्रतः** " हा सुप्रसिद्ध श्लोक ज्या प्रक्षिप्त सर्गांत आहे तो सर्ग व ' काक ' आणि ' इषीकास्त्र ' यासंबंधींच्या कथा गोरेशियोच्या ग्रंथांत आहेत. याजरून या निराळ्या आवृत्या कदाचित् भवभूतीनंतर झालेल्या असाव्या असें दिसतें

(१९) " कच्चित् " सर्ग या आवृत्तींतही सांपडतो. परंतु त्यानंतर ' **प्रष्टुं समुपचक्रमे** " हें नसून भरत दशरथाच्या मृत्यूची बातमी सांगतो. त्याच्यापुढें मात्र भाषणें सुरू करण्याची रामायणांतील नेहमींची पद्धत जी श्लोकाचा उपयोग करणें तिच्याशीं अगदीं विसंगत असा " लक्ष्मण उवाच " हा शब्दप्रबंध आलेला आहे.

(२०) मुंबई आवृत्तीप्रमाणें हींतही जाबालीनें धर्म व श्राद्ध यांविरुद्ध टीका केलेली आहे

(२१) बुद्धाविषयींचा श्लोक या आवृत्तींत सांपडत नाहीं.

(२२) ज्या श्लोकांत " वराहाचा " उल्लेख आहे त्या श्लोकांचें स्वरूप या आवृत्तींत सुसंगतपणें बदललें आहे. "**ततःसमभवद्ब्रह्मा स्वयंभूर्दैवतैः सह**" या ऐवजीं ह्या आवृत्तींत "ततःसम-

भवद्ब्रह्मा स्वयंभूर्विष्णुरव्ययः " असें असून त्याच्यापुढें पुढील श्लोक आहे.

स वराहोथ भूत्वेमामुज्जहार वसुंधराम् ।
अमृजच्च जगत्सर्वं सचराचरमव्ययम् ॥

(२३) भरताला पादुका दिल्यासंबंधींची कथा थोडी निराळी आहे. त्याचवेळीं शरभंगानें आकस्मिकरीत्या कुशपादुका पाठविल्या व त्या भरतास देण्याबद्दल वशिष्ठानें रामास सांगितलें असें या आवृत्तींत दाखविलें आहे.

अरण्यकांड

(२४) सीतेनें आपल्या लग्नासंबंधाची अनसूयेला सांगितलेली हकीगत मुंबई आवृत्तीप्रमाणेंच आहे. "अथ दीर्घस्य कालस्य राघवोयं महामतिः" हा चरणही त्या हकीगतींत सांपडतो. (परिशिष्ट " उ " पहा.)

(२५) अहमेवाहरिष्यामि स्वयं लोकान्महामुने ।
आवासं त्वहमिच्छामि प्रदिष्टमिह कानने ॥

हे जे विसंगत शब्द राम शरभंगाला बोलतो ते या आवृत्तींतही सांपडतात.

(२६) मुंबई आवृत्तीप्रमाणें या आवृत्तींतही रामाला राक्षसांबरोबरच्या युद्धाविषयीं सावधगिरीची सूचना देतेवेळीं सीतेनें हत्येविरुद्ध लांबलचक व्याख्यान झोडलें आहे.

(२७) शूर्पणखेनें सीताहरणाची कल्पना सुचविण्याच्या अगोदरच रावण व मारीच त्यासंबंधाच्या शक्याशक्यातेविषयीं विचार करितात ही गोष्ट या आवृत्तींत नाहीं.

(२८) सुवर्णमृगाची गोष्ट प्रक्षिप्त आहे असें दाखविणाऱ्या

श्लोकाचा कांहीं भाग या आवृत्तींत सांपडतो व कांहीं सांपडत नाहीं. " आगमिष्यति मे भर्ता वन्यमादाय पुष्कलम् " एवढाच भाग आपणास सांपडतो; परंतु ' रुरून गोधान्" वगैरे श्लोक सांपडत नाहींत.

किष्किंधाकांड

(२९) भूगोलवर्णनविषयक सर्ग मुंबई आवृत्तीप्रमाणेंच या आवृत्तींतही असून दंडकारण्य व गोदावरी यांचे दोनदां उल्लेख आले आहेत. एकदां पश्चिमेस व एकदां दक्षिणेस असल्याबद्दलचे ते उल्लेख आहेत.

(३०) तत्रासीनं नगस्याग्रे मलयस्य महौजसः ।
द्रक्ष्यथादित्यसंकाशमगस्त्यमृषिसत्तमम् ॥

हा श्लोक या आवृत्तींतही सांपडतो.

(३१) सुग्रीव प्रथम " मला रावणाचें निवासस्थान माहीत नाहीं" असें म्हणतो व नंतर भूगोलवर्णनविषयक सर्गांत लंका त्या राक्षसाचें वसतिस्थान आहे असें म्हणतो; यांमधील विरोध या आवृत्तींतही कायम आहे. मुंबई आवृत्तींतीलच श्लोक हींत असून ते मुंबई आवृत्तींत ज्या ठिकाणीं आहेत त्याच ठिकाणीं या आवृत्तींत आहेत.

न जाने निलयं तस्य सर्वथा पापरक्षसः ।
सामर्थ्यं विक्रमं वापि दौष्कुलेयस्य वा कुलम् ॥

यत्र देवैरवध्यस्य रावणस्य दुरात्मनः ।
राक्षसाधिपतेर्वासः श्रूयते वानरर्षभाः ॥

सुंदरकांड

(३२) सीता संध्या करीत असल्याबद्दलचा श्लोक या आवृत्तींत मोठ्या काळजीपूर्वक गाळलेला आहे. परंतु मग सीता तेथें

येईल अशी अपेक्षा मारुतीनें कशावरून करावी हें कळणें कठीण आहे. कारण या आवृत्तींत त्या ठिकाणीं फक्त

इह सा राममहिषी नूनमेष्यति जानकी ।

एवढाच चरण आहे.

(३३) रामेश्वराचें देवालय स्थापण्यासंबंधीं अथवा तरत्या दगडांचा सेतु बांधण्यासंबंधीं या आवृत्तींतही मुळींच उल्लेख नाहीं.

युद्धकांड

(३४) या आवृत्तींतही "गंधमादन" पर्वतावरून मारुति एक पर्वतशिखर घेऊन येतो; परंतु द्रोणागिरीचें नांव मात्र यांत मुळींच सांपडत नाहीं.

(३४) मुंबई आवृत्तीप्रमाणें या आवृत्तींतही रावणाचीं मस्तकें कापल्यावर त्या ठिकाणीं दुसरीं उत्पन्न झाल्याचा उल्लेख आहे. मुंबई आवृत्तींतील श्लोकच येथें सांपडतो.

तच्छिरः पतितं भूमौ दृष्ट्वं लौकैस्त्रिभिस्तदा ।
तथैव सदृशं चान्यद्रावणस्योत्थितं शिरः ॥

(३५) सुसंगतपणें पालटलेला असा पुढील श्लोक या आवृत्तींत सांपडतो.

तस्य क्रुद्धस्य नेत्रेभ्यः प्रापतन्नश्रुबिन्दवः ।
दीपेभ्य इव दीप्तेभ्यः सार्चिषः स्नेहबिंदवः ।

परंतु याच्याच थोडे मागें

तस्य क्रुद्धस्य ते नेत्रे रक्ते क्रोधाग्निना पुनः ।

हा चरण असून रावणाच्या स्त्रिया शोक करीत असतांनाही

उत्क्षिप्य च भुजौ काचिद् भूमौ विपरिवर्तते ।
काचिदंके शिरः कृत्वा रुरोद भृशमीक्षती ॥

हा श्लोक आहे.

(३७) मुंबई आवृत्तीप्रमाणें हींतही मंदोदरीचा उल्लेख फक्त एकदां आला आहे; त्याचप्रमाणें दशरथानें रामाला दर्शन देणें, रामानें ब्रह्मदेवाला तूं कोण म्हणून विचारणें; या गोष्टीही या आवृत्तींत असून ब्रह्मदेवानें रामाची केलेली स्तुति दोन्ही आवृत्तींत एकच आहे.

(३८) राम व सीता विमानांतून परत येत असतांना या आवृत्तींत राम तिला "अत्र पूर्वं महादेवः प्रसादमकरोन्मम" असें सांगत नाहीं; तर

अत्राहं शयितो देवि कुशास्तीर्णे महीतले ।
दर्शनार्थं समुद्रस्य त्रिरात्रं नररूपिणः ॥

ही प्रत्यक्ष घडलेली गोष्ट सांगतो.

(३९) या आवृत्तींतील शेवटल्या आशीर्वादाच्या वेळची स्तुति जरा नेमस्त आहे. आसीद्वर्षशतायुश्च तथा पुत्रसहस्रवान् ।

(४०) आदिकाव्यं महच्चैतत्पुरा वाल्मीकिना कृतम् ।

हा मुंबई आवृत्तींतील श्लोकाप्रमाणें अत्यंत सूचक असा श्लोक या आवृत्तींतही सांपडतो.

हें परिशिष्ट संपविण्यापूर्वी रा. अभ्यंकर यांनीं दिल्याप्रमाणें आम्ही या दोन्ही आवृत्त्यांच्या विस्ताराचें कोष्टक खालीं देत आहों. (रा. अभ्यंकर यांनीं हें कोष्टक अत्यंत काळजीपूर्वक तयार केलें असल्याकारणानें तें उतरून घेण्यास आम्हांस कांहींच हरकत वाटत नाहीं.)

कांड	बंगाल आवृत्ति		मुंबई आवृत्ति	
	सर्ग	श्लोक	सर्ग	श्लोक
बाल, अगर आदि	८०	२२९२	७७	२२५०
अयोध्या	१२७	४१२१	११९	४३५०
अरण्य	७९	२८४२	७५	२४४५
किष्किंधा	६३	२३०२	६७	२४६७
सुंदर	९५	३३००	६८	२८१५
युद्ध	११३	४९३६	१३३	६१९८
उत्तर			१११	४००३
	५५७	१९७९३	६५०	२४५२८

खुद्द काव्यांत सांगितल्यापेक्षां मुंबई आवृत्तीमध्यें ५० सर्ग व ५२८ श्लोक जास्त असल्याकारणानें टीकाकारांना कित्येक श्लोक व सर्ग प्रक्षिप्त आहेत असें सांगणें भाग पडलें असावें असें आम्हांस वाटतें

———

आ.

महाभारतांतील रामोपाख्यान व हल्लींचें रामायण यांमधील फरक.

महाभारताच्या वनपर्वातील रामोपाख्यान व हल्लींचें रामायण यांमध्यें दिसून येणारे पुढील फरक ध्यानांत ठेण्यासारखे असून त्यांवरून हल्लींच्या रामायणांत अद्भुततेची जास्त भर कशी पडली आहे हें चांगलें दिसून येईल.

(१) रामोपाख्यानांत सीता जनकाची मुलगी असल्याबद्दल उल्लेख आहे; परंतु ती जमीनींतून वर आल्याबद्दल कोठेंही उल्लेख आढळत नाहीं.

विदेहराजजनकः सीता तस्यात्मजा विभो ।
यां चकार स्वयं त्वष्टा रामस्य महिषी प्रिया ॥

यामध्यें सीता अयोनिजा असल्याबद्दलचा मुळींच उल्लेख नाहीं. परंतु टीकाकाराचें मत निराळें आहे.

(२) रावणाच्या जन्माची कथा निराळ्या रीतीनें दिली आहे.

स राजराजो लंकायां न्यवसन्नरवाहनः
राक्षसीः प्रददौ तिस्रः पितुर्वै परिचारिकाः ।
पुष्पोत्कटा च राका च मालिनी च विशांपते
पुष्पोत्कटायां जज्ञाते कुंभकर्णदशग्रिवौ ॥
मालिनी जनयामास पुत्रमेकं विभीषणम् ।
राकायां मिथुनं जज्ञे खरशूर्पणखे तथा ॥

(३) रामोपाख्यानांतहीं राम विष्णूचा अवतार होता असेंच वर्णन आहे. परंतु त्यांत 'पायसविषयक कथा' मात्र सांपडत नाहीं.

(४) सीताहरणाच्या वेळीं रावणाच्या रथाचा उल्लेख यांत केलेला नाहीं. रावण सीतेचे केश धरून तिच्यासह आकाशांतून उडून गेला.

मूर्धजेषु निजग्राह उर्ध्वमाचक्रमे ततः ।

(५) सेतुबंधाची कथा कांहीं बाबतींत रामायणांतील कथेच्या मागें आहे, तर कांहीं बाबतींत पुढें आहे; समुद्रानें रामाला स्वप्नांत प्रत्यक्ष दर्शन देऊन नलानें सेतु बांधावा असें सांगितलें. रामानें रागावून समुद्रावर सोडण्याकरितां बाण काढल्याची कथा या आख्यानांत नाहीं. रामायणांत न सांपडणाऱ्या परंतु लोकसमजांत प्रसृत असलेल्या तरत्या दगडांच्या सेतूच्या कथेचें मूळ या आख्यानांतील

यत्काष्ठं वा तृणं वापि शिला वा क्षिप्यते मयि ।
सर्वं तद्धारयिष्यामि स ते सेतुर्भविष्यति ॥

या श्लोकांत असावें. शिवाय मोठी आश्चर्याची गोष्ट ही कीं, होड्यांच्या साहाय्यानें समुद्र तरून जाण्याबद्दलचा विवाद या आख्यानांत असून ती सूचना रामानें पुढीलप्रमाणें सोडून दिली आहे.

नावो न संति सेनाया बह्व्यस्तारयितुं क्षमाः
वणिजामुपघातं च कथमस्मद्विधश्चरेत् ।
विस्तीर्णं चैव सैन्यं च हन्याच्छिद्रेण वै रिपुः ॥

हा सेतु अजून प्रसिद्ध आहे असें आणखी महाभारतांत वर्णिलेलें आहे.

दशयोजनविस्तारमायतं दशयोजनं ।
नलसेतुरिति ख्यातो योऽद्यापि प्रथितो भुवि ॥

(६) या आख्यानांत कुंभकर्णाला लक्ष्मणानें मारलेलें आहे.

(७) इंद्रजितानें अदृश्य राहून युद्ध केलें व रामलक्ष्मणांना मूर्च्छित पाडिलें. अतिमानुष असे मंत्र व संजिविनी वल्ली यांचा उपयोग करून सुग्रीवानें त्यांना शुद्धीवर आणिलें.

विशल्यौ चापि सुग्रीवः क्षणेनैतौ चकार ह ।
विशल्यया महौषध्या दिव्यमंत्रप्रयुक्तया ॥

मारुतीनें संजिविनी वल्ली हिमालयावरून आणल्याचा यांत मुळींच उल्लेख नाहीं.

(८) रावण ब्रह्मास्त्रानें जळून खाक झाला असेंच फक्त रामोपाख्यानांत म्हटलेलें आहे. वाल्मीकिरामायणांत जें सांगितलें आहे कीं रावणाचीं मस्तकें कित्येक वेळां कापलीं तरी पुन्हां तीं उत्पन्न झालीं, त्याचा यांत मुळींच उल्लेख नाहीं.

(९) सीतेनें या आख्यानांत अग्निदिव्य केलेलें नसून, अग्नि व वायु यांची तिच्या शुद्धतेविषयीं आकाशवाणी झाली आहे.

———

इ.

रामायणांतील कांहीं अत्युत्कृष्ट वचनें.

मा निषाद प्रतिष्ठां त्वमगमः शाश्वतीः समाः ।
यत्क्रौंचमिथुनादेकमवधीः काममोहितम् ॥ १ ॥

धिग्बलं क्षत्रियबलं ब्रह्मतेजोबलं बलम् ॥ २ ॥

सह रंस्ये त्वया वीर वनेषु मधुगंधिषु ॥ ३ ॥

रामं दशरथं विद्धि मां विद्धि जनकात्मजाम् ।
अयोध्यामटवीं विद्धि गच्छ तात यथासुखम् ॥ ४ ॥

यथा फलानां पक्वानां नान्यत्र पतनाद्भयम् ।
तथा नरस्य जातस्य नान्यत्र मरणाद्भयम् ॥ ५ ॥

वयसः पतमानस्य स्रोतसो वाऽनिवर्तिनः ।
आत्मा सुखे नियोक्तव्यः सुखभाजः प्रजाः स्मृताः ॥६॥

अन्तकाले हि भूतानि मुह्यन्तीति परा श्रुतिः ॥ ७ ॥

सुलभाः पुरुषा राजन्सततं प्रियवादिनः ।
अप्रियस्य च पथ्यस्य वक्ता भोक्ता च दुर्लभः ॥ ८ ॥

गुणवान्वा परजनः स्वजनो निर्गुणोऽपि वा ।
निर्गुणः स्वजनः श्रेयान्यः परः पर एव सः ॥९॥

यः स्वपक्षं परित्यज्य परपक्षं निषेवते ।
सः स्वपक्षे क्षयं याते पश्चात्तैरेव हन्यते ॥ १० ॥

एति जीवन्तमानन्दो नरं वर्षशतादपि ॥ ११ ॥

श्रूयते हस्तिभिर्गीतः श्लोकः पक्षवने पुरा ।
नाग्निर्नान्यानि शस्त्राणि न नः पाशा भयावहाः ।
घोराः स्वार्थप्रयुक्तास्तु ज्ञातयो नो भयावहाः ॥ १२ ॥

सागरं चांबरप्रख्यमंबरं सागरोपमम् ॥ १३ ॥

रामरावणयोर्युद्धं रामरावणयोरिव ॥१४॥

संप्राप्तमवमानं यस्तेजसा न प्रमार्जति ।
कस्तस्य पौरुषेणार्थो महताप्यल्पचेतसः ॥ १५ ॥

दशरथजातक.

(V. Fausboll यांच्या भाषान्तरावरून सारांशरूपानें.)

" लक्खणा व सीते इकडे या " हें स्वामीनें ज्याचा बाप मेलेला होता अशा एका कौटुंबिकाला सांगितलें. कारण बाप मेल्यावर सर्व कामधंदा सोडून तो शोकाच्या आधीन झाला होता. तेव्हां स्वामीनें एक गोष्ट सांगितली.

फार प्राचीन काळीं वाराणसीमध्यें दशरथ नांवाचा एक मोठा राजा होऊन गेला. सोळा हजार स्त्रियांची पट्टराणी अशी त्याची जी स्त्री तिच्या पोटीं त्याला दोन पुत्र व एक कन्या झाली. त्यांपैकीं ज्येष्ठ पुत्र साधु राम असून दुसरा राजपुत्र लक्खण होय. राजपुत्रीचें नांव सीता होतें. त्यानंतर ती राणी मरण पावली. तिचे सर्व प्रेतविधि उरकल्यावर राजानें दुसरी पट्टराणी केली. ती त्याची मोठी आवडती व सुखदात्री झाली, व गर्भार राहून तिनें पुत्रास जन्म दिला. त्याचें नांव भरत ठेवलें. त्या पुत्रावरील प्रेमामुळें राजा एक दिवस म्हणाला, "प्रिये, मी तुला एक वर देतों त्याचा तूं स्वीकार कर." राणीनें वर घेतला परंतु मागण्याचा हक्क राखून ठेवला. तिचा मुलगा ८ वर्षांचा झाल्यावर राजाकडे जाऊन ती म्हणाली, " महाराज, तुम्ही मला एक वर दिला होता. त्याची आतां पूर्ति करा; भरताला राज्य द्या. " राजा बोटें मोडून तिचा निषेध करून म्हणाला " हे जातिभ्रष्ट दुष्टे, माझे दोन्ही पुत्र अग्निगोलकाप्रमाणें तेजस्वी आहेत. त्या दोघांनाही मारून तुझ्या मुलाला

राज्य देण्यास तूं मला सांगत आहेस. " यामुळें भीति वाटून राणी आंत गेली; परंतु पुन्हां पुन्हां तिनें राजाजवळ राज्य देण्याबद्दल गोष्ट काढली राजानें तिला राज्य दिलेंच नाहीं; परंतु त्याला वाटलें, " स्त्रिया मोठ्या विश्वासघातकी व खोट्या असतात. ही खोटे कागद लिहून अथवा लांचलुचपत देऊन माझ्या पुत्रांना मारवील." तेव्हां आपल्या मुलांस बोलावून त्यानें ती गोष्ट त्यांस सांगितली. तो म्हणाला, " माझ्या प्रिय मुलांनो, तुम्ही येथें रहाल तर तुम्हांवर संकटें येतील; तरी शेजारच्या एखाद्या राज्यांत अथवा अरण्यांत जा; माझ्या और्ध्वदेहिकाच्या वेळीं परत येऊन आपलें राज्य बळकावा—." नंतर ज्योतिषांना बोलावून आणून त्यांना त्यानें आपली आयुर्मर्यादा विचारल्यावर ती आणखी १२ वर्षें आहे असें समजल्यामुळें तो पुन्हां म्हणाला, " लाडक्यांनो, १२ वर्षांनंतर परत या. " ते बरें म्हणाले व राजपुत्री सीता "मीही त्यांजबरोबर जाणार " असें म्हणाली. तीं तिघेंही पुष्कळ मनुष्यांसह गेलीं व त्यांना परत पाठविल्यावर त्यांनीं हळू हळू हिमवनांत प्रवेश केला; व ज्या ठिकाणीं पुष्कळ पाणी आहे अशा स्थळीं आश्रम बांधून त्यांत नुसत्या फळांवर निर्वाह करीत त्यांनीं वास्तव्य केलें. लक्ष्मण व सीता साधु रामाला म्हणालीं, "तूं आम्हांला आमच्या पित्याच्या ठिकाणीं आहेस; तूं आश्रमांत रहात जा; आम्ही फळें आणून तुझी सेवा करूं. " त्या दिवसापासून राम आश्रमांत रहात असे. त्याचीं भावंडें फळें आणीत व त्याचें रक्षण करीत. तीं तेथें रहात असतां पुत्रशोकामुळें ते गेल्यापासून नवव्या वर्षीं राजा दशरथ मरण पावला. त्याचे प्रेतसंस्कार झाल्यावर त्याची राणी म्हणाली, " भरताच्या मस्तकावर राजछत्र धरा. " परंतु प्रधान तसें करूं देईनात. "माझा भाऊ साधु राम याला मी परत घेऊन येतों " असें म्हणून चतुरंग

दलासह भरत रामाच्या निवासस्थानाजवळ जाऊन पोहोंचला. थोड्या अंतरावर सैन्य थांबवून तो आश्रमांत शिरला; या वेळीं सीता व लक्ष्मण हीं अरण्यांत गेलीं होतीं. निरिच्छ असा साधु राम दरवाजांत शांतपणें एखाद्या सुवर्णमूर्तीप्रमाणें तटस्थ बसला होता. त्याचाजवळ जातांच भरतानें त्याला नमस्कार केला व आपल्या बापाच्या मृत्यूची वार्ता सांगून तो त्याच्या पाया पडला. साधु रामाला दुःखही झालें नाहीं; त्यानें शोकही केला नाहीं. त्याच्या वृत्तींत काडीइतकाही फरक पडला नाहीं. भरत शोक करीत असतां सीता व लक्ष्मण नानाविध फळें घेऊन आलीं. साधु रामाला वाटलें, " हीं लहान आहेत. योग्यायोग्य विचारबुद्धि माझ्याप्रमाणें यांना अजून प्राप्त झालेली नाहीं; त्यांचीं हृदयें फाटून जातील. मी त्यांना प्रथम पाण्यांत जावयास लावतों व मग त्यांना ही वार्ता सांगतों. " जवळच असणाऱ्या जलाशयाकडे बोट दाखवून तो म्हणाला, " इतक्या उशीरानें तुम्ही आलांत; त्या पाण्यांत जाऊन उभे रहा; ही शिक्षा तुम्हांला देण्यांत येत आहे. " याच वेळीं त्यानें ' सीते व लक्ष्मणा इकडे या; दोघेही जण पाण्यांत जाऊन उभे रहा" या अर्थाचा श्लोकचरण म्हटला. त्याच्या नुसत्या सांगण्यावरून त्या दोघांनीं तसें केलें. तेव्हां, "भरत सांगतो आहे कीं, दशरथ राजा मृत्यू पावला"या अर्थाचा वरील श्लोकाचा दुसरा चरण* त्यानें म्हटला.

आपल्या पित्याच्या मृत्यूची वार्ता ऐकून तीं दोघेंही मूर्छित झालीं. रामानें पुन्हां त्यांना तीच वार्ता सांगितली व तीं पुन्हां मूर्छित झालीं. असें तीन वेळ झाल्यावर सेवकांनीं त्यांना पाण्याबाहेर काढलें. नंतर ते सर्वजण रडत व अश्रु ढाळीत बसले. राजपुत्र भरतानें विचारिलें, " हे राम, शोच्य गोष्टीविषयीं तुला शोक

होत नाहीं अशी तुजजवळ कोणती शक्ति आहे ?" साधु राम म्हणाला "कितीही शोक केला तरी ज्या गोष्टीचें मनुष्याला रक्षण करतां येत नाहीं त्या गोष्टीविषयीं शहाण्या माणसानें उगीच दुःखी कां व्हावें ? पिकलेल्या फळांना ज्याप्रमाणें नेहमीं खालीं पडण्याचें भय असतें तसें जन्मास आलेल्या प्राण्यास नेहमीं मृत्यूचें भय असतें.* इत्यादि. इ " साधु रामाचें हें वेदांतपर भाषण ऐकून तेथें जमलेला सर्व समाज दुःखमुक्त झाला. नंतर रामाला अभिवादन करून राजपुत्र भरत ह्मणाला, "वाराणसीच्या राज्याचा स्वीकार कर." राम म्हणाला, "माझ्या लाडक्या, सीता व लक्ष्मण यांना घेऊन जा व राज्य कर. 'बारावर्षांनंतर ये' असें मला माझ्या पित्यानें सांगितलें आहे. आतां जर मी गेलों तर त्याचे शब्द पाळल्यासारखें होणार नाहीं; तीन वर्षांनंतर मी येईन." "पण तोंपर्यंत राज्य कोण करील ? आम्ही करणार नाहीं" असें भरतानें म्हटल्यावरून, "काहीं हरकत नाहीं; मी परत येईपर्यंत या पादुका राज्य करितील" असें म्हणून रामानें पायांतील कुशपादुका काढल्या व त्या भरताला दिल्या. त्या पादुका घेऊन ते त्रिवर्ग वाराणसीस गेले. प्रधान राजसिंहासनापुढें पादुका ठेऊन कारभार करीत. कोठें चूक झाल्यास पादुका एकमेकांवर आपटत. तीन वर्षांनंतर रामानें मोठ्या परिवारासह नगरांत प्रवेश केला, व सुचंडक नांवाच्या भव्य प्रासादाच्या वरच्या मजल्यावर चढल्यानंतर त्यानें सोळाहजार वर्षें न्यायानें राज्य केलें आणि मग तो स्वर्गास गेला.

दशवर्षसहस्राणि षष्टिवर्षशतानि च ।
कंबुग्रीवो महाबाहू रामो राज्यमकारयत् । *

* हा व दुसरे दोन * हे चिन्ह केलेले श्लोक वाल्मीकीच्या रामायणांत थोड्याफार फरकानें सांपडतात.

याप्रमाणें हकीगत सांगून स्वामीनें ती पुढें दिल्याप्रमाणें संपविली. "त्या वेळीं महाराजा दशरथ शुद्धोदन हा होता; महामाया रामाची आई झाली होती; राहुलाच्या आईला सीता, आनंदाला भरत, व सरिपुहाला लक्ष्मण अशीं रूपें प्राप्त झालीं होतीं; दरबार म्हणजे बुद्धाचा दरबार असून साधु राम मी स्वतः जाहलों होतों.

उ.

राक्षसांचीं नांवें.

रामायणांतील राक्षसांचीं नांवें प्रत्येकाच्या व्यक्तिविषयक विशेषावरून दिलेलीं आहेत हें पाहिलें म्हणजे मोठी मौज वाटते. प्रथम रावणांचें नांव घेतल्यास त्याचा अर्थ सिंहनाद करणारा हा आहे. त्याचीं दुसरीं नांवें दशग्रीव, दशमुख हीं त्याचीं दहामस्तकें अथवा दहामुखें दाखवितात. त्याच्या भावाचें नांव जें कुंभकर्ण त्याचा अर्थ कुंभासारखे ज्याचे कान आहेत तो असा होतो. विभीषण याचा अर्थ भयंकर असा आहे. मेघनाद हें रावणाच्या पुत्राचें नांव असून त्याचा अर्थ मेघासारखा आवाज असणारा असा आहे. त्याच्या बहिणीच्या शूर्पणखा या नांवाचा अर्थ सुपासारखीं नखें असणारी असा आहे. त्याच्या एका भावाचें नांव खर अथवा गाढव असून दुसऱ्याचें दूषण अथवा निंद्य हें होतें. रावणाच्या सेनापतींचीं नांवें सुद्धां या तत्वाला अनुसरूनच आहेत. तीन मस्तकें असणारा तो **त्रिशिर**. धुराच्या रंगाचे ज्याचे डोळे आहेत तो **धूम्राक्ष**. लांब हात असणारा तो **प्रहस्त**. हीं व इतर नांवें काल्पनिक असून त्या त्या राक्षसांचीं तीं खरीं नांवें नव्हतीं. रामायणांत रावणाच्या वंशाचें नांव "सालकटंकट" हें दिलें आहे; याच्यांत मात्र मूळ रहिवाशांच्या भाषेचा व सत्य स्वरूपाची झांक दिसून येते. व रामायणांत जरी हें नांव एकच असलें तरी राक्षस हे आझटेक लोकांसारख्या नरमांसभक्षकांची हिंदुस्तानची मूळ रहिवाशी अशी एक जात होती हें सिद्ध करण्यास पुरावा म्हणून तें नांव पुरेसें आहे.

ऊ.

सीतेचें लग्न बाळपणीं झालें काय ?

सीतेचा विवाह हा बालविवाह होता अशी कित्येकांची कल्पना असून या त्यांच्या कल्पनेस दुजोरा देणारे असे कित्येक श्लोक वाल्मीकीच्या रामायणांत सांपडतात. अरण्यकांडांत जेव्हां सीता रावणाला आपली हकीगत सांगते तेव्हां ती म्हणते:—

अष्टादश हि वर्षाणि मम जन्म निगण्यते ।

" राम वनवासांत जाण्यावेळीं माझें वय १८ वर्षांचें होतें, " याच ठिकाणीं इक्ष्वाकुवंशांत मी १२ वर्षें राहिलें असें ती म्हणते; व यावरून लग्नाच्यावेळीं तिचें वय फक्त ६ वर्षांचें होतें असें सिद्ध होतें. परंतु हा चरण प्रक्षिप्त आहे हें पुढील ऊहावरून सिद्ध होईल. अयोध्याकांडाच्या शेवटीं तिचें जें अत्रीच्या पत्नीशीं भाषण झालें आहे त्यांत ती म्हणते,

पतिसंयोगसुलभं वयो दृष्ट्वा तु मे पिता ।
चिंतामभ्यगमद्दीनो वित्तनाशादिवाधनः ॥
तच्च दृष्ट्वा धनुश्रेष्ठं गौरवाद्धिरिसंनिभम् ।
अभिवाद्य नृपा जग्मुरशक्तास्तस्य तोलने ॥
सुदीर्घस्य तु कालस्य राघवोऽयं महाद्युतिः ।
विश्वामित्रेण सहितो यज्ञं द्रष्टुं समागतः ॥

"पतीशीं संगत होण्यास योग्य इतक्या वयाची मी झाल्यामुळें माझ्या पित्याला फार काळजी लागली. पुष्कळ राजपुत्र आले व त्यांनीं पर्वतासारखें जड असें तें धनुष्य पाहिलें, परंतु उचलण्यास

असमर्थ झाल्याकारणानें ते निघून गेले. यानंतर पुष्कळ काळ गेल्यावर राम विश्वामित्राबरोबर यज्ञ पहावयास आला." (जनकाकडे). याच गोष्टीसंबंधीं जनक बालकांडांत विश्वामित्राला म्हणतो "धनुष्य उचलण्यास असमर्थ झालेले सर्व राजे मजवर क्रुद्ध झाले व त्यांनीं एकत्र होऊन मिथिलेवर हल्ला केला. मी एक वर्ष त्यांजबरोबर लढलों;परंतु माझें सर्व सैन्य नाश पावलें. त्यामुळें अत्यंत चिंता वाटून मीं देवांना संतुष्ट करण्याकरितां एक वर्ष तप केलें व त्यांनीं दिलेल्या दिव्य शस्त्रांनीं शेवटीं त्या राजांचा मीं पराभव केला." या सगळ्यावरून असें स्पष्ट दिसतें कीं जनकानें सीता पतीशीं संगत होण्याला योग्य इतक्या वयाची झाल्यावर आपला पण जाहीर केला. पतीशीं संगत होण्याला योग्य याचा अर्थ निवळ लग्नाला योग्य असा घेतला तरी तिला त्यावेळीं कमींत कमीं ६ वर्षे पुरीं झालींच असलीं पाहिजेत. कारण धर्मशास्त्राप्रमाणें सहा वर्षांच्या आंत मुलीचें लग्नच करितां येत नाहीं; "षडब्दमध्ये नोद्वाह्या" वगैरे पहा. पण जाहीर केल्यानंतर धनुष्य उचलण्याकरितां राजे आले; परंतु त्यांस यश न आल्यामुळें त्यांनीं जनकाच्या राजधानीला वेढा घातला व तो उठेपर्यंत एक वर्षापेक्षां जास्त काळ गेला. या गोष्टीनंतर राम येईपर्यंत पुष्कळ काळ लोटला असें सीताच म्हणते. तेव्हां रामाशीं लग्न होण्याच्या वेळीं ती फक्त ६ वर्षांची असूं तरी कशी शकेल ? परंतु बाल कांडांतील

अभिवाद्याभिवाद्यांश्च सर्वान् राजसुतास्तदा ।
रेमिरे मुदिताः सर्वा भर्तृभिः सहिता रहः ॥

या श्लोकानें या कल्पनेचा फोलपणा पूर्ण उघड होत आहे. लग्नानंतर जनकाच्या राजधानीहून अयोध्येस आल्यावर, ज्यांचा नमस्कार घेण्याचा मान होता त्यांस अभिवादन करून त्या राज-

कन्यांनीं आपल्या पतीशीं एकांतांत विलास भोगिले " असें त्या श्लोकांत म्हटलेलें आहे. सहा वर्षांच्या मुलीनें आपल्या पतीशीं "एकांतांत विलास भोगिलें" हें म्हणणें हास्यास्पद नाहीं काय ? रहः या शब्दाचा वरच्याखेरीज दुसरा अर्थ होणें अशक्य आहे, व त्यामुळें लग्नाच्या वेळीं सीता निदान १५ वर्षें वयाची असावी ही गोष्ट आपोआपच सिद्ध होते. राम त्या वेळीं १८ किंवा १७ किंवा १६ वर्षांचाही असेल. परंतु १६ व्या वर्षीं राजपुत्र लग्नाला योग्य समजला जात असे ही गोष्ट व रामाची वाढ फार मोठी असून अत्यंत जड असें तें धनुष्य उचलण्याइतकी असामान्य शक्ति त्याच्या आंगीं होती ही गोष्ट ध्यानांत घेतली म्हणजे लग्नाच्या वेळीं तो लहान वयाचा होता असें वाटण्याचें कोणतेंही कारण नाहीं.

परंतु अर्वाचीन काळीं बालविवाह सगळीकडे प्रसृत झाल्यामुळें अलीकडे पुराणांच्या ज्या आवृत्त्या निघाल्या त्यांत संपादकांनीं आपल्या डोक्यांतली लग्नविषयक वर्णनें व त्या वेळच्या वधूवरांच्या वयाविषयीं वर्णनें दिलीं. अग्निवेश्य रामायणांत अशीच एक मजेदार वर्णन आहे. त्यांत म्हटलेलें आहे--

रामः पंचदशे वर्षे षड्वर्षामपि मैथिलीम् ।
उपयेमे त्वयोध्यायां द्वादशाब्दानुवास सः ॥

हा श्लोक टीकाकाराच्याही लक्षांत येऊन त्यानें तो कांहीं इतर कारणामुळें अस्वाभाविक ठरविला आहे. (युद्धकांडाच्या ११० व्या सर्गाच्या शेवटील टीका पहा.) या असल्या श्लोकामुळें अर्वाचीन बालविवाहाला पुष्टि देणारे असें *वर एक दिला आहे तसले एखाददुसरे चरण वाल्मीकीच्या सर्वमान्य ग्रथांत घालण्याची प्रवृत्ति झाली असल्याचा संभव आहे.

* हा चरण गारेशियोच्या आवृत्तींत नाहीं.

ऋ.

राम अगोदर कीं कृष्ण अगोदर ?

रामाचा काळ कोणता या प्रश्नाचा उलगडा करण्याचा आम्ही प्रयत्न केलेला नाहीं; व तो प्रश्न सोडविणें खरोखरीच बुद्धिग्राह्य अशा संशोधनाच्या आवांक्याबाहेरचें आहे. याविषयावर पुरेशी माहिती उपलब्ध नाहीं. परकीय लेखकांच्या ग्रंथांतूनही या प्रश्नाचा उलगडा नाहीं. हिंदी लेखनांतही त्याची गुरुकिल्ली सांपडत नाहीं. रामायणांतील एका प्रक्षिप्त श्लोकाच्या आधारावर अर्वाचीन ज्योतिष्यांनीं राम व भरत यांच्या कुंडल्या तयार केलेल्या आहेत. जरी या कुंडल्या काल्पनिक नाहींत असें क्षणभर धरून चाललें तरी तेवढ्यानें कालगणना करण्यास फारच थोडी मदत होते. हल्लींचे जुन्या मताचे लोक राम गेल्या त्रेतायुगांत झालेला नसून या युगचक्राच्या मागच्या तिसऱ्या युगचक्रांतील त्रेतायुगांत झाला होता असें मानतात; व हीच गोष्ट युद्धकांडाच्या शेवटल्या भागावरील टीकेंत सांगितलेली आहे. एका हिंदु ज्योतिष्यानें रामरावणयुद्धाचा काळ ख्रिस्ती शकाच्या पूर्वी १२५६७१०१ वर्षें हा दिला आहे. रामायणांतील एकंदर अतिशयोक्तीपूर्ण वर्णनाशीं अत्यंत जुळत्या अशा या काळावरून टालबाइज व्हीवर रामाचा काळ इ. स. च्या १० व्या शतकापर्यंत आणून ठेवतो तिकडेही आपणास लक्ष दिलें पाहिजे. कित्येकांना वाटतें कीं, राम कृष्णानंतर कांहीं काळानें व बुद्धाच्या आधीं जन्मला व यामुळें ते त्याचा काळ इ० स० पूर्वी १५००–५००हा ठरवितात. तेव्हां मुख्य महत्त्वाचा प्रश्न असा

उद्धवतो कीं, कृष्ण आधीं का राम आधीं ? राम कृष्णाच्या आधीं पुष्कळ शतकें होऊन गेला हें सिद्ध करण्यास पुष्कळ आधार आहेत. रा. अभ्यंकर यांनीं विष्णुपुराणाच्या आधारावर लिहिल्याप्रमाणें कृष्ण व राम यांमध्यें जर ३९ राजे (म्हणजे दर पिढीस २० वर्षे य हिशोबानें ७८० वर्षें) झाले असतील तर जुन्या मताप्रमाणें महाभारताचा इ० स० पूर्वी ३१०१ हा काळ बरोबर घेऊन रामाचा काळ ३८८१ हा येतो. किंवा लो. टिळक व इतर यांनीं त्याच विष्णुपुराणावरून काढलेला इ०स०पू० १५००हा कृष्णाचा काळ मानला व त्याच्यांत व रामांत ७८० वर्षांचें अंतर होतें असें मानलें तर रामाचा काळ इ० स० पूर्वी २२८० हा होय असें आपणास म्हणतां येईल. असो. राम कृष्णाच्या अगोदर झाला असें आम्हांस कां वाटतें त्याचीं कारणें पुढें दिलीं असून विवरणांत योग्य ठिकाणीं विरुद्ध बाजूचाही विचार केला आहे.

पहिला मुख्य मुद्दा हा कीं, रामाच्या वेळीं दंडकारण्य यमुनेपर्यंत पसरलेलें होतें. कारण असें जर नसतें तर यमुनेच्या थोड्या दक्षिणेस असणाऱ्या चित्रकूटावर रामानें निवास केला नसता. वास्तविक गोष्ट अशी आहे कीं, गंगा व यमुना यांच्यामध्यें सुद्धां त्याच्या वेळीं कांहीं ब्राह्मण वसाहतींशिवाय दुसरी वसति नव्हती. रामायणावरून दिसून येणारी रामाच्या वेळची देशाची स्थिति पुढीलप्रमाणें असावी, आर्य लोकांनीं पंजाब व बहारपर्यंत गंगेच्या उत्तरकडील प्रदेश काबीज केला होता. गंगा व यमुना यांच्या मधील दुआबांत वसति होत चालली असून जास्त धाडसी लोक दक्षिणेस गोदावरीपर्यंत घुसले होते. परंतु दुआबामध्यें अथवा यमुनेच्या दक्षिणेस आर्यांचें राज्य मुळींच नव्हतें. कृष्णाच्या वेळीं आर्यांनीं यमुनेच्या खोऱ्याच्या दोन्ही बाजूंस, मध्य प्रांतांत, गुजराथेंत व दक्षिणेमध्यें

सुद्धां वसाहत केली होती. कृष्णाच्या वेळीं काठेवाड, गुजराथ, माळवा व वऱ्हाड यांमध्यें आर्यांचीं राज्यें होतीं. या जोरदार मुद्या-विरुद्ध म्हणून असा एक मुद्दा पुढें करण्यात येतो कीं, दक्षिणेंत वसाहत होण्याच्या आधींच कौरवपांडव युद्ध झालेलें असलें पाहिजे. परंतु असें कां म्हणावें हें आम्हांस कळत नाहीं. उलट याची विरुद्ध बाजूच जास्त खरी ठरेल. जर नवीन वसाहत करण्याला पुरेशी व सुपीक जागा शिल्लक असती तर युधिष्ठिरानें कौरवांशीं तें भयंकर युद्ध केलेंच नसतें. बोअर लोकांना दुसरीकडे जाऊन स्वतंत्र राज्य स्थापण्यास जागा असती तर त्यानीं पूर्वीप्रमाणें दुसरीकडे राज्यच स्थापलें असतें; आपल्यापेक्षां बलाढ्य अशा इंग्लंडशीं लढाई केली नसती. त्याचप्रमाणें वसाहतीवरून कालानुक्रम बांधण्यास मुळींच मदत मिळत नाहीं. मध्यप्रांताच्या दक्षिणेकडील देश मनुष्याच्या ताब्यांत आल्यास हजारों वर्षें होऊन गेलीं तरी मध्यप्रांतांतील कांहीं जमीन आतां नुकती नुकती लागवडीस येत आहे.

देशस्थितिप्रमाणें समाजस्थितीवरूनही राम कृष्ण अथवा पांडव यांच्या आधींचा असावा हीच गोष्ट सिद्ध होते. रामाच्या वेळीं ब्राह्मण व क्षत्रिय यांना वेदांत व धनुर्विद्येंत सारखेंच शिक्षण मिळे. वेदप्रवीण ब्राह्मणाप्रमाणें राम स्वतः वैदिक मंत्र म्हणत असे व वैदिक यज्ञ करीत असे. उदाहरणार्थ, **ब्रह्मवत्क्षत्रवच्चैव जजाप हितमात्मनः** आणि **देवता देवसंकाश यजस्त्वं कुशलो ह्यसि** हे श्लोक वाचावे. पांडवांच्या वेळीं या दोन वर्णांत इतका फरक पडला होता कीं वेदप्रावीण्य हा क्षत्रियाचा कांहीं मोठासा गुण मानला जात नसे. ब्राह्मण वीरांची योग्यताही कमी झाली होती. उदाहरणार्थ द्रोणाला त्याच्या क्षत्रविद्येबद्दल **ब्रह्मबंधु** अथवा भ्रष्ट ब्राह्मण म्हणत असत. रामाच्या वेळीं पांडवांच्या वेळच्यापेक्षां

स्त्रियांचा दर्जाही जास्त उच्च होता;* त्या संध्या व यज्ञ करूं शकत. सीता व कौसल्या या गोष्टी करीत असल्याबद्दलचा रामायणांत उल्लेख आहे महाभारतांतील कोणीही स्त्री खुद्द ब्रह्मवादिनी द्रौपदी सुद्धां वैदिक धर्मकृत्यें करीत असल्याबद्दलचा उल्लेख नाहीं. हल्लींच्या रामायणापेक्षां हल्लींचें महाभारत जास्त जुनें आहे ही गोष्ट येथें अवश्य नमूद केली पाहिजे; परंतु हल्लींच्या आवृत्त्यांतून रामायणाच्या प्राचीन विचाराबद्दल आदर वाटून जे-कांहीं प्राचीन विचार तसेच ठेवले गेलेले आहेत त्यांच्या आधारावर आमचीं विधानें केलेलीं आहेत.

विराट देशांत दुर्योधनानें गोग्रहण केलें त्यावरून पांडवांच्या वेळीं आर्य लोक शेतकीवर अवलंबून नसून ते पशू बाळगून त्यांच्यावर निर्वाह करणारे लोक होते; परंतु रामाच्या वेळीं तर शेतकी प्रधान होती असा एक मुद्दा कांहीं लोक पुढें आणतात. शेतकीपेक्षां जे पशूंवरच अवलंबून असत अशा लोकांमध्यें कृष्णाचा जन्म झाला होता असेंही ते आणखी सांगतात. आमच्या मतें ही कल्पना अथवा या पुराव्याच्या जोरावर काढला जाणारा निष्कर्ष चुकीचा आहे. हिंदुस्तानचे आर्य कोणत्याही काळीं पशूंवर अवलंबून नव्हते. खरें पाहिलें तर त्यांनी आपल्याला जें आर्य हें नांव धारण केलें होतें व ज्या नांवाचा त्यांना मोठा अभिमान वाटे त्या नांवावरून ते जमीनीची लागवड करणारे होते असेंच अनुमान निघतें. प्राचीन आर्य लोक गोमांस खाणारे लोक होते ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे ते पाळीव गुरांचे समूहच्या समूह कां बाळगीत

---

* ज्या काळीं "पुरा कल्पे तु नारीणां मौंजीबंधनमिष्यते । या वाक्याप्रमाणें स्त्रियांचा व्रतबंध होत असे तो रामाचा काळ असावा.

याचा सहज उलगडा होतो; त्यामुळें गुरांचा समूह ही मोठी संपत्ति मानली जात असे व युद्धामध्यें लुटीची ती एक बाब झाली होती. गेल्या बोअर युद्धामध्यें दोन्हीही पक्ष पशूसमूहांची लूट करण्यास किती उत्सुक असत व त्याकरितां कित्येकदां छापेहा कसे घातले जात हें चांगलें दिसून आलें आहे. हिंदुस्तानचे मुसलमान राजे राज्याचें एक अंग या नात्यानें पशूंचे पुष्कळ कळप पाळीत. रामायणांत सुद्धां रामाजवळ पुष्कळ गाई असून त्या त्यानें दंडकारण्यांत जावयास निघतेवेळीं ब्राह्मणांना देऊन टाकल्या असें म्हटलेलें आहे. शिवाय कृष्णानें गुराख्याचें आयुष्य घालविलें असें म्हटल्यास रामानें त्याच्यापेक्षांही प्राथमिक असें पारध्याचें आयुष्य घालविलें आहे असें म्हटलें पाहिजे; कारण वनवासाचीं १४ वर्षें त्यानें मृग व वनांतील इतर पशु यांच्या मांसावरच फक्त काढिलीं असें वर्णन आपणांस सांपडतें.

आमचा तिसरा मुद्दा असा आहे कीं, राम हिंदुस्तानच्या प्राचीन राजांपैकीं एक होय अशी हिंदुस्तानांत फार पूर्वीपासून चालत आलेली परंपरा आहे. महाभारतांतील षोडशराजीय आख्यानांत दिलेल्या १६ मोठ्या प्राचीन राजांपैकीं राम एक आहे. हें आख्यान अत्यंत जुनें आहे हें महाभारतावरील आमच्या ग्रथांत आम्ही दाखविलेंच आहे. या आख्यानांतील कित्येक राजांचीं वर्णनें शतपथ ब्राह्मणाच्या शब्दांत दिलीं आहेत. यमसभेंत बसलेल्या राजांचें वर्णन नारदानें महाभारतांत केलें आहे त्यांतही रामाचा उल्लेख आहे. या वर्णनांत राम विष्णूचा अवतार होता असें म्हटलेलें नसून आपल्या पुण्ययोगानें तो त्या पदवीस चढला असें म्हटलेलें आहे ही गोष्ट विशेष ध्यानांत ठेवण्याजोगी आहे. पुढील श्लोकावरून तो पांडवांच्यापूर्वी झाला हें स्पष्ट दिसून येतें.

रामो दाशरथिश्चैव लक्ष्मणोऽथ प्रतर्दनः ।
तथाऽपरे सहस्राणि ये गताः शशबिंदवः ॥
इष्ट्वाश्वमेधैर्बहुभिर्महद्भिर्भूरिदक्षिणैः ।
तस्यां सभायां राजेंद्र वैवस्वतमुपासते ॥

षोडशराजीयाख्यानांत रामाचा निर्देश असला तरी मोठमोठ्या प्राचीन अश्वमेधांचीं वर्णनें ज्यांत दिलीं आहेत अशा शतपथ ब्राह्मणांत त्यास मुळींच आधार नहीं असें कदाचित् पुष्कळांस वाटण्याचा संभव आहे; परंतु असले नकारार्थी मुद्दे आणणें नेहमीं कसें भ्रमोत्पादक असतें हें महाभारतावरील पुस्तकांत आम्ही दाखविलेलेंच आहे. शतपथ ब्राह्मणाच्या १३ व्या कांडांत अश्वमेध करणाऱ्या सर्व प्राचीन राजांची यादी देण्याचा आव मुळींच घातलेला नाहीं; असली यादी शतपथ ब्राह्मणाच्या विषयाबाहेरची होईल एवढेंच नव्हे तर ती सर्व देणें शक्यतेच्या पलीकडचें आहे. युधिष्ठिराचेंही नांव या यादींत नाहीं; परंतु तेवढ्यावरून तो शतपथ ब्राह्मण लिहिलें गेल्यानंतर झाला असें अनुमान काढणें बरोबर नाहीं. व याच कारणास्तव राम त्याच्यानंतर झाला हें म्हणणेंहि योग्य नव्हे. लो. टिळकांनीं हा मुद्दा युधिष्ठिराच्या बाबतींत पुढें केला आहे. परंतु त्यांच्या मतें ऋग्वेदाच्या कांहीं ऋचांत रामाचें नांव सांपडतें यावरून त्याचा वैदिक कालाशीं संबंध असला पाहिजे. आणि असें असूनही प्राचीन शतपथ ब्राह्मणांतील अश्वमेधकारांच्या यादींत त्याचें नांव सांपडत नाहीं. या सर्वांचें खरें स्पष्टीकरण हेंच कीं, शतपथ ब्राह्मणाचा सर्व अश्वमेधकर्त्यांचीं संपूर्ण नांवें देण्याचा उद्देशच नाहीं.

या सर्व मुद्यांवरून आम्हांला असें वाटतें कीं, राम हा हिंदुस्थानचा अतिप्राचीन राजा असून तो कृष्णाच्या पूर्वी कित्येक शतकें होऊन

गेला असावा. यमुनेच्या दक्षिणेकडील हिंदुस्तानचा सर्व भाग ज्या वेळीं निर्मनुष्य अथवा फार तर रानटी लोकांनीं व्यापलेल्या घनदाट अरण्यांनीं व्याप्त होता त्या वेळीं अयोध्येंत राज्य करणाऱ्या एखाद्या राजानें त्या अरण्यांतून सिंहलद्वीपापर्यंत जाऊन तें काबीज करणें शक्य तरी आहे काय ? असा कित्येकजण प्रश्न विचारतील. परंतु याविषयीं आपणास आश्चर्य वाटावयास नको. मुसलमानी अंमल यमुनेच्या पलीकडे नसतांना अलाउद्दीन खिलजीनें दक्षिणेंत दौलताबादेपर्यंत लांबवर स्वारी केली; व तो राज्यावर बसल्यावर त्याच्या सेनापतीनें दक्षिणेस थेट हिंदी महासागरापर्यंत लुटालूट केली. त्याचप्रमाणें राम केवळ एकटा होता म्हणून त्याचे पराक्रम काल्पनिक होत असें वाटण्याचेंही कांहीं कारण नाहीं. हिंदुस्तान अगर इतर देशांतून कित्येक अर्वाचीन धाडसी वीरांनीं अगदीं अज्ञात अशा लोकांत जाऊन यश व कीर्ति मिळविलेलीं आहेत. पृथ्वी उत्पन्न झाल्यापासून जेथें कोणीही परकी मनुष्य गेला नाहीं त्या आफ्रिकेच्या अरण्यमय मध्यभागांत 'स्टॅनले' (Stanley) यानें प्रवास केला हें जर खरें तर अतिप्राचीन कालीं एतद्देशीय लोकांच्याच साहाय्यानें रामानें लंकेवर स्वारी करून ती जिंकिली यांत कोणाला मुळींच आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं.

६.

स्पॅनिश लोकांनीं मेक्सिको काबीज केल्याचा वृत्तांत.

प्रकरण १ लें.

देशाचें वर्णन व लोकांची संस्कृति.

(१)

इ. स. च्या पंधराव्या शतकाच्या अगदीं अखेरीस समुद्रपर्यटण करून नवीन देश शोधून काढण्याची जी एक लाट यूरोपमध्यें उसळली ती शिखरास पोंचून खालीं येईपर्यंत एक शतकापेक्षां अधिक काळ लोटला. कोलंबसानें अमेरिका शोधून काढिली असें आपण वाचलें; परंतु तें अक्षरशः खरें नसून अमेरिकेच्या बाजूचीं कांहीं बेटें मात्र शोधून काढिल्याचें श्रेय त्याला देतां येईल. त्यानें शोधलेल्या प्रांतांत वसाहत इतरांनींच केली. तेथें वसति झाल्यानंतर आणखी प्रदेश शोधून काढून वसाहत करण्यास सुरवात झाली; व अशा रीतीनें अमेरिकेंत पूर्ण वसाहत होण्याला एक शतकापेक्षां अधिक अवधि लागला. याच कालांत स्पॅनिश सरकारच्या आधिपत्याखालीं 'हार्नाडिझ् कोर्टेझ्' नांवाच्या वीरानें मेक्सिको देश काबीज केला; त्यासंबंधींचा संक्षिप्त वृत्तांत या ठिकाणीं द्यावयाचा आहे; परंतु त्याच्या आधीं मेक्सिको देश कोठें आहे, त्याची भूगोलिक रचना कशी आहे, त्या देशांत कोणत्या प्रकारचे लोक राहत असत व त्यांची संस्कृति कशा प्रकारची होती इत्यादि गोष्टींचें संक्षिप्त वर्णन पुढील वृत्तांत समजण्यास सुलभ पडण्यासाठीं दिलें पाहिजे.

(२)

हल्लीं मेक्सिको म्हणून ज्या प्रजासत्ताक राज्याचा निर्देश करण्यांत येतो त्यापेक्षां पूर्वीच्या मेक्सिकोची मर्यादा पुष्कळ लहान होती. अमेरिकाखंडाच्या मध्यावर जो एक चिंचोळा प्रदेश आहे त्याच्या मध्यभागीं समुद्रसपाटीपासून ७५०० फुटांच्या उंचीवर शंभर मैल परिघाची बदामी आकाराची एक दरी आहे. या दरींत पांच लहान मोठीं सरोवरें असून त्यांपैकीं टेझ्क्यूको सरोवर सर्वांत मोठें व दरीच्या मध्यभागीं आहे. ही दरी पूर्वीच्या मेक्सिकन राज्याचा वास्तविक विस्तार होय. या सर्व सरोवरांच्या सभोंवतीं मोठमोठे डोंगर असून त्यांतील कित्येक शिखरें ज्वालाग्राही होतीं. या सर्व प्रदेशास अॅनाहॉक म्हणत.

स्पॅनिश लोकांनीं या प्रदेशांत प्रवेश केला त्या वेळीं तेथें दोन प्रमुख राज्यें होतीं. एक मेक्सिकोचें व दुसरें टेझ्क्यूकोचें. टेझ्क्यूकोचें राज्य टेझ्क्यूको सरोवराच्या ईशान्येस असून त्याची राजधानी टेझ्क्यूको शहर सरोवराच्या पूर्व कांठावर होतें. मेक्सिकोचें राज्य दरीच्या बाकीच्या भागावर पसरलेलें असून त्याची राजधानी मेक्सिको शहर टेझ्क्यूको सरोवराच्या पश्चिम कांठावर होतें.

त्या काळीं या प्रदेशांत टेझ्क्यूकन व मेक्सिकन अथवा अॅझ्टेक या प्रमुख व बहुसंख्याक आणि, लाकोपन, टेपीकन, चोलूलन, व टोटोनॅक अशा चार अल्पसंख्याक जाति राहत होत्या. हीं सर्व नांवें राज्यांच्या नांवावरून पडलेलीं होतीं. लोकोपन लोक मेक्सिको शहराच्या ईशान्येस असणाऱ्या लोकोपन अथवा टाकूब नांवाच्या लहान परंतु शक्तिमान राज्याचे लोक असून त्यांचा व मेक्सिकन आणि टेझ्क्यूकन लोकांचा संघ होता व त्यांत मेक्सि-

कन लोकांचा पगडा होता. टेइक्यूको सरोवरापासून पूर्व दिशेला पुष्कळ लांब अंतरावर **टेपीका** नांवाचें एक लहानसें राज्य होतें; त्यांतील रहिवासी टेपीकन लोक होत. चोलूलन लोक चोलूला नांवाच्या अतिप्राचीन शहराचे व त्याच्या आसपासच्या प्रदेशाचे रहिवासी होत. चोलूला शहर टेइक्यूको व टेपीका या शहरांच्या साधारणतः दरम्यान आहे. मेक्सिकोच्या आखाताच्या पश्चिमेस कांहीं अंतरावर **सेंपोआला** शहर होतें; तेथील रहिवासी टोटोनॅक लोक होत. याशिवाय या प्रदेशाच्या शेजारींच लास्कालन लोकांचें **लास्काला** नांवाचें राज्य होतें. या लोकांचा मेक्सिको काबीज करण्यांत स्पॅनिश लोकांना अतिशय उपयोग झाला असल्याकारणानें त्यांचें राज्य, लोक व संस्कृति यांसंबंधाची माहिती या प्रकरणाच्या शेवटीं दिली आहे.

याप्रमाणें या ६।७ राज्यांचें मिळून जें एक मोठें राष्ट्र बनलें होतें त्यांत ॲझ्टेक अगर मेक्सिकन या लोकांचें प्राबल्य जास्त असून त्यांनीं सार्वभौम सत्ता आपल्याच हातीं घेतली होती. मेक्सिकोचे दोन तीन राजे चांगले प्रबळ झाल्याकारणानें स्पॅनिश लोक आले त्या वेळचा मेक्सिकोचा राजा **मांटेझूमा** याच्या राज्याचा विस्तार वर वर्णन केलेल्या सर्व राज्यांइतका असून त्या सर्व प्रदेशाचा निर्देश प्रस्तुत वृत्तांतांत " मेक्सिकोचें राज्य " या शब्दांनीं केला आहे.

(३)

एवढें मोठें राज्य, राजेहीं प्रबळ, असें असतां, थोड्याशा स्पॅनिश लोकांनीं त्यास काबीज कसें केलें ? हा मोठा प्रश्न उभा राहतो; परंतु मेक्सिकन — सर्व सामान्य अर्थानें — लोकांची संस्कृति कशी होती हें समजल्यानें त्या प्रश्नाचा उलगडा होईल.

ॲनाहॉकमधील प्रत्येक राज्यांत राज्यव्यवस्था निरनिराळ्या प्रकारची होती; परंतु मेक्सिको व टेक्स्यूको येथील राज्यव्यवस्था सारखी होती. मेक्सिकन राजे फार शूर व धाडसी निपजल्यामुळें त्यांनीं आपलें संस्थान प्रमुख केलें असल्यानें त्यांना जिंकणें म्हणजे सर्व मेक्सिको प्रदेश जिंकण्यासारखें होतें. अशा या राज्यांत अलीकडे राजे फार धर्मवेडे व विषयलालसेनें जिंकलेले असे निपजूं लागले होते. वृत्तांताच्या कालचा राजा मांटेझूमा हा तरुणपणीं फारच शूर व धाडसी असून त्यानें आपली सत्ता ॲनाहॉकमध्यें अबाधित बसविली होती; परंतु त्यानंतर त्याची वृत्ति विषयोपभोग व धार्मिक कृत्यें यांकडे वळली. त्याची धार्मिक अंधश्रद्धा फारच जबर होती; व त्याचा मेक्सिकन उपाध्यायांवर अकृत्रिम भरंवसा असे. या उपाध्यायांमध्यें अशी एक दंतकथा प्रचलित होती कीं, त्यांचा एक देव एकदां त्यांच्यावर रागावून मेक्सिकोमधून निघून गेला होता. मात्र जातां जातां त्यानें " पुष्कळ काल गेल्यानंतर मी परत येईन " असें त्यांना आश्वासन दिलेलें होतें. या दंतकथेवर सर्व लोकांचा विश्वास असे व त्यांत मांटेझूमा प्रमुख होता. त्याचा या कथेवर विश्वास इतका चमत्कारिक होता कीं, आपला देव परत येण्याची वेळ आतां जवळ येऊं लागली आहे असें त्यास वाटूं लागलें होतें. इतकी त्याची अंधश्रद्धा जबर होती !

कांहीं दृष्टींनीं मेक्सिकन लोक बरेच सुधारलेले होते. त्यांची राज्यव्यवस्था अत्यंत व्यवस्थित होती. त्यांचे कायदेकानू त्यांच्या चित्रलिपींत नीट लिहिलेले असून त्यांचा अम्मल अत्यंत सक्त होत असे. त्यांची जमाबंदीची पद्धति फार पद्धतशीर असल्यामुळें राजाचा खजिना भरपूर भरलेला असे. त्यांचीं लष्करेंही पुष्कळच व्यवस्थेशीर होतीं. लष्करचें आधिपत्य खुद्द राजाकडे असून त्याच्या

हाताखालीं निरनिराळ्या दर्जाचे अधिकारी असत; परंतु त्यांच्या शस्त्रास्त्रांमध्यें अद्याप पूर्णत्व मुळींच आलें नव्हतें. बंदुक, तरवार वगैरे हत्यारांविषयीं त्यांस मुळींच माहिती नव्हती. घोड्यासारखा एखादा प्राणी असून त्याचा लढाईत उपयोग होतो ही गोष्ट त्यांस ठाऊक नव्हती, त्यामुळें स्पॅनिश घोडेस्वाराला ते घोडा व स्वार मिळून एकच प्राणी समजत. त्यांचीं शस्त्रास्त्रें म्हणजे काठ्या, दगड, झुडपें हीं होत. तिरकमठ्याचाही ते चांगला उपयोग करीत, परंतु त्यांच्या बाणांचीं टोंकें पोलादी नसत; तर एका प्रकारच्या गारगोटीचीं असत. या गारगोटीस अत्यंत तीक्ष्ण धार देतां येत असे. परंतु ती धार थोड्या आघातानें सुद्धां बोथट होई. या गारगोटीच्या बोथीचे कांहीं आंखूड भालेही ते वापरीत असत. याशिवाय त्यांस दुसरीं शस्त्रास्त्रें माहीत नव्हतीं. स्पॅनिश लोकांचें शस्त्रास्त्रें फार पुढें गेलेलीं होतीं. ते बंदुका व लहान तोफा यांचा उपयोग करीत. त्यांचेजवळ लांब व पोलादी टोंकांचे भाले असत व त्यांचें सैन्य कवाईत शिकलेलें असे.

मेक्सिकन लोकांना फक्त चित्रलिपीच माहीत होती. या लिपींत त्यांच्या दंतकथा, ऐतिहासिक हकागती वगैरे पद्यांत व गद्यांत लिहिलेल्या असत व त्या सार्वजनिक शाळांतून मुलांस शिकवून त्यांजकडून त्या पाठ करून घेतल्या जात. त्यांच्यांमध्यें अंकगणित, खगोल, ज्योतिष वगैरे शास्त्रांतही बरीच प्रगति झाली होती. शेतींतही त्यांची चांगली प्रगति होती. मात्र त्यांचीं आउतें कमी काम देणारीं असत. सोनें, रुपें, तांबें, वगैरे धातु जमिनींतून काढून शुद्ध करण्याची कलाही त्यांस अवगत होती. सोन्याची अत्यंत विपुलता असल्यानें त्यांना त्याची विशेष किंमत वाटत नसे. त्यांच्यामध्यें अत्यंत परिणतावस्थेस पोंचलेली कला म्हणजे मातीचीं

करण्याची कला होय. भांडीं व मातीच्या कारागिरीच्या विविध वस्तु करण्याविषयीं त्यांची स्तुति खुद्द स्पॅनिश लोकांनींही केली आहे व त्यांतील कांहीं वस्तु त्यांनीं आपल्या बादशहास नजर करण्याकरितां व पदार्थसंग्रहालयांत ठेवण्याकरितां स्पेनमध्यें नेलेल्या आहेत. समुद्राच्या पाण्यापासून मीठ उत्पन्न करण्याची कलाही त्यांस अवगत होती. दगडाच्या मूर्तीही ते घडवीत. मात्र त्या त्यांस चांगल्या प्रकारच्या करतां येत नसत. त्यांच्यामध्यें व्यापाराचा पेशा फार उच्च प्रतीचा गणला जात असे. माल विकीत निरनिराळ्या प्रदेशांतून हिंडणाऱ्या त्यांच्या सौदागरांना त्यांच्यांमध्यें फार मान असे. हे सौदागर गुलामांचा व्यापारही करीत व हा व्यापार मोठा मानास्पद मानला जाई. हे व्यापारी द्रव्यविनिमयाच्या बाबतींत फार तज्ज्ञ असत; व जमाबंदीच्या कारभारांत राजा त्यांच्या पंचांचा वेळोवेळीं सल्ला घेई.

समाजांतील स्त्रीपुरुष, लहानमोठे वैगेरेची वर्तणूक फार प्रेमळ व आदरपूर्ण असे. त्यांच्या सार्वजनिक शाळांतून शिस्त मोठी कडक असून तेथें श्रीमंत गरीब असा भेद ठेवला जात नसे. मेक्सिकन कुटुंबांत अविवाहित मुलीला फार प्रेमानें वागवीत. सासरीं जातांना मुलीला तिची आईबापें जो उपदेश करीत तो वाचून अजूनही गांहिवर उत्पन्न होतो. मेक्सिकन समाजांत स्त्रीपुरुष सारख्याच स्वातंत्र्यानें वावरत. त्यांच्या स्त्रिया थोड्या सुंदरही असत. त्या आपला काल घरगुतीं कामें व शिवणें टिपणें यांत घालवीत. मोठमोठ्या समारंभाच्या ठिकाणीं स्त्रिया पुरुषांत मोकळेपणानें वावरत. मेक्सिकन लोकांच्या व्यसनांत तंबाखूचें व्यसन प्रमुख होतें. दारूही ते पीत असत. परंतु लहान मुलांना त्या व्यसनापासून अलिप्त ठेवण्यांत येत असे. सुख, दिमाख व वैभव यांची

मेक्सिकन लोकांना फार आवड असून मोठमोठ्या समारंभाच्या प्रसंगी त्यांच्या या आवडीस पूर्ण वाव मिळत असे.

याप्रमाणें त्यांचा समाज बऱ्याच बाजूंनीं चांगला सुधारलेला असा वाटला तरी त्यांत दोन तीन गोष्टी अशा चमत्कारिक होत्या कीं, त्यामुळें त्यांस सुधारलेले म्हणणें योग्य नाहीं. त्यांची धार्मिक अंधश्रद्धा इतकी कळसास पोंचली होती कीं, त्यामुळें त्यांच्या चांगल्या गोष्टींनाहीं काळोखी येते व या अंधश्रद्धेमुळेंच त्यांचा पराभव बराच सुलभतेनें झाला. व्यसनी, भोंदू, भित्रे व स्वार्थसाधु अशा त्यांच्या धर्माधिकाऱ्यांचा लोकांवर फार पगडा होता. या धर्मश्रद्धेच्या जोडीलाच त्यांच्यांमध्यें नरयज्ञाची किळसवाणी पद्धति होती; व ती इतक्या कळसास गेली होती कीं, स्वतः बळी जाणारा मनुष्य कित्येकदां आपणास मोठा भाग्यवान् समजत असे. परंतु मेक्सिकन राजे दरवर्षीं आसपासच्या आपल्या शत्रुप्रदेशावर स्वारी करीत व लोकांना कैद करून त्यांना अमानुषतेनें बळी देत. व अशा बळी दिलेल्या लोकांचें मांस ते लोक भक्षण करीत; तेंही तें त्यांस आवडत असें म्हणून नव्हे; तर केवळ धर्माज्ञा म्हणून. एका देवालयांत अशा बळी दिलेल्या लोकांचीं मस्तकें सांठविलेलीं होतीं; तीं ३६००० भरलीं असें एका बखरकारानें लिहून ठेवलें आहे. एवढ्या थरास ही गोष्ट त्यांच्यांमध्यें पोंचलेली होती. व त्यामुळें त्यांच्या आसपासच्या शत्रुप्रदेशांत त्यांच्याविषयीं द्वेषाग्नि भडकून राहिला होता. यामुळें स्पॅनिश लोकांनीं मेक्सिकन लोकांवर स्वारी करतांच या असंतुष्ट लोकांची त्यांस असामान्य मदत झाली.

" अशी ही मेक्सिकन् लोकांची संस्कृति पूर्णपणें स्वतंत्र; पण फार चमत्कारिक होती. एका ठिकाणीं सांपडावयास अशक्य

अशा परस्पर विरोधी गोष्टींनीं ती भरलेली आहे. उच्चनीच अशा सर्व प्रकारच्या राष्ट्रांच्या सुधारणांचे सर्व विशेष त्यांच्या सुधारणेंत होते. उत्तरेकडील हिममय प्रदेश, युरोपांतील समशीतोष्ण प्रदेश व हिंदुस्तान आणि अरबस्तान यांकडील उष्ण प्रदेश या सर्व प्रदेशांत उत्पन्न होणारे सर्व निरनिराळे पदार्थ त्यांच्या केवळ १०।१५ चौरस मैल जमिनींत उगवतात. अशीच स्थिति त्यांच्या संस्कृतीची होती असें म्हटलें पाहिजे," असें त्यांच्या सुधारणेच्या वर्णनाच्या शेवटीं सुप्रसिद्ध अमेरिकन इतिहासकार प्रेस्कॉट यानें म्हटलें आहे.

(४)

येथपर्यंत मेक्सिकन लोकांचा स्वभाव व सुधारणा याविषयीं थोडक्यांत वर्णन दिलें. आतां त्यांचे शत्रू लास्कालन लोक यांच्या विषयीं कांहीं विशेष गोष्टी देऊं.

लास्कॉलन् लोक हे मेक्सिकन लोकांच्याच वर्णाचे होत. प्रथमतः ते मेक्सिकन दरींतच राहत. परंतु त्यांच्यांविरुद्ध तेथें संघ झाल्यामुळें त्यांना तो प्रदेश सोडून परप्रदेशीं जाणें भाग पडलें. याचें कारण बहुधा त्यांच्या मनोवृत्तींतील उच्छृंखलपणा असावा. तेथून निघाल्यानंतर त्यांनीं लास्काला नांवाच्या प्रांतांत वसाहत केली. कालक्रमानें त्यांच्यांमध्यें निरनिराळीं संस्थानें पडून त्यांचें एक प्रजासत्ताक राज्य बनलें. त्यांच्यांमध्यें उच्च व नीच असे दोन वर्ग असून खालच्या वर्गाला फारच कमी हक्क होते. त्यांची सुधारणा साधारणतः मेक्सिकन लोकांइतकीच होती. नरयज्ञ व नरमांसभक्षण यांही चाली त्यांच्यांमध्यें होत्या. हे लोक अत्यंत उद्योगी व शेतकीनिपुण असल्यामुळें पुष्कळ श्रीमंत होते. त्यांच्या स्वभावांतील विशेष ह्मणजे काटकपणा, चिकाटी व असामान्य

युद्धप्रीति हे होत. मेक्सिकन व लास्कालन लोक यांच्यांमध्यें हाडवैर असून त्यांमध्यें दरवर्षी लढाया होत, व लास्कालन लोक संख्येनें कमी असूनही त्यांचा पराभव होत नसे. अल्पसंख्येचा दोष भरून काढण्यासाठीं त्यांनीं आपल्या प्रदेशाभोंवतीं तट उभारलेले असत व शस्त्रास्त्रांचीही ते जय्यत तयारी ठेवीत. इतका त्यांचा द्वेषाग्नि सारखा पेटलेला असे. अशा या लोकांच्या प्रजासत्ताक राज्यांत सर्व सत्ता उच्च वर्गाच्या हातीं होत्या. त्या सर्वांचें एक मंडळ असून त्यांचें नायकत्व अत्यंत शूर व धोरणा वीरमुत्सद्यांकडे दिलेलें असे. स्पॅनिश लोकांनीं त्यांच्या देशांत प्रवेश केला त्या वेळीं त्यांच्या मंडळाचें नायकत्व चार प्रमुख वीरांकडें होतें; त्यांत क्झिकोटेंकॅटल नांवाच्या वृद्ध वीराचें बरेंच वजन असून त्याच्या खालोखाल त्याचा मुलगा तरुण क्झिकोटेंकॅटल यांचें होतें. मॉक्सिक्सा नांवाचा अत्यंत वृद्ध वीर त्या चाघांत प्रमुख होता.

स्पॅनिश लोक प्रवेश करतेवेळीं लास्कालाची अशी स्थिति होती. मेक्सिकोसारख्या बलाढ्य देशाची सारखी लढाईची कदर असूनही साधनसामुग्रीच्या बाबतींत सुस्थात व विपुलता; जनतेच्या भावनांची उत्कटता; शाततेच्या काळीं अत्यत नेमस्तपणा; युद्धांतील शौर्य; व स्वातंत्र्यरक्षणाविषयीं अत्यंत उत्कट प्रयत्न या गोष्टींविषयीं त्यांच्यांबद्दल त्यांच्या शत्रूंसही कौतुक व आदर वाटे. काळानें तीव्र झालेला द्वेषाग्नि ज्यांच्या हृदयांत भडकत होता अशा लोकांचें स्पॅनिश लोकांना मेक्सिको काबीज करण्यांत अपरिमित साहाय्य झालें.

(५)

निरनिराळ्या संस्थानांत विभागलेलें; मेक्सिकन राजाच्या सार्वभौमत्वाखालीं असलेलें; मांडलिक लोकांच्या मनांत सार्वभौमाविषयीं

आदर दूरच राहिला; परंतु निष्ठाही राहिलेली नाहीं; उलट एक प्रकारचा तिरस्कार जागृत झालेला; परंतु भीतीमुळें तो गुप्त राहिलेला; टेक्क्यूको संस्थानांत मांटेझूमानें आपल्या वर्गीचा मनुष्य गादीवर बसविलेला; इक्स्ट्लिल्स्कॉचिटल् नांवाच्या हुषार व शूर अशा त्याच्या भावानें राज्य स्वतःस मिळविण्याचें प्रयत्न सुरूं केलेले; धर्मश्रद्धेमुळें लोकांवर उपाध्यायांचें अवास्तव वजन पडलेलें; नरमांसाशनाच्या चालीनें ग्रासलेलें; भेदभावांनीं भरलेलें; बऱ्याच दृष्टीनें सुधारलेलें; शौर्यधैर्याकरितां प्रसिद्ध असलेलें; असें मेक्सिकोचें स्वरूप स्पॅनिश लोक त्यांत प्रवेश करतेवेळीं होतें.

प्रकरण २ रें.

लास्कालन लोकांशीं सख्य व मेक्सिकोकडे कूच.

(१)

पंधराव्या शतकाच्या शेवटीं युरोपखंडामध्यें नवीन देश शोधून काढून तेथें वसाहत करण्याची प्रबल इच्छा जागृत झाली होती हें मागील प्रकरणाच्या आरंभीं सांगितलेंच. या कामास त्या काळच्या प्रबल आरमारी रूत्तेचें स्थान जो स्पेन देश त्यानें सर्वांच्या आधीं सुरवात केली होती; व इ० स० १५१८ पर्यंत उत्तरदक्षिण अमेरिका खंडाचा किनारा बहुतेक शोधून झाला होता. परंतु अद्याप मेक्सिकोचें आखात व त्याच्या पलीकडील भरभराटलेला प्रदेश हीं शोधून काढलीं गेलीं नव्हतीं.

वेस्ट इंडीज बेटांमधील क्यूबा बेटावर स्पॅनिश गव्हर्नर राहत असे. तो वसाहत केलेल्या प्रांतावर अंमल करी व नवीन प्रदेश शोधून काढण्यास काफिले पाठवी. अशा एका काफिल्यानें इ. स. १५१८ च्या सुमारास मेक्सिकन आखात ओलांडून मेक्सिकोचा कांहीं किनारा शोधून काढला व पुष्कळ संपत्ति जमा केली. परंतु मध्येंच त्या काफिल्याचा नाश होऊन त्यांतील ॲलव्हॅरॅडो नांवाचा मनुष्य फक्त परत क्यूबा बेटांत आला. त्यानें सांगितलेली मेक्सिकोच्या संपत्तिविषयींची माहिती ऐकून क्यूबा बेटांतील रहिवाशांस तो सर्व देश शोधून काढण्याची इच्छा उत्पन्न झाली. या त्यांच्या व आपल्या इच्छेस मूर्त स्वरूप देण्याचा निश्चय करून त्या कामास लायक मनुष्य पाहण्यास त्या वेळचा गव्हर्नर व्हेलॉस्केझ यानें सुरवात केली; व थोडक्याच दिवसांत तसा मनुष्य त्याला मिळून त्याच्यावर त्यानें ती कामगीरी सोंपविली. हा मनुष्य हर्नांडीझ कोर्टेझ हा होय.

हर्नांडीझ कोर्टेझ याचा जन्म स्पेनमध्यें एका उच्च कुलांत इ. स. १४८५ सालीं झाला. लहानपणीं तो बराच अशक्त होता, परंतु वाढत्या वयाबरोबर त्याची शरीरयष्टीही वाढून जोरकस झाली. तो लहानपणापासून उनाड व कलागती लावण्यांत हुषार असून त्याला लष्करी शिक्षणाखेरीज सर्व शिक्षणाचा तिटकारा होता. धैर्य व साहस हें गुण त्याच्या आंगीं लहानपणापासूनच दृग्गोचर होऊं लागले होते.

वेस्ट इंडीज बेटांत त्या वेळीं जमीन मुबलक होती; यामुळें तेथें जाणाऱ्या स्पॅनिश इसमास स्वतःच्या इच्छेनुरूप जमीन मिळे व ती कसण्यास हवे तेवढे मजूरही मिळत. कारण तेथील मूळ रहिवाशांस वेठीस धरण्याची पद्धत तेथें सुरू होती. या सर्व गोष्टी

ध्यानांत घेऊन तो आपल्या वयाच्या १९ व्या वर्षी हिस्पॅनियोला बेटांत आला. तेथें इ.स. १५११ पर्यंत शेतकी करून राहिल्यावर तो व्हेलास्केझबरोबर क्यूबा बेटाच्या स्वारींत गेला. त्या समयीं व्हेलास्केझ याची कोर्टेझवर इतकी मर्जी बसली कीं, स्वतः क्यूबाचा गव्हर्नर झाल्यावर त्यास त्यानें आपला चिटणीस नेमलें. परंतु त्यांचें फार दिवस नीट जमलें नाहीं. त्यांच्यांमध्यें फारच वैर माजलें, व त्याची मजल कोर्टेझ कैद होण्यापर्यंत गेली. परंतु पुढें त्यांच्यांमध्यें सलोखा होऊन कोर्टेझ क्यूबा बेटांत शेतकी करून राहूं लागला. अशा रीतीनें तो राहत असतां व्हेलास्केझनें त्याची वर निर्दिष्ट केलेल्या कामावर नेमणूक केली.

त्यानेंही आपली सर्व मालमत्ता विकून एक जहाजांचा लहानसा काफिला तयार केला. लोकही कांहींजण केवळ उत्साहामुळें व कांहींजण संपत्तीच्या लालसेमुळें त्यास येऊन मिळाले; व त्यांची निघण्याची तयारी झाली. परंतु कोर्टेझच्या हितशत्रूंनीं व्हेलास्केझचे कान भरल्यामुळें त्यास जाऊं न देण्याचें त्यानें ठरविलें. ही वार्ता आगाऊच कळून कोर्टेझनें रातोरात जहाजें हाकारलीं. त्यानंतर व्हेलास्केझनें हॅवाना बंदरांत त्याला आडकाठी करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यास त्यांत यश न येतां कोर्टेझ हॅवाना बंदरांतून पाणी व साधनसामुग्री घेऊन सुरक्षित बाहेर पडला. केप सेट अँटोनियो येथें इतर लोक त्यास येऊन मिळणार होते. त्या ठिकाणीं जाऊन मोजदाद करून पाहतां आपणाबरोबर ११ जहाजें; ११० खलाशी; ५१० शिपाई; ३२ धनुष्यबाणवाले व १३ तोफावाले; २०० रेड इंडियन पुरुष; कांहीं रेड इंडियन बायका; १० मोठ्या व ४ लहान तोफा एवढी सामुग्री असून दारूगोळ्याचा भरपूर पुरवठा आहे असें त्यास आढळून आलें. याशिवाय त्याजजवळ १६ घोडे होते.

शिडं सोडण्यापूर्वी कोर्टेझनें सर्वांना एक उत्तेजक व्याख्यान दिलें. कार्याचें महत्व—ध्येयाचें काठिण्य—त्यांच्यांतील असामान्य धैर्य व त्यांच्यावरील ईश्वराची कृपा इत्यादीविषयीं त्यानें मोठें सुंदर विवेचन केलें; व त्याच्या सहज वक्तृत्वशैलीनें त्या सर्वांवर अत्यत उत्साहजनक व स्थिर असा परिणाम होऊन मोठ्या उत्साहयुक्त अंतःकरणानें त्यांनीं जहाजें लोटलीं. पुढील असामान्य अडचणींची त्यांस कल्पना असती तर !

(२)

तेथून तो काफिला कोझूमल नांवाच्या बेटांत गेला. पूर्वी जो काफिला नाश पावला, त्यांतील कांहीं मंडळी या ठिकाणीं कोर्टेझला येऊन मिळाली. कोर्टेझ हा फार धार्मिक मनुष्य असून या काफिल्याचा नायक होण्यांत त्यांचा एक हेतु ख्रिस्ती धर्माचा प्रसार करणें हा होता. त्याला अनुसरून त्या बेटांतील लोकांस आपलीं धर्मतत्वें समजाविण्याचा त्यानें प्रयत्न केला. परंतु समजावणीचा उपयोग होत नाहीं असें पाहून त्यानें सक्तीनें आपला हेतु साध्य करून घेतला. त्यानंतर जहाजांतून जी काय थोडी नादुरुस्ती झाली होती ती दुरुस्त करून ता. ४मार्च१५१९ रोजीं कोर्टेझ कोझूमलमधून निघाला तो युकाटान प्रांताच्या कांठाकांठानें ग्रिजाल्व्हा नदीच्या मुखाशीं आला.

त्या नदीच्या मुखांतून वर जात असतां एका मैदानावर बरेच मेक्सिकन लोक जमा झालेले कोर्टेझनें पाहिल; व त्यांच्या वर्तनावरून आपणांस विरोध करण्याचा त्यांचा हेतु आहे हें त्यान ताडल. एक दोन दिवसांत त्यांची व स्पॅनिश लोकांची मोठी लढाई झाली; व विरुद्ध बाजूस मोठा जमाव असूनही घोडे व अग्निवर्षाव यांच्या जोरावर कोर्टेझला चांगला जय मिळाला.

या ठिकाणीं देवळांचा विध्वंस करून विजयानें उत्पन्न झालेल्या आत्मविश्वासामुळें कोर्टेझ पुढें प्रवास करूं लागला. किनाऱ्याकिनाऱ्यानें प्रवास करीत असतां व्हेराक्रूझ नांवाच्या शहराच्या आसपासच्या लोकांची शांत व सहानुभूतिपूर्वक वागणूक पाहून कोर्टेझनें तेथें २१ एप्रिल रोजीं मुक्काम केला. हा प्रदेश मांटेझूमाच्या सार्वभौमत्वाखालीं असून तेथें एक मांडलिक राजा राज्य करीत असे. स्पॅनिश लोकांनीं तेथील लोकांस मनसोक्त गप्पा मारून खूप सोनें मिळविलें. कोर्टेझनें त्या मांडलिकाची आपल्या छावणींत भेट घेऊन स्पॅनिश बादशहाचा संदेश निवेदन करण्यासाठीं मांटेझूमाची भेट घेण्याचा आपला मनोदय असल्याचें त्यांस त्यानें सांगितलें. कोर्टेझच्या या इच्छेविषयीं आश्चर्य प्रदर्शित करून व त्यास साधनसामुग्री पुरविण्याविषयीं हुकूम देऊन तो राजा निघून गेला. कोर्टेझनें त्याच्या द्वारें मांटेझूमाकडे नजराणा पाठवून भेटीची याचना केली; व लौकरच मांटेझूमाचें होकार दर्शक उत्तर येईल अशी त्याची अपेक्षा होती.

(३)

तेव्हां आतां आपण मांटेझूमाकडे वळूं. हा राजा मोठा अंधश्रद्धावान असून आपला रागावून गेलेला देव आपल्या अनुचरासह परत येणार आहे या दंतकथेवर त्याचा मोठा विश्वास होता हें मागील प्रकरणांत सांगितलेंच. स्पॅनिश लोकांचा पहिला काफिला मेसिकोंत गेला त्यावेळीं हेच आपल्या देवाचे अनुचर होत अशी त्याची भावना झाली होती. कोर्टेझच्या अधिपत्याखालीं पुन्हां त्याच प्रकारचे लोक आल्यावर त्याची ती भावना जास्तच दृढ झाली; व स्पॅनिश लोकांना आपल्या देशांतून वेळींच हांकून देण्याचें सामर्थ्य अंगांत असूनही या भावनेस बळी

पडून त्यानें तसें केलें नाहीं. कोर्टेझनें भेटीविषयीं केलेल्या विनंतीस काय उत्तर द्यावें हा त्यास विचार पडला व आपल्या अनिश्चित मनस्थितीला अनुरूप असा अर्धवट मार्ग त्यानें स्वीकारला. कोर्टेझकडे नजराणा पाठवून त्यानें त्यास कळविलें कीं, माझ्या राजधानीपर्यंत येण्याचा मार्ग बिकट आहे; तेव्हां तेथपर्यंत येण्याचा प्रयत्न स्पॅनिश लोकांनीं न करतां तेथूनच परत जाऊन आपल्या बादशहास माझी स्नेहवृत्ति कळवावी. हा निरोप ऐकून स्पॅनिश लोकांच्या आशेस धक्का बसला व तद्देशीय लोकही त्यांस साधनसामुग्री पुरविण्यांत कुचराई करूं लागल्यामुळें मोठी अडचणीची परिस्थिति उत्पन्न झाली. परंतु, 'मला तेथपर्यंत येण्यास बिलकुल त्रास पडणार नाहीं; तरी परवानगी असावी,' असा कोर्टेझनें पुन्हां निरोप पाठविला. परंतु त्यास पुढें येण्यास सक्त मनाई असल्याबद्दलचें उत्तर आलें. तेव्हां त्यांचा हल्लीं मुक्काम होता त्याच्या उत्तरेस कांहीं अंतरावर एक राहण्यास सुखकर अशी जागा शोधून काढून त्या ठिकाणीं जाऊन राहण्याचें कोर्टेझनें ठरविलें.

अशा स्थितींत सेंपोआला येथील टोटोनॅक राज्याचे प्रतिनिधि कोर्टेझकडे येऊन त्यांनीं, " आमचे मेक्सिकन राज्याशीं हाडवैर असल्याकारणानें तुमच्याशीं स्नेह करण्यास आम्हीं तयार आहों " असा संदेश आणला. व कोर्टेझला आपल्या राजधानीस पाचारण केलें. अशा लोकांचा आपणास मोठा उपयोग होईल हें जाणून कोर्टेझनें सेंपोआला येथें जाण्याचें ठरविलें.

परंतु त्याच्या सैन्यांत आतां दोन पक्ष झाले होते. एक कोर्टेझ पक्ष. व दुसरा व्हेलास्केझ पक्ष. पैकीं दुसऱ्या पक्षानें अशी ओरड सुरू केली कीं, कोर्टेझला फक्त देश शोधून काढण्याला परवानगी मिळालेली होती. तेव्हां कोणाशीं स्नेह अगर शत्रुत्व त्यानें

करणें अयोग्य होय. अशा स्थितींत दुसरा मार्ग न उरल्यामुळें कोर्टेझनें व्हेलास्केझची सर्व सत्ता झुगारून देऊन आपल्या आधिपत्याखालीं तेथें एक वसाहत स्थापिली. व थोड्याशा दंडुकेशाहीनें ओरड करणारांना गप्प बसविलें.

नंतर ठरविल्याप्रमाणें तो **सेंपोआला** येथें गेला; तेव्हां तेथील लोक खरोखरच असंतुष्ट आहेत असें त्यास आढळून आलें. तेथील राजापासून मदतीचें अभिवचन घेऊन व त्याचा निरोप घेऊन कोर्टेझनें पूर्वी शोधून काढलेल्या ठिकाणीं मुक्काम केला. त्या ठिकाणीं तो तेथील उमराव व सेंपोआलाचा राजा यांच्याशीं बोलत असतां मांटेझुमाच्या वकीलांनीं अचानक येऊन तो सर्व प्रकार व स्पॅनिश लोकांना पोंचणारी मदत बंद करण्यास फर्माविलें. कोर्टेझनें त्या वकिलांस तेथल्या तेथें गिरफदार केलें; परंतु रात्रीं त्यांस सोडून देऊन नजरनजराण्यासह **मांटेझुमाकडे** त्यांची रवानगी केली. **मांटेझुमाचा** राग हें ऐकून प्रथम फार झाला. परंतु कोर्टेझनें आपल्याकडे वळवून सोडून दिलेले त्याचे वकील परत येतांच त्याचें चित्त पालटून त्यानें पुन्हां कोर्टेझकडे वकील पाठवून आपल्या बंडखोर मांडलिकाशीं स्नेह केल्याबद्दल निषेध व्यक्त केला. परंतु ' राजधानींत आल्यावर आपलें सर्व गैरसमज दूर होतील ' असा कोर्टेझनें उलट निरोप पाठविल्यामुळें स्पॅनिश लोकांच्या प्रभावाविषयीं टोटोनॅक लोक थक्क झाले.

येथेंही सामोपचारानें वळेना तेव्हां तेथें सत्तीनें ख्रिस्ती धर्म कोर्टेझनें स्थापन केला. ख्रिश्चन लोकांनीं देवालयांतून मूर्ति फेंकिल्या असतां मूर्ति कांहींच प्रतिकार करीत नाहींत हें पाहून लोकांचा आपल्या धर्मावरील विश्वास उडाला व त्यांनीं ख्रिस्ती धर्म स्वीकारला. एक स्पॅनिश लंगडा शिपाई त्यांचा धर्माधिकारी झाला.

यानंतर आपण आजपर्यंत केलेल्या सर्व कृत्यांस स्पॅनिश बादशहाची अनुमति मिळविण्यासाठीं आपले प्रतिनिधि स्वेनमध्यें कोर्टेझनें पाठविलें. आणि शिपायांना वेळोवेळीं परत जाण्याची इच्छा उत्पन्न होऊं नये एवढ्याकरितां त्यानें एक सोडून सर्व जहाजें तीं निरुपयोगीं झालीं आहेत या सबबीवर, त्यांतील सर्व लोखंडी सामान काढून घेऊन बुडवून टाकिलीं. व एक भाषण करून त्याच्या या कृत्यानें झालेली असंतुष्टता त्यानें पार नाहींशी करून टाकली. अशा रीतीनें मोठ्या धाडसानें कोर्टेझनें आपला पुढचा मार्ग सुलभ केला.

(४)

नंतर कांहीं लोक नवीन स्थापलेल्या वसाहतींत ठेवून व आपल्या बरोबरीच्या लोकांखेरीज आपल्या बंदुका व सामान नेण्याकरितां कांहीं टोटोनॅक लोक बरोबर घेऊन कोर्टेझनें १५ ऑगस्ट १५१९ रोजीं पुन्हां कूच केलें. बऱ्या वाईट रस्त्यानें जातां जातां मांटेझुमाच्या मांडलिकांच्या हाताखालीं असलेल्या व धनधान्यपूर्ण अशा एका शहरांत त्यानें चार दिवस विश्रांति घेतली. पुढील मार्गाविषयीं चौकशी करतां शहरांतील लोकांनीं चोलुला नांवाच्या प्राचीन शहरास जाण्याचा सल्ला दिला. परंतु कोर्टेझचे नवे दोस्त टोटोनॅक लोक यांनीं त्यास लास्कालन लोकांच्या प्रांतांत जाऊन त्यांच्याशीं स्नेह करण्याचा सल्ला दिला. चोलुलन लोक भित्रे व लबाड आहेत, आणि लास्कालन लोक शूर, धाडसी व विश्वासू आहेत या त्यांच्या बोलण्यावर कोर्टेझचा विश्वास बसून त्यानें आपले वकील लास्कालन राजाकडे पाठविले; व ते गेल्यानंतर २।३ दिवसांनीं हलीं लास्कालाला जो रस्ता जातो त्याच रस्त्यानें कडेकोट बंदोबस्तानें कूच केलें. कांहीं दिवसांनीं लास्कालन लोकांच्या

सरहद्दीवरील भिंतीशीं तो येऊन पोहोंचला. भिंतीबाहेर राहण्यापेक्षां आंत राहणेंच बरें असा विचार करून व विरोध होण्याचा संभव न दिसल्यामुळें त्यानें भिंत ओलांडिली व त्याच्या सैन्यानें लास्कालन भूमीवर पाय ठेवले.

स्पॅनिश लोक आल्याची वार्ता समजल्यावर त्यांच्याशीं कसें वागावें याविषयीं लास्कालन लोकांत द्विमत झालें. आपल्या येणार असणाऱ्या देवाचे हे अनुचर असल्याकारणानें त्यांच्यांशीं आपण सख्य करावें असें एका पक्षाचें म्हणणें होतें; तर हे लोक आपल्या देवाचे अनुचर नाहींत; कारण तसें असतें तर त्यांनीं आपल्याच देवालयांचा विध्वंस केला नसता; तेव्हां त्यांस आपण विरोधच करावा असें दुसऱ्या पक्षाचें म्हणणें असून या पक्षाला वृद्ध व तरुण क्विझकोटॅकॅटल हे असल्यामुळें त्यांच्याच म्हणण्याप्रमाणें वागण्याचें लास्कालन लोकांनीं ठरविलें.

भिंतीच्या आंत जातांच आसपासच्या लोकांनीं स्पॅनिश लोकांवर तुटून पडून त्यांचा एक घोडेस्वार जायबंदी केला. परंतु अग्निवर्षाव सुरूं होताच ते भिऊन पळून गेले. त्यांच्या पाठलागाच्या नादीं न लागतां कोर्टेझनें पुढें कूच केलें.

परंतु थोडा वेळ कूच केलें नाहीं तोंच त्यास लास्कालन लोकांच्या मोठ्या जमावानें प्रतिबंध केला. लढाई अत्यंत निकराची झाली. लास्कालन लोकांनीं असामान्य शौर्य दाखविलें तरी ५००।६०० स्पॅनिश लोक व २०००।२५०० टोटोनॅक्स यांनीं कमींत कमी ३०००० लास्कालन लोकांचा घोडेस्वार व अग्न्यस्त्रें यांच्या जोरावर पराभव केला. यांत लास्कालन लोकांच्या अपुऱ्या वस्त्रप्रावरणांनीं मदत केली. या लढाईत कोर्टेझनें एका बाजूस व तरूण क्विझकोटॅकॅटल यानें दुसऱ्या बाजूस शिकस्तीचे प्रयत्न केले;

परंतु लास्कालन लोकांचे उमराव व प्रमुख योद्धे पडल्यामुळें पूर्ण पराभव टाळण्यासाठीं किझकोर्टेकॅटल यानें आपलें सैन्य मागें घेतलें. संध्याकाळ झाल्यामुळें व जखमी लोकांची शुश्रूषा करावयाची असल्यामुळें कोर्टेझनेंही त्यांचा पाठलाग केला नाहीं.

इतकें शौर्य, इतकी चिकाटी, स्पॅनिश लोकांच्या शस्त्रास्त्रांविषयीं ॲनाहॉकमधील इतर लोकांस वाटलेल्या भीतीच्या लवलेशाचाही अभाव, शिस्त इत्यादि लास्कालन लोकांचे गुण पाहून असल्या लोकांचें सहाय्य आपल्यास मिळाल्यास किती उत्तम होईल हा विचार कोर्टेझच्या मनांत आला. परंतु प्रत्येक पाऊल पुढें टाकण्यास इतका विरोध होऊन इतका अट्टहास करावा लागणार कीं काय या चिंतेंत त्या रात्रीं त्याला अर्धवटच झोंप लागली.

दुसऱ्या दिवशीं (ता. ५ सप्टेंबर १५१९) सकाळीं लढाईस पुन्हां तोंड लागलें. किझकोर्टेकॅटल यानें फार कडेकोट तयारी केली होती. परंतु त्याला स्पॅनिश उच्च शस्त्रास्त्रांपुढें नमावेंच लागलें. शिवाय स्वतः कोर्टेझ पुढें झाल्यामुळें स्पॅनिश लोकही दुप्पट उत्साहानें लढत होते. इतक्यांत किझकोर्टेकॅटल याच्या उद्दाम वर्तनास कंटाळून एक उमराव आपल्या सैन्यासह निघून गेला; तेव्हां जवळ राहिलेल्या अर्ध्या फौजेसह चार तास जोरानें लढून त्यानेंही माघार घेतली. शत्रूचें अत्यंत नुकसान झालें असूनही स्पॅनिश लोक फार थोडे मृत्यु पावलें होतें. त्यांनाही कोर्टेझनें अत्यंत शुरपणें पुरलें; हेतु हा कीं, स्पॅनिश लोक मर्त्य आहेत असें कोणास वाटूं नये.

या संधीस कोर्टेझनें आपलें वकील पुन्हां लास्कालन दरबारीं पाठविलें. झालेल्या प्रकारानें गांगरून जाऊन लास्कालन लोकांनीं उपाध्यायास तोड काढण्यास सुचविलें. तेव्हां उपाध्यायांनीं, 'के,

लोक सूर्यपुत्र आहेत तेव्हां त्यांच्यावर रात्रीं हल्ला करावा" असा सल्ला दिला. लास्कालन लोकांत रात्रीं लढण्याची पद्धत नव्हती. तेव्हां रात्रीं लढण्यास मिळावें म्हणून तरुण क्विझकोटेंकॅटल यानें हा डाव केला होता. परंतु रात्रीच्या या हल्ल्यांतही लास्कालन लोकांना यश न येतां माघार खावी लागली.

सकाळीं कोर्टेझनें पुन्हां आपले वकील तहाकरितां पाठविले व लास्कालन लोकांनींही परत वकील तहासाठीं पाठविले. परंतु त्या वकिलांस थांबवून घेऊन पुन्हां एकदां आपला अपयशाचा डाग धुवून काढण्याचा प्रयत्न क्विझकोटेंकॅटल यानें केला. परंतु त्यांत त्याला यश आलें नाहीं.

स्पॅनिश लेखक क्विझकोटेंकॅटलच्या या वर्तनास रानटी, मूर्खपणाचें, व क्रूर अशीं विशेषणें देतात हें साहजिकच होय. परंतु विकाररहित मनुष्याला तें वर्तन निराळ्या प्रकारचें दिसेल. आपल्या सभोंवार पडलेल्या पडक्या व नाश पावलेल्या वस्तूमध्यें अत्यंत प्रौढपणें उभा राहणाऱ्या खांबाप्रमाणें उच्च व अजिंक्य अशा क्विझकोटेंकॅटलच्या वृत्तीचें त्याला कौतुकच वाटेल. स्पॅनिश लोकांनीं करुं घातलेल्या स्नेहाच्या विरल पडद्यांतून आपल्या राष्ट्राचा भावी नाश दिसण्याइतकी तीक्ष्ण व दूरदृष्टिपूर्ण बुद्धि त्याला त्याच्या वृत्तींत दिसून येईल. व आपलें राष्ट्र बंधमुक्त ठेवण्यासाठीं तळमळणारा व आपला असामान्य व अस्खलित उत्साह आपल्या राष्ट्रबंधूच्या हृदयांत उत्पन्न करून राष्ट्रस्वातंत्र्यासाठीं मरण्यास तयार असणारा जळजळीत व उदार देशाभिमान त्याला त्याच्या त्या वृत्तींत दिसेल.

शेवटीं यशाविषयीं निराशा होऊन क्विझकोटेंकॅटल स्वतः कोर्टेझकडे सख्य करण्यासाठीं आला. त्याचें निर्भय व भव्य तेज पाहून

स्पॅनिश लोकांच्या मनांतही त्याच्याविषयीं आदर उत्पन्न झाला. आजपर्यंत तह लांबविण्याच्या प्रयत्नाचा दोष कबूल करून, 'एकदां स्नेही झाल्यावर माझे देशबांधव फिरणार नाहींत,' असे त्यानें कोर्टेझ यास मोठ्या अधिकारी वाणीनें आश्वासन दिलें; व अशा तऱ्हेनें लास्कालन युद्धाचा शेवट झाला.

त्यानंतर लास्कालन लोकांच्या प्रामाणिकपणाविषयीं खात्री पटवून घेऊन कोर्टेझ लास्काला शहरास जावयास निघाला; व मोठ्या समारंभानें ता. २३ सप्टेंबर १५१९ रोजीं कोर्टेझनें आपल्या सैन्यासह लास्कालांत प्रवेश केला. हें शहर लष्करी दृष्ट्या फार मजबूत असें होतें. येथेंही ख्रिस्ती धर्म स्थापण्याचा कोर्टेझनें प्रयत्न केला. परंतु तो यशस्वी झाला नाहीं. या ठिकाणीं स्पॅनिश ऑफिसरांनीं लास्कालन उमरावांच्या मुलींशीं लग्नें केलीं; व अशा रीतीनें त्या विश्वासू लोकांमध्यें स्पॅनिश लोक सुखानें राहूं लागले.

(५)

अशा रीतीनें कांहीं दिवस गेल्यावर मांटेझूमाकडून पुष्कळ नजरनजराणा घेऊन वकील कोर्टेझकडे आले; व त्यांनीं त्यास चोलूला शहरावरून मेक्सिको शहरांत येण्याची विनंति केली. मेक्सिकन लोकांवर भरंवसा टाकण्यांत अर्थ नाहीं असें सांगून लास्कालन लोकांनीं कोर्टेझला परावृत्त करण्याचा शक्य तितका प्रयत्न केला. शेवटीं त्यांच्या हेरांनीं चोलूलाजवळ सैन्याचा मोठा जमाव झाला असल्याची बातमी आणल्यावर तर त्यांनीं कोर्टेझला जाण्यास फारच विरोध केला. परंतु कांहींही अडचणी आल्या तरी मेक्सिको शहरांत जाण्याचा त्याचा निश्चय असल्यामुळें व स्वतःच्या सामर्थ्यावर त्याचा पूर्ण भरंवसा असल्यामुळें लास्काला

राजधानींत प्रवेश केल्यानंतर तीन आठवड्यांनीं कोर्टेझनें पुन्हां कूच करण्यास सुरवात केली.

प्रकरण ३ रें.

मेक्सिको शहरांत प्रवेश व तेथून उच्चाटन.

ठरविलेल्या दिवशीं सकाळीं स्पॅनिश सैन्यानें चोलूला येथें जाण्यासाठीं कूच केलें. एवढ्याशा सैन्यांनिशीं मांटेझूमाशीं तोंड देऊं इच्छिणाऱ्या या लोकांबद्दल कौतुकपूर्ण आदर वाटून लास्कालन लोक त्यांच्या मागून जात होते.

चोलूला शहर फार प्राचीन, सुधारलेलें, कलाकौशल्याकरितां प्रसिद्ध परंतु लष्करी दृष्ट्या कमकुवत असें असून लास्काला शहरापासून अठरा मैल दक्षिणेस व मेक्सिको शहरापासून साठ मैल पूर्वेस वसलेलें होतें. या शहरांत कोर्टेझशीं लोक फार स्नेहानें वागले; परंतु मांटेझूमाकडून दूत आल्यावर त्यांच्या वागणुकींत फरक पडला. आपला विश्वासघात होणार अशी खात्री पटतांच दुसऱ्या दिवशीं कोर्टेझनें शहराची अचानक नाकेबंदी करून शहरांतील लोकांची अग्निवर्षावानें कत्तल केली. ६००० लोक मृत्युमुखीं पडल्यावर चोलूलन उमराव शरण आले व नंतर कोर्टेझनें शांतता प्रस्थापित केली.

या प्रकाराविषयीं नैतिक दृष्ट्या जरी भिन्न मतें झाली तरी मुत्सद्देगिरीच्या दृष्टीनें पाहतां सर्वांचें एकमत होईल. कारण त्यामुळें मांटेझूमाला असामान्य भीति वाटून या प्रकारांत आपलें

कांहीं अंग नाहीं असें त्यानें कोर्टेझ यास कळवून त्यासे राजधानीस येण्यास पाचारण केलें.

चोलूलांतून निघून मजल दर मजल करीत टेझ्क्यूको सरोवर व चाल्को सरोवर यांना जोडणारा जमिनीचा पट्टा ओलांडून झाल्यावर स्पॅनिश सैन्यानें इझ्टापलापन शहरांत तळ दिला. या शहराच्या भोंवतीं फार सुंदर बागा होत्या. या ठिकाणीं मांटेझूमाचा भाऊ व इतर मेक्सिकन सरदार यांनीं कोर्टेझचें फार मोठें स्वागत केलें. या शहरांतून मेक्सिको शहर स्पष्ट दिसत होतें; त्यांत प्रवेश करणें म्हणजे सिंहाच्या गुहेंत प्रवेश करण्यासारखें होय हें त्यास कळत असूनही त्यानें त्यांत प्रवेश करण्याचा निश्चय केला.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं, पुढें घोडेस्वार, मध्यें स्पॅनिश पायदळ व पिछाडीला लास्कालन लोक अशी व्यवस्था लावून कोर्टेझनें कूच करण्यास सुरवात केली. टेझ्क्यूको सरोवराच्या खाऱ्या पाण्यांतून जाणाऱ्या सरळ व अफाट पुलावरून मेक्सिकोकडे जात असतां पाण्याच्या पृष्ठभागावर वसलेलीं कित्येक गांवें त्यांस आढळलीं. लहान लहान होड्यांतून स्पॅनिश लोकांना पाहण्यासाठीं आलेल्या ॲझ्टेक लोकांनीं सरोवर फुलून गेलें होतें. अशा रीतीनें थोडक्याच वेळांत कोर्टेझ शहराच्या प्रवेशद्वाराशेजारच्या पुलाशीं आला. हा पूल काढतां घालतां येण्याजोगा असल्यामुळें त्याच्या मनांत कुशंका आली; परंतु लगेच मांटेझूमानें मोठ्या समारंभानें स्वतः त्याचें स्वागत केल्यामुळें त्यास विचार करण्यास वेळ न राहून त्यानें शहरांत प्रवेश केला. शहरांतील लहान मोठीं सुखकर घरें, मोठमोठे चौक, आडवे रस्ते व उभे कालवे; व रस्त्यांच्या आणि कालव्यांच्या संगमावरील पूल इत्यादि आश्चर्यजनक गोष्टी पाहत पाहत कोर्टेझनें त्याच्याचसाठीं तयार केलेल्या एका वाड्यांत प्रवेश केला. आपली

व्यवस्था लावण्यास त्याला थोडा वेळ देऊन मांटेझूमानें त्याला मोठ्या नजराण्यानिशी भेट दिली; दुसऱ्या दिवशीं कोर्टेझनेंही त्याला परतभेट दिली. या भेटींत त्यानें मांटेझूमाच्या मनांत ख्रिस्ती धर्मतत्वें बिंबविण्याचा प्रयत्न केला; परंतु त्यास यश आलें नाहीं; तेव्हां त्यानें आपल्या राज्याच्या मोठेपणाविषयीं पुष्कळ वर्णन करून अशा राज्याशीं सख्य जोडण्याचा त्यास उपदेश केला. त्यावर मांटेझूमानें उत्तर दिलें, "तुम्हालाहीं लोकांनीं सांगितलें असेल कीं, मी देव आहें; व सोन्याच्या राजवाड्यांत राहतों. परंतु तुम्हांला दिसतच आहे कीं, तें सर्व खोटें आहे. माझीं घरें मोठीं असलीं तरी तीं दगडामातीचींच आहेत व हा माझा हात तुमच्यासारखाच हाडामांसाचा आहे." असें म्हणून त्याला मोठा नजराणा देऊन मांटेझूमानें त्याची रवानगी केली.

अशारीतीनें ८ नोव्हेंबर १५१९ रोजीं स्पॅनिश लोकांचा मेक्सिको शहरांत प्रवेश झाला.

(२)

मेक्सिको शहर टेझ्क्यूको सरोवराच्या पश्चिम कांठावर वसलें होतें हें पहिल्या प्रकरणांत सांगितलेंच आहे. शहरांतून बाहेर जाण्यासाठीं सरोवरावर तीन लांब व मोठे पूल घातलेले असून त्यांमध्यें काढतां घालतां येणारे लहान सरपूल होते; व त्यायोगें शहराच्या संरक्षणाची चांगली सोय झालेली होती. सरोवराचें पाणी खारें असून त्याचें कित्येक रुंद पाट शहरांतून वाहत असत. हे पाट व दुसरे रस्ते या सर्वांचा रस्त्यांसारखा उपयोग होत असे; शहरांत पाणी लांबच्या एका गोड्या तळ्याचें नळ टाकून आणलें होतें. गांवांतील घरें एक प्रकारच्या ठिसूळ दगडाचीं बांधलेलीं असून त्यांत सौंदर्यापेक्षां दृढतेवरच जास्त लक्ष दिलेलें असें; व घरें चौकांचीं

असत. शहराचा परिघ नऊ मैलांचा असून राजानें नेमलेले अधिकारी शहराच्या आरोग्याकडे व शांततेकडे लक्ष पुरवीत.

मांटेझूमाचे अनेक वाडे असून ते त्याचा जनानखाना; त्याचें भांडागार; भोजनगृह; राहण्याची जागा; कचेरी इत्यादि कामांसाठीं उपयोगांत आणले जात. **एका वाड्यामध्यें मांटेझूमानें चमत्कारिक व वेड्यावांकड्या मनुष्यांचा संग्रह करून ठेवलेला होता.** या वाड्याभोंवतीं नानातऱ्हेच्या फुलझाडांनीं भरलेल्या बागाही होत्या. मांटेझूमाच्या रानटी वैभवाचें वर्णन करण्याची आमची इच्छा होती; परंतु त्यास स्थलावकाश नाहीं.

मांटेझूमाच्या मोठ्या इमारतीखेरीज शहरांतील मोठ्या इमारती म्हणजे देवालयें व बाजारची जागा होय. बाजारांत व्यापार पद्धतशीर चालत असून तो नेहमीं फुललेला असे. देवालयांतून निरनिराळ्या धार्मिक कार्याकरितां निरनिराळीं दालनें होतीं. अशा एका दालनांत बळी देणाच्या जागेवर रक्ताचा जाड थर बसला असल्याचें एका सैनिकानें लिहून ठेवलें आहे.

ॲझ्टेक लोकांच्या या आचारविचाराविषयीं किंवस वाटून स्पॅनिश लोकांनीं स्वतःचें एक चर्च बांधण्यास सुरवात केली. ज्या वाड्यांत त्यांनीं चर्च बांधण्यास सुरवात केली त्याच वाड्यांत काम चालूं असतां त्यास एक भुयार सांपडून त्यांत अपार संपत्ति आढळली. व स्पॅनिश लोकांनींही नीति अनीतीकडे न पाहतां तिचा खुशाल स्वीकार केला. चर्च तीन दिवसांत तयार होऊन स्पॅनिश लोक तेथें प्रार्थना करूं लागले.

एक आठवडाभर ॲझ्टेक लोक स्पॅनिश लोकांशीं मोठ्या स्नेहानें वागले. परंतु एवढ्या लोकांचा खर्च चालविणें त्यांना जडच होतें. तेव्हां त्यांच्या मनांत स्पॅनिश लोकांविषयीं साहजिकच वाईट विचार

येऊं लागले; क्यूबाचा गव्हर्नर दुसरा एखादा काफिला पाठवून अडचण उत्पन्न करील ही भीति; मांटेझूमावर अविश्वास इत्यादि कारणांमुळें मांटेझूमास आपल्या छावणींत आणून ठेवण्याचें कोर्टेझनें ठरविलें. स्वतः कोर्टेझनें त्याला ही गोष्ट सुचविली; व जबरदस्ती होण्यापेक्षां स्वतां होऊन जाणेंच बरें असें वाटून मांटेझूमा स्पॅनिश छावणींत आला. मेक्सिकन लोकांनीं विरोध करण्याचा प्रयत्न केला, परंतु मांटेझूमानें त्यांचें निवारण केलें. त्यानंतर कोर्टेझनें मांटेझूमाच्या प्रभावळींतील १०।१५ प्रबल उमरावांना त्याच्या देखत कांहींना कांहीं अपराधावरून फांशी दिलें. या गोष्टीमुळें मांटेझूमाच्या मनाची स्थिति इतकी चमत्कारिक झाली कीं, आपण बादशहाच नाहीं, असें त्याला वाटूं लागले, व कोर्टेझ परत जाऊं देत असतांही त्यानें जाण्याचें नाकारिलें.

अशा रीतीनें मांटेझूमा स्वतः होऊन स्पॅनिश छावणींत राहिला होता तरी टेइक्यूकोच्या राजाला तें मुळीच पसंत नव्हतें. स्पॅनिश लोकांना मेक्सिकन भूमीवर पाय ठेवूं देण्याविरुद्ध तो पहिल्यापासून होता. मांटेझूमाच्या या स्थितीचा त्यांच्या पुतण्याला—टेइक्यूकोच्या राजाला—साहजिकच राग येऊन त्यास त्यानें सोडविण्याचा प्रयत्न केला. तेव्हां कोर्टेझनें त्याच्या उमरावांना लांच लुचपत देऊन काकामा—राजा—ला कैद करून मांटेझूमापुढें आणून उभा केलें परंतु त्या वीरानें मांटेझूमाची त्याच्या तोंडावर निर्भर्त्सना केली; तेव्हां मांटेझूमाच्या संमतीनें त्यास कोर्टेझनें कैदेंत टाकलें; त्यानंतर त्यानें आपल्या सर्व शत्रूंना युक्तिप्रयुक्तीनें कैद करून मोठ्या मुत्सद्देगिरीनें थोडीशी स्वस्थता उत्पन्न केली.

अशा तऱ्हेनें मांटेझूमावर पूर्ण ताबा प्रस्थापित करून त्यांजकडून आपणाला इष्ट त्या वस्तु मिळविण्याचा कोर्टेझनें सपाटा

लावला. त्यानंतर सर्व मांडलिक व सरदार उमराव यांच्या समक्ष त्यानें मांटेझूमाकडून स्पेनच्या राजाचें आधिपत्य कबूल करविलें. आतां फक्त ख्रिस्ती धर्माची स्थापना मेक्सिकोंत करण्याची राहिली होती; व त्यासाठीं कोर्टेझनें मांटेझूमाजवळ पुष्कळ बोलणींही काढलीं. परंतु, कांहीं उपयोग होईना. शेवटीं मांटेझूमानें शहरांतील सर्वांत उच्च अशा एका देवालयाचा एक भाग स्पॅनिश लोकांस प्रार्थनेसाठीं दिला. परंतु त्यामुळें मेक्सिकन लोक चिडून गेले. व स्पॅनिश लोकांनीं आतां मेक्सिकोंत राहणें धोक्याचें आहे असें कोर्टेझ यास मांटेझूमानें बजाविलें. त्या संबंधांत कोर्टेझ चिंतेंत आहे तोंच त्यावर दुसरेंच एक संकट आलें.

(३)

कोर्टेझनें आपले प्रतिनिधि स्पॅनिश दरबारीं पाठविले होते हें दुसऱ्या प्रकरणांत सांगितलेंच. या प्रतिनिधींची दरबारांत दाद लागली नाहीं. क्यूबाच्या गव्हर्नरनें मात्र नॅरव्हेस नांवाच्या मनुष्याबरोबर ४००।५०० सैनिक देऊन कोर्टेझला अडथळा करण्यास्तव पाठविलें; व हा मनुष्य मेक्सिकोंत आल्याबद्दलची वार्ता कळल्यामुळें कोर्टेझला चिंता उत्पन्न झाली.

नॅरव्हेस प्रथम व्हिला रिका येथें उतरला; व तेथून त्यानें कोर्टेझकडे वकील पाठविले. परंतु परत पाठवितेवेळीं त्यांना पूर्ण आपलेसे करून कोर्टेझनें पाठविलें; व त्यांनीं नॅरव्हेसच्या सैन्यांत पुष्कळच फूट पाडली. त्यास पाठविल्यावर आपला मित्र ॲलव्हॅरॅडो याच्या ताब्यांत मान्टेझूमास ठेवून व चिनांट्ला प्रांतांतील आपल्या दोस्तांस बोलावणें पाठवून कोर्टेझ बऱ्याचशा सैन्यासह नॅरव्हेसला तोंड देण्यास निघाला.

सेंपोआलाच्या राज्यांत एका नदीपासून दीड कोसांवर एका

देवळांत नॅरव्हेसचा मुक्काम होता. या नदीशीं आल्यावर आपल्या सैन्याची पाहणी करून व अंमलदारांकडून एकनिष्ठेच्या शपथा घेऊन कोर्टेझनें रात्रीं नॅरव्हेसवर हल्ला करण्याचें ठरविलें. त्याच दिवशीं मोठें वादळ व पाऊस झाल्यानें नदीला पूर आला; व त्याच्या जोरावर नॅरव्हेस निश्चिंत होता. परंतु मोठ्या युक्तीनें नदी-पार होऊन कोर्टेझनें त्याच्यावर अचानक हल्ला केला. झकमक मोठी झाली; परंतु हल्ला अचानक आल्यामुळें नॅरव्हेसचा पूर्ण पराभव होऊन त्याच्याच सैन्यांतील लोक फुटून कोर्टेझला मिळाले. अशा रीतीनें हें महासंकट टळलें.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं आपली जास्त संख्या पाहून नॅरव्हेसच्या सैन्याला थोडें स्फुरण चढत होतें; परंतु त्याच वेळीं कोर्टेझच्या दोस्तांचीं सैन्यें त्याच्या मदतीस आल्यानें तो प्रसंग टळला. नंतर सर्व सैन्यास शांत करून त्यानें पुन्हां मेक्सिकोकडे कूच केलें.

(४)

मेक्सिकोंत आपल्या सैन्याविरुद्ध गडबड आहे अशा बातम्या त्याच्याकडे वाटेंतच येत होत्या. आपल्या राहिलेल्या सैन्याला ॲझ्टेक लोकांनीं वेढा घातल्याची बातमीही त्यास समजली. तेव्हां मोठ्या काळजीनें त्यानें २४ जून १५२० रोजीं पुन्हां मेक्सिकोंत प्रवेश केला. शहरांतील कित्येक पूल ॲझ्टेक लोकांनीं काढून टाकलेले त्याला आढळलें. ॲझ्टेक लोकांच्या मनांत असा वैरभाव उत्पन्न होण्याचें कारण मे महिन्यामध्यें एका सणाच्या दिवशीं देवालयांत ॲझ्टेक लोक नाचण्याचे रंगांत आले असतां ॲलव्हॅरडोनें त्यांची अमानुष कत्तल केली हें होय. या कत्तलीमुळें मेक्सिकन लोक चिडून गेले होते.

मेक्सिकन लोकांनीं आपला वेढा जास्तजास्तच दृढ केला व

शेवटीं प्रत्यक्ष हल्ल्यासही सुरवात झाली. सर्व काढते घालते पूल काढून स्पॅनिश लोकांचा बाहेर जाण्याचा रस्ता बंद केल्यावर असंख्य लोकांनीं स्पॅनिश लोकांच्या राहत्या वाड्यावर हल्ला केला.

हल्ल्यांवर हल्ले तोफांच्या जोरावर परतविले गेले. तरी हल्ले कमी होईनात. मेक्सिकन लोकांना तोंड देण्याचे असंख्य प्रयत्न कोर्टेझनें करून पाहिले; परंतु निभाव लागेना. मेक्सिकन लोक मागें परतत खरे; परंतु पुन्हां दुप्पट वेगानें हल्ला करीत. अशा स्थितींत स्पॅनिश लोकांचा निभाव कसा लागणार ? मांटेझूमानें स्वतः गच्ची-चरून समाजाला शांत करण्याचा प्रयत्न केला. आपल्या प्रिय बांदशहाला पाहून लोकांनीं लढाई क्षणभर थांबविली. परंतु लगेच एक गोळी येऊन मांटेझूमास जबर दुखापत झाली. या जखमेंत त्याचा अंत झाला. त्याचें अंतकाळचें वर्तन मोठें हृदयद्रावक आहे; परंतु या ठिकाणीं तें देण्यास सवड नाहीं.

मांटेझूमाच्या मृत्यूनंतर मात्र कोर्टेझची स्थिति फार काळजीची झाली. निरनिराळ्या तऱ्हेचे कोट करून त्यानें पाहिले. परंतु मेक्सिकन लोकांच्या आवेगापुढें त्याचें कांहीं चालेना. असंख्य मेक्सिकन लोक मारले गेले तरीही हल्ल्यांचा जोर कमी होत नाहीं हें पाहून कोर्टेझनें शहर सोडण्याचा विचार केला.

दक्षिणेकडच्या रस्त्यावर तीन ठिकाणीं काढघालीचे पूल लागत. त्या ठिकाणीं एक पूल तयार करून तो तीनदां उपयोगांत आणावा अशी योजना करून ज्याला जेवढी संपत्ति घेववली तेव्हढी घेऊन ठरविल्याप्रमाणें वाडा सोडून स्पॅनिश सैन्य पहाटें शहर सोडण्या-साठीं पुलाकडे निघालें. सँडोव्हलच्या हाताखालीं आघाडीवर २०० स्पॅनिश लोक; पिछाडीला ॲलव्हॅरॅडोच्या हाताखालीं तितकेच लोक व मध्यें खजिना, कैदी, लढाईचें महत्त्वाचें सामान व स्वतः कोर्टेझच्या

हाताखालील तुकडी अशी सैन्याची रचना केलेली होती. सैन्य पहांटेच्या प्रहरीं काढघालीच्या पुलाच्या पहिल्या ठिकाणीं आलें. पूल घातलेला होता; त्यावरून सर्व सैन्य पलीकडे गेलें; परंतु दुसऱ्या ठिकाणीं घालण्यासाठीं पूलच उपटेना. पूल पहिल्याच जागीं रुतून बसला !

सर्वत्र निराशा आणि धडपड पसरली; जो तो आपल्यास काय करतां येईल तें पाहूं लागला. आघाडीचे बरेचसे लोक परतीरावर पोहोंचले. कित्येक पोंचू शकले नाहींत. कित्येक पोंचून वर चढूं शकले नाहींत. अशा वेळीं त्यांच्या पळाची बातमी शहरांत पसरून असंख्यांत मेक्सिकन लोक होड्या काढून त्यांच्याशीं तोंड देण्यास आले. पाण्यांत मनुष्य व संपत्ति किती गेली; प्रेतांचा खच कसा पडला; कोर्टेझ मोठ्या मुष्कीलीनें पार कसा पडला वगैरेचें वर्णन हृदयद्रावक आहे. परंतु स्थलावकाशास्तव तें वाचकांच्या कल्पनेवर सोंपविणें भाग आहे. मात्र एका गोष्टीचा निर्देश अवश्य केला पाहिजे आणि ती ही:—

अॅलव्हॅरॅडोच्या हाताखालीं पिछाडी होती. आपल्या हाताखालचे सर्व लोक परतीरीं गेल्याखेरीज आपण परतीरीं जावयाचें नाहीं असा त्यानें निश्चय केला होता. त्याप्रमाणें तो दोन खाडे ओलांडून गेला. परंतु एव्हढें होईतों मेक्सिकन लोकांनीं त्यावर लगट केली. घोडा पाण्यांत घालून पलीकडे जाणेंच शक्य नव्हतें; कारण प्रेतांचा खच व मेक्सिकन लोकांचा अडथळा. अशा स्थितींत त्याचा तेथें अंतच व्हावयाचा. परंतु एक अलौकिक कृत्य करून त्यानें आपला प्राण वांचविला. दुसरा उपाय नाहीं असें पाहून निराश होऊन त्यानें आपला भाला जमीनीवर टेकला व त्यावर जोर देऊन त्यानें उडी मारली व परतीराला जाऊन त्यानें पाय

टेकले. हें पाहून स्पॉनिश व मेक्सिकन लोक चकित होऊन त्याजकडे पाहातच राहिलें. व 'हा खरोखर सूर्यपुत्र आहे' अशी मेक्सिकन लोकांनीं आरोळी ठोकली. या जागेस अद्याप 'अॅलव्हरॅडोची उडी' असें नांव आहे,

या खाड्याची रुंदी दिलेली नाहीं. परंतु ज्यांतून पोहून जातांना पलीकडे जाण्यापूर्वीच कित्येक लोक दमले, घोड्यांना सुद्धां जो ओलांडणें फार कठिण झालें; व ज्यांत अनेक मेक्सिकन होड्यांचा जमाव होऊं शकत होता तो फारच रुंद असला पाहिजे यांत शंका नाहीं.

नंतर मागें पुढें न पाहतां स्पॉनिश लोकांनीं पळ काढला. जवळच एका टेकडीवर त्यांना एक देऊळ दिसलें. तेथें मोठ्या श्रमानें चढून जाऊन त्यांनीं ठाणें दिलें. त्या ठिकाणीं त्यांस थोडी सुरक्षितता प्राप्त झाली.

या रात्रीला 'काळी रात्र' या नांवानें स्पॅनिश लोक संबोधतात.

दुसरा दिवस मेक्सिकन लोकांनीं शहर साफ करण्यांत घालविला; म्हणून स्पॅनिश लोकांवर हल्ला झाला नाहीं. परंतु मेक्सिकोंत राहणें सुरक्षित नसल्यामुळें जखमी लोकांना बरोबर घेऊन कोर्टेझनें मोठ्या कष्टानें कूच केलें. आडवाटेनें जातां जातां सातव्या दिवशीं मेक्सिको शहरापासून २५ मैल असणाऱ्या ओंटुबा दरींत तो आला. दरीवर चढून जातांच खालीं मैदानावर अफाट मेक्सिकन सैन्य आपलीच वाट पहात उभें आहे असें त्यास आढळून आलें. आपलें सैन्य चांगलें रचून व घोडेस्वारांची नीट व्यवस्था लावून कोर्टेझनें लढाई देण्याचा निश्चय केला. कारण त्याला दुसरा मार्गच नव्हता. सैन्याला चार प्रोत्साहनपर शब्द सांगून त्यानें जोराचा हल्ला केला. हल्ल्याच्या जोरामुळें मेक्सिकन सैन्याची फळी फुटलीसें वाटून

स्पॅनिश व लास्कालन लोक आंत शिरले; परंतु मेक्सिकन लोकांनीं लगेच सावध होऊन नेट धरल्यामुळें ते त्यांत गडप झालें. लढाई अत्यंत निकराची झाली. घोडेस्वारांनीं शौर्याची कमाल केली. तरी पण मेक्सिकन सैन्यापुढें त्यांचा टिकाव लागेना. सूर्य बराच वर आला; उष्मा जास्त होऊं लागला; लास्कालन व स्पॅनिश लोक दमूं लागले. जखमेशिवाय एकही मनुष्य राहिला नव्हता. कोर्टेझला तर दोन जखमा झाल्या होत्या आतां मृत्यूशिवाय मार्ग नाहीं असें प्रत्येकास वाटूं लागलें. इतक्यांत कोर्टेझच्या नजरेस मेक्सिकन सैन्याचा अधिपति पडला. आपल्या ४।५ कट्ट्या दोस्तांना बरोबर घेऊन त्यानें घोडे फेकले. माणसें तुडवीत; आडवे येतील त्यांना कापीत व जयघोष करीत तो एका क्षणाच्या अवधींत त्या सेनापतीशीं गेला व त्याला त्यानें डोळ्याचें पातें लवतें न लवतें तोंच जमिनीवर लोळविलें. त्याचे रक्षक भयचकित होऊन ती वार्ता पसरीत चोहोंकडे पळूं लागले. मेक्सिकन सैन्यांत एकच गोंधळ उडाला; व स्पॅनिश सैन्याला नवा दम आला. मेक्सिकन लोकांचीं त्यांनीं लांडगेतोड केली. मेक्सिकन सैन्य थोडक्याच वेळांत उधळून गेलें. अशा रीतीनें कोर्टेझच्या रणकौशल्यामुळें म्हणा अथवा त्याचें नशीब उदयास आलें होतें म्हणून म्हणा त्याला या लढाईत अपूर्व यश आलें. ही इतिहासप्रसिद्ध लढाई ८ जुलै १५२० या दिवशीं झाली.

(५)

परंतु या लढाईत जय आला तरी मेक्सिकोमध्यें राहणें कोर्टेझला मुळींच सुरक्षितपणाचें वाटेना नव्हतें. तेव्हां मोठ्या कष्टानें मजल दर मजल करीत मेक्सिको सोडून तो त्याचे दोस्त जे लास्कालन लोक त्यांच्या लास्काला प्रांतात आला. अशा रीतीनें कोर्टेझ मेक्सिकोंतून उच्चाटण झालें.

प्रकरण ४ थें.

मेक्सिकोचा विजयी वेढा.

(१)

लास्कालन लोक त्याचे खरे स्नेही होते. त्यांनीं त्याचें अत्यंत प्रेमानें स्वागत केलें. त्याची व त्याच्या खाण्यापिण्याची वैगेरे सर्व व्यवस्था त्यांनीं केली. त्यांच्यांपैकीं कांहींजणांना मात्र स्पॅनिश लोकांविषयीं वैषम्य वाटल्यावांचून राहिलें नाहीं. कारण एक तर स्पॅनिश लोकांना मदत करून त्यांचा लाभ तर राहिला; परंतु तोटाच झाला होता; व अशा स्थितींत त्याच स्पॅनिश लोकांना पोसणें त्यांना प्राप्त झालें होतें.

(२)

कोर्टेझ लास्कालांत दाखल होतो न होतो तोंच मेक्सिकोहून वकील येऊन, " स्पॅनिश लोक आपल्या धर्माचे शत्रु आहेत; तेव्हां आपले पूर्वीचे वैरभाव विसरून जाऊन त्यांच्याविरुद्ध लढण्यास तुम्ही आम्हाला मदत करा " अशी त्यांनीं लास्कालन लोकांना विनंति केली. या विनंतीला मान द्यावा असें तरुण क्विझकोटकॅटल याचें मत पडलें; परंतु मॅक्सिक्सा वैगेरे वृद्ध पुढाऱ्यांचें मत विरुद्ध पडून मेक्सिकन वकिलांना धुडकावून लावण्यांत आलें.

त्यायोगें कोर्टेझला धीर येऊन त्यानें आपल्याविषयीं ज्यांस वैषम्य वाटतें त्यांची सहानुभूति मिळविण्यासाठीं व शत्रूवर वचक बसविण्यासाठीं लास्कालन लोकांच्या साहाय्यानें त्यानें मेक्सिकोच्या आसपासच्या सर्व लहानमोठ्या मांडलिकांवर निरनिराळ्या स्वाऱ्या

केल्या; त्यांना पूर्ण पराभूत करून निःसत्व केलें व कांहींना आपले दोस्त करून घेतलें.

ओटुंबाच्या लढाईनंतर कोर्टेझचें भाग्य चांगलेंच उदयाला आलें. मांडलिकांवरील लढाईत जय येतो आहे तोंच त्याच प्रांतांत निराळ्या उद्देशानें आलेलीं ५।६ जहाजावरचीं माणसें व साधनसामुग्री युक्ति-प्रयुक्तीनें त्यानें आपलीशी करून घेतली. लास्कालन लोकही त्याच्या या विजयामुळें खुष होऊन त्याला खुल्या अंतःकरणानें मदत करण्यास तयार झाले.

(३)

अशा स्थितींत आतां चांगली तयारी करून पुन्हां मेक्सिकोवर हला करावा असा कोर्टेझनें विचार केला. मेक्सिको शहर सर्व बाजूनीं जलवेष्टित असल्यामुळें जहाजांतून हल्ला केल्यास फार फायदेशीर आहे हें ध्यानांत आणून त्यानें एक अपूर्व योजना केली.

मेक्सिकोचें दोस्त राज्य जें टेक्झ्यूको त्याचा राजा काकामा याचा प्रतिस्पर्धी इक्सलिल्क्सॉचिटल याच्याशीं दोस्ती करून कोर्टेझनें टेक्झ्यूको शहरांत ठाणें देण्याची व्यवस्था केली. लास्कालांत जहाजें तयार करून तीं टेझ्क्यूको सरोवरांत माणसांनीं वाहून आणून सोडावयाची अशी त्याची योजना होती.

या योजनेप्रमाणें जहाजें बांधविण्याची सुरवात करवून ता. २६ डिसेंबर १५२० रोजीं कोर्टेझनें टेझ्क्यूको शहरीं जाण्यासाठीं कूच केलें. बरोबर लास्कालन लोकांचें पुष्कळ मोठें सैन्य त्यानें घेतलें होतें. त्यासह तो ३१ डिसेंबर १५२० रोजीं टेझ्क्यूकोंत दाखल झाला.

शहरांत आल्यावर कोर्टेझनें लगेच त्याची बंदोबस्ती करण्यास सुरवात केली. एक आठवड्यांत तें काम संपलें. जहाजें येण्यास

अद्याप अवधि होता. तेव्हां जमिनीवरूनच कांहीं थोडी चढाई करावी या उद्देशानें त्यानें आपल्या अंमलदाराकडून २।४ ठिकाणीं चढाई केली. प्रत्येक ठिकाणीं त्यास तात्पुरतें यश आलें; परंतु त्यास लगेच प्रत्येक ठिकाणीं थप्पड खावी लागली. तेव्हां जहाजें येईपर्यंत तो स्वस्थ राहिला. शेवटीं एकदाचीं अवाढव्य लास्कालन सैन्या-निशीं जहाजें आलीं; तें पाहून त्याचा आनंद गगनांत मावेनासा झाला.

(४)

त्यानंतर जमिनीवरून व पाण्यांतून कोर्टेझनें मेक्सिकोला पक्का वेढा दिला. अनेक हल्ले प्रतिहल्ले झाले. एकदां हा पक्ष तर एकदां तो पक्ष विजयी असे. कित्येकदां कोर्टेझच्या जिवावरही प्रसंग येऊन गेले. मेक्सिकन लोकांचा राजा त्या वेळीं ग्वाटेमोझिन हा झाला असून, अत्यंत शूर, हुषार, चलाख व स्वाभिमानी अशा त्या राजानें कोर्टेझला फारच कौतुकास्पद रीतीनें तोंड दिलें.

अशा आणीबाणीच्या प्रसंगांत कोर्टेझला मारण्याचा तरुण क्झिकोटेंकॅटल यानें केलेला कट उघडकीस आला. कोर्टेझला हा उमदा, स्वाभिमानी, देशप्रेमी व दूरदृष्टि तरुण लास्कालन वीर मनापासून आवडत नसे. तेव्हां ही संधि साधून त्यास त्यानें देहांत शासन केलें. लास्कालन लोकांचें न्यायप्रेम विलक्षण होतें. स्वतः क्झिकोटेंकॅटल कां होईना; तो गुन्हेगार आहे असें सिद्ध होतांच त्याच्या शिक्षेस एकाही लास्कालनानें हरकत घेतली नाहीं. अशा रीतीनें ज्याच्या वजनानें कदाचित् लास्कालन लोक कोर्टेझला सोडून जाण्याचा संभव होता तो शूर वीर मारला जाऊन कोर्टेझचा एक मोठा चिंताविषय नाहींसा झाला.

हल्ले प्रतिहल्ले चाललेच होते. कोर्टेझनें शहरची आंता चांगलीच

नाकेबंदी केली होती. आंत अन्न व युद्धसामुग्री मुळीच पोचेना. लोकांचा सांठा संपत आला. अशा स्थितींत मेक्सिकन लोकांनीं होड्यांतून स्पॅनिश सैन्यावर हल्ला केला; परंतु त्यांतही त्यांचा पराभव झाला.

यानंतर मेक्सिकोंतील रहिवाशांची स्थिति मोठी अनुकंपनीय झाली. खाण्यास पुरेसें अन्न नाहीं; पाण्याचाही तोटा; लढाईत वेळोवेळीं अपयश. परंतु यामुळें मेक्सिकन लोकांनीं धैर्य मात्र सोडलें नाहीं. अत्यंत कठिण अंत:करणानें व अलौकिक निश्चयानें ते लढत होते. अशा स्थितींत स्पॅनिश लोकांनीं त्यांच्यावर चोहोंकडून एकदम हल्ला केला. परंतु या भल्या मोठ्या हल्ल्यांत मेक्सिकन लोक इतक्या त्वेषानें लढले कीं आजपर्यंत आक्रमिलेला सर्व प्रदेश स्पॅनिश लोकांना सोडावा लागला; व त्यांच्यांपैकीं कांहीं लोक कैदही झाले. त्यांस मोठ्या समारंभानें बळी देऊन मेक्सिकन उपाध्यायांनीं जाहीर केलें कीं, आठ दिवसांत देव येऊन मेक्सिकन लोकांची स्पॅनिश लोकांपासून सुटका करणार आहे.

यामुळें कोर्टेझची स्थिति फार नाजुक झाली. मास्कालन लोकांची धर्मश्रद्धा फार जबर असल्यामुळें उपाध्यायांचें हें भविष्य त्यांस खरें वाटून त्यांनीं कोर्टेझला सोडून जाण्यास सुरवात केली; व थोडक्याच वेळांत कोर्टेझचें गोरें सैन्य फक्त त्याजजवळ शिल्लक राहिलें. एवढें परिश्रम करून मिळाविलेलें यश जाऊन वर जीव जाण्याची पाळी येतें कीं काय अशी त्यास चिंता पडली.

उपाध्यायांचें हें भविष्य कोर्टेझला मुळींच खरें वाटलें नाहीं, तेव्हां त्यानें मास्कालन लोकांकडे जाऊन त्यांस विनंति केली कीं, " उपाध्यायांचें हें भविष्य खरें होणार नाहीं अशी मला खात्री आहे. तेव्हां तुम्ही शहराबाहेर थांबा. भविष्य खरें झाल्यास तुम्ही

परत जा. खरें न झाल्यास मग तरी तुम्ही मला मदत करूं शकाल.'' लास्कालन लोकांना त्यांचें म्हणणें पटून ते थोड्या अंतरावर थांबून राहिले.

आठ दिवसांत भविष्य खरें ठरलें नाहीं. लास्कालन लोक परत आले. अत्यंत निकराचा हल्ला करून स्पॅनिश लोकांनीं मेक्सिको शहर ताब्यांत घेतलें. शहरांत लोक अन्नाविणा पटापट प्राण सोडीत होते; तरी ते तह करण्यास कबूल होईनात. त्यानंतर स्पॅनिश लोकांनीं त्यांची अपूर्व व अमानुष कत्तल केली. ग्वाटेमोझिनशीं बोलणें करण्याचें कोर्टेझनें पुष्कळ प्रयत्न केले. परंतु त्यांत त्याला यश आलें नाहीं. शेवटीं त्यानें एक मोठा हल्ला करून सर्व शहर ताब्यांत घेतलें. परंतु सर्व लोक पळून गेल्यामुळें तें उद्ध्वस्त झालेलें होतें.

(५)

अशा रीतीनें स्पॅनिश लोकांनीं मेक्सिको देश काबीज केला. कोर्टेझनें पुढें काय केलें; या प्रांतांत वसाहत कशी झाली वगैरे हकीगती मनोरंजक आहेत. त्याचप्रमाणें देश काबीज करण्यास स्पॅनिश लोकांस कितपत हक्क पोंचतो; त्यांनीं केलेल्या कत्तली कितपत न्याय्य होत्या; इत्यादि प्रश्नांचें विवेचनही फार मनोरंजक तसें उद्बोधकही आहे. परंतु ही हकीगत या ठिकाणीं देण्याचा हेतु निराळा असल्यामुळें या मुद्द्यांविषयीं येथें लिहिणें योग्य नाहीं. सदर 'वृत्तान्त' वाल्मीकि रामायणाशीं त्याचें सादृश्य आहे हें दाखविण्याकरितांच केवळ लिहिला आहे; व तो वाचून रामायणांतील कित्येक अशक्य वाटणाऱ्या गोष्टी खरोखर तशा नाहींत हें वाचकांस कळून यावें हा तो लिहिण्याचा प्रमुख हेतु आहे. तेव्हां येथेंच थांबणें योग्य आहे.



समाप्त.

IRBK-0100296

IRBK-0100296